
१९८७ वर्षारंभ विशेषांक

रुपये २७

# माणूस



राष्ट्रपती आणि पंतप्रधान

## राजीव गांधी राष्ट्रपती झाले तर?



नमध्ये आम्ही काय पाहिले?
- डॉ. बेडेकर, ठाणे




बुनियाद
अथांग लोकप्रवाह

फअरफॅक्स, जर्मन पाणबुडी आणि बोफोर्स

यस्लर (मोटार कंपनी) कार्यालयात माझ्या टेबलावर कॉम्प्युटर नाही याचं लोकांना आश्चर्य वाटतं.
यशाची गुरूकिल्ली 'माहिती' नाही. ती आहे 'माणूस'.
ज क्रायस्लरमध्ये माझ्या हाताशी जेमतेम डझनभर तयार माणसे आहेत.
शी पंचवीस तयार माणसे हाताशी आली तर अमेरिकेचा गाडाही मी चालवून दाखवीन.

- ली अयाकोका



सागरमधल्या नेपाळ पॅलेसपासून
ग्वाल्हेरच्या जयविलास प्रासादापर्यंतचा
विजयाराजे शिंदे यांचा जीवनप्रवास म्हणजे
रोमांचक अनुभवांची एक अखंड मालिकाच.

योगायोगाने महाराणीचे दुर्मिळ वैभव
चरणांशी लोळण घेऊ लागले.
पाठोपाठ भेसूर विपदाही समोर उभ्या ठाकल्या.
मनाचा असह्य कोंडमारा करणाऱ्या.
प्रत्येक आव्हान म्हणजे आजवर जोपासलेल्या
मूल्यांची धगधगती कसोटाच.

या राजमातेने सदैव जपला
तो महादजी शिंदे यांच्या मर्दुमकीचा
वारसा सांगणाऱ्या स्वाभिमानी राजवंशाचा नावलौकिक.

सत्ताधाऱ्यांच्या सूडबुद्धीचे
सतत दाहक दर्शन घडत असतानाही
लाचार तडजोडीला निग्रहपूर्वक नकार देणाऱ्या
जिद्दी व्यक्तित्वाचे प्रांजल, प्रेरक दर्शन

# राजमाता

विजयाराजे शिंदे यांचे आत्मकथन

**लेखक : कर्नल मनोहर माळगावकर / रूपांतर वि. स. वाळिंबे**

**किंमत : रुपये शंभर**


## राजहंस प्रकाशन


☐ १०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०

☐ जोशी वाडी, ४१ भवानी शंकर रोड, दादर (प.) मुंबई ४०० ०२८

# देवा, आम्हाला तुमच्याविषयी आपलेपण कां वाटतं ?

आमच्या पिढीनं तुम्हाला पाहिलं नाही तुमचा आवाजही ऐकला नाही. बुजुर्ग लेखक–कलावंतांच्या आठवणींतून तुम्ही दिसता, ऐकू येता. असं तर कित्येकांच्या बाबतीत घडलंय्. भास्करबुवा बखले, भूगंधर्व रहिमतखाँ, अल्लादियाखाँसाहेब ही महाराष्ट्रातली किमान तीन माणसं आम्हाला पहायला, ऐकायला मिळाली पाहिजे होती. आज त्यांच्याबद्दल केवळ कल्पना करणं आणि त्यातून त्यांच्याशी आमचे जुळणारे लागेबांधे शोधणं एवढंच हातात आहे. तुमच्याशी आमचं काय नातं आहे, याचा शोध घेण्याचा नव्या पिढीचा प्रयत्न चालू असतो.

संगीत रंगभूमीला तुम्ही चिरस्थायी केलंत, नाट्यसंगीत नावाची वेगळी चीज रूढ केली, तिचं स्वरूप, बैठक स्पष्ट–निश्चित केली या गोष्टीही तुमच्या–आमच्या नात्याच्या संदर्भात आता कमी महत्त्वाच्या वाटतात. काळाच्या, त्या–त्या जमान्याच्या ओघात या गोष्टी मागे पडल्या आहेत. आज गंधर्वांची नाटकं, नाट्यसंगीत आम्ही ऐकतो, आदरानं, मुद्दाम ऐकतो. या सहज अभिरुचीपेक्षा काही तरी पुरातन archaic पाहतो आणि त्याला आपल्या सध्याच्या अभिरुचीबाहेर जाऊन कृत्रिम दाद देत आहोत ही जाणीव प्रकर्षानं होते तुमच्या नाटकांबद्दलही तेच. १९१०–१९४० या तीन दशकातल्या पिढीशी, त्यातल्या मध्यमवर्गाच्या आवड, आकांक्षांशी तुमच्या रुक्मिणी–भामिनी यांचा बेमालूम सांधा जुळत होता. आजच्या काळात तुमची नाटकं, तुमचा अभिनय, तुम्ही निश्चित केलेलं नाट्यसंगीत तेवढ्याच आवडीनं स्वीकारलं जावं हे तुम्हालाच मान्य होणार नाही. मग देवा, आम्हाला तुमच्याविषयी आपलेपण का वाटतं ? आपल्यात एवढं अंतर असूनही ? बुजुर्गांच्या मांगण्यानुसार तुमच्या काळात तुम्ही नाटकाला सजीव केलं होतं. नट, नाटककार, नाटक यांचा प्रभाव, त्यांच्याविषयी आकर्षण वाढवलं.



¤

जीवनात रसिकता आणली, तुमच्या भामिनी, रेवती, वसंतसेनेनं त्या काळातल्या स्त्री–पुरुष संबंधात माधुर्य, थोडं औदार्य आणलं. मात्र याचा जास्त खल होण्याऐवजी तुमच्या कंपनीचा थाट, त्यातला अमाप खर्च, हजारो रुपयांचे गालिचे, जेवणाचा थाट, तुपाच्या धारा, ते अत्तर–गजऱ्याचे सुवास, ते ऑर्गन–सारंगीचे सूर, तो मखमली पडदा या आठवणींमागेच तुम्ही दडून राहिलात. आमच्यापर्यंत पोचला नाहीत. या आठवणी, उसासे, अश्रुपात यांच्यापल्याड जावं लागेल.

आम्हाला आकर्षण वाटतं तुमच्या सुरांचं न ऐकल्या–देखल्या शुद्ध–निर्मळ सुरांचं. रहिमतखाँसाहेबांच्या सुरांचीसुद्धा अशीच आस आहे. केवळ वर्णनावरून तुमच्या निखळ सुरांचं तसंच. बुजुर्ग म्हणतात की, तुमच्या सहज गाण्यात पारदर्शी व शेवटपर्यंत निकोप–स्पष्ट राहणारा सूर आजही आठवतो. आजच्या गाण्यात देवा, हे निखळ साधेपण, पारदर्शीपण, प्रामाणिकता यांची कमतरता आहे. माणसं मैफिलीतसुद्धा नटव्या सुरांची आरास मांडतात. तुम्ही नाटकातदेखील सुरांशी जाऊन मिळत होतात-असं म्हणतात. भास्करबुवा गाण्यातली अस्ताई कशी भरत होते– तसंच तुम्ही हे कसं करत होता, ते आज कुठं मिळेल का ? याची तुम्ही रुखरुख लावून ठेवली आहे. या चिरंतन गोष्टी असतात, देश–कालाच्या पलीकडे

तुमच्या नाटकातल्या अनेक चिरस्मरणीय संवादापेक्षा तुमची एकच हाक आमच्यापर्यंत पोचली ' मायबाप, अन्नदाते हो ' हे तुमच्या रसिक–श्रोत्यांसाठी तुम्ही वापरलेले शब्द आजही आम्हाला हवेत. एवढा झगमगाट, वैभव यातूनही तुमचे रसिक–श्रोते व कलावंत यांच्यातल्या मूलभूत नात्याचं भान तुम्ही सोडलं नव्हतं. राजाप्रमाणंच कलावंतही शेवटी लोकांच्या रंजनासाठी असतो हे कठोर सत्य एवढ्या मुलायमपणं, अभिजातपणं कधीच पुढं आलं नाही. या नात्याचं भान ठेवताना स्वतःला काय तोशीस पडेल त्याचीही तुम्ही पर्वा केली नाही. भरजरी सेट, उंची अत्तरं, गालिचे असा षौक तुम्ही केला–तो तुमच्या मायबाप–अन्नदात्यांसाठी. तुम्ही म्हणायचा ' देवा, लोकांना चांगलं दाखवायला नको का?' तुमची मुलगी मरण पावल्याची बातमी आली न् तुम्ही ते ऐकूनही ' मानापमाना ' चा प्रयोग, त्यातली चतुर–गुणलुब्ध भामिनी रंगविली. कलाकार आणि रसिक यांच्यातलं हे नातं इतकं कठोर, परीक्षा घेणारं असतं. कलाविष्कार म्हणजे तीन तास येऊन पेशकारी करणं एवढंच नाही. नवा अनुभव यायचा–घ्यायचा असतो. प्रतिसृष्टी निर्माण करायची असते. एवढी दाहक, कस घेणारी निष्ठाच त्यात हवी. राजासारखाच कलावंतही अखेरीस उपभोगशून्य स्वामी असतो. तुम्ही हे जगून दाखवलं.

तुमची शताब्दी म्हणूनच आमच्या जिव्हाळ्याचा विषय होते. न देखल्या–ऐकल्या माणसाबद्दल ओढ असण्याचं नसता कारणंच नाही. तुमची नाटकं, नाट्यसंगीत यांनी आम्हाला आज भारावून जाणं होत नाही. काळाची अपरिहार्य गती आहे. पण ' माझ्या मायबाप–अन्नदातेही ' ही तुमची साद सतत टोचत राहील. दुसऱ्या बाजूनं आम्हीही तुम्हाला म्हणतो– ' देवा–' कलावंत–रसिकातलं हे सनातन नातं.

–संजय संगवई

२७

# माणूस

## वर्षारंभ विशेषांक

**जून १९८७**

### अनुक्रम


**चर्चा**

बुनियाद

राष्ट्रपती–पंतप्रधान संघर्ष

**लेख**

डॉ. अनिल सहस्रबुद्धे / १७

डॉ. बेडेकर/सु. ल. सोमण / २५

रंगा मराठे / २९

डॉ. अरुण बाळ / ७४

निरंजन आगाशे / ७७

फिरोझ रानडे / ८३

अवंती भावे / ८६

संजय संगवई / १

**कथा**

पंकज कुरुलकर / २२

श्रीकांत कार्लेकर / ४२

रघुपती भट्ट / ९४

**आत्मवृत्त**

ली अयाकोका / ४६



संपादक

**श्री. ग. माजगावकर**

सहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

या अंकाचे संपादन सहाय्य

**अविनाश कोल्हे**

मुखपृष्ठ व आतील चित्रे

**श्याम देशपांडे**

व्यंगचित्रे

**अभिमन्यु कुलकर्णी**

वर्ष : सत्ताविसावे

अंक : पहिला

किंमत : दहा रुपये

वार्षिक वर्गणी : साठ रुपये

पत्ता : १०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११ ०३०.

फोन : ४४३४५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे नियतकालिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

# प्रेरणा

स्वावलंबी अर्थव्यवस्थेची उभारणी या आपल्या मूळ राष्ट्रीय संकल्पापासून आपण फार दूरदूर वाहवत गेलो. याउलट चीनने हे उद्दिष्ट डोळ्यासमोरून जराही हलू-ढळू न देता गेल्या ४० वर्षांत आपला विकास साधला. परिणामी सर्व क्षेत्रात चीन आज आपल्या पुढे आहे. युद्धात, खेळात, अगदी जागतिक सत्ता म्हणूनही. अमेरिका, पाश्चात्य देश किंवा रशिया हे चीनला एक सत्ता म्हणून जितके महत्त्व देतात तितके आपल्याला बिलकूल देत नाहीत. कारण चीनने परकीय तंत्रज्ञान–भांडवल याची थोडी फार आयात करण्यास अलिकडे सुरुवात केली असली तरी आधुनिक चीन हा मूलतः आणि मुख्यत स्वतःच्या पायावर उभा आहे आपल्या अफाट लोकसंख्येचा वापर करून चीनने आपल्या विकासाचा स्वतंत्र मार्ग ठरवला, कठोरपणे तो अमलात आणला. आपण मात्र कधी रशियाचे, कधी अमेरिकेचे अनुकरण करण्यात धन्यता मानली, आशियाई देशाच्या विकास–प्रक्रियाचे एक जगन्मान्य अभ्यासक गुनार मिर्डाल यानी त्याच्या Asian Drama या ग्रंथाच्या दुसऱ्या भागात म्हणून ठेवले आहे की, ' It is in this sector (Agriculture) that the battle for long term economic development in South Asia will be won or lost.' चीनने विकास आणि संरक्षण या दोन्ही क्षेत्रात आपल्याला मागे टाकले, कारण मिर्डाल यानी दिग्दर्शित केलेले हे ध्रुवसत्य चीनने सतत डोळ्यासमोर ठेवले. नव्या चीनची उभारणी ग्रामीण भागाच्या पुनर्घटनेपासून सुरू केली. आता चीनची ही उभारणी पहिल्या टप्प्यापर्यंत आली असल्याने थोडे बाहेरचे वारे चीनने आत घ्यायला सुरुवात केलेली दिसते. चीनला भेट देणाऱ्याची संख्या हळूहळू वाढत आहे गेल्याच वर्षी ठाण्याचे प्रख्यात प्राच्यविद्या अभ्यासक डॉ. बेडेकर व त्याचे काही सहकारी चीनला जाऊन आले या अकात दिलेली त्याची सविस्तर मुलाखत वाचून कोणाचेही डोळे उघडायला हरकत नाही, इतकी ती परखड आणि आत्मपरीक्षणास उद्युक्त करणारी आहे. सर्व क्षेत्रात योजनाबद्धरीतीने पुढे जाणाऱ्या चीनशी आपली गाठ आहे हे आपण उत्साहातिरेकात विसरू तर ६२ ची पुनरावृत्तीही अटळ ठरेल तिबेट जोवर चीनच्या ताब्यात आहे तोवर आपल्याला लष्करी दाबाखाली ठेवणे चीनला केव्हाही सुलभच जाणार आहे हा भूगोल आपण काही बदलू शकत नाही. पण माणसाच्या प्रेरणा, मनुष्यबळाचे नियोजन बदलता येते. तेही आपण करत नाही–गप्पा मात्र भारतीय संस्कृतीच्या किंवा अध्यात्माच्या थोरथोर ठोकत असतो. एकीकडे दुष्काळ, पाणीटंचाई, गर्दीने दाटलेली शहरे आणि दुसरीकडे पंचतारांकित हॉटेलांची, मोटार गाड्यांची, टिव्हीची, मऊमुलायम वस्त्राची रेलचेल अशी आपल्यासारखी हालत चीनने करून घेतली नाही– कारण पहिल्यापासून ग्रामीण वास्तवाचे भान चीनला होते– आपल्याला नव्हते हे भान जोवर आपल्याला प्राप्त होत नाही तोवर अरूणाचलममध्ये घुसलेल्या चीनला बाहेर हाकलण्याची मानसिक व भौतिक ताकद आपल्यात निर्माणच होणार नाही सैन्य आपले शूर व देशभक्त असेल– आहेही. पण सैन्यामागे एकसंध जनता उभी राहावी लागते. राज्यकर्ते भ्रष्टाचारात बुडालेले; उद्योगपती परदेशी चैनीच्या वस्तू, तयार तंत्रज्ञान आयात करण्यात दंग असलेले; देशात धार्मिक–जातीय दंगली चालूच. मग सैन्य लढणार कोणासाठी ? अगदी अल्पसंख्याकाचा प्रश्न चीनने कसा सोडवला हेही डॉ. बेडेकरानी आपल्या मुलाखतीत लख्खपणे सांगून टाकलेले आहे. वाचकाना म्हणूनच ही मुलाखत विचार प्रवर्तक व अंतर्मुख करणारी वाटेल असा विश्वास वाटतो

दुसऱ्या टोकाची प्रवृत्ती म्हणजे ली अयाकोका याचे आत्मकथन ते केवळ रंजक नाही तर उद्बोधकही आहे. अमेरिका आज सत्तासंपत्तीच्या शिखरावर पोचलेला एक देश आहे, याचे कारण तो केवळ दुसऱ्या किंवा तिसऱ्या जगातील देशाचे शोषण करीत असतो, हे नाही अमेरिकन माणूस साहसप्रिय आहे, परिस्थितीची आव्हाने स्वीकारून नवी झेप घेणारा आहे, त्याच्याजवळ धडाडी–कल्पकता आहे, तो विज्ञान आणि संशोधनावर भर देणारा आहे हे अमेरिकेच्या या डोळे दिपवणाऱ्या प्रगतीमागील रहस्य आहे. ही आत्मकथा फार प्रकर्षाने हे जाणवून देते.

इतरही खूप साहित्य या विशेषाकात आहे गेल्या दोन/चार महिन्यात गाजलेली प्रकरणे आहेत, ' बुनियाद ' या टि. व्ही मालिकेच्या लोकप्रियतेवर थोडी टीकाटिप्पणी आहे; कथा, व्यंगचित्रे, लेख वगैरे नेहमीचे प्रकार आहेतच.

माणूसचा गेल्या वर्षभर चाललेला हा विशेषाक प्रयोगही वाचकाना आवडलेला दिसतो हा प्रतिसाद पाहता सध्या तरी आणखी काही काळ हा प्रयोग चालू ठेवावा असे वाटते.

यापुढील अक मात्र दिवाळी विशेषाक.

वाचकाकडून, हितचिंतकाकडून गेली सव्वीस वर्षे जशी साथ लाभली तशीच ती यापुढेही लाभावी, ही विनती.

–संपादक




## आपण सारे हवेलीराम, रोशन, शामलाल, लोचन आहोत ! लाजोजी कुठे आहे ?

• पंढरीनाथ सावंत •


'बुनियाद' चा शेवटचा हप्ता काही मुंबईकरांना धडपणी पहाता आला नाही. ८–४० चे 'समाचार' जेमतेम ८–५० ला टेकतात ना टेकतात तोच वीज गेली. ती १०–१० ला आली नि पाच मिनिटात परत जाऊन १०–४५ ला आली. मी गिरणगावातल्या एक पत्रा चाळीत राहतो. ते एक खेडेच आहे. परंतु तिथली प्रतिक्रिया मोठी विलक्षण होती. कित्येकांना हिंदुस्थान–पाकिस्तानची लढाई झाल्यामुळे 'लाइट हाप केला' असे वाटण्यापर्यंत मजल गेली. पण खरे दुःख होते 'बुनियाद' चा शेवटचाच हप्ता नेमका बुडाल्याबद्दल. त्यामुळे कुणी युद्ध सुरू केल्याबद्दल पाकिस्तानला शिव्या दिल्या. एक समाजवादी आहेत ते राहून राहून हुंदका यावा तसे म्हणत होते 'राजीव गांधीला सत्तेवर राहाण्याचा अधिकार नाही त्याला अक्कल असती तर युद्ध झाले नसते.' युद्ध झाले नाही हे अर्ध्या तासात सिद्ध झाले. पण प्रत्येकाने आपापल्या स्वभावाप्रमाणे, टाटा, बीईएस्टी, वीजमंडळ, शंकरराव चव्हाण वगैरेंना इरसाल शिव्या दिल्या. राग 'बुनियाद' मध्ये वांधा पडल्याचा होता. अन्यथा या अंधाराचा फायदा घेऊन अनेकांनी अनेक उद्योग केले असते. मुंबईतले चोर देखील 'लाइट कवा येतो' याची बुनियादसाठी वाट पहात असावेत. कारण सकाळी चोऱ्यांच्या बातम्यांचा खच पडायला हवा होता तो पडला नाही. उलट गुन्ह्यांच्या बातम्या कमीच होत्या.

बुनियादबाबत सर्वसामान्य प्रतिक्रिया अशी आहे. ही मालिका बांधीव नव्हती, पसरट होती. नको त्या पात्रांवर फाजील 'फूटेज' खर्च केले होते. काही पात्रे उपरी होती, नको तिथे लांबण होती, वगैरे अनेक आक्षेप तिच्यावर घेतले गेले. तरीपण तिचा प्रत्येक हप्ता पहायला माणसे जिथे असतील तिथून जवळच्या टी. व्ही. सेटवर जात. अनोळखी घरात घुसत हे प्रकरण किती जोरदार होते याचे उदाहरण सांगतो. आमच्या कंपाउडात मुले शिवजयंती व्याख्यान माला चालवतात. तिच्यासाठी क्रिकेटचे रामशास्त्री माधव गोठोसकर यांना आमंत्रण द्यायला गेलो. त्यांनी ते स्वीकारले, पण म्हणाले, 'मंगळवार शनिवार नको.' का ? तर 'बुनियाद' असतो. लोक तो झाल्याशिवाय येत नाहीत.' मग हसून म्हणाले, 'मलाही पहायचा असतो. चुकवीत नाही.'

माझीही अवस्था वेगळी नव्हती. गेल्या २० वर्षात मला सिनेमाबद्दल 'कडी नफरत' पैदा झाली आहे. पहायचे सोडून दिले आहे. पण बुनियादचा एक हप्ता चुकवायचे जीवावर येत होते. नाइलाजाने चुकला तर जीव चरफडत असे. या मालिकेत अनेक दोष होते. पण ती पाहिल्याशिवाय राहावत नव्हते याचे कारण काय ?

स्वातंत्र्याआधीची ४० वर्षे आणि नंतरची ३० वर्षे इतक्या काळातल्या भारतीय समाजाचे चरित्र 'बुनियाद' मध्ये सांगितले होते. या समाजाचे अनंत गुणदोष मान्य केले तरीही तो अनंत आहे हे अमान्य करता येणार नाही. त्याचा हा अनंतपणाच मला 'बुनियाद' कडे खेचीत होता. ही मालिका पहाताना मला मार्क ट्वेनचे उद्गार सतत आठवत. तो म्हणतो–

'भारत हा एक अफाट, अथांग लोकप्रवाह आहे त्यात बुडी मारताना हाताला काही लागलेसे वाटते. आणि मग लक्षात येते की, हे काहीच नाही. आणखी किती आहे,



मजहर खान, नीना गुप्ता, अनिता कंवर, आलोकनाथ

□

काय आहे, कसे आहे, काहीच कळत नाही. तुम्ही भांबावून मध्ये उभे असता. तुमच्या भोवती सगळीकडे हा लोकप्रवाह असतो. आवाज न करता तो पाहात असतो संथपणे. तो पाहात आहे हे देखील कळत नाही. एकदा दोनदा पाहून भारत कळायचा नाही. त्यासाठी भारतातच अनेकदा जन्म घेतले पाहिजेत.'

बुनियाद पहाताना हा लोकप्रवाह दोन वेगवेगळ्या वळणांवर दिसतो. आधी तो स्वातंत्र्यासाठी ब्रिटिश साम्राज्याच्या खडकाशी टकरा घेताना दिसतो. त्याला कपाळमोक्षाची पर्वा नाही. पण ते स्वातंत्र्य हाती येताच त्यातले स्वार्थी मगर शिरजोर बनतात. स्वातंत्र्य हे जणू काही 'वसूल करण्या' साठी मिळवले होते असे लोक वागायला लागतात. आपल्या कुरणात ब्रिटिश चरत होते. आता यथेच्छ चरायचा हक्क आपला आहे असे काही लोकांना वाटायला लागते. स्वातंत्र्यासाठी त्यागही केलेल्यांपैकी काही लोक स्वार्थाने पागल झालेले दिसतात. हे तुम्ही आम्हीही पाहातो आहोत आणि व्यथित होतो आहोत. हवेलीराम या व्यथित होणाऱ्यांपैकीच एक आहे. त्याने स्वातंत्र्यासाठी त्याग केलेला आहे. एक सून मुलाला पैसे खायला सांगते आहे, दुसरा मुलगा कोट्याधीश बनण्याखेरीज कसले स्वप्न पहात नाही, स्वातंत्र्य लढ्यातले एकेकाळचे सहकारी कंत्राटे मिळवण्याच्या मागे आहेत. हवेलीराम व्यथित होतो आहे पण काही करीत नाही.

यातली लाजोजी ही भारतमाता आहे. ती मास्टरजीला बजावते. सारे काही बिघडत चालले म्हणून तू नुसता चडफडतोस, पण काही करीत नाहीस. मला कशाचा लोभ नाही या सबबीवर मैदान सोडून पळतोस. मास्टरजी राजकारणात उतरतो. मंत्री होतो. त्याच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप होतात. चौकशीत तो निर्दोष ठरतो.

असा हा लोकप्रवाह ! यात शुद्ध असलेल्या सीतेलाच आपल्या शुद्धतेचा पुरावा देण्यासाठी दिव्ये करावी लागतात. तीदेखील अशुद्ध लोकांनीच घेतलेल्या आक्षेपांपायी.

तरी देखील या मालिकेच्या शेवटी लाजोजीची हाक शिल्लक राहाते. राष्ट्र स्वार्थाने, भ्रष्टाचाराने बुजबुजले तरी देखील आपण ओंडक्यांसारखे या प्रवाहात वाहतोच आहोत, राज्ययंत्रात दोनचार शुद्ध माणसे जाऊन भागत नाही. समाजच शुद्ध पाहिजे. लोकशाहीत लोकांचे प्रतिनिधी राज्य करतात. ते लोकांचेचे गुणदोष घेऊन सत्तेत जातात. समाजाने स्वतःला शुद्ध करावे लागते संत आणि महात्मे प्रत्येक शतकात होत नाहीत. 'मैदान सोडून भागणाऱ्यां' चा समाज सुधारत नाही. स्वातंत्र्यलढ्याच्या काळात या समाजाला उद्दिष्ट होते. म्हणून विकार मागे पडले होते. आज उद्दिष्टच नाही. असा हा 'चालिला जनांचा प्रवाहो' म्हणजे 'बुनियाद'! एवढेच मला या क्षणी वाटत आहे.

आम्ही प्रत्येकाने उद्दिष्टाचा विचार केला नाही तर आहे हे असेच चालणार ! चोरांनीच चोरांना शिव्या द्यायच्या–नि सावांनाही द्यायच्या. बहुसंख्य सावांनी 'ये क्या हो रहा है' म्हणून हात झाडायचे. त्यामुळे 'बुनियाद' टी. व्ही. वर संपली तरी व्यवहारात चालूच राहाणार आहे. □

# बुनियादमधली लाजो.... अनिता कँवर

• प्रा. जया वैराळे •

एपिसोड क्रमांक १०४... आणि 'बुनियाद' ही लोकप्रिय मालिका संपणार. पारिवारिक मनोरंजन करीत असतानाच, प्रेक्षकामध्ये अभिरुची निर्माण करुन... त्याची मने जिंकून, त्यांच्या हृदयात अढळ स्थान मिळविणाऱ्या दूरदर्शन मालिकांपैकी सर्वात अधिक लोकप्रिय ठरलेली मालिका म्हणजे 'बुनियाद'

'स्वप्नाची......आठवणीची.. ...प्रेमळ नात्याची सुंदर रुपं होऊन साकार झालेली बुनियाद सर्वांना आपलेसे करते त्यातील सुखद क्षण, दु:खाचे अश्रु, फाळणीच्या वेदना, चढाओढ, वादविवाद, भांडण, स्वार्थ, फसवणूक, राजकारण, प्रेम आदी आयुष्याचे सारे रंग भारतीय कुटुबानी गेल्या काही दशकाल अनुभवलेले व सोसलेलेही.

आजोबा–आजीचा काळ, आई–वडिलाच्या काळातील सघर्ष, परिवर्तन आणि आजच्या पिढीच्या समोरील आदर्श समस्या, राजकारण आणि परिस्थितीचे हुबेहुब चित्र उभे करण्याचा यशस्वी प्रयत्न बुनियादने केला. कलारंग कुटुब प्रमुख रमेश सिप्पी यांनी या मालिकेच्या सर्व कलारगाना अभिनय प्रदर्शनासाठी भरपूर वाव दिला आणि अनेकाची अभिनयक्षेत्रात भक्कम 'बुनियाद' ही तयार केली. सर्व कलारग त्या त्या भूमिकेशी एकरुप होऊन गेलेत. 'लाजो' ही त्यापैकीच एस् एस्. लाजो उर्फ अनिता कवर.

अनिताला केवळ एका लाजोनेच आज कलाकार म्हणून नाव, पैसा व लोकप्रियता मिळवून दिली आहे. अनिताने आपल्या उत्कृष्ट अभिनयाने 'लाजो' प्रेक्षकासमोर जिवत केली आहे. नुकतीच तरुण वयात पदार्पण करणारी लाजो. एक प्रणयी स्वप्न रंगविणारी तरुण लाजो. सामाजिक रुढी, परंपराच्या प्रवाहाविरुद्ध पोहणारी 'लाजो.' एक प्रेमळ आई, एक शिक्षिका, एक सहृदय समाजसेविका. एवढ्या विविधतेने घडविलेली चारित्र्यवान लाजोची भूमिका उत्कृष्ट झाली आणि म्हणूनच तिला भेटण्याची इच्छा तीव्र झाली. अनिताला फोन करून मी आपली इच्छा व्यक्त करताच तिने ह्या भेटीच्या कल्पनेचे स्वागत केले व म्हणाली,

'आपसे मिलकर बहोत खुषी होगी, लेकिन मैं आजही बम्बईसे बाहर जा रही हूँ। .. मी पुढे काही बोलणार इतक्यात तीच म्हणाली

'आप, अभी, इसी बख्त आ सकेगी ?'

...आणि पुढच्या पधरा मिनिटातच मी तिच्या नविन घेतलेल्या फ्लॅटची बेल वाजविली

हसतमुखाने माझे स्वागत करीत अनिता म्हणाली... 'बस्स, सामानही पॅक कर रही थी. शामको ६–३० की फ्लाईट है।' तिच्या बोलक्या डोळ्यात स्वागत पाहून मी आनदले पण आज तिला प्रत्यक्ष पाहताना वाटले, चित्रपटासाठी लागणारी फिगर मात्र तिच्याकडे नाही मी ह्या विचारात असतानाच ती म्हणाली.

'पुछीए...' आणि पुन्हा ते हळुवार हास्य.

तरीही माझे विचार चालूच होते..

'आज चित्रपटातील नट्या म्हणजे पूर्वीसारख्या शोभेच्या बाहुल्याच राहिलेल्या नाहीत. फोटोजनिक चेहरा, मादक शरीर या तथाकथित पारिभाषेच्या फार पलिकडे जाऊन पोहचली आहे आजची नायिका. जया, स्मिता, शलाका सारख्या श्रेष्ठ अभिनेत्रीनी.. बोलके डोळे, आव्हानात्मक भाव प्रदर्शन...ह्या कुवतीवर आपले एक अढळ स्थान निर्माण केले आहे आणि अनिता सारख्या येऊ पाहणाऱ्या अभिनेत्रीचा मार्ग मोकळा केला आहे

तरीही मी मुद्दामच तिला छेडण्यासाठी विचारलं...

मी : फिल्मसाठी आवश्यक असणाऱ्या ग्लॅमरबद्दल तुझे काय मत आहे ?

ती : ग्लॅमर प्रयत्नानी मिळवता येते. त्यासाठी प्रयत्न मात्र प्रामाणिक असायला हवे मला ग्लॅमरस भूमिकापेक्षा चांगल्या भूमिका करायच्या आहेत. त्याचबरोबर कमशिअल चित्रपटातही नाव मिळवायचं आहे.

मी आपण एक उत्कृष्ट अभिनेत्री व्हाव... हेच तुझे बालपणापासूनचे स्वप्न आहे का ? की लहानपणी तू दुसरा काही विचार, स्वप्न उराशी बाळगले होतेस ?

ती : मी लहानपणी कुठलाही असा विचार केला नव्हता. अशी कुठलीही महत्त्वाकाक्षा शालेय जीवन सपेपर्यंत माझ्या मनात निर्माण झाली नाही.

मी : शाळेत शिकत असताना रंगभूमीवर कामे केली आहेत का ?

ती : होय. लहान–मोठ्या नृत्यनाटिकामधून कामे केली आहेत... हौसेपेक्षा...सधी मिळत गेली म्हणून

मी : शालेय जीवनातील सर्वात प्रिय गोष्ट कोणती ?

ती : खेळ. माझ्या शालेय जीवनात मी एक खेळाडू म्हणून परिचित होते मी माझ्या शाळेची 'स्पोर्टस् कॅप्टन' होते. व्हॉलीबॉल हा माझा सर्वात आवडता खेळ मी एक चागली अॅथलेटही होते. स्प्रींटिंग आणि भालाफेक ह्यामध्ये माझा चागला सराव होता तेव्हा अभिनयाचा एव्हढा जबरदस्त प्रभाव आपल्यावर पडेल व आयुष्याला एक वेगळी दिशा मिळेल असे स्वप्नातही वाटले नव्हते

मी : मग, अभिनयाचे हे वेड कुठे व कसे लागले ?

ती : मी कॉलेजच्या शेवटच्या वर्षाला असताना.

एक दिवस मी 'मिस् ज्युली' हे नाटक पाहिले. त्यातला किरण ठाकूरचा अभिनय पाहून मी खूप प्रभावित झाले. मलाही अभिनय करावा असे वाटू लागले आणि मी निश्चय केला... अभिनय शिकण्याचा...मी N S D. मध्ये दाखल झाले.

मी : N. S. D. त असताना अभिनय

करण्याची संधी व प्रगती कशी काय घडत गेली.

ती : N. S. D. मध्ये अभिनयाचे प्रशिक्षण सुरू असताना एका व्यावसायिक नाटकात काम करण्याची संधी मिळाली. नाटकाचे नाव होते... 'मेन विदाऊट शॅडोज'... ह्या नाटकाच्या निमित्ताने मला माझ्या अभिनयाचे प्रदर्शन करता आले. त्यानंतर अनेक नाटकातून काम केली... आणि हो... पैकी प्रत्येक ठिकाणी मी प्रमुख भूमिकाच केल्या.

मी : मग ?...पुढे ..

ती : ८१ साली मी मुंबईत आले, चित्रपट सृष्टीत नाव मिळवण्याची महत्त्वाकांक्षा घेऊन.

मी : तुझा पहिला चित्रपट कोणता ?

ती : प्रथम (आधार शिला) ह्या चित्रपटांत मला लहानशी भूमिका मिळाली. त्यानतर श्याम बेनेगल बरोबर मँडी, यु सुमनसारखे चित्रपट, पण त्यातली माझी भूमिका जवळ जवळ नगण्यच. वर्षा मागून वर्ष जात होती ..नैराश्य वाढत होतं...पण त्यावेळी शबाना आझमीने मला धीर दिला. एक नवा आत्मविश्वास दिला. म्हणूनच सहा वर्षे मी इथे धडपड करत जगू शकले—

मी : 'बुनियाद' मधली लाजोची भूमिका तुझ्याकडे कशी काय आली ?

ती : अर्थातच... ती सुद्धा शबानाचीच मेहरबानी तिच्यामुळे जावेद साहेबांशी परिचय झाला आणि जावेद साहेबांनी रमेश सिप्पींना माझे नाव सुचविले ..अर्थात... सुरुवातीला दूरदर्शन मालिकामध्ये काम करण्याची माझी इच्छा नव्हती...परंतु (बुनियाद)... एका जबरदस्त ताकदीच्या दिग्दर्शकाची मालिका होती... त्यामुळे नाव मिळण्याचे, पैसा मिळण्याचे चान्सेस होते... म्हणून मी बुनियाद स्वीकारली.

मी : 'बुनियाद' ने तुला आणखी काय दिलं ?

ती : महत्त्वाचे म्हणजे बुनियादने मला ब्रेस दिला. आणि अभिनेत्री म्हणून एक आत्मविश्वास दिला,.. मुंबईत राहायला एक घर दिलं.

मी : बुनियादमधल्या लाजोबद्दल तुला काय वाटतं ?

ती : हे पहा, मला कथानक ऐकताना सर्वसाधारणपणे समजावून सांगितलेली लाजोची भूमिका आवडली ती साकार करीत असताना... सुरुवातीला... नुकतीच तारुण्यात पदार्पण केलेली चंचल, प्रणयी, जिद्दी लाजो साकार करताना विलक्षण आनंद मिळत होता. मास्टरजीच्या प्रेमान आयुष्याचे सुंदर स्वप्न रंगविणारी अल्लड लाजो मी अगदी मनापासून एन्जॉय केली. त्यानंतर रुढी परंपराच्या विरुद्ध जाणारी लाजो... मुलाच्या संगोपनाची जबाबदारी योग्यपणे सांभाळणारी आई... फाळणीत झालेले अतोनात हाल, गायब झालेले मास्टरजी... ते परत भेटतील ह्या फक्त विश्वासावर जगणारी पत्नी— ही सारी सारी रूपं प्रेक्षकापर्यंत पोहचवताना ते एक आव्हान वाटले. परंतु प्रौढ लाजो साकार करताना मात्र थोडासा कंटाळा येऊ लागला होता.

मी : का ?... ज्या लाजोनं तुला...

मला मध्येच तोडत ती म्हणाली...

ती काही विचारू नकोस... म्हातारी दिसण्यासाठी करावा लागणारा मेकअप्, त्या मेकअप्मुळे खूप अस्वस्थ वाटायचे. शिवाय हळूहळू इतराच्या तुलनेत लाजोला वावही थोडा कमी मिळायचा. संवादातही तोचतोचपणा जाणवू लागला आणि मग म्हातारी लाजो मलाच नकोशी वाटायला लागली. त्यामुळे आता बुनियाद संपल्यावर रिलॅक्स वाटतय. I don't miss it anymore...

मी बर यापुढे अशा मालिका ऑफर झाल्यास करणार का ?

ती : नाही. यापूर्वीही मला अनेक ऑफर्स आल्या पण त्या मी नाकारल्या यानंतरही मी दूरदर्शन मालिकापासून शक्यतो दूरच राहणार आहे कारण, दूरदर्शनवरील एखादी प्रतिमा प्रेक्षकाच्या मनात फार काळ रेंगाळत राहते. ती प्रतिमा बदलायला फार वेळ लागतो; फार कठीण परिस्थिती होऊन बसते .. आणि म्हणूनच मी... शक्यतो दूरच राहणार आहे

मी : बर, बुनियादच्या लोकप्रियतेने तुला कमर्शियल चित्रपटात भूमिका मिळवून दिल्यात का ?

ती : होय आणि नाहीसुद्धा

कारण बुनियादमुळे मला ज्या निर्मात्यांनी ऑफर्स दिल्या त्या त्याच प्रकारचे रोल्स करण्यासाठी... परंतु मी त्या नाकारल्या कारण सारखे तेच तेच करत राहण्याची माझी मुळीच इच्छा नाही.

मी : मग तुला आता . कशा प्रकारच्या भूमिका करायला आवडतील ?

ती : मला विविधता हवी आहे. एखादी चौकट किंवा इमेज मला मंजूर नाही...मला नित्य नवीन असे काही तरी करायला आवडते. मला माझी विविध अभिनयक्षमता रसिकासमोर सादर करायची इच्छा आहे. आणि असे काही वेगळे रोल्स मी करते आहे. हम दहेज लाये है मध्ये मी दरोडेखोर महिलेच्या भूमिकेत आहे. शिवाय रझियामध्येही माझी वेगळी भूमिका आहे.

मला दमदार, स्वच्छंदी भूमिका करायला आवडतील. ग्लॅमेटिक भूमिका करणे ही माझी इच्छा आहे. प्रत्येक भूमिकेमध्ये एक वेगळा चॅलेन्ज स्वीकारावा अशी जिद्द घेऊन मी ह्या मायावी दुनियेत अद्यापही धडपडते आहे. माझ्या अभिनय क्षमतेवर जसा माझा स्वतःचा विश्वास आहे, तसाच तो प्रेक्षकांमध्येही निर्माण करण्याची माझी महत्त्वाकांक्षा आहे.

मी : अनिता, इतका वेळ आपण बोलतो आहोत... तेव्हा तुला ऐकताना मला आणखी एक गोष्ट जाणवली आहे ती म्हणजे तुझा आवाज... तुझ्या आवाजामध्ये एक विलक्षण गोडवा आहे... एक समज आहे... तू गाणं शिकली आहेस का ?

ती : मी गाण शिकू शकले नाही... पण मला गाण्याची आवड आहे ..माझा आवाजही चांगला आहे संधी मिळाली तर मी चांगलं गाऊही शकेल.

—आणि... खरच तिला गुणगुणायची लहरसुद्धा आली. तिच्या गोड आवाजाबरोबरच तिचे पारदर्शी डोळेसुद्धा गात असल्याचा मला भास झाला, आणि सुरुवातीचाच विचार मी पुन्हा करू लागले...

अनिताजवळ आकर्षक व्यक्तिमत्त्व, सुंदर चेहरा नसला तरीही बोलके डोळे व आव्हानात्मक चेहरा आहे. अभिनयाचे वेगवेगळे रंग सजविण्याची तिची इच्छा जबरदस्त आहे. योग्य संधी मिळून, यशस्वी होण्यासाठी खूप वेळ लागू शकतो .. पण त्यासाठी वाट पाहण्याची तिची तयारी आहे कारण ती अपयशाशी समर्थपणे झगडली आहे आज तिच्याजवळ संयमाबरोबर हिम्मतही आहे ती नृत्य करू शकते. तिच्या आवाजावर तिचे प्रभुत्व आहे. या कला प्रदर्शनाच्या स्पर्धेत ती आपल्या योग्यतेमुळेच उतरली आहे आणि आपली योग्यता तिने जनम बुनियाद व डकैतमध्ये सिद्धही केली आहे. यापुढेही तिला आपल्या अभिनयाची कुवत सिद्ध करणाऱ्या 'लाजो' पुन्हा मिळत राहो अशी प्रामाणिक सदिच्छा व्यक्त करून मी तिचा निरोप घेतला. □

## ☐ नाना पाटेकर

सध्या बुनियादचा बराच बोलबाला आहे. ही सिरिअल आहे चांगली पण त्यातील कलाकारानी ती अधिकच खुलवली आहे. नाहीतर ती सुद्धा कंटाळवाणी झाली असती. अर्थात अनेकदा तिने तसा टर्न घेतलाही होता पण प्रेक्षकांच्या प्रतिक्रिया लक्षात घेऊन तो वेळोवेळी सावरण्यात आला. आता कलाकारांविषयी बोलायच तर 'लाजोजी' बेस्ट ! हवेलीराम श्रेष्ठ, खालोखाल सतवीर.

## ☐ गुलजार

बुनियाद तशी याद राहिल अशी मालिका आहे. तिचं लेखन, दिग्दर्शन चांगलं आहेच शिवाय पात्राची निवडही झकास झाली आहे. जमल्या नाहीत त्या दोन गोष्टी ! एक आटोपशीरपणा आणि दुसरी कॅरॅक्टर डेव्हलपमेंट ! या मालिकेतील काही भाग अनावश्यकपणे खर्ची पडले आहेत. उदा. रोशनलाल आणि त्याची राजराजेश्वरी ! तत्पूर्वी त्याची निवेदिता आणि प्रकरण हे भाग फारच लांबल्यासारखे वाटतात. तसाच लांबला ब्रिजभानचा आजार ! त्यातून बुनियाद लांबत गेले. एका खानदानाचा तो प्रदीर्घ इतिहास ! परंतु अनेकदा त्याच्या स्वकालीन वास्तवापासून अगदी अलिकडील वास्तवाशी सुसवाद साधतो आणि तेच नेमक विसवादी वाटत. आता कॅरॅक्टर डेव्हलपमेंटबाबत म्हणाल तर लाजोजी, शामलाल, सतवीर ही ठीक ! पण हवेलीराम नंतर ढिल्ले पडतात तर ब्रिजभानची स्वाभाविक तडफ पुढे पुढे बोथट पडते. कुलभूषण आणि त्याची पत्नी यांचे स्वाभाविक संघर्ष ठीक. परंतु लोचनला हवेलीरामचे महात्म्य कधीच कळू नये हे पटत नाही. याचा अर्थ पात्राना त्याच्या स्वभावानुसार न खुलवता सोयीनुसार खुलविण्यात आल आहे, हे वारंवार जाणवते.

## ☐ सत्यदेव दुबे

बुनियाद मालिकेचे सर्वच भाग मी पाहू शकलो नाही. परंतु 'हम लोग' नंतरची बहुचर्चित आणि लोकप्रिय मालिका म्हणजे बुनियाद ! बुनियाद 'हम लोग' इतकी निश्चितच कंटाळवाणी झाली नाही. मालिकेचे दिग्दर्शन त्यामानाने फारच सरधोपट झालं आहे. पात्राच्या आणि ती करणाऱ्या कलावंताच्या धारेवरच ही मालिका विशेष तरली असेच म्हणावे लागेल आता आता तिचा शेवट पाहिला. परंतु त्यात कल्पकतेचा फारच अभाव जाणवला हवेलीरामला शंभरीतच न्यायचा अट्टाहास का ? सतवीरचं लग्न अखेर कोणाशी कसे होते यावर आडपडदा का ? याचा सरळ अर्थ लेखकही या संदर्भात कुठे तरी संभ्रमात असला पाहिजे ! कथानकात अनेक बारकावे असूनही कल्पकतेअभावी ते पुरेसे प्रकट होऊ शकले नाहीत आणि झाले ते तितकीशी प्रगल्भता गाठू शकले नाहीत अर्थात सर्वसामान्य प्रेक्षकाना ही मालिका खिळवून ठेवण्याइतकी खुलविणं मात्र लेखकाला निश्चित जमले आहे.

## ☐ ओमपुरी

बुनियाद ! प्रांजळपणे सांगायचे तर मी या मालिकेचे भाग अधूनमधूनच पाहू शकलो त्यामुळे तिच्याविषयी मी समग्र मतप्रदर्शन करण तितकसं योग्य नाही. मालिकेचा कथा भाग खरोखरच उत्कृष्ट आणि प्रभावी आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील इन्कलाबपासून अगदी अलिकडच्या 'इन्कलाब' पर्यंतचा प्रदीर्घ प्रवास त्यात आहे त्यामुळे आपोआपच त्यात अनेक ऐतिहासिक टप्पे येतात. परंतु कथा भागात ते ठोसपणे आले नाहीत असे वाटते. इतका प्रदीर्घ काळ पण तो एकाच कुटुंबाभोवती फेर धरतो हेही काहीसे खटकते. लाजोजीच्या पहिल्या विवाहात काही खर्ची घालण्यापेक्षा ते हवेलीरामच्या ठोस इन्कलाबी कार्यात घालविले असते तर ते कॅरॅक्टर तेव्हाच उठले असते. बुनियादवर हवेलीरामची पकड यायलाच खूप उशीर झाला आणि जेव्हा ती पुरेशी आली तेव्हा अन्य पात्राची भाऊगर्दी होऊन हवेलीराम त्यात हरवूनच गेले. एकाच कुटुंबातील व त्याच्याशी संबधित अशी पात्र रचना केल्यामुळे ती गर्दीची वाटते. त्यात प्रत्येकाला योग्य आणि पुरेसा 'फिड अप' मिळत नाहीत मग ती एक तर अविकसित रहातात किंवा अकृत्रिमपणे विकास पावतात.

आता श्याम बेनेगलच्या 'यात्रा' मध्ये पात्राची याहून अधिक गर्दी आहे. पण ते सर्व घडीचे प्रवाशी ! हा त्यांचा हिशेब कायम ठेवण्यात आलाय. त्यामुळे कोणाला उगाच गाळल कोणाला उगाच अंतर्धान केले असे होत नाही की कोणाला तसे वाटतही नाही. बुनियादमध्ये राजकीय उहापोह टीकाटिपणीही आलीय आणि ती बऱ्याचदा जाणीवपूर्वक आणण्यात आली आहे हे स्पष्टपणे जाणवते. 'हमलोग'ने ही फॅशन सुरू केली. ती पुढे 'बुनियाद'च झाली की काय अशी शंका येऊ लागलीय. अर्थात मी निवेदक पात्र असलेल्या 'राग–दरबारी'मध्येही हा प्रकार होताच. पण राग–दरबारी ही मालिकाच मुळी ग्रामीण राजकारणावर आधारित होती. त्यात प्रत्येक भाग राजकीय–सामाजिक पार्श्वभूमी घेऊनच येत होता.

कलाकारानी फारच मेहनतीने आणि मनापासून ही मालिका रंगविली याविषयी कोणाचेच दुमत नसावे विशेष म्हणजे विजयेंद्र घाटगे, कवलजीत या सिनेकलावंताना त्यांच्या अभिनयाची ताकद दाखविण्याची उत्तम संधी 'बुनियाद'ने दिली आणि त्याच त्यानी सोन करून दाखविले. अन्य कलावंत चांगलेच ! पण त्याच्यावर कसले छाप नव्हते

## ☐ शंकर पुरी

( पोलीस इन्स्पेक्टर जोगेश्वरी ) 'बुनियाद'च्या वेळी नाईट ड्युटी म्हणजे अक्षरशः मला जुलूम वाटायचा. पण ड्युटी म्हणजे ड्युटी ! त्यामुळे काही क्षण चुकायचे. पण दुसऱ्याच दिवशी मित्राशी चर्चा करून मी ती कसर भरून काढायचा बुनियादचा कधीच कटाळा आला नाही. फार मस्त, पॉवरफुल सिरियल ! ह्या मालिकेमुळे मला दूरदर्शनसमोर बसून वेळ फुकट घालविण्याचा छंद जडला. आता ती संपली तर माझा हा छंदही संपुष्टात येईल असे वाटते. हवेलीराम, सतवीर, लाजोजी ही पात्रे नसून आपलेच कोणी स्वकीय आहेत असे आता वाटू लागलय. त्याना आठवड्यातून दोनदा नव्हे चारदा भेटावे अशी इच्छा होते. पण...

बुनियादचे कथानक वेड लावणारे आहेच. पण स्वातंत्र्यपूर्व काळापासूनचा इतिहासच जणू आपण पाहतोय असे वाटते त्यातील प्रत्येक पात्राशी प्रचंड अटॅचमेन्ट झालीय. इतकी की तो 'श्यामलाल' कुठे दिसला तर तात्काळ आठ–दहा कलमाखाली त्याला अटक करून टाकावीशी वाटते, आणि सतवीरला आमच्या खात्यात खेचावसं वाटतं.

## ☐ प्रदीप कबरे . . .

प्रदीप कबरे हे नाव दूरदर्शन प्रेक्षकांना माहीत आहेच. याखेरीज ते नाट्यनिर्माते, नाट्यअभिनेते, दूरदर्शन कलावंत म्हणूनही रसिकांना परिचित आहेत. श्री. कबरे म्हणतात : खरेपणा वाटणं हेच 'बुनियाद 'च्या यशाचं खरं रहस्य. एखाद्या कलाकृतीत त्या त्या भूमिका साकार करणारी अभिनेती मंडळी कितीही जीव तोडून काम करीत असोत. पण कथानकातून जो सच्चेपणा उलगडतो त्यामुळे एखाद्या चित्रपटाविषयी वा नाटकाविषयी कमालीचा जिव्हाळा प्रेक्षकांना वाटायला लागतो. 'बुनियाद '-मधील पात्र, त्यांच्या लकबी, त्यांच्या प्रवृत्ती या आपल्या जवळपास वावरणाऱ्या माणसांमधीलच एक वाटतात. त्यामुळे या सिरीयलविषयी कमालीचा आपलेपणा वाटतो. हवेलीरामच्या स्मृतीभ्रंशानं सारा प्रेक्षकवर्ग गदगदतो. त्याला जुन्या गोष्टी आठवतील का, याची आपसात विचारणा करतो, हे या सिरीयलच्या यशामागील अत्यंत महत्त्वाचं कारण. आणखी एक महत्त्वाचं कारण म्हणजे ती बरीचशी फिल्मी वाटते. पण तांत्रिकदृट्या ती अत्यंत नितांत सुंदर आहे असं म्हणता येईल. मेकअप, दिग्दर्शन, चित्रण या साऱ्याच बाजू इतक्या मस्त आहेत की बस्स. नाट्य आणि चित्रपट यांचा सुरेख मेळ या मालिकेत पहायला मिळाला हे आणखी एक वैशिष्ट्य.

## ☐ इर्शाद हाश्मी . . .

इर्शाद हाश्मी दूरदर्शनवरील अनेक मालिकात, अनेक दूरदर्शन नाटकात तसेच नाटकात आणि चित्रपटातही महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसतात. ते स्वत: चांगले दिग्दर्शकही आहेत. 'सिंहासन' या चित्रपटाचे सहाय्यक दिग्दर्शक म्हणून त्यांनी काम पाहिले होते. ते म्हणतात –

टेकिंग वाईज ही एक अत्यंत उत्कृष्ट सिरीयल होती. पण गंमतीची गोष्ट ही की विलक्षण उत्सुकता असताना वेळीच ती थांबविली गेली नाही. १०४ भाग रेटायचे म्हटल्यावर पुढे पुढे घोडं चालविताना नकळतच रेंगाळलेपणा येतो. तो टाळता आला असता, तर ही सिरीयल याहीपेक्षा अधिक लोकप्रिय झाली असती. मात्र रमेश सिप्पी यांच्या दिग्दर्शनानं हा रेंगाळलेपणा जाणवू दिला नाही ही गोष्ट इथं मुद्दाम नमूद करावीशी वाटते.

## ☐ भाऊ तोरसेकर :

'मार्मिक' या साप्ताहिकाचे कार्यकारी संपादक व एक सडेतोड पत्रकार म्हणून मराठी वाचकांस परिचित आहेत. 'बुनियाद' या सिरीयलकडे एका वेगळ्याच नजरेनं पाहणं आवश्यक आहे असं ते म्हणतात –

'बुनियाद' ही एक प्रतिकात्मक टी. व्ही. सिरीयल होती. यातील प्रत्येक भूमिका ही भारतात वावरणारी एक एक प्रवृत्ती असल्याचं त्यांच्या एकंदर व्यक्तिविशेषांकडे पाहिलं तर आढळून येईल. फाळणीनं या कथानकाचा आरंभ होतो आणि हे कथानक ज्यावेळी लोकांसमोर येतय् त्याचवेळी देश फाळणीच्या तोंडावर उभा आहे. भारत देश हा समाजाधिष्ठीत देश आहे. कुटुंब हा समाजाचा घटक. कौटुंबिक कथानकातून आजची भारताची स्थिती या मालिकेत मांडण्याचा प्रयत्न केला गेला. यातील चार प्रमुख पात्रे पहा – सतबीर ही अहंकारातून आलेली विकृती फुलविणारी व्यक्ती. टोपकल सर्वोदय आणि समाजवादी चळवळीचं हे प्रतिक. यांच्या वर्तनातून साध्य काहीच होत नाही. माणूस विध्वंसापर्यंत मात्र पोचतो दुसरा रोशनलाल. स्वार्थासाठी सारा आदर्शवादही फाट्यावर मारणारं हे पात्र. कॉंग्रेस कल्चरचं प्रतिनिधित्व वाटतं. हवेलीराम हे आणखी एक पात्र. गांधीवादाच्या आणि आदर्शवादाच्या एवढं आहारी गेलेलं की वस्तुस्थितीचं भान राहत नाही. त्याचवेळी लाजो या साऱ्या मंडळींना एकत्र ठेवण्यासाठी आपल्या परीनं प्रयत्न करीत असते. ही लाजो म्हणजे भारतीय जनता. भारतीय जनताच या साऱ्या प्रवृत्तींना सांभाळण्याचा आटोकाट प्रयत्न करते. बाकी सर्व पात्रे ही सवयीनुसार व सोयीनुसार, स्वार्थ, गुन्हेगारी, संधीसाधूपणा याची प्रतीकं आहेत. कर्तृत्व फुलविणं ही स्त्रीची कर्तबगारी असते. जनताही तेच करते. जनतेनंच भारत देश सांभाळला. याच गोष्टी या मालिकेत दाखवून जनजागृती करण्याचा 'बुनियाद'च्या निर्मात्यांचा प्रयत्न असावा. पण ती पाहणाऱ्या प्रेक्षकांनी मात्र निखळ मनोरंजन म्हणूनच या मालिकेकडे पाहिलं. ☐


वैद्य पाटणकर काढा
कडकी, काविळ, मलावरोध, रक्तशुद्धी,
अपचन आणि वातविकारावर.

वैद्य पाटणकर–
आम्लपित्त नाशक काढा
आम्लपित्त, घशातील जळजळ, पोट फुगणे,
व आंबट ढेकर यावर

वैद्य पाटणकर–
कफांतक काढा
कफघ्न व स्वरदोष नाशक यावर

SHREE KRISHNA PHARMACY
श्रीकृष्ण फार्मसी
१३४, न्यू प्रभादेवी रोड, मुंबई-४०० ०२५,
फोन : ४२२०९४१.

# अपराधग्रस्त शुक्रदूषित बुनियाद

• प्रा. गोपाळ दत्त कुलकर्णी •

For the rest of your life, people are going to be divided into two classes :

Those who are on T. V.

And those who only watch T.V.

– From **OUTRAGE** of Henry Denker

'हमलोग' आणि 'खानदान' या दूरदर्शनमालिका संपल्या. नतर 'बुनियाद' आणि आता 'रामायण' गाजत आहेत. टी. एस्. इलियटने तत्कालीन युरोपीय माणसांची आयुष्ये कॉफीच्या पेल्यानी मोजली जातात म्हणून खत केली. (म्हणजे उदा. एका दिवसात १० कप या हिशोबाने पेले रिचवत, दिवस कटवत हुश्श् करायचे.) आपल्याकडे अकबर इलाहाबादीने 'बच्चे हुवे, नोकरी की पेन्शन मिली और मर गये' म्हटले आहे. आज इलियट व इलाहाबादी भारतीयाबद्दल लिहिताना, मर्ढेकराच्या शब्दात–

'अजून बुनियाद सपेना, हंत!' म्हणाले. असते.

दूरदर्शनवरील मालिका 'सॉफ्ट ड्रग्ज' आहेत. थोडी वैषयिकता, थोडे विषयातर, बराचसा रटाळ, रोमँटिक व ठिसूळ ध्येयवाद अधिक **बिग डी डी** (दूरदर्शन) ची नियंत्रणे याची भट्टी जमली की बुनियादसारखे चालू रसायन तयार होते. रोमन राजे नेहमी म्हणत की, जनतेला लोकशाही वगैरे नको असते, त्याना सर्कशी हव्या असतात, टाळ्या पिटायला, ऊर बडवायला, रडायला–ते त्याना द्या, पब्लिक कुत्र्याप्रमाणे शेपूट घालून जागी बसून राहते. बोलावले की शेपूटही हलविते!

भारतीय करमणूक साहित्य गेल्या शभर वर्षात पुरेसे परपुष्ट नाही, हे डॉ. श्री व्य. केतकराचे *विधान* १९८७ सालीही खरे आहे. दूरदर्शनची करमणूक ही तर इम्पोर्टेड आहेच. अमेरिकन इंग्लिशमध्ये दूरदर्शन मालिकेला **सोप–ऑपेरा** म्हणतात. म्हणजे साबणाची जाहिरात व खप वाढविण्यासाठी चार–दोन जाहिरातीत बसविलेली, आठवड्यामागून आठवडे चालणारी कर्मकहाणी–आसू व हसू याची मिसळ खाताना (म्हणजे पाहताना) बरी वाटणारी परतु शेवटी फक्त पोट विरेचन करणारी! ॲरिस्टॉटलने कॅथार्सिसची जी चर्चा केली आहे ती खानदान, हमलोग व बुनियादसाठी वापरणे म्हणजे बरडी सुपारी फोडण्यासाठी बोफोर्स तोफ वापरण्याचा अडाणी प्रकार ठरतो.

बुनियाद (उर्फ फौंडेशन) चा उल्लेख १६ मार्च १९८७ च्या १ कोटी साप्ताहिक खपाच्या TIME (टाईम) मध्ये आहे. 'व्हाय ऑल द् वर्ल्ड लव्हज् अ सोप ऑपेरा' शीर्षकाच्या लेखात हा उल्लेख आहे– 'मेक देम लाफ्, मेक देम क्राय, बट अबॉव्ह ऑल मेक देम वेट' (जनतेला रडवा, जनतेला हसवा, पण सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्याना वाट पहायला लावा) एवढाच प्रत्येक यशस्वी टी. व्ही. सिरीयलचा फॉर्म्युला असतो

बुनियादमध्ये हा यशस्वी फॉर्म्युला इस्तेमाल केल्याने बुनियादच्या सर्व एपिसोडस् (हप्ते) चिक्कार लोकप्रिय झाल्या. रमेश सिप्पी (निर्माता) दिग्दर्शक, त्यामुळे ही मालिका चलाख व चतुर आणि चपळ आहे शहरात (दहा हजाराची वस्ती) आज एकाकी माणसे खूप आहेत. घरात राहून दुरावलेली, घाईगर्दीमुळे दुखावलेली, त्यामुळे कौटुबिक जिव्हाळयाने (?) ओथबलेल्या **'साबण–नाटिका'** त्याना सुखावतात. एकत्र कुटुंबात वा कोणत्याही कुटुबात न राहणाऱ्याना कौटुबिक साबण–नाटिका **'भावतात'** (मराठी टीव्हीवरील एक हायब्रीड नाटकी शब्द!) शिवाय 'भोगशून्य करी भोगव्यथेचे प्रच्छन्न प्रदर्शन.' घरबसल्या व फुकट तरी तेवढ्याच चविष्टपणे चघळता येते, हेही समाधान थोडके नसते. टी. व्ही. वरील मालिका ERSATZ म्हणजे प्लॅस्टिकचे पर्याय आहेत–हलक्या मोत्यासारखे!

गेंडामल कुटुबाची १९१४ ते १९७०-७५ पर्यंतची कहाणी १०४ × २४ मिनिटात भटकत भटकत, वळसे–वेलाट्या घेत चालली. सुमारे २५०० मिनिटे भागिले ६० म्हणजे ४०–४२ तासाचा हा सिनेमा झाला कुदन शाह (जाने भी दो यारो फेम) म्हणतो, 'The audience is a **Voyeur** of the lives of family.' (गेंडामल घराण्याच्या भानगडीत डोकावून पाहणारे पब्लिक!) आठवड्यातून दोनदा ४–५ कोटी जनतेने वर्षभर बुनियाद पाहिले. *त्यामागे हे 'डोकावून'* पाहणे जसे होते तसेच भारतीय स्त्री–पुरुषाच्या कायरतेच्या बुनियादीवर हे १०४ अक रगले कायर, का–पुरुष, क्लीब वगैरे शब्द कमी–अधिक लागू पडणारी बुनियादमधील पात्रे तसेच त्याचे प्रेक्षकही बुनियादच्या लोकप्रियतेचे मर्म त्यातील दडलेली व अध्याहृत लैंगिकता हे आहे, हे सकृद्दर्शनी कसेसेच वाटले, तरी जरा खरवडून पाहिले तर ते सहज प्रत्ययाला येते.

'बुनियाद' ही सपूर्ण मालिका शुक्रदूषित आहे भारतीय करमणूक एकूणच शुक्रदूषित आहे शुक्रदूषित जीवन जगण्याला भारतीय कौटुबिक करमणूक मानतात गेंडामलची दोन मुले. होयली (हवेली) राम **'त्या' बाबतीत 'बावळट'** पेश केला आहे. त्याच्या प्रेमात 'कच' खाण्याच्या वृत्तीमुळे लाजोजीला एका थेरड्याला वरमाला घालावी लागते. कदाचित हवेलीरामला *सुधारकपणाचे व पुर्नविवाहाचे धाडस केल्याचे* पुण्य देण्यासाठी लेखक जोशीचा हा प्रयास असावा पुरुषाच्या बाबतीत वापरत नाहीत. तथापि हवेलीराम *FRIGID* (थडकामा) व्यक्तिरेखा आहे त्याचा भाऊ बाईलवेडा आहे परतु रयलीरामच्या लैंगिकसुखाला पुत्र न होण्याचे व हवेलीवर जळण्याचे ग्रहण लागले आहे प्रत्येक पात्र असे न्यूरॉटिक वागते, परतु २० इची पडद्यावर ते रोमँटिक म्हणून पेश होते. या दोन भावाची बहीण वीरावाली तर कुमारीमाता होते – वृषभानच्या मुलाची व लैंगिक चुकाना सन्याशीपणाची झालर–टोपडी घालून ती मोकळी होते.

*मास्टरजी हसण्या–बोलण्यात व प्रेम* व्यक्त करण्याचे बाबतीत तोलून–मापून वागणारे तर त्याचा थोरला मुलगा काकाप्रमाणे बाईलवेडा तर त्याची बायको लोचन FLIRT (चालू) व सिनेमातील नटीप्रमाणे ससारातून उठलेली! लोचनची आई

स्वतःच्या मुलीच्या संसारात स्वतःच्या वैधव्याचा 'विब्रा' घालणारी ! सत्वीर हा मास्टरजीप्रमाणे प्रत्येक बाबतीत थपडा व उष्टे खाणारा व उशिरा टयूब पेटणारे पात्र आहे. म्हणून तो बबलीजीचे प्रेम ठोकरतो पण तिचे अनौरस पोर सांभाळतो ! रोशन तर Lecherous व Lewd आहे. रंगीत कपडयातील काहीही दिसले की हा निघाला पाठलागावर. तो बबली व बंगाली निवेदिताला फसवितो, नाकारतो आणि राजराजेश्वरी नामक 'चालू' मुलीला वरमाला घालतो. सत्वीर बबलीला ठोकरतो; पण मंगलाला चाहतो; पण मंगला जे. बी. शी लग्न करते. जे. बी. तर बोलून चालून 'बिगडा हुआ शहजादा' आहे. तो बबली व मंगला दोघींचे तारुण्य उपभोगतो व त्यांना मातृत्व देतो. सत्वीरने जे टाळले ते जेबीने भोगले. वृषभानने जे मागच्या पिढीत केले, मास्टरजींनी जे केले तोच लैंगिक वारसा अनुक्रमे जे. बी. व सत्वीर पुढे चालवितात. व्यभिचार व अनाचार एवढे एका कुटुंबात शोधून सापडणार नाहीत, तेवढे 'बुनियाद' मध्ये ठासून भरले आहेत. शामलाल तर लैंगिकदृष्टया दुष्काळी म्हणून तो आयेगो (वाहव्वा !) बनून वृषभान व लल्लीच्या, जे. बी. व मंगला, सत्वीर व बबली यांच्या मीलनात व लग्नात विष कालवतो. निवेदिताचा जो बंगाली बाप आहे त्याने बायकोला बदचलन आहे या आरोपावरूनच घराबाहेर काढलेले असते ! 'बुनियाद' जर प्रातिनिधिक मालिका मानली तर यच्चयावत् भारतीय (निदान प्रेक्षक) शुक्रदूषित करमणुकीचे चाहते आहेत, असा निष्कर्ष निघतो. नर्म व्यभिचार व सूक्ष्म लैंगिक दमनातून निर्माण होणाऱ्या समस्यांची मालिका 'बुनियाद' आहे.

मृणाल सेननी 'बुनियाद'मधील आलोकनाथ आणि अनिता कँवर यांच्या अभिनयाला 'फर्स्ट रेट' (प्रथम श्रेणी) मानले आहे, तरी देखील ही मालिका का लोकप्रिय झाली ते सांगता येणार नाही, (Unknown) असेही म्हटले आहे. नरेंद्र पंजवानी नामक अभ्यासकाने 'रात्री ९ वाजता आठवडयातून दोन वेळा दाखविली जाणारी 'बुनियाद' म्हणजे टी. व्ही. धारक ९३ टक्के कुटुंबांना जेवणानंतरची स्वीट डीश किंवा डेझर्ट वाटते' असा निष्कर्ष काढला आहे. 'डेबोनियर'चे संपादक अनिल धारकरनी, 'बुनियाद'च्या लोकप्रियतेचे 'गमक' इतरांच्या आयुष्यात डोकावण्याच्या प्रवृत्तीत दाखविले आहे. माझ्या मते बुनियादच्या लोकप्रियतेचे गमक शेजाऱ्याचे जीवन कसे माझ्यासारखेच शबल आहे, या कृतक् समाधानात आहे. हिंदी सिनेमातील एरवीची व सर्रास हिंसा आणि प्रच्छन्न कामुकता प्रेक्षकांच्या दबलेल्या आणि दमन केलेल्या करुणा वासनांचे उन्नयन करते तोच प्रकार सूक्ष्म पातळीवर बुनियादमध्ये आढळतो. हिंदी सिनेमा ॲलोपाथिक ड्रग आहे, तर बुनियादसारख्या मालिका होमिओपाथीची ड्रगस् आहे.

'मास करमणूक' ही तीन पायांची शर्यत असते. एक पाय निर्माता रमेश सिप्पी-लेखक मनोहर शाम जोशीचा, दुसरा गोदरेजचा, तिसरा प्रेक्षकांचा. हिंदू धर्मात इंद्रिय दमन सांगितलेले आहे; पण त्यापैकी एक प्रमाथी इंद्रिय मन आहे, हे सस्ते धंदेवाईक विसरतात. सस्ती–मास करमणूक सेन्सॉर आणि दूरदर्शनच्या कात्रीतून सुटून मनाला चौखूर उधळू देण्याचे कार्य करते. हताश व हतबलांना आपल्याच, टेक्निकलर व सुधारून वाढविलेल्या 'नळीतल्या' (पिक्चर टयूब) जगातील लोकांचे धिंडवडे पाहून बरे वाटते. मर्ढेकरांनी 'नळीतले जग नळीत जगते' हे पिक्चर टयूबवाल्या टी. व्ही. सेटला समर्पकपणे लागू पडणारे शब्द ३०–३५ वर्षांपूर्वी चपखलपणे वापरले याबद्दल त्यांना दाद दिली पाहिजे ! त्यांचे द्रष्टेपण मानले पाहिजे.

'बुनियाद' ही गतपौरुष व निःसत्व लोकांची कहाणी होती. 'शोले'च्या संघर्षाची दुसरी बाजू. बुनियादने धंदा केला त्याचे कारण ही सावण–नाटिका मास करमणूक म्हणून सस्ती व म्हणूनच प्रेक्षकांना काहीही न देणारा भेळ–मिसळीसारखा पदार्थ होता. मयसभेतील मृगजळाप्रमाणे. हाश्–हुश्श्, दोन करपट ढेकर, चार ग्लास पाणी– संपले ! गतपौरुष व निःसत्त्व म्हणण्याचे कारण त्यातील प्रत्येक पात्र अपराध–गंडाने (गिल्ट कॉम्प्लेक्स) पछाडलेले आहे आणि अपराधी माणसे आयुष्यात कधीच नहुप राजाप्रमाणे, लाख चुका करूनही, विश्वासाने 'नर हूँ, पुरुष हूँ, चढके रहूँगा मैं' असे म्हणू शकत नाहीत. ◻

'बुनियाद' विषयक माझ्या मतांचे समापन मी बॅ. अप्पा पंतांच्या 'अनडिप्लोमॅटिक इन्सिडेंटस्' (Undiplomatic Incidents) (संगम बुक्स) मधील एका आठवणीने करतो.

स्थळ : इंडोनेशिया

प्रमुख पात्रे : प्रेसिडेंट सोकार्नो व राजदूत अप्पा पंत.

एका विमान प्रवासात प्रे. सोकार्नो पंतांना विचारतात–

'राजदूतजी तुमची दृष्टी कशी आहे ?'

'बऱ्यापैकी आहे, तर'

'ठीक आहे, पण तुम्ही सौंदर्याचा आस्वाद घेऊ शकता का ?'

'सर्वसाधारण भारतीयांप्रमाणे, अपराध गंडाने पछाडले न जाता, तुम्ही सुंदर स्त्रीकडे पाहू शकता का ?'

सोकार्नोनी दुसऱ्या संदर्भात विचारलेला हा प्रश्न भारतीयांनी स्वतःला विचारून पाहावा– तो म्हणजे कोणतीही गोष्ट अपराध गंड वा अपराध भावना टाळून भारतीय करू शकतात ? या प्रश्नाच्या नकारार्थी उत्तरात बुनियादचे यश समाविष्ट असते. ◻


प्रतिकूल निसर्ग
जीवघेणी उपासमार
सहकाऱ्यांचे मृत्यू
भयाण एकाकीपणा, त्यावर
मात करून, चार हजार मैलांची
पायपीट करून ते कैदी
भारतात पोचले.
कसे ?
दुसऱ्या महायुद्धातील
एक चित्तथरारक पलायन कथा.

**मला निसटलंच पाहिजे !**

अनुवाद : श्रीकांत लागू
वीस रुपये

**राजहंस प्रकाशन**
**१०२५ सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३०**





मी त्यांना युद्धाच्या अत्यंत गुप्त योजनेबद्दल माहिती देत होतो
तर म्हणाले, " ठीक आहे पण उद्घाटन शक्यतो बटण दाबून ठेवा,
मला फीत कापायचा कंटाळा येतो. "






काळजी नको ! आज त्यांनी पंतप्रधानांना फक्त " किती वाजले "
एवढंच विचारलं.




पाहिलंत ! त्या मानाने आपण नशिबवानच. ही लोकं आपल्याहीपेक्षा
भयंकर दुष्काळातून आलेली दिसतात.




काय सांगता राव, इकडे दुष्काळबिष्काळ काही भानगडच नाही ?
मला हे आधी माहित असतं तर वायका-पोरांना पण नसतो का घेऊन आलो ?

# सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला घ्यावा

**प्रा. टी. के. टोपे**
माजी कुलगुरू, मुंबई विद्यापीठ

---

राष्ट्रपती झैलसिंग आणि पंतप्रधान राजीव गांधी यांच्यात गेले काही दिवस जणू एक घटनात्मक युद्धच खेळले गेले. सध्या हे युद्ध थांबलेले असले तरी यात गुंतलेले प्रश्न महत्त्वाचे व आपल्या लोकशाही पद्धतीवर दूरगामी परिणाम करणारे आहेत. या दृष्टीने जाणकारांनी येथे व्यक्त केलेले विचार वाचकांना निश्चितच उद्बोधक वाटतील.

---

वास्तविक पाहता आज इंग्लंडमध्येसुद्धा संसद सार्वभौम नाही. तेथे सुद्धा मंत्र्यांवर संसदेचा ताबा राहिला नसून उलट मंत्रीच संसदेवर हुकमत गाजवत असतात. इंग्लंडच्या पंतप्रधानाला 'निवडून दिलेला संचालक' ( Elected Director ) असेच म्हणतात. G. W. Keaton यांनी १९५२ सालीच 'संसदेचा मृत्यू' ( Passing of Parliament ) या नावाचे पुस्तक लिहिले आहे.

हे खरे की, गेल्या शतकामध्ये अशी एकही ज्ञात घटना नाही की जेव्हा ब्रिटिश पंतप्रधानाने राजाला शासकीय कामकाजाची माहिती पुरवली नाही. पण हेही तितकेच खरे की, राजाने सुद्धा संसदेत बहुमत असलेले मंत्रीमंडळ बरखास्त केलेल नाही.

सध्या सुरू असलेला वाद घटनेच्या ७८ कलमाच्या अन्वयार्थावर आहे. या वादात वेगवेगळ्या भूमिका घेतलेल्या दिसतात. अशा अडचणीवर मात करण्यासाठी घटनेमध्ये दोन पर्याय उपलब्ध आहेत. (१) लोकसभेमध्ये अविश्वासाचा ठराव संमत करावा. (२) कलम १४३ प्रमाणे राष्ट्रपतीने सर्वोच्च न्यायालयाकडे सल्ल्यासाठी बाब सुपूर्द करावी. राष्ट्रपती स्वतःच्या अधिकारात असे करू शकतात. कलम ५३ प्रमाणे 'शासनाचे अधिकार राष्ट्रपतीकडे असतील. या अधिकाराचा वापर राष्ट्रपती स्वतः किंवा कनिष्ठ अधिकाऱ्यामार्फत करतील' खरे तर राष्ट्रपतींनी ही बाब सल्ल्यासाठी सर्वोच्च न्यायालयाकडे पाठवावी. आता सुद्धा हे करण्यासारखे आहे.

१९६४ साली गंभीर प्रकारचा घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला होता. उत्तर प्रदेश विधानसभेच्या सभापतींनी एका सभासदाला आठ दिवस कैदेची शिक्षा सुनावली. त्या सभासदाने हायकोर्टात बेल (Bail) साठी अर्ज केला. हायकोर्टाच्या दोन न्यायमूर्तींनी अर्ज मान्य करून त्याच्या सुटकेचा आदेश काढला. सभापतींनी घटनेच्या १९४ व्या कलमाप्रमाणे सभागृहाचा अपमान ( Contempt of Legislature ) झाला म्हणून न्यायमूर्तींच्या अटकेचे वॉरंट काढले. न्यायमूर्तींनी न्यायालयाचा अपमान ( Contempt of court ) झाला म्हणून सभापतीच्या अटकेचे वॉरंट काढले मोठाच बाका प्रसंग गुदरला होता. त्यावेळी राष्ट्रपतींनी सर्वोच्च न्यायालयाचा सल्ला मागितला आणि पेचप्रसंग टाळला.

१९३६ साली इंग्लंडमध्ये पंतप्रधान आणि राजेसाहेब (आठवे एडवर्ड ) यांच्यात मतभेद निर्माण झाले होते राजेसाहेबांना एका घटस्फोटित स्त्रीशी लग्न करावयाचे होते. पंतप्रधानांना ते मान्य नव्हते काही खासदारांनी राजेसाहेबांची भेट घेऊन सांगितले की, तुम्ही मंत्रिमंडळ बरखास्त करा. जे नवीन मंत्रिमंडळ येईल ते तुमच्या लग्नाला पाठिंबा जाहीर करतील. राजेसाहेबांनी हा सल्ला मानला नाही गादीचा त्याग करून मगच त्यांनी लग्न केले. पण बहुमत असलेल्या पंतप्रधानाला बडतर्फ केले नाही.

पंतप्रधान–राष्ट्रपती संघर्षाची बीजे घटनेमध्येच आहेत. भारतीय घटनेमध्ये इंग्लंडच्या घटनेमधील काही संकेत अंतर्भूत केलेले आहेत. इंग्लंडमध्ये राष्ट्रप्रमुखाचे पद वंशपरंपरेने मिळते. राजघराण्यातील व्यक्तीवर लहानपणापासून तसे संस्कार केले जातात. भारतात मात्र राष्ट्रपती निवडणूक लढवून येतो. सक्रिय राजकारणातील व्यक्ती आपल्याकडे राष्ट्रपती झाल्याची उदाहरणे आहेत. अशा व्यक्तींना राष्ट्रपती झाल्यावर जुन्या राजकारणाचा विसर पडणे अवघड आहे

१९१९ साली अमृतसर येथे कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते त्यावेळी अध्यक्षीय भाषणात पंडित मोतीलाल नेहरू यांनी पाश्चात्त्य लोकशाहीविरुद्ध इशारा दिला होता. महात्मा गांधींनीसुद्धा नवजीवनमध्ये लेख लिहून संसदीय लोकशाहीवर टीका केली होती. पण घटनाकारांनी या सर्व इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले. □

# सामंजस्याची गरज

## प्रा. डी. एन. संदानशिव


राष्ट्र आणि राष्ट्रीयत्व ही मानवी समाजाची घटनात्मक गरज आहे तर घटनात्मक नीतिमत्ता ही शासनकर्ते आणि प्रत्येक नागरिकाची राजकीय आणि सामाजिक गरज आहे. सौहार्द, सहकार्य आणि सहभाग या त्रिसूत्रातून घटनात्मक शासन लोकाभिमुख करून लोककल्याण साध्य करणे शक्य आहे.

मानवी गरजांची पूर्तता करण्यासाठी बौद्धिक कौशल्य, दूरदृष्टी, आणि शहाणपणाचा उत्तम राजकीय आविष्कार म्हणजे घटना होय.

घटना समितीपुढे भारतीय घटनेचा मसुदा सादर करीत असताना केलेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले विचार मूलभूत स्वरूपाचे आहेत. ते म्हणाले होते की, "घटनात्मक कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याला निश्चितपणे दोन प्रश्नांची उत्तरे शोधावी लागतील. पहिला प्रश्न असा असेल की, घटना कोणत्या स्वरूपाची आहे. आणि दुसरा प्रश्न म्हणजे घटनेत कोणत्या स्वरूपाच्या शासन व्यवस्थेचा अंतर्भाव केला आहे. हे दोन्ही प्रश्न अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक घटनेला या प्रश्नांचा विचार करावा लागतो." भारतीय घटनाकारांच्या पुढे असा प्रश्न होता की, घटनेद्वारे कोणत्या स्वरूपाची शासन व्यवस्था भारतात प्रस्थापित करायची आणि शासनाचे कायदे मंडळाशी कोणत्या प्रकारचे संबंध असावेत ?

घटनाकारांपुढे दोन प्रकारच्या शासन व्यवस्थेची उदाहरणे होती (१) संसदीय लोकशाही (२) अध्यक्षीय लोकशाही. संसदीय लोकशाही इंग्लंडमध्ये अस्तित्वात होती, तर अध्यक्षीय लोकशाही अमेरिकेत होती. ब्रिटिशांचे राज्य भारतात असल्यामुळे संसदीय लोकशाहीचा अनुभव घटना समितीतील काही सदस्यांना होता. या पार्श्वभूमीवर घटनाकारांनी संसदीय लोकशाहीचा अंतर्भाव भारतीय घटनेत केला. संसदीय आणि अध्यक्षीय पद्धतीमध्ये नेमका फरक काय आहे हे सांगताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, 'अमेरिकन शासन पद्धतीला राष्ट्राध्यक्षीय शासन पद्धत म्हणतात. पण आपल्या राष्ट्राचा प्रमुख राष्ट्रपती असेल, घटनेच्या मसुद्यात संसदीय शासन पद्धतीचा विचार करण्यात आला आहे. अमेरिकेत राष्ट्राध्यक्ष हा शासनाचा प्रमुख असतो. त्याच्या हातात शासनाचे सर्व अधिकार एकवटलेले असतात. पण आपल्या घटनेतील राष्ट्रपतींचे स्थान इंग्लंडमधील राजासारखे आहे. **राष्ट्रपती हा राष्ट्रप्रमुख आहे, पण शासनाचा प्रमुख नाही.** तो राष्ट्राचे प्रतिनिधित्व करतो; पण राष्ट्राचा कारभार हाकत नाही. शासनामध्ये त्याचे स्थान शोभेचे आहे. शासनाचे सर्व निर्णय त्याच्या नावाने, सहीने जाहीर केले जातात. अमेरिकेतील राष्ट्रपती आपल्या सहकाऱ्यांची सचिव म्हणून नेमणूक करतो. याबाबतही एक मूलभूत फरक आहे. तो असा की, अमेरिकन राष्ट्राध्यक्षावर त्याच्या सचिवांनी दिलेला सल्ला बंधनकारक नसतो. पण भारतीय राष्ट्रपतीवर मात्र मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला बंधनकारक असतो. राष्ट्रपती मंत्रिमडळाने दिलेल्या सल्ल्याविरुद्ध काहीही करू शकत नाही,त्याचप्रमाणे सल्ल्याशिवायही काही करू शकत नाही. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष त्याने नेमलेल्या सचिवांना काढू शकतो. पण भारतीय राष्ट्रपती जोपर्यंत लोकसभेचा मंत्रिमंडळाला पाठिंबा आहे, तोपर्यंत मंत्रिमंडळ बरखास्त करू शकत नाही.'

लोकशाही शासन पद्धतीने दोन मूलभूत अटींची पूर्तता करणे आवश्यक असते. पहिली अट अशी की, शासन व्यवस्था स्थिर असणे जरुरीचे असते आणि दुसरी अट म्हणजे शासन व्यवस्था लोकांच्या आशाआकांक्षांना जबाबदार, संवादी असली पाहिजे. अमेरिकेतील शासनपद्धती राष्ट्राध्यक्षीय असल्यामुळे स्थिर आहे. राष्ट्राध्यक्ष खंबीर प्रशासन देऊ शकतो. राष्ट्राध्यक्ष संसदेला जबाबदार नसल्यामुळे त्याला त्याच्या कोणत्याही कृत्या-



**लोकशाही शासन पद्धतीने दोन मूलभूत अटींची पूर्तता करणे आवश्यक असते.........**

¤

बद्दल अभियोग चालविल्याखेरीज काढून टाकता येत नाही ससदीय शासन पद्धतीत मत्रिमडळ ससदेला जबाबदार असते स्थिरतेपेक्षा जबाबदारीच्या तत्त्वाला अधिक महत्त्व देऊन संसदीय शासन पद्धतीचा भारतीय घटनेत अतर्भाव करण्यात आला, ही अत्यत उल्लेखनीय बाब आहे.

## नेहरू–राजेंद्रप्रसाद

या पार्श्वभूमीवर सध्या गाजत असलेल्या राष्ट्रपती–पतप्रधान सघर्षाचा विचार केला पाहिजे. भारताचे पहिले पतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद याच्यात घटनात्मक हक्क आणि जबाबदाऱ्या याविषयी मतभेद निर्माण झाले होते या मतभेदाचे पर्यवसान उघड सघर्षात झाले नव्हते. दोघामध्ये राष्ट्रपती–पतप्रधान याच्या अधिकार–जबाबदाऱ्या याची व्याप्ती, कक्षा, मर्यादा याबाबत समझोता होऊन उघड संघर्ष सफाईने टाळण्यात आला. नेहरूनी राजेंद्रप्रसाद याच्या मताचा आदर करून हिंदू कोड बिल मजूर करून घेतले नाही. तसेच राष्ट्रपती डॉ राधाकृष्णन याचे म्हणणे मान्य करून नेहरूनी तत्कालीन सरक्षणमत्री कृष्ण मेनन याना पदमुक्त केले होते. राष्ट्रपती डॉ. झकिर हुसेन आणि फक्रुद्दिन अली अहमद याचे संबध श्रीमती इदिरा गाधी याच्याशी खूपच चागले होते. राष्ट्रपती गिरी यानी मात्र कामगाराच्या प्रश्नावर आग्रही मतप्रदर्शन केले होते पण तरी सुद्धा राष्ट्रपती आणि पतप्रधान याच्यातील मतभेदाला सघर्षाचे स्वरूप आले नव्हते.

राष्ट्रपती नीलम सजीव रेड्डी याची कारकीर्द मात्र भारतीय इतिहासात नवे पान निर्माण करणारी ठरली. जनता पक्ष केद्रात राज्यावर असताना पतप्रधान मोरारजी देसाई यानी बहुमत गमावले त्यावेळी श्री. जगजीवनराम याना श्री. चरणसिंग याच्यापेक्षा जास्त खासदाराचा पाठिबा असूनही राष्ट्रपती रेड्डी यानी चरणसिगाना मत्रिमडळ बनविण्याला पाचारण केले होते. लोकसभेचे अधिवेशन बोलावूनही पतप्रधान चरणसिंग लोकसभेला सामोरे गेले नाहीत, कारण बहुसख्य खासदाराचा त्याना पाठिबाच नव्हता. तरीसुद्धा पतप्रधान चरणसिग यानी दिलेल्या सल्ल्यानुसार राष्ट्रपती रेड्डी यानी लोकसभा बरखास्त केली आणि निवडणुका जाहीर केल्या. पतप्रधान-मोरारजी देसाई आणि राष्ट्रपती सजीव रेड्डी याचे भावनात्मक सबध बरे नव्हते. तरीसुद्धा जनता सरकार कोसळण्याचे कारण पंतप्रधान आणि राष्ट्रपती याच्यातील सघर्ष हे नव्हते आणीबाणीमुळे अनेक पक्ष एकत्रित येऊन निर्माण झालेल्या जनता पक्षाला लोकसभेत बहुसख्य खासदाराचा पाठिंबा असूनही पूर्वाश्रमीय विविध पक्षातील राजकीय मतभेदामुळे आणि काही नेत्याच्या अतिरेकी भूमिकेमुळे जनता सरकार कोसळले जनता पक्षातील मतभेदाचा उपयोग चतुरपणे श्रीमती इदिरा गाधी यानी राष्ट्रपती रेड्डीच्या अधिकारामार्फत करून घेतला.

श्रीमती इदिरा गाधीची निर्घृण हत्या झाल्यावर लोकशाही मार्गाने नेत्याची निवड होण्याची वाट न पाहता राष्ट्रपती झैलसिग यानी श्री. राजीव गाधी यांना पंतप्रधानपदाची शपथ दिली. राष्ट्रपती झैलसिग आणि श्रीमती इदिरा गाधी याचे सबध खूप चागले होते झैलसिंग यानी नेहरू घराण्याची सेवा करण्यात धन्यता व्यक्त केली होती. श्रीमती इंदिरा गाधी यानी आज्ञा केल्यास मी झाडूसुद्धा मारेन असे उद्गार झैलसिग यानी जाहीरपणे काढले होते. असे असताना राष्ट्रपती झैलसिग आणि पतप्रधान राजीव गाधी याच्यामध्ये जो सघर्ष आहे, तो अभूतपूर्व आहे

पंजाब प्रश्न, भिंद्रनवालेचा उदय आणि अस्त, ऑपरेशन ब्लू स्टार, इदिरा गाधी याचा खून, राजीव – लोंगोवाल करार, आसाम करार, राष्ट्रपतीचे परराष्ट्र दौरे रहित करणे, घटनात्मक परंपरेनुसार पतप्रधानानी राष्ट्रपतीना भेटण्याचे टाळणे, या आणि अशा अनेक घटना या सघर्षाच्या पार्श्वभूमीवर आहेत

ससदीय लोकशाहीत राष्ट्रपती राष्ट्रप्रमुख जरी असला तरीही मत्रिमडळाच्या सल्ल्यानुसारच त्याला वागले पाहिजे राष्ट्रपतीला सल्ला देण्यासाठी आणि मदत करण्यासाठी मत्रिमडळाची घटनेत तरतूद आहे ससदीय लोकशाहीमध्ये मत्रिमडळ सयुक्तपणे लोकसभेला जबाबदार धरण्यात आले आहे लोकसभेच्या प्रत्येक अधिवेशनात रोज होणाऱ्या लोकसभेच्या कामकाजाद्वारे मत्रिमडळाच्या सयुक्त जबाबदारीची कसोटी लागत असते लोकसभेतील खासदार लोकप्रतिनिधी असतात. अशा रीतीने मत्रिमडळ लोकप्रतिनिधीना प्रत्यक्षपणे जबाबदार असते.

## हेडमास्तरची भूमिका

राष्ट्रपती हे केवळ शोभेचे स्थान नव्हे, तो केवळ रबरी शिक्का नव्हे. राष्ट्रपती एखाद्या शाळेच्या हेडमास्तरसारखी भूमिका घेऊ शकत नाही तो राष्ट्रप्रमुख आहे. राष्ट्रपतीना काही अधिकार आणि सन्मान आहेत त्या अधिकाराच्या आणि सन्मानाचा विचार घटनेत अतर्भूत केलेल्या ससदीय शासन पद्धतीच्या चौकटीत केला पाहिजे.

घटनेतील कलम ७८ नुसार राष्ट्रपतीपदाचा सन्मान आणि कार्यपद्धती निश्चित करताना पतप्रधानावर काही कर्तव्ये लादली आहेत कलम ७८ (अ) नुसार मत्रिमडळाने घेतलेल्या निर्णयाची माहिती राष्ट्रपतीना कळविण्याचे कर्तव्य पतप्रधानानी करावयाचे असते कलम ७८ (ब) नुसार राष्ट्रपतीच्या इच्छेनुसार शासकीय कामकाजासदर्भात माहिती पुरविण्याचे कर्तव्य पतप्रधानाचे आहे आणि कलम ७८ (क) नुसार एखाद्या मत्र्याने घेतलेला निर्णय मत्रिमडळाने विचारार्थ घेतला नसेल तर पंतप्रधानाचे असे कर्तव्य आहे की, राष्ट्रपतीच्या इच्छेनुसार तो निर्णय मत्रिमडळाच्या विचारार्थ घेण्यात यावा.

शासकीय निर्णय कळविणे आणि निर्णयाचा तपशील कळविणे यामध्ये काही घटनातज्ज्ञ फरक करीत आहेत. निर्णय हा एक निष्कर्ष असतो तर तपशील हा निर्णय घेण्याकरिता आवश्यक असलेली माहिती असते. निर्णयामुळे केवळ अतिम निष्कर्ष समजू शकतो, पण तपशिलामुळे घेतलेल्या निर्णयाची सपूर्ण पार्श्वभूमी समजू शकते. बोफोर्सच्या प्रकरणात राष्ट्रपतीना कळविलेल्या माहितीपेक्षा अधिक तपशील सांगण्यास मत्रिमडळाने नकार दिला आहे. ही बाब घटनात्मकदृष्ट्या अयोग्य आहे. राष्ट्रपती आणि पतप्रधान याच्यातील मतभेदामुळे हे अयोग्य कृत्य मत्रिमडळाने केले.

राष्ट्रपती पतप्रधानाना पदमुक्त करू

( पृष्ठ १०५ पहा )

# सुरी सोन्याची झाली म्हणून काय?

● प्रा. डॉ. अनिल सहस्रबुद्धे ●

नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण घोषित झाले. शिक्षणविषयक नव्या युगाला सुरुवात झाली. एकविसाव्या शतकातील नव्या स्वयंपूर्ण, स्वावलंबी, सतृशील, राष्ट्रीय एकात्मतेला आणि अखंडतेला मानणाऱ्या, राष्ट्रहितदक्ष, आदर्श, तेजस्वी विद्यार्थ्यांचं स्वप्न आमच्या तरुण पंतप्रधानांना नव्याने पडलं ! त्याची स्वप्नावृत्ती शिक्षणमंत्र्यांनाही झाली. त्यात आमच्या महाराष्ट्राचे शिक्षण-मंत्री ( नाबाद ! ! ) प्रा. राम मेघे मुळात प्राध्यापक आणि शिक्षणक्षेत्रात नवीन काही करून दाखवायला उत्सुक ! नवा पुरुषार्थ-संपन्न युवक तयार करण्याची कल्पना घोषणेच्या स्वरूपात त्यांनी आपल्या शिक्षण-संदर्भातील अनेक ओजस्वी भाषणांत केली. या स्वप्नांचं आणि घोषणांचं नक्कीच स्वागत करावयास हवं. सर्वजण मनापासून ते करीत आहेत. चांगल्या स्वप्नांची परिपूर्ती करण्याची परंपरा, थेट हरिश्चंद्रापासूनची आहे. अगदी युद्धपातळीवर आम्ही हे शैक्ष-णिक धोरण राबवावयाचे ठरविले आहे; कारण मनुष्यबळ विकास मंत्रालयाने काढ-लेल्या पुस्तिकेत म्हटल्याप्रमाणे (मे १९८६) 'शिक्षण ही आजची आणि उद्याची एक-मेवाद्वितीय अशी गुंतवणूक आहे.' ही राष्ट्रीय शिक्षणविषयक धोरणाची गुरुकिल्ली आम्हाला शासकीय पातळीवर गवसली आहे ! कोटयवधी रुपये खर्च करण्याची राजीव सरकारने तयारी दाखविली आहे. महाराष्ट्र तर हे शैक्षणिक धोरण राब-विण्याची प्रयोगशाळाच ठरणार आहे. महाराष्ट्रीय माणसाला ही अभिमानाची गोष्ट आहे. विधायक चळवळीत नाहीतरी महाराष्ट्र नेहमी आघाडीवर राहिलेला आहेच.


## तिसऱ्या डोळ्यात धूळफेक

'शिक्षण हा माणसाचा तिसरा डोळा आहे' हा सुविचार आजच एकदम आम्हाला स्फुरला असं नाही, प्राचीन भारतीय संस्कृतीतील गुरुकुलात 'नहि ज्ञानेनं सदृशं पवित्र-मिह विद्यते !' असे प्रथमतः शिकविले जाई. गुरुकुलातून स्वयंपूर्ण, पुरुषार्थी, सामर्थ्यवान जबाबदार नागरिक निर्माण होत असत. कारण ते शिक्षण विद्यार्थीकेंद्रित होते. त्यासाठी स्वतंत्र सक्तीचा एक काल-खंड समाज–व्यवस्थेत अंतर्भूत होता. ती गुरुकुलाची पद्धती परकीय आक्रमणाच्या झपाटयात नामशेष झाली साऱ्या संस्कृतीला विकृती ठरविण्याचा सपाटा सुरू झाला ! इंग्रजांच्या शासनकेंद्री शिक्षणाच्या माध्यमा-तून भारतीय संस्कृतीला शिव्या घालून विद्वेषाची व पृथगात्मतेची भावना जोपास-णाऱ्यांच्या फौजा सुधारणेच्या नावाखाली निर्माण झाल्या. लेखनिकांच्या, अधिका-ऱ्यांच्या टोळधा निर्माण झाल्या आणि वाघिणीचे दूध पिऊन पढतमूर्खांच्या संख्याच बहुतांशाने निर्माण झाल्या. इंग्रजांचा आदर्श घेऊन जगणारे प्रगत पुरोगामी ठरले ! ज्यांनी स्वयंभूपणानं या राष्ट्राच्या अस्मितेचा उच्चार केला व शिक्षणाच्या माध्यमातून राष्ट्रउभारणीचे स्वप्न पाहिले, त्यांना प्रतिगामी ठरवून आम्ही मोकळे झालो. भारतीय शिक्षणाकडे पाठ फिरविण्याचा उद्योग केला. इंग्रजांनी शाळांचे वरदान दिले आहे व त्यांनी अंगीकारलेली शिक्षण-पद्धती अगदी आदर्श आहे, असा आमचा कितीतरी काळ विश्वास होता. महात्मा गांधींनी मांडलेल्या मूलोद्योग जीवन पद्ध-तीला आपण जितक्या झपाटयाने गांधीजींना विसरलो, तितक्याच झपाटयाने फंड ठरवून मूठमाती दिली ! विद्यार्थीकेंद्रित राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचा विचार आणि उच्चार अगदी पंतप्रधान नेहरूंपासून ते इंदिराजीं-पर्यंत सर्वांनीच मोठया हिरीरीने केला. शिक्षकदिनाच्या दिवशी शिक्षकांचा गौरव करताना शिक्षणविषयक जबाबदाऱ्या, अपेक्षा पुन्हा पुन्हा ठळकपणाने मांडल्या. शिक्षकांना नवराष्ट्रनिर्मितीचे आधारस्तंभ आणि काय काय म्हणून झाले. परंतु तितक्याच हिरीरीने शिक्षण खात्याकडे अनुत्पादक खाते म्हणून दुर्लक्ष केले गेले. शिक्षक, अभ्यास-क्रम, शाळा, विद्यापीठे या सर्व गोष्टीविषयी पूर्ण अनास्था निर्माण झाली. पारंपरिक शासनकेंद्र इंग्रजी पद्धतीच्या शिक्षणाने, एका बाजूला जागतिक क्षेत्रातील प्रचंड आणि वेगाने होणारी औद्योगिक व वैज्ञानिक प्रगती आणि वरील शिक्षणपद्धतीतून बाहेर पडलेल्या शिक्षितांची कुवत, यात प्रचंड दरी निर्माण झाली आणि विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणविषयक पूर्ण अनास्था निर्माण झाली.

'एक एक बात सात सात हात' आणि पैशाच्या नावानं शिमगा असा प्रकार शिक्ष-णाच्या बाबतीत केल्यावर शिक्षक आणि विद्यार्थी शिक्षणाचं नाटक न करू लागले तरच नवल ! यात ग्रामीण भागाची दुर्दशा तर विचारायलाच नको ! एकूण शिक्षण हा राष्ट्राचा पाया आहे असे म्हणत आम्ही आजपर्यंत या तिसऱ्या डोळ्यात धूळफेकच केली आहे. म्हणूनच नवीन शैक्षणिक धोरण राबविण्यापूर्वी कठोर आत्मपरीक्षण करणे अगत्याचे ठरेल. तसे करण्याची आमची तयारी असली पाहिजे, तरच 'शिकेल त्येऽहुठे हुकेल !' ही म्हण आपण बदलू शकू !

## ग्रामीण भागातली परवड

मुंबई-पुण्यात राहणाऱ्या, वाचनालयांच्या, शाळाकॉलेजांच्या आणि विद्वानांच्या गर्दीत हरवलेल्या लोकांना ग्रामीण भागातल्या शिक्षणाची परवड कशी समजणार ! अकोले सारख्या तालुक्याच्या गावी इ. ५ वीत प्रवेश घेतलेल्या अनेक विद्यार्थ्यांना नीट स्वतःचं नावही लिहिता येत नाही. मग पाचवीचा अभ्यासक्रम तर दूरच ! एक-शिक्षकी शाळांच्या बाबतीत तर विचारूच



नका. कोणत्या वर्गाकडे लक्ष देऊ, असे म्हणत कोणत्याच वर्गाकडे लक्ष दिले जात नाही अशी स्थिती. खेड्यातले शिक्षक म्हणजे जणू पुढाऱ्यांचे कार्यकर्ते. त्यांनी शिकवले नाही तरी चालेल. परंतु जयंत्या-मयंत्या, सप्ताह, सणोत्सव यामधून गल्ली-पुढारी, तालुकापुढारी यांना मुलांसमोर महान म्हणून मिरवले पाहिजे. निवडणुकांच्या काळात एकनिष्ठ कार्यकर्ता म्हणून उपयोगी पडले पाहिजे. याशिवाय सरकारने कुटुंब-नियोजन मोहीम, साक्षरता मोहीम, शिर-गणती मोहीम, अल्पबचत मोहीम, ही मोहीम नि ती मोहीम राबविण्याचे हुकमी साधन म्हणजे गुरुजीवर्ग, अशा भाऊगर्दीत त्यांनी शिकवायचं कधी ?

त्यातच शिक्षणविस्तार अधिकारी आप-लेच ! ते बिचारे शिक्षकांना चांगले सांभा-ळून घेतात. शिक्षकही त्यांच्या सेवेत तत्पर असतात. त्यामुळे एज्युकेशन ऑफिसरपर्यंत सर्वांचे आशीर्वाद लाभतात.

सोयीनुसार आपापल्या भागात बदल्या आणि नोकरी यामुळे स्वतःची शेती, घरदार आणि गाव यांच्या विकासकामाला गुरुजन-वर्गास वाहून घ्यावे लागते. मग बिचाऱ्या शिक्षणाला या सगळ्या गदारोळात कसा वेळ मिळावा ? पण या विषयी तक्रार कर-ण्याचे कारण नाही. ग्रामीण जीवनातील ग्रामस्थांनी या विषयी कधी तक्रार केलीये का ? शेतीची कामे, संघ, सोसायट्या, ग्राम-पंचायती या आणि अशा महत्त्वाच्या कामात ग्रामस्थही इतके अडकले आहेत की आपली मुले शाळेत जातात हेही त्यांना मास्तरांनीच सांगावे लागते ! मग गावमार्गदर्शक अस-लेल्या मास्तरांना कसा दोष द्यायचा ? मास्तरही कोणाचे 'वर्षाचे नुकसान' कधी होऊ देत नाहीत. सगळी मुले पास होतातच. हे मुलांना आणि पालकांनाही माहीत असते. अनेक मास्तर महिनोगणती शाळांवर हजरच नाहीत, त्यांना तेवढी सवडच नाही असे ऐकिवात येते. कधी मुले येत नाहीत, कधी मास्तर येत नाहीत. एकूण शाळा चालू असतात. चहा, भजी, विड्या यांच्याबरोबर चवदार गप्पा शाळेच्या व्हरांड्यात चाल-लेल्या कैक शाळांमध्ये दिसतात.

या सगळ्यांचा दोष का बिचाऱ्या शिक्ष-कांना देणार ?

आदिवासी भागात तर सगळाच आनंद दिसतो. कुठे शाळेची कौलं उडालेली. कुठे शाळेच्या खोल्यांत गुरे बांधलेली, कुठे मारु-तीचे देऊळ म्हणजेच शाळा, चावडी, चव्हाटा गप्पांचा सुगंधी कट्टा. (ऑल इन वन !) तीन तीन महिने पावसाशिवाय शाळेत कोणीच जाऊ शकले नाही अशीही उदाहरणे ऐकिवात येतात.

आदिवासी भागात चाललेल्या आश्रम-शाळा तर स्वतंत्र कुरणंच झाली आहेत ! विद्यार्थ्यांपेक्षा विद्यार्थ्यांसाठी पालकत्वाच्या नात्याने काम करणाऱ्या शिक्षक, अधीक्षक, कर्मचारी यांच्याच तब्येती आश्रमातील मुक्त संचाराने सुधारतात. अर्थात सगळीकडे 'आपलेच दात आपलेच ओठ'. तक्रार कोणी कोणाविषयी करायची ?

या आश्रमशाळांच्या संदर्भात होणारा खर्च, असलेल्या आजच्या गरजा, ह्या सगळ्या गोष्टी लक्षात घेऊन 'गुरुकुल शिक्षणपद्धती असा एक गुरुकुलाचा पर्याय स्वतंत्रपणाने 'शिक्षण संदेश 'मधून सर्वांसमोर मांडला होता. त्याच्या प्रती शिक्षणमंत्र्यांपासून सर्वां-पुढे विचारार्थ पाठवल्या. पुढे त्याची फल-निष्पत्ती फार थोडी झाली. नवीन नवोदय शाळांमध्ये व आदिवासी भटक्या विमुक्तांच्या पब्लिकस्कूलच्या धर्तीवर होऊ घातलेल्या शाळांमध्ये त्यातील काही विचार अंतर्भूत झाले इतकेच ! ग्रामीण जीवनातील शाळा, विद्यार्थी, मास्तर हा विनोदी कथांचा विषय आहे इतकेच.

ग्रामीण भागात शाळांच्या इमारती बांधल्या जातात त्या सुधेपणाने वर्ष-दोन वर्षेही नीट तग धरीत नाहीत यात काय ते सारे आले !

अशा परिस्थितीत पहिली ते चवथीचा प्रत्यक्ष पुस्तकातला अभ्यासक्रम, शिक्षकांच्या नियोजन वहीतला नियोजन कार्यक्रम, शिक्ष-णाची उद्दिष्टे यांची गाठ विद्यार्थ्यांशी कशी पडावी ? यातून पिढ्यांपिढ्यांचा बट्ट्याबोळ झाला आहे हे वास्तव आहे, सार्वत्रिक शिक्ष-णाचे आणि सक्तीच्या शिक्षणाचे धोरण स्वीकारल्यापासून आता तीस वर्षे उलटली त्याचे काहीच फलित नाही असे नाही. अनेक साक्षर झाले हे खरे, पण त्याच बरोबर भ्रष्टाचाराचे, कामचुकारपणाचे, लबाडीचे, बाळकडू लहानपणापासूनच मिळाले हे ध्यानी घेणे जरूर आहे.

यात आदर्श घेऊन जगणारे शिक्षक नाहीतच असे नाही. जरूर आहेत. बुडत्याला

काडीचा आधार तेवढाच आहे इतकेच ! त्यातच शिक्षक संघटनेने शिक्षकांच्या हाती आलेले स्वत च्या सुरक्षिततेचे हत्यार !

_ एकूण ग्रामीण पातळीवर आजही सगळा अधार आहे असेच म्हणावे लागेल.

यातून आलेले विद्यार्थी जेव्हा माध्यमिक शाळात येतात तेव्हा निकाल आणि अभ्यास याबाबतीत मागील पानावरून पुढे चालू असे धोरण सर्वांना स्वीकारावे लागते. रयत शिक्षण संस्था, हिंद सेवा मंडळ, मराठा एज्युकेशन सोसायटी, सत्यनिकेतन यांसारख्या काही ध्येये उराशी बाळगून काम करणाऱ्या संस्था ग्रामीण जीवनात खंबीरपणाने कार्य करीत असताना त्यांच्या अतर्वर्तुळात नैराश्य आलेले पाहावयास मिळते

राजकारण हे असे रसायन आहे की, प्लॅटफॉर्मवरून बोलताना आकाशाला गव-सणी घालायची, आदर्शाची झूल पांघरायची आणि कार्य करताना मात्र पाताळातल्या कारवाया करायच्या. त्या राजकारणाच्या कचाट्यात सापडलेल्या अशिक्षित अजागृत ग्रामीण जीवनातील शिक्षणाचे पुढे काय होणार ?

अशी पार्श्वभूमी लाभलेल्या क्षेत्रात नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचे धाडस आपण करीत आहोत. दुष्काळात जमीन पिकवण्याइतके ते अवघड आहे हे जाणून आपल्याला ते अमलात आणावयाचे आहे. केवढी घोर प्रतिज्ञा आपण केली आहे, हे आपणच समजून घ्यायला पाहिजे. आपल्या डोळ्यांसमोर केवळ पुण्यामुंबईसारखी शहरे तर नाहीत ना ? हा देश खेड्याचा आहे. दोन-तृतीयांश जनता खेड्यात राहते आणि त्यातच शैक्षणिक जाण असलेल्यांची संख्या अगदीच अल्प आहे हे ध्यानी घ्यायला पाहिजे.

## दुष्काळात तेरावा ठरू नये !

*नवीन शैक्षणिक धोरणामध्ये टी. व्ही.*, व्हिडिओ या दृक्श्राव्य साधनांना अनन्य-साधारण महत्त्व मिळाले आहे. मानस-शास्त्रीय दृष्टिकोणातून दृक्श्राव्य साधनांचा शैक्षणिक प्रगतीसाठी होणारा उपयोग हा अतुलनीय आहे हे सर्वांना मान्य आहे १९९० सालापर्यंत ऐंशीनव्वद टक्के जनते-पर्यंत हे माध्यम पोहोचविण्याचा निर्धार शासनाने केला आहे. रेडिओचा पोहोच जवळपास शंभरटक्के लोकांपर्यंत झाला आहे. हाही होईल. परतु एक गोष्ट लक्षात ठेवणे आवश्यक आहे की विचारवंत वगळता या साधनाकडे शैक्षणिक साधन म्हणून कोणीही पाहत नाहीये ! **एखादा उत्तम चित्रपट पाहण्यात जनमेला दंग करावे आणि खुशाल बेसावर आक्रमण करावे, घरे लुटून न्यावीत अशी परिस्थिती येऊन ठेपली आहे.** सहासहा, आठआठ तास लोक टीव्ही, व्हिडिओसमोर दृश्यसमाधीमध्ये गुंगून गेलेले दिसतात. त्यातील व्हिडिओनामक प्रकरणाचा प्रसार गाजर गवतासारखा झपाट्याने झालाय, होतो आहे शहरात दर हजारी एक एवढे या व्हिडिओ हॉलचे प्रकरण पोहोचले आहे. ' किधर भी देखो व्हिडिओ हॉल ! ' असे दृश्य दिसते आहे. परंतु हे केवळ शहरातच नाही ग्रामीण जीवनात तर ह्या प्रकरणाने दारूड्यासारखा धुमाकूळ घातला आहे. अगदी दोन तीन हजार वस्तीच्या गावातूनही व्हिडिओ हॉल पोहोचले आहेत त्यात हायस्कूले असलेली गावे या साथीने लवकर पछाडली जात आहेत हे लक्षात घेतले पाहिजे ग्रामीण जीवनातील सांस्कृतिक केंद्रे म्हणून ज्या मारुती मंदिरा-कडे पाहिले जाई ती आता रात्री ओस पडू पाहत आहे. टाळमृदुंगाचा नाद आता दिवसें-दिवस व्हिडिओमधील, टीव्हीमधील चित्र-पटात विरून जाऊ लागला आहे. मग शाळे-तल्या विद्यार्थ्यांची गोष्ट तर विचारूच नका. अगोदरच अभ्यासाविषयी आनंद असलेल्या विद्यार्थ्यांना ही पर्वणीच आली. निरनिराळ्या वसतिगृहांत राहून शाळा शिकणारे विद्यार्थी वसतिगृहातही नसतात आणि शाळेतही नसतात, रस्त्याने बोकाळतानाही दिसत नाहीत. तारवटलेल्या, तांबरलेल्या डोळ्यांनी व्हिडिओ हॉलमध्ये जमेल तेथे बेहोशीत बसलेले असतात. ध्येयवादी शिक्षण संस्थांना ग्रामीण पातळीवर कार्य करताना ह्याला कसे तोंड द्यायचे, हा प्रश्न पडला आहे.

टी. व्ही. ची करामत तर विचारूच नका ग्रामपंचायत हॉलमध्ये ग्रामसभेला चुकूनही न जमणारी माणसं चार-चारतास, पाच-पाच तास घालवितात. हा, आता पुढाऱ्यांची मात्र सोय झाली, थोडा वेळ टीव्ही बंद करायचा, भाषण ठोकायचे, टाळ्या घ्यायच्या, टी. व्ही. पाहण्यात *व्यत्यय आणल्याबद्दल क्षमा मागा-*यची आणि जायचे. पूर्वी ही संधी लग्न-समारभ, मर्तिके यावेळी मिळत असे. श्रीकृष्णाने गोकुळातील गोपींना एवढे वेड लावले नसेल असे वेड या टीव्हीने ग्राम-जीवनाला लावले आहे. शेताभातातून लोक लगबगीने परततात ते या ओढीने. पान्हाव-लेली जनावरे धारेसाठी ताटकळतात आणि टीव्हीत गुंतलेली माणसं ' गाय धुऊन ये ' असे दुसऱ्याला सुचवून मोकळे होतात. मुलगा बापाला आणि बाप मुलाला, भाऊ भावाला कामे सांगून मोकळे. आपली जाग, न सोडण्याचा मोह कुणालाच आवरत नाही. आता या साधनाचा फायदा म्हणजे गावातले तटेबखेडे कमी झाले, लोकाना बसल्या बैठकीला दुनियेचे दर्शन घडले. त्याचबरोबर शिक्षणही थप्प होण्याच्या मार्गावर आहे !

सुदैव असे की शहराप्रमाणे फार मोठ्या प्रमाणावर ब्ल्यू फिल्मचा सुळसुळाट ग्राम-जीवनात अद्याप नाही. पण त्याला फार वेळ थांबावे लागणार नाही. मांडवाच्या दारी जावई टीव्ही मागू लागला आहे.

अशा परिस्थितीत आधीच शिक्षणाविषयी अधार असलेल्या ग्रामजीवनात टीव्ही, व्हिडिओने असा प्रकाश पाडल्यावर शिक्षण-विषयक प्रगतीसंबंधी बोलायलाच नको. द. मा. मिरासदाराच्या शिकवणीमधील विद्यार्थी मास्तराना तमाशाला नेतो, आता गावोगावी विद्यार्थी मास्तरांना व्हिडिओ हॉलमध्ये नेतील तर आश्चर्य कसले ? ग्राम जीवनातून मुंबईत गेलेले ग्रामस्थ पाहुणे म्हणून येताना काही वेळा ब्ल्यू फिल्म घेऊन येतात आणि दिमाखात आपल्या सवंगड्यांना दाखवतात. त्याचे व्यसन पुस्तकशत्रू असलेल्या थोराड शाळकरी, आश्रम शाळावासी, वसतिगृहवासी विद्यार्थ्यांना लागते आहे.

मोठी लोकसंख्या असलेल्या या देशात शिक्षणाचे हे समर्थ माध्यम वापरताना किती सावधगिरी वापरावी लागेल हे ध्यानी घेणे *जरूर आहे. ' सुरी सोन्याची झाली म्हणून* काय उरीच खुपसावी ! ' असे घडले तर जीवनातील शिक्षणाच्या दुष्काळात हा तेरावा महिना ठरेल !

## चुकीची पार्श्वभूमी

विसावे शतक संपताना देशाची लोक-संख्या सुमारे १०० कोटी असेल आज राज-कीय आणि सामाजिक जीवनातून मूल्ये

नाहीशी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. सर्वधर्मसमभाव, समाजवाद, लोकशाही आणि व्यावसायिक आचारसंहिता ह्यांचे पालन करणे उत्तरोत्तर अवघड होते आहे ग्रामीण आणि शहरी विभागातील विषमता कमी केल्याशिवाय ग्रामीण भागाला सुशिक्षित आणि प्रशिक्षित युवकाचा लाभ व्हायचा नाही. नवनवीन तणाव निर्माण होत आहेत. राष्ट्रीय एकात्मता व मानवता याना तडे जात आहेत. अशा पार्श्वभूमीवर राष्ट्र आत्म-निर्भर करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण घोषित केले आहे. भारताचा सांस्कृतिक वारसा, लोकशाही, सर्वधर्मसमभाव, स्त्री-पुरुष समानता, वातावरणशुद्धी, सामाजिक कुपण तोडणे, छोटया परिवाराच्या आदर्शाचे पालन, वैज्ञानिक दृष्टिकोण बिंबवणे ह्या सर्व गोष्टींवर नवीन शैक्षणिक धोरणात लक्ष केंद्रित केले असून विद्यार्थीकेंद्रित शिक्षण आणण्यासाठी १० (५+३+२) + २ + ३ हा आकृतिबंध जाणीवपूर्वक स्वीकारला आहे. विशेष प्रज्ञावतासाठी शिक्षण, व्यावसायीकरण ह्या पद्धतीचा अवलंब केला आहे. उच्च शिक्षण, मुक्त विद्यापीठ, दूरअध्ययन, ग्रामीण विद्यापीठ अशा अनेक नावीन्यपूर्ण योजना अनेक तज्ज्ञांच्या सूचनानुसार स्वीकारलेल्या आहेत. आणि निर्धारपूर्वक त्यासाठी प्रचंड प्रमाणात पैसा खर्च करावयाचे ठरविले आहे.

देशातील व समाजातील गंभीर समस्यांचा विचार करून आखलेल्या या नव्या शैक्षणिक धोरणाला पार्श्वभूमी अजिबात समाधानकारक नाही. मुळावर अनैतिकतेचे, भ्रष्टाचाराचे, व्यभिचाराचे, रंगेलपणाचे, रंगेलपणाचे, खोटेपणाचे, उर्मटपणाचे तसेच लाचारीचे आणि पळपुटेपणाचे, एवढेच काय परंतु निष्ठा बदलण्याचे बाळकडू मिळण्याच्या परिसरातील जागाच दाखवू म्हटलं तर यादी संपता संपणार नाही. यात भरीला देशद्रोहीपणाची उदाहरणे ! याची जबाबदारी कोण घेणार ? अशा परिस्थितीत समस्यांचा विचार तज्ज्ञांनी केला आहे याबद्दल शंका नाही. पण ज्या वयात शिक्षकाच्या समोर बसून त्यांच्या मार्गदर्शनाने अपेक्षित धडे विद्यार्थ्यांनी गिरवावेत अशी आपली अपेक्षा. त्या वयात वरील प्रकारचे आदर्शच मुलाच्या समोर असतील तर त्याची जबाबदारी कोण घेणार ?

'विद्यार्थीकेंद्रित शिक्षण' हा शिक्षणशास्त्रदृष्टया अतिशय तर्कशुद्ध विचार आहे. परंतु त्याकरिता आवश्यक अशा बाबी, उदा. वर्गात विद्यार्थ्यांची मर्यादित संख्या ठेवणे, इमारती, आरोग्य इ. आम्ही काटेकोर पाळण्याची हमी घेतली पाहिजे. त्याचबरोबर शिक्षकांना अल्पकालीन प्रशिक्षण देऊन त्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून नवीन शैक्षणिक जबाबदारी शिक्षकांवर ढकलून देताना वरील प्रकारचा बेजबाबदारपणा थांबविण्याची हमी शासन आणि समाज घेणार की नाही ? की तीही जबाबदारी शिक्षकावर टाकून मोकळे होणार ? सध्या जी अल्पकालीन प्रशिक्षण शिबिरे चालली आहेत त्याच्याविषयी शिक्षक आणि त्यांना मार्गदर्शन करणारामध्ये अनास्था, संभ्रम आढळत आहे एवढेच नव्हे तर ज्यांची मुले शिकणार आहेत त्या समाजाला ते फॅड किंवा नव्याने होऊ घातलेला खेळखंडोबा वाटतो आहे, ह्याचे भान आपण ठेवायला हवे

नवे शैक्षणिक धोरण निश्चित योजनाबद्ध आणि श्रेष्ठ उद्दिष्टानुवर्ती आहे हे खरेच त्याची कार्यवाही काटेकोरपणे केली गेली व 'दिल्ली ते दौलताबाद' असे प्रमाद त्यात घडले नाही तर नवे सामर्थ्य राष्ट्रात निर्माण होणे शक्य आहे.

पण—

## सामूहिक जबाबदारी

नवे शैक्षणिक धोरण अमलात आणण्याची जबाबदारी केवळ सरकारची आहे असेही नाही. ती सामूहिक जबाबदारी म्हणून स्वीकारली पाहिजे. शासन, शिक्षक, विचारवंत, समाज आणि मुख्य म्हणजे विद्यार्थी याचा समन्वय साधण्याची गरज आहे विशेषत: ग्रामीण भागात ही जबाबदारी शासन, शिक्षक आणि ग्रामीण भागात कार्यरत असलेले पुढारी याची आहे. आजपर्यंत शिक्षणाचा जो बट्याबोळ झाला त्याची दोन प्रमुख कारणे आहेत (१) इंग्रजांचे पूर्णत: अनुकरण करण्याचा अनैसर्गिक प्रकार आणि (२) शिक्षण विषयक अनास्था. या दोन्ही कारणाचे सामूहिक जबाबदारीचे तत्त्व लक्षात घेऊन निराकरण करावयास हवे. एकदा सर्वधर्मसमभाव आणि समाजवाद ही दोन्ही तत्त्वे स्वीकारल्यानंतर संवैधानिक बंधन म्हणून मूल्याधिष्ठित शिक्षण दिले गेले पाहिजे. त्यासाठी न्यायसंस्थाच्या संवैधानिक स्वातंत्र्याप्रमाणे शिक्षण खात्याचे संवैधानिक स्वातंत्र्य जपले गेले पाहिजे वर उल्लेखिल्याप्रमाणे लहरी मुहम्मदाप्रमाणे शिक्षण क्षेत्रात वागता कामा नये सरकार कोणतेही असो, शिक्षणावर होणारा खर्च, शिक्षणाचा दर्जा, शैक्षणिक सुविधा, शिक्षक याच्या बाबतीत कायमस्वरूपी व सन्मानाचे सूत्र अवलंबिणे आवश्यक आहे त्यासाठी धाडसाने काही पावले उचलली पाहिजेत आणि ती कर्तव्य-कठोरतेने अमलात आणली पाहिजेत. तरच अंतिम उद्दिष्ट साधले जाईल.

## धाडस आहे ?

(१) गुरुकुलाची संख्या टप्प्याटप्प्याने शंभर टक्क्यापर्यंत नेण्याचा उपक्रम हाती घेणे आणि विद्यार्थी आणि शिक्षक याना स्वतःच्या गावापासून दूर ठेवून विद्यार्थ्यांचे अध्ययन घडविण्यासाठी निवासी शिक्षकांची सोय करून अध्ययन आणि अध्यापन या व्यतिरिक्त अन्य गोष्टींशी व्यावहारिकदृष्टया शिक्षकाचा संबंध नसणे त्याचबरोबर त्याची आर्थिक परिस्थिती, सन्मान आणि त्याच्या व्यासंगाची अद्ययावतता याची काळजी घेणे. आखीव रेखीव कार्यक्रम आखणे.

(२) टीव्ही, व्हिडिओ ही केवळ शैक्षणिक साधने म्हणूनच वापरणे. त्यावरील जाहिराती, चित्रपट बंद करून केवळ बातम्या माहितीपट, एवढया गोष्टी व अभ्यासक्रम एवढेच दाखविण्याचे कायद्याने बंधन आणणे.

(३) इमारती, शैक्षणिक साधने याच्यासाठी भरपूर खर्च.

(४) शाळांची संख्या कमी करून त्यांचे केंद्रीकरण करणे— म्हणजे तालुक्यात दोनशे प्राथमिक शाळा असतील तर त्यांचे चार-पाचच शाळात, परंतु वर उल्लेखिल्याप्रमाणे निवासी शाळात, रूपांतर करून शिक्षकाची संख्या वीस ते पंधरा विद्यार्थ्यांगणिक एक या प्रमाणात आणली पाहिजे व एकेक विद्यार्थी घडविण्यावर लक्ष केंद्रित झाले पाहिजे. प्राथमिक शाळांच्या बाबतीत असा दृष्टिकोण स्वीकारल्याशिवाय भावी शिक्षणाची तयारी होणार नाही.

(५) निसर्ग आणि औद्योगिक विश्व याची ओळख प्राथमिक पातळीवर झाली

पाहिजे. सहलीद्वारे दीर्घ अभिसरण प्रक्रिया.

(६) शारीरिक शिक्षण आणि मूलोद्योगावर खऱ्या अर्थाने भर.

(७) प्राथमिक व माध्यमिक पातळीवरील सर्व शिक्षकाना शारीरिक शिक्षण, सैनिकी शिक्षण, तत्त्वज्ञान आणि मानसशास्त्र यांचे सक्तीचे प्रशिक्षण आणि व्यवस्थापन आणि विषयाचे अद्ययावत ज्ञान याचे वेळोवेळी पुन· प्रशिक्षण

नवीन शिक्षण धोरण राबविताना शासनाच्या मनात असेच काही करावयाचे आहे पण खरोखरीच तसे धाडस आहे काय? पैसा, नियोजन आणि राजकारण याची आडकाठी नक्कीच या सर्व गोष्टीत येईल. याचबरोबर प्राथमिक शिक्षणाचे सपूर्ण राष्ट्रीयीकरण करण्याचा विचार केला पाहिजे अर्थात ह्या सगळ्या गोष्टी सुचविणे हे कागदावर खूप सोपे आहे प्रत्यक्ष ते अतिशय प्रामाणिकपणे व व्रतस्थपणाने राबवणे फार कठीण आहे. आणि अशा सूचनाच करायच्या म्हटल्या तर शेकडो प्रबंध, लेख सादर होतील आणि 'अहो रूप अहो ध्वनीम् !' अशी अवस्था निर्माण होण्याची शक्यता आहे.

अनेक प्रगत देशांमध्ये आणि जाणीवपूर्वक राष्ट्रनिर्मिती करू इच्छिणाऱ्या देशानी हे केले आहे हे ध्यानी घेतले पाहिजे.

## धसका घेतला !

१९८५ मध्ये उच्चारित झालेल्या नव्या शैक्षणिक धोरणाचा आम्ही एवढा धसका घेतला की आमची योजनाच तयार होईना. १९८६ जूनपासून आम्ही सुरू करणार होतो. आता आम्ही १९८७ सालातही काही प्रायोगिक शाळांवर भागवणार आहोत. १९८८ साली पहिली, सहावी, नववी, अकरावी या स्तरावर काही टक्के शाळावर आम्ही ही योजना आणण्याचा विचार करीत आहोत, काय सागावे पुढच्या वर्षीपर्यंत काय होईल. या प्रयोगामुळे आम्ही किती नुकसान करून घेतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे ग्रामीण भागात अप्रशिक्षित मास्तराची धाऊक प्रमाणात तिगस्ता केलेली भरती. ३०० रु. ठरीव वेतनावर केलेल्या या नेमणुकांमुळे अनेक महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी शिक्षण मध्येच सोडून नोकऱ्या पत्करल्या. त्यांना आपण नेमके काय आणि कसे शिकविणार हे न कळल्यामुळे त्याच्यासमोर आलेल्या विद्यार्थ्यांचे तर नुकसान झालेच. पण खुद्द त्या विद्यार्थ्यांचेही नुकसान झाले. अशा किती पिढ्या आम्ही बरबाद करणार आहोत ?

एकूण नवीन शैक्षणिक धोरण म्हणजे सरकारने काढलेले नवे फंड न ठरो ! एन. सी· ई. आर. टी. चा अभ्यास ग्रामीण शाळामधून राबवताना कपाटे भरभरून प्रयोग साधने फुकट घालविलेली किंवा पेटीबद ठेवलेली पहावयास मिळाली आहेत.

## बुडत्याला काठीचा आधार

नवीन शैक्षणिक धोरण राबवले जाईल तसे जाईल आणि टीव्हीचा व्हायचा तसलाच वापर होईल असे भाकित धरून चाललो तरी असे सुचवावेसे वाटते की निदान चवथीतून पाचवीत जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पहिल्या सहा महिन्यात भरगच्च उजळणी अभ्यासक्रमाचे नियोजन करून प्रथम त्यांना प्राथमिक स्तरावर आणता येणे शक्य आहे मग दुसऱ्या सहामाहीमध्ये आज पाचव्या इयत्तेत असलेल्या अभ्यासक्रमातील निवडक निम्मा अभ्यासक्रम प्रयत्नपूर्वक विद्यार्थ्यांच्या गळी उतरविण्याचा प्रयत्न सर्वदूर केला गेला पाहिजे तर आणि तरच निदान होणारे नुकसान टाळता येईल. त्यासाठी टीव्हीचा व व्हिडिओचा उपयोग करता येईल म्हणजे बुडत्याला काठीचा आधार होईल ! नवीन शैक्षणिक धोरणाचे व्रत घेताना पार्श्वभूमी तयार होईल. शिक्षण क्षेत्रात एकप्रकारे शून्याधारित सूत्रबद्ध शिक्षणयोजना नवीन शैक्षणिक धोरणाच्या संदर्भात आणली पाहिजे.

ग्रामीण विद्यापीठाची कल्पना अमलात आणण्यासाठी, ग्रामीण भागातील शाळावर आणि विशेषत: माध्यमिक शाळावर जबाबदारीचा बोजा टाकून त्यासाठी विशेष अनुदानाची भरपूर व्यवस्था करून त्याना समपातळीवर आणण्यासाठी विशेष परिश्रम घेतले गेले पाहिजेत त्यासाठी शिक्षकाचे विशेष सहाय्य घ्यावे लागेल.

## शिक्षण ही चळवळ

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरी विद्यार्थ्यांच्या पातळीवर आणण्यासाठी आणि शिक्षणाचा राष्ट्रीय पातळीवर समान दर्जा निर्माण करण्यासाठी शिक्षण ही चळवळ आहे असे समजून प्रयत्न व्हायला पाहिजेत. त्यात प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षकाचा समन्वय आणि सहभाग घडवावा लागेल. आज ध्येयाने प्रेरित, कार्यरत झालेला शिक्षक हजारात एखादा असतो. त्यांना प्रेरित करण्याचे कार्य फक्त रचनात्मक कार्य करणारे कार्यकर्ते, वयोवृद्ध, ज्ञानवृद्ध शिक्षक, प्राध्यापक आणि मुख्य म्हणजे पुरेसा पैसा आणि कार्याच्या स्पर्धेवर आधारित वेतन आणि पदोन्नती याच गोष्टी करू शकतील. काळ बदलला आहे आदर्श विरळा झाला आहे राजकीय क्षेत्रातील व्यक्तीनी केलेली आव्हाने वाझोटया घोषणा वाटतात ! त्यानी आपली विश्वासार्हता गमावली आहे. ही शोकांतिका क्षणभर बाजूला ठेवून शिक्षकाला कार्यकर्ता बनविण्याचा कार्यक्रम हाती घेणे आवश्यक आहे.

झणझणीत अजन घातल्याशिवाय दृष्टीला स्वच्छपणा प्राप्त होत नाही असे अजन आज घालण्याची गरज आहे. त्यासाठी शासनाजवळ राजकीय स्वार्थापलीकडे जाऊन न्याय्य पद्धतीने कठोर कार्यवाही करण्याचे धाडस पाहिजे. एरवी दूरचित्रवाणी आणि संगणकासारखी साधने ही विकृती निर्माण करणारीच ठरतील अशी भीती वाटते !

विचारवंतांनी, समाजधुरीणानी मांडलेली कोणतीही योजना चागलीच असते. त्याचा वापर आपण कसा करतो, कसे भान ठेवतो, किती प्रामाणिक हेतूने ती योजना राबवतो यावरच त्या योजनेचे भवितव्य अवलबून असते सोन्याची सुरी वाढदिवसाचा केक कापून आनद व्यक्त करण्यासच शोभून दिसते किंवा शोभेची वस्तू म्हणूनच ठीक आहे ती उरात खुपसली तर परिणाम व्हायचा तोच होणार! आतापर्यंत आलेल्या शैक्षणिक योजनांची वासलात लावण्यात आपण यशस्वी होऊन आपला आत्मघात आपण केलाच आहे; तसाच आताही करणार का, असा प्रश्न आहे तशी भीती आहे ! ग्रामीण जीवनात तर मुकी बिचारी कशी हाका, अशीच परिस्थिती आहे. त्याच्या वाट्याला तीच परवड येणार. म्हणजेच देश पुन्हा मागासला तो मागासला राहणार ! एकविसाव्या शतकात झेप घेताना अपघात होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. बारीकशी नकळत चूक राहिली तरी केवढा घात होतो याचे आपण कमी अनुभव घेतलेले नाहीत. परवाचा अवकाशयानाचा अनुभव तर बोलकाच आहे. □

# काळे शोध

## पंकज कुरूलकर

सकाळी उठल्यावर दिनकर परळीकरने ड्रेसिंग टेबलच्या आरशात स्वतःचा चेहरा बघितला. आधीच्या रात्री त्याने चेहऱ्यावर लिंबाचा रस लावला होता. त्याने चेहऱ्यावरून एकदा हात फिरवला. आरशात नीट निरखून बघितले. छे ! तसा आपला चेहरा थोडाही उजळ झालेला दिसत नाही. उलट तेलकट दिसतो आहे. मग त्याने वॉश बेसिनवर स्वतःचा चेहरा हळूवारपणे धुतला. नॅपकिनने चेहरा पुसल्यावर परत एकदा बेसिनच्या वरच्या आरशात बघितले. त्याला वाटले गेले कित्येक दिवस आपण ह्या लिंबाचा प्रयोग करतो आहोत पण परिणाम तसा काही दिसत नाही. कंपनीतील पर्सोनेल डिपार्टमेंटची अमृता अगदी ठासून म्हणाली होती की लिंबाने चेहरा बराच उजळ होतो. त्याच्या आधी तिने सांगितले होते की रात्री मुलतानी मिट्टी नावाचा प्रकार लावत चल. ब्युटी पार्लरमध्येसुद्धा तो प्रकार वापरला जातो. म्हणून त्याने दोन महिने मुलतानी मिट्टी वापरून बघितली. हा प्रकार बाजारातसुद्धा दुर्मिळ. त्यासाठी उन्हातान्हात हिंडून त्याने मिट्टी मिळवली होती. पण परिणाम शून्य झाला. दोन महिन्यांनी तो परत अमृताकडे गेला. तेव्हा तिने लिंबू लावून बघायला सांगितले. हाही प्रकार लावायला सुरुवात करून महिना होत आला. परिणाम शून्यच आहे.

आंघोळ झाल्यावर कंपनीत जायची तयारी करताना दिनकरला फ्रेश झालो आहोत असे वाटले. टाय लावल्यावर घराबाहेर निघताना त्याने परत एकदा आरशात बघितले. आपण काळे असलो तरी स्मार्ट आहोत. एवढ्या प्रख्यात कॉम्प्युटरच्या कंपनीत आपण सेल्स इंजिनियर आहोत.

... खरे तर आपल्याला काळे आहोत म्हणून कमीपणा का वाटावा ? कमीपणा वाटावा असे आपल्याकडे कमी काहीच नाही. इंजिनियरिंगची डिग्री, एकुलता एक, मुंबईत स्वतःचा फ्लॅट, छानशी नोकरी, सर्व काही चांगले आहे आणि आपण काळे अथवा गोरे होणे आपल्या तर हातात नव्हते. ते जन्मापासून आपल्याला चिकटले आहे. आपल्या हातात होते ते कर्तृत्व दाखवणे. ते तर आपण दाखवले आहे. मग कसला कमीपणा.

. त्याला एकदम मानसी बर्वे आठवली. रिझर्व बँकेत नोकरी करते. तेव्हा बँकांचे कॉम्प्युटरायझेशन चालले होते. आपण आपल्या कंपनीच्या कामासाठी तेथे दररोज जायचो. त्यातून ओळख झाली. ओळखीचे मैत्रीत रूपांतर झाले. मैत्रीचे प्रेमात– तिच्या सांगण्यावरून आपण तिच्या वडिलांना विचारायला गेलो. बर्वे निघाले पक्के कोकणस्थ. चहा वगैरे दिला नाहीच पण घमेंडीने म्हणाले, 'आम्ही कोकणस्थ आहोत. देशस्थ इंजिनीयरला माझी मुलगी देण्यापेक्षा कोकणस्थ कारकुनाला देणं पसंत करेन.' आपल्याला धक्काच बसला. मानसीला म्हटले 'चल तुला पळवून नेतो. बघूच तुझा बाप काय करतो ते.' ती एकदम घाबरली. नको म्हणाली. आणि अचानकपणे आपल्याला न कळवता कोकणस्थाशीच लग्न सुद्धा केले. खूप गोरी होती आणि निळे डोळे, शेवटी गोऱ्याशीच लग्न केले. तेव्हा प्रथमच त्याला स्वतःच्या काळेपणाचा राग आला. हे सगळे ह्या रंगापायीच घडले अशी त्याची पक्की खात्री पटली.

त्याला नेहमी वाटायचे आपण सेल्समधील माणूस. बोलण्यात वाकबगार. मानसीच्या वडिलांना पाहता पाहता गुंडाळून टाकू. पण तसे काही घडले नाही. मग त्याच्या लक्षात आले नुसते कर्तृत्वाचेच महत्त्व नाही, रंगाचेसुद्धा आहे..

¤

कंपनीत पोहोचेपर्यंत त्याच्या मनात नेहमी प्रमाणेच हा संघर्ष चालला होता. कंपनीत आल्यावर तो सरळ अमृताकडे गेला.

'तुझ्या ह्या लिंबू लावण्याचासुद्धा काही फायदा होत नाही. माझा रंग थोडासुद्धा उजळलेला नाही.' काहीशा घुश्यातच तो म्हणाला.

'तुझा रंग अगदीच पक्का दिसतो.' अमृता खळखळून हसली. ती हसली की तिला खळी पडते हे त्याला खूप आवडायचे. मग तोही थोडा हसला.

'तुला असे वाटते का तू असले प्रकार केल्याने गोरा होशील ? ह्याने काय होऊ शकते ? फार तर तुझा मूळ रंग फक्त येऊ शकतो. तू सेल्सचा माणूस. उन्हातान्हात हिंडतोस. तू रापला आहेस. तेव्हा मी सांगते त्याला काही मर्यादा आहेत.

'मान्य आहे पण असे काही सांग की, ज्यामुळे किमान माझा मूळ रंग परत येईल' मग अमृता त्याला आयुर्वेदातील औषधे सांगत बसली.

'दिनकर तुला असे वाटत नाही का की तू तुझ्या रंगाचे जरा जास्तच करतो आहेस. नशीब मी तुझी चांगली मैत्रीण आहे. कंपनीत आणखी कोणाला तू एवढा डेसपरेट आहेस कळले तर ते तुला हसतील. तरी बरं तुझ्या डिपार्टमेंटचा मॅनेजर साऊथ इंडियन आहे व तो चांगलाच काळा आहे.'

'हे बघ हा रंग मला एकप्रकारे गुलामीचा प्रतीक वाटतो. मला ह्या रंगाचा राग आहे.'

'राग ? आपण सगळे इंडियन्स काळ्या रंगात जमा होतो. अशिया–अफ्रिका खंड काळ्यांचे आहेत. राग तू कोणाचा करशील?'

'म्हणून ते मागासलेले आहेत.'

'तसे नाही आहे. तुझे व्यक्तिमत्त्व दुभंगलेले आहे. एकाच वेळेला सुपिरिऑरिटी व इनफिरॅरीटी असे दोन्ही कॉम्प्लेक्स तुझ्यात आहेत. म्हणून असे घडते.'

हे बघ वाद नको, माझा मूड चांगला आहे.

'म्हणजे बिनशर्त माघार घेतो आहेस.'

'तसे समज.' म्हणत तो उठला व आपल्या डिपार्टमेंटकडे गेला.

¤

ट्रेनमध्ये बऱ्याच दिवसांनी त्याला त्याचा जुना मित्र प्रकाश देशपांडे भेटला. प्रकाश त्याचा क्लासमेट. बऱ्याच गप्पा झाल्यावर तो सहज म्हणाला,

'यार लग्न केव्हा करतो आहेस ?'

'आधी बहिणीचे लग्न, मग माझे.'

'अरे हो तुझी बहीण, आर्किटेक्ट मागच्याच वर्षी झाली ना ? मग तिच्या लग्नाचे चालले असेल.'

'चालले आहे. वडील गेल्यापासून मलाच तिच्या लग्नाचे बघावे लागत आहे. तुला सांगतो दिनकर एकवेळ मुंबईत घर घेणे पैसा असेल तर सोपं आहे पण सर्व काही असूनही मुलीचे लग्न जमवणे अवघड आहे.'

'एनी प्रॉब्लेम ?'

ती सावळी आहे. म्हणून गेले वर्षभर तिचे लग्न जमत नाही. स्वतः काळी असलेली मुलं तिला नापसंत करतात. आम्हाला बायको गोरी हवी म्हणतात, भले मग ती कुठे क्लर्क असली तरी त्यांना ती चालते. हरामखोर आहेत.' दिनकर एकदम गप्पच झाला. चर्च-गेट आल्यावर दोघेही उतरले.

'येरे कधी तरी घरी. दोनतीन वर्षांत आला नसशील. आईसुद्धा तुझी आठवण काढते !' प्रकाश आपुलकीने दिनकरला म्हणाला. दिनकरच्या डोळ्यांसमोर त्याची बहीण होती.

विचारांच्या तंद्रीत तो चर्चगेट स्टेशन-जवळील कॉलेजसमोरून जाऊ लागला. कॉलेज अभ्यासू पोरांपेक्षा व्यसनी पोरांचे म्हणूनच प्रसिद्ध होते. कंपाऊंडबाहेर बऱ्याच गाड्या पार्क केलेल्या होत्या व तेथे मुलंमुली खुशाल गप्पा मारत बसली होती. त्याने एकदा त्यांच्याकडे निरखून बघितले. साली ही श्रीमंतांची मुलं नेहमी गोरीच कशी होतात ? कधीच कोणी काळे कसे दिसत नाही ? आईबाप गोरे असतात म्हणून ? पण मग ते सुद्धा नेहमी गोरेच कसे असतात? खालच्या जातीतले, झोपडपट्टीतले कधी कोणी गोरे नसते ? अपवाद असतील पण ते अपवादच का ठरतात ? काही समजत नाही. जाऊ दे आपण नाही तरी आजकाल ह्याबाबत जास्तच विचार करू लागलो आहोत.

¤

'द. आफ्रिकेत सात काळ्यांना गोळ्या मारून ठार केले गेले. अलिप्त राष्ट्रांचे आवाहन बोथा सरकारने फेटाळले. कवीची फाशी कायम !'

सगळ्याच वृत्तपत्रांनी मोठ्या अक्षरांत ही बातमी छापली होती. बातमी वाचता वाचता दिनकर अस्वस्थ झाला. जगाच्या इतिहासात आजपर्यंत नेहमीच हे गोरे काळ्यांवर अन्याय करत आले आहेत. बास्टर्डस !

सी. डी. सी. ह्या जगद्विख्यात कॉम्प्युटर



कंपनीचे डेलिगेशन भारतात कॉम्प्युटर मार्केटिंगचा सर्व्हे करण्यासाठी आले होते. ते येण्याच्या आधीपासून त्यांच्याशी संपर्क ठेवणे दिनकर काम करत असलेल्या 'भारत कॉम्प्युटर्स'ने चालू केले होते. त्यांच्याशी कोलॅब्रेशन करण्यासाठी कपनीने एक ग्रूप फॉर्म केला होता व त्या ग्रूपचा इनचार्ज दिनकरला केले होते.

गेले चार दिवस दिनकर सी. डी. सी. च्या डेलिगेशनशी मोठमोठ्या हॉटेल्समध्ये कोलॅब्रेशन संबंधात चर्चा करत होता. अखेर चर्चा यशस्वी झाली. कंपनीच्या मॅनेजिंग डायरेक्टरपासून दिनकरच्या ग्रूपवर अभि-नंदनाचा वर्षाव झाला. ताजमधून बाहेर पडताना दिनकर याचाच विचार करत होता की आता आपल्याला इनक्रिमेंट किती मिळेल. विचारांच्या तंद्रीत चालत असताना त्याला समोरून मानसी बर्वे व तिचा नवरा येताना दिसले. त्याला अस्वस्थ झाल्यासारखे वाटले. त्यांना टाळावे म्हणून तो मान खाली घालून चालू लागला. पण मानसीच्या नवऱ्याने थांबून 'हॅलो' म्हटल्यावर त्याला थांबणे भाग पडले. त्यानेही उपचारार्थ 'हॅलो' म्हटले.

'इकडे कुठे ?'

'ऑफिस सुटले व दोघेही गेटवेला फिरायला आलो. तेवढाच चेंज. तुम्ही ?

'अं ? इकडे आलो होतो. जरा काम होते.' त्याला क्षणभर वाटले आजचा आपला पराक्रम त्यांना सांगावा. पण त्याला तसे बोलताच आले नाही. मग जरा वेळ कोणीच काही बोलले नाही. मग तोच आपणहून म्हणाला, 'निघतो, वेळ होईल.'

'चलो. सी यू' मानसीचा नवरा प्रसन्न-पणे हसत त्याला म्हणाला व दोघेही निघून गेले.

¤

घरी आल्यावर आधी त्याने चेहरा धुतला व भस्‌भस्‌ 'फेअर अँड लव्हली' चेहऱ्याला लावले.

'भारतात इंग्रज आले तेव्हा भारतीयांनी त्यांचे दगडाने स्वागत केले नाही उलट त्यांची गोरी कातडी बघण्यासाठी ते रस्त्यावर कुतूहलाने जमले. त्यामुळे इंग्रज भारतावर दोडशे व निर्विघ्नपणे राज्य करू शकले.' एका प्रसिद्ध पत्रकाराचे भाषण संध्याकाळच्या इंग्रजी वृत्तपत्रात छापून आले होते.

सकाळी कंपनीत गेल्यावर तो आधी अमृताकडे गेला.

'तुझे आयुर्वेद, होमिओपथी सगळ्या शास्त्रातील कातडी गोरी करण्याची औषधं सांग. मला माझ्या रंगाचा राग आहे. आय हेट धीस ब्लॅक कलर. मला गोरे बनायचे आहे !

टेक इट इझी माय डिअर फ्रेंड ! आधी जरा शांत हो. मग बोलूच ! नेहमीच्याच शांतपणे अमृता म्हणाली. मग बराच वेळ ती बोलत होती व तो ऐकत होता.

आयुर्वेद, होमिओपथी, अॅलोपथी सर्व प्रकार झाले. कशाचाच परिणाम झाला नाही.

## २

सकाळी उठून नेहमीप्रमाणे दिनकरने आरशात बघितले. त्याला काहीशी शंका आली. रुंद कपाळावरून हात फिरवला. कपाळावर आलेले केस वर केले. केसांच्या बाजूला छोटासा पांढरा डाग पडला आहे असे वाटले. बेसिनपाशी जाऊन त्याने चेहरा पाण्याने स्वच्छ धुतला. नॅपकिनने चेहरा पुसल्यावर परत एकदा आरशात बघितले. पांढरा डाग तसाच होता. उलट आता तो

काहीसा स्पष्टपणे दिसत होता. त्याने आठवण्याचा प्रयत्न केला की आपल्याला येथे जखम होऊन खपली बसली होती का तसे काही आठवत नव्हते. कदाचित झालीही असेल व आपल्याकडून दुर्लक्षही झाले असेल

आघोळ झाल्यावर त्याने भाग काहीसा कपाळाच्या दिशेने वळवला.

¤

काही दिवस असेच गेले दररोज तो सकाळी उठल्यावर कपाळाकडे बघायचा डागाच्या आकारात काहीशी वाढ होते आहे असे त्याला वाटले. प्रथम त्याला वाटले होते डागावर कातडी परत येईल. पण तसे काही घडले नाही. तसे मनातल्या मनात तो काहीसा घाबरला. अजून तो डाग कोणाला दिसण्याएवढा मोठा झाला नव्हता. घरी कोणाला सागावे का याचा तो विचार करत होता. पण त्यामुळे आई-बाबा उगीचच घाबरून जायचे.

काही दिवसांनी असेच डाग डाव्या हाताच्या कोपराजवळ आणि उजव्या पायाच्या गुडघ्याशी आले आहेत हे त्याच्या लक्षात आले तेव्हा मात्र तो घाबरला. काहीही केले तरी कपनीच्या कामात त्याचे लक्ष लागत नव्हते. सतत या डागासबंघी त्याच्या मनात विचार चालू होते. अमृताला या डागांबद्दल सागावे का ? पण त्यामुळे काहीही नसताना बभ्रा झाला तर ? समजा मनातील शंका खरी असली तर ? डॉक्टरांकडे जरूर जाऊन यावे का ?

सहजपणे मराठीतील पांढऱ्या डागावरील इलाजाबद्दल असलेली जाहिरात त्याने वाचली. जाहिरातीत पत्राने सल्ला व औषध सांगितले जाईल लिहिले होते त्याने सहजपणे पत्र लिहिले व पोस्टात टाकले

¤

बघता बघता कपाळावरील डाग ढब्बू पैशाएवढा झाला. इतरही ठिकाणच्या डागांच्या आकारमानात वाढ झाली होती. कपाळावरील डाग केसाच्या झुलपामधूनसुद्धा दिसत होता. पोस्टाने आलेल्या सल्ल्यानुसार त्याने काही औषधे घेतली पण फरक दिसला नाही. मग मात्र घरी आईने हट्टाने त्याला डॉक्टरकडे नेले. फॅमिली डॉक्टरने स्कीन स्पेशॅलिस्टकडे पाठवले. स्कीन स्पेशॅलिस्टने वेगवेगळया टेस्ट घेऊन बघितल्या. गभीर होत ते म्हणाले,

'सॉरी मी फार काही करू शकेन असे मला वाटत नाही. प्रयत्न करणे माझे काम आहे व तो मी शेवटपर्यंत करत राहीन. पण ह्या रोगावर हमखास उपाय कोणताही सापडलेला नाही. वैद्यकीय शास्त्रात अजून बरीच प्रगती व्हायची आहे.'

डॉक्टरनी निघताना त्याच्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा त्याला वाटले आपल्या डोळ्यात पाणी येईल. पण निग्रहाने त्याने चेहऱ्यावरची रेषाही ढळू न देण्याचा प्रयत्न केला

¤

कपनीतून बाहेर पडल्यावर त्याने अमृताला गाठले.

'तुझे डाग आता अधिकच स्पष्ट दिसायला लागले आहेत '

'असे माझ्याच बाबतीत का व्हावे अमृता? हा रोग आमच्या खानदानात नाही. शिवाय हा सासर्गिकही नाही. मग हे असे कसे घडले ?'

'वैद्यकीय शास्त्र अजून त्याचे समाधानकारक उत्तर देऊ शकलेले नाही. मी कसे सांगू ?'

'मला आता माझीच भीती वाटते अमृता. तू मला आधी गोरा बनण्यासाठी औषध सागायचीस. मला माझी मूळची कातडी मिळवण्यासाठी औषध सागशील !'

'मी नक्की बघेन. आयुर्वेदाचा माझ्या वडिलाचा सखोल अभ्यास आहे. त्यात तरी ह्याला औषध सापडेल '

बऱ्याच दिवसानी प्रकाश देशपांडे त्याला भेटला. आपल्याला पाहिल्यावर तो एकदम चरकला आहे हे त्याला कळले. पण प्रकाशने तसे भासवले नाही. नेहमीप्रमाणेच त्याने आपुलकीने चौकशी केली.

'बहिणीच्या लग्नाला आग्रहाचे निमंत्रण देऊनही आला नाहीस.' काहीशा नाराजीच्या सुरात तो म्हणाला.

'व्हेरी सॉरी ! तुझे पत्रही वेळेवर मिळाले होते. तू प्रत्यक्ष येऊन आमत्रण दिले नाहीस म्हणून आलो नाही असे मात्र नाही ह; पण त्याचवेळेस कपनीच्या कामासाठी कलकत्त्याला गेलो होतो.' त्याने सरळ थाप ठोकली प्रकाशही काही बोलला नाही.

'काहीसे उशिराच तिचे लग्न झाले. पण चागला नवरा आहे. बार्कमध्ये सायंटिस्ट आहे.'

'म्हणजे तू आता मोकळा झालास' त्याने प्रकाशच्या पाठीवर थाप मारली तेव्हा आपण मनातून हललो आहोत हे त्याला जाणवले.

¤

मॅनेजिंग डायरेक्टरने त्याला बोलावले तेव्हाच त्याने मनातून काय ते ओळखले.

'दिनकर यू आर वन ऑफ मोस्ट टॅलेंटेड परसन्स. तुझ्यात नुसती उत्तम सेल्समनशिपच नव्हती तर तुला उत्तम टेक्निकल नॉलेज आहे. बट यू सी...'

त्याने खिशातून पत्र काढले व समोर ठेवले.

'हे माझे राजीनामा पत्र आहे. माझ्या ह्या रूपामुळे कस्टमर्स काहीसे घाबरतात हे मला माहिती आहे सेल्समनचे रूप चागले हवे '.

'नाही तसे नाही. तुझ्याकडून आम्हाला राजीनामा नको. तुझ्या ज्ञानाचा अजूनही आम्हाला उपयोग आहे तुला आम्ही प्रॉडक्शन इनचार्ज करायला तयार आहोत.'

'थँक्यू. मीसुद्धा कुठल्याही कटुतेने राजीनामा देत नाही आहे. मला ह्या कपनीत खूप आनंद मिळाला. पण बाकी कुठे मन रमेल असे वाटत नाही '

'जशी तुझी इच्छा. पण मनापासून सांगतो आमचे दरवाजे तुझ्यासाठी नेहमी उघडे आहेत. तुझे सर्व ड्यूज, आमची पेनल्टी तयार ठेवायला सागतो '

'थँक्यू' म्हणत तो उठला तेव्हा त्याला मोकळे झाल्यासारखे वाटले.

¤

गेटवेला तो बऱ्याच वेळा संध्याकाळी एकटाच जाऊन फिरायचा. कधीतरी रस्त्यात मानसी व तिचा नवरा भेटतील अशी त्याची अपेक्षा होती, पण ते त्याला कधीच भेटले नाहीत.

त्याने मध्ये एक ग्रीक लोककथा वाचली. एकदा ग्रीक देवता अथेन्समधील एका श्रीमंत माणसावर कोपली व तिने त्याला शाप दिला ; 'तुझ्याकडे नसलेल्या गोष्टी शोधण्याचा छद तुला जडेल व त्या छदापायी कायमचा दुःखी होशील.'

होमिओपथी, आयुर्वेद, ॲलोपथी सर्व प्रकार झाले. कशाचाच काही परिणाम झाला नाही. □

# “चीन एकेक प्रश्न सोडवत पुढे झेप घेतो आहे. आपण एकेका प्रश्नात गुंतत चाललो आहोत...”

**डॉ. विजय बेडेकर** ● **शब्दांकन : सु. ल. सोमण**

**ची**नभोवती नेहमीच एक गूढतेचं वलय आहे. विशेषत: चीन लाल झाल्यापासून. पोलादी पडद्याआडच्या रशियात काय घडत आहे हे जसं स्टॅलिनच्या काळापर्यंत बाहेरच्या जगाला कळत नव्हतं, तसंच प्रसिद्ध ‘ग्रेट वॉल’नं वेढलेल्या लाल चीनमध्ये होणाऱ्या उलथापालथींच्या बातम्याही बाह्य जगाला मिळत नव्हत्या! एकूणच संपूर्ण जगाला चीनबाबत नेहमीच उत्सुकता असते. भारतात ती जास्त आहे. भारताचे चीनशी पूर्वापार संबंध आहेत. चीनची संस्कृती एके काळी भारतातनं गेलेल्या व भारतात येऊन शिकून परतलेल्या, भारतीय व चिनी बौद्ध भिक्षूंच्या सान्निध्यात फुलली, समृद्ध झाली. पुरातन काळातल्या ह्या परस्पर मैत्रीनंतरही दोन्ही राष्ट्रांमध्ये देवाण-घेवाण चालूच राहिली. संस्कृत साहित्य मोठ्या प्रमाणावर चिनी भाषेत नेलं गेलं. वेद, उपनिषदांवर तिथे ग्रंथ लिहिले गेले. सन् येत सेनच्या उठावापर्यंत, म्हणजे शेवटच्या राजेशाहीतही, तिथल्या अंदाधुंदीतही हे घडत राहिलं. १९११ मध्ये राजेशाही उखडली जाऊन डॉ. सन्-येत-सन ह्यांचं राष्ट्रीय सरकार तिथे प्रस्थापित झालं. त्यानंतरच्या काळात भारत-चीन संबंध काहीसे दुरावले तरी, डॉ. कोटणीसांसारख्यांच्या त्या देशातल्या कामांनी दुवा कायम ठेवला. दुसऱ्या महायुद्धानंतर चँग कै शेकच्या नेतृत्वाखालील चीन सर्वच दृष्टींनी खिळखिळा होत गेला. आक्रमणं, अंतर्गत यादव्या उठाव ह्यांनी जर्जर झालेला, भीषण रोगराई, चलन-फुगवटा, बेबंदशाही ह्यांनी पोखरून निघालेला चँग कै. शेकचा चीन, कम्युनिस्ट नेता माओ–त्से–तुंगच्या १९३५ च्या लाँगमार्चपासूनच त्या धडाक्याला तोंड देऊ शकला नाही. चँग कै. शेक तैवानमध्ये पळाला आणि १९४८ मध्ये माओने कम्युनिस्ट चीनची घोषणा केली. त्या आधी नुकताच भारत स्वतंत्र झाला होता. रशियन समाजवाद व ब्रिटिश लोकशाही ह्यांचा एकाचवेळी स्वीकार करून नेहरूंच्या भारतानं रशियाला, आपल्या मैत्रीसंबंधात झुकतं माप दिलं. साहजिकच, कम्युनिस्ट जगताबाहेरील राष्ट्रांमध्ये सर्वांत प्रथम भारतानं माओच्या चीनपुढे मैत्रीचा हात केला. पंचशीलचा पुकारा झाला. पुन्हा एकदा भारत–चीन ह्यांच्यामध्ये सांस्कृतिक देवाण–घेवाण होणार अशी चिन्हं दिसू लागली. चौ एन लाय आणि पं. नेहरू ह्यांचे एकत्र फोटो झळकू लागले.

ह्याच वेळी म्हणजे १९६२ मध्ये चीनने विश्वासघात केला. ‘हिंदी चिनी भाईभाई’ म्हणत म्हणत चिनी सैन्य मॅकमोहन रेषा ओलांडून भारतात घुसू लागलं. भारतानं ह्या युद्धात सपाटून मार खाल्ला. एकतर्फी युद्धबंदी घोषित करत चीननं भारताचा फार मोठा भूभाग स्वत:च्या ताब्यात ठेवला. त्यावर, म्हणजे आज तब्बल पंचवीस वर्षांनंतरही वाटाघाटींचा घोळ चालूच आहे.

ह्या दग्याफटक्यानंतर भारत–चीन संबंध दुरावतच गेले. सर्वसामान्यपणे चीनविषयी या देशात संशयाचंच, चिडीचंच वातावरण निर्माण झालं. आणि तरीही भिंतीपलीकडून येणाऱ्या बातम्या मनात कुतूहल निर्माण करीत राहिल्या. चीन अण्वस्त्रयुक्त झाला. चीननं फार मोठी औद्योगिक आघाडी घेतली. ग्रेट–लीप–फॉवर्डच्या (१९५८-६२) काळात उत्पादनात प्रचंड वाढ झाली. शेती, उत्पादन, काम्युन्सच्या आधारे वाढले. ह्या बातम्या येत असतानाच चीनमध्ये सांस्कृतिक पुनरुज्जीवन चळवळीनं आकांत मांडला. चीन जगापासूनही अलिप्त झाला. पण त्याचवेळी रशियाशीही उघड वैर पत्करून चीननं कम्युनिस्ट जगतातही दुफळी उभी केली. ह्याच सुमारास चीन पाकिस्तान सख्य वाढलं. चीन–अमेरिका मैत्री वाढली.

हे सगळेच प्रकार चीनविषयी तेढ वाढवणारेच खरे तर होते. पण तेवढ्यात चीनची ‘पिंगपाँग’ पॉलिसी सुरू झाली. चिनी संघ भारतात खेळायला आले. देशोदेशी हिंडू लागले. नुसतेच हिंडू लागले नाहीत तर मोठाले पराक्रमही करू लागले. याचं लोकशाही भारतातल्या अनेकांना आश्चर्य वाटलं. कुतूहल वाटलं. तर त्याचबरोबर कराटे, कूंग–फू, ज्युडो आदी चिनी–जपानी व्यायाम प्रकारांचं, ॲक्युपंक्चर, ॲक्यु–प्रेशर आदी वैद्यकीय उपचार पद्धतींचं आकर्षणही वाढू लागलं...

हे सगळ घडत राहिलं तरी सर्वसामान्य भारतीयात भीतियुक्त औत्सुक्यच चीनविषयी, चिनी लोकांविषयी, चिनी सांस्कृतिक जीवनाविषयी वसत राहिलं. जवळचे संबंध मात्र अजिबातच विकसित झाले नाहीत. चिनी खाद्यपदार्थ चवीन खातानाही कुठ शंका यायची, ह्यात पाली-झुरळ तर नसतील ना ? पूर्वापार भारतात परिचित असलेल्या चिनी दंतवैद्यांकडेही १९६२ च्या युद्धानंतर साशंकतेन बघितलं जाऊ लागलं अमेरिका-पाकिस्तान-चीन मैत्रीनंतर तर चीनविषयीची तेढ आणखी वाढू लागली नाही म्हणायला, भारत-चीन मधला एक दुवा भारतात अद्यापही होता भारतातले मार्क्सवादी. चीनबरोबर त्यांचा संवाद होता. इतर भारतीयांचा तुटलेला होता.

अलीकडे जनता राजवटीत परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी ह्यानी चीनला भेट दिली ती त्यांना अर्धवट सोडावी लागली डॉ. सुब्रह्मण्यम स्वामी ह्यांच्या प्रयत्नांनी मानस सरोवर भारतीय यात्रेकरूंसाठी आता खुलं केलं गेलं आहे. आणखीही काही लोक, औद्योगिक-राजकीय शिष्टमंडळं चीनला अलीकडे जाऊन आली आहेत. हळूहळू का होईना, संबंधात वाढ होत आहे. चीनला भेट देऊन आलेल्या लोकांकडून बदलत्या चीनची माहिती कुठे कुठे झिरपते १९७७-७८ पासून चीनने जगासाठी आपल्या देशाचे दरवाजे खुले केले आहेत. काही चिनी शिष्टमंडळेही ठिकठिकाणी जात आहेत. चिनी साहित्य इतर देशात प्रसृत होत आहे

चीनबरोबरच्या संबंधाचा आपला इतिहास, त्या देशाविषयीचं राग-द्वेष-अविश्वासमिश्रित औत्सुक्य ह्यामुळे त्या देशातून येणाऱ्या बातम्यांबाबत जनमानसात नेहमीच कुतूहल असत. गूढतेच्या वलयामुळे हे औत्सुक्य वाढत जात. साहजिकच चीनला जाऊन आलेली व्यक्ती आढळली की ती व्यक्ती काय बोलते, चीनविषयी काय सांगते ह्याविषयी मनात जिज्ञासा निर्माण होते. अनेक लोक त्या व्यक्तीभोवती ही माहिती मिळवण्यासाठी घोटाळू लागतात. ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेचे डॉ. विजय बेडेकर, त्या संस्थेच्या अन्य सभासदांबरोबर गेल्या वर्षी चीनचा दौरा करून आले. विशेष म्हणजे एक सर्वसामान्य पर्यटक म्हणून त्यांनी हा दौरा केला...

डॉ विजय बेडेकर हे एक आगळ व्यक्तिमत्त्व आहे. पेशानं वैद्यकीय व्यवसायात ते आहेत. त्या व्यवसायाचा त्यांचा अभ्यासही चांगला आहे. त्यात ते यशस्वीही आहेत. पण त्याचबरोबर इतिहासाचाही त्यांचा दांडगा अभ्यास आहे. विशेषतः प्राचीन भारतीय संस्कृतीत त्यांना विशेष रस आहे. जिथे जिथे भारतीय संस्कृतीच्या खुणा त्यांना आढळतात तिथे तिथे ते जिद्दीने पोचतात. भारतीय संस्कृतीबरोबरच संस्कृत भाषेवरही त्याचं प्रेम आहे. १९८३ मध्ये ठाणे येथेच त्यांनी प्राच्य विद्या अभ्यास संस्था ( Institute for Oriental Studies ) प्रस्थापित केली या संस्थेतर्फे त्यांनी भारतीय संस्कृती व संस्कृत भाषा या विषयावर अनेक परिषदा, परिसंवाद आयोजित केले आहेत 'भारताबाहेरील संस्कृतचा अभ्यास' या विषयावर १९८३ मध्ये त्यांनी ठाण्यालाच एक आंतरराष्ट्रीय परिषद भरवली. तर १९८४ मध्ये फिलाडेल्फिया, अमेरिका येथे झालेली सहावी जागतिक संस्कृत परिषद त्यांनी आपल्या उपस्थितीने गाजवली ! १७ व्या शतकात विद्यासन म्हणून मान्यता पावलेल्या तंजावरला भेट देऊन प्राच्य विद्या पद्धतीचा त्यांनी अभ्यास केला. तिथे उपलब्ध ग्रंथाचा मागोवा घेतला. कच्छचाही असाच दौरा त्यांनी केला हा त्यांचा कार्यक्रम नित्य चालू आहे. त्यासाठी व या विषयाची रुची लोकांत वाढावी म्हणून 'इतिहास' नावाचं एक इंग्लिश त्रैमासिकही त्यांनी जवळजवळ पाच वर्षं चालवलं. त्यात इतिहासातली अनेक अज्ञात पानं परिश्रमानं त्यांनी उजेडात आणली. जेझुईट प्रार्थना, अलेक्झांडर कनिंगहॅमचा भारतावर राज्य करण्याच्या दृष्टीनं तयार केलेला गुप्त अहवाल, फत्तेपूर सिक्री-ताजमहाल आदीवरचे ऐतिहासिक पुरावे इत्यादी अनेक विषयांना त्यांनी वाचा फोडली दुर्दैवान हे त्रैमासिक सध्या तरी बंद करण्याचा निर्णय त्यांनी घेतलेला आहे.

ठाण्यात भरलेल्या 'भारताबाहेरील संस्कृत' ह्या परिषदेच्यावेळी प्राच्य विद्या अभ्यास संस्थेकडे एक अनपेक्षित पत्र आलं प्रा हुआंग चीन चुआंग ह्याचं पाठोपाठ ह्या परिषदेसाठी त्यांनी चीनमधल्या संस्कृत अभ्यासावर एक निबंधही पाठवला. १९७६ मध्ये माओच्या मृत्यूनंतर व चांडाळचौकडी नेस्तनाबूत होऊन डेंग सत्तेवर आल्यापासून चीनन आपले दरवाजे इतरेजनांना खुले केले. तिथून नवीन बदलाच्या बातम्या सगळीकडे प्रसृत झाल्या डॉ. बेडेकरांच चीनविषयीच कुतूहल तेव्हापासून वाढत गेलं. चीनला भेट देण्याचे विचार मनात डोकावू लागले. चिनी प्राध्यापकाचा निबंध येताच हे विचार बळावले पत्रव्यवहारातनं शक्यता निर्माण झाली. अभ्यास मंडळ म्हणून पुरस्कृत करायला प्राच्य विद्या अभ्यास संस्था होतीच. विशिष्ट परवानगी भारत सरकारतर्फे आली. चिनी प्रशासनानही आनंदानं मान्यता दिली ट्रान्स कॉंटिनेंटल संस्था व चीनमधील 'चायना इंटरनॅशनल ट्रॅव्हल सर्व्हिस' ह्यांच्या मदतीन कार्यक्रमाची आखणी झाली शेवटी डॉ. विजय बेडेकर, त्यांच्या पत्नी सौ. बेडेकर व प्राच्य अभ्यास संस्थेच्या अन्य दहा जणांचा चीन दौऱ्याचा मार्ग मोकळा झाला. आणि सव्वीस जून १९८६ रोजी ही सारी मंडळी बँकॉक, हाँगकाँग मार्गे मुंबईहून लाल चीनकडे निघाली. स्वतंत्र भारतातून लाल चीनला केवळ प्रवासासाठी, सांस्कृतिक अभ्यासासाठी जाणारा, राजकारण-औद्योगिक प्रशासन ह्यांच्याशी संबंध नसलेला खाजगी स्वरूपाचा, निव्वळ सर्वसामान्य नागरिकांचा हा कदाचित पहिलाच समूह असावा ! त्यांच्याच चीन दौऱ्याचं हे वर्णन...त्यांच्या शब्दात-

## तिसऱ्या क्रांतीचे कुतूहल

बऱ्याच वर्षांपासून मला चीनच आकर्षण होतं अनेक गोष्टी ऐकत होतो. एकतर चीन आणि भारत अतिशय पुरातन राष्ट्रं. त्यांच्यातले संबंधही तेवढेच जुने. लोकसंख्या, दारिद्र्य वगैरे बाबतीतही साम्य. परकीय अतिक्रमण, राजेशाही वगैरे इतिहास बराचसा सारखा. दोन्ही संस्कृतीमधलं, बौद्ध धर्माच्या प्रसारामुळंच साम्य. कन्फ्युशियस, ताओईझम व बुद्ध संस्कृतीचा चीनमध्ये मिलाफ झाला तरी एकूणच पौर्वात्य संस्कृती एकमेकांशी मिळती जुळती. त्यामुळं चीनविषयी एक औत्सुक्य होतच. पण खरं आकर्षण वाढलं ते १९७८ मधल्या घटनानंतर. चीनमध्ये माझ्या मते झालेली ती तिसरी क्रांती. फारशी गाजावाजा न झालेली. कुठलाही हिंसाचार नसलेली

चीनमध्ये पहिली क्रांती झाली १९११ मध्ये. राजेशाहीचं व बव्हंशी परदेशी राजेशाहीचं जू झुगारून देऊन डॉ. सन–यत्–सेन ह्यांच्या नेतृत्वाखाली ही क्रांती झाली. त्यांच्याच नेतृत्वाखाली राष्ट्रीय सरकार तिथे प्रस्थापित झालं. १९२५ मध्ये सन–येत्–सेन ह्यांचा मृत्यू झाला. त्याआधीच हे राष्ट्रीय सरकार अमेरिकी प्रभावाखाली आलेलं होतं. ब्रिटन, फ्रान्स आदींनी नंतर त्याचे लचके तोडायला सुरुवात केली. हाँगकाँग, मकाव ही आधीच्या अंदाधुंदीची अपत्यं. त्याला प्रतिशह व तिथलं दैन्य लक्षात घेऊन १९२१ मध्ये तिथे रशियन प्रोत्साहनानं कम्युनिस्ट पार्टी अस्तित्वात आली. डॉ. सन–येत्–सन ह्यांच्या मृत्यूनंतर सत्ता कोमिन्टांग व चँग कै शेक ह्यांच्या हातात गेली. ह्या सत्तेनं चीन खिळखिळा केला. अनागोंदी वाढली. अराजक वाढलं. १९३५ मध्ये माओनं लाँग मार्च आयोजित केला न् तेव्हाच माओ–त्से–तुंग खऱ्या अर्थानं जनतेचा पुढारी झाला. माओच्या नेतृत्वाखाली दुसरी क्रांती झाली १९४९ साली. हिचा गाजावाजा खूप झाला. 'चीन स्वतंत्र झाला' असंच ह्या क्रांतीचं वर्णन केलं गेलं. माओनं सत्ता हाती येताच चीन हे कम्युनिस्ट राष्ट्र घोषित केलं. रशियाबरहुकूम कम्युनिस्ट राजवटीकडे वाटचाल सुरू झाली. पंचवर्षीय योजना सुरू झाल्या. १९५८ च्या सुमारास 'ग्रेट लीप फॉर्वर्ड' चा प्रयोग सुरू झाला. त्या प्रयोगात चिनी अर्थव्यवस्थेला फार मोठा सुरुंग लागला. १९६६ मध्ये सुरू झालेल्या 'सांस्कृतिक पुनरुत्थान' चळवळीत अर्थव्यवस्था, सांस्कृतिक जीवन सगळंच डबघाईला आलं! १९७६ साली चेअरमन माओचं निधन झालं. कुप्रसिद्ध चांडाळचौकडीचा (मादाम माओसकट) उच्छाद सुरू झाला लौकरच त्यांचे गुन्हे त्यांच्या पदरात घालून त्यांचं उच्चाटन करण्यात चिनी कम्युनिस्ट पक्षाला यश मिळालं. आणि त्याचवेळी 'सांस्कृतिक पुनरुत्थाना'त झालेल्या बुद्धिवाद्यांच्या गळचेपीत दूर फेकल्या गेलेल्या डेंगचं पुनरागमन झालं. डेंग सर्वसत्ताधीश झाला. तिसऱ्या क्रांतीची शांततामय सुरुवात झाली.

चीनमधल्या दुसऱ्या क्रांतीच्या वेळी, म्हणज १९४९ मध्ये मी फारच लहान होतो. त्यावेळचा इतिहास मी नंतर वाचला; पण चीनकडे प्राभुख्यानं मी आकर्षला गेलो ते ह्या तिसऱ्या क्रांतीचे वृत्तांत वाचून! जवळजवळ सत्तावीस वर्षे साम्यवाद, मार्क्सवाद आपल्या देशात राबवूनदेखील डेंगच्या नेतृत्वाखालील चीनने पोथीनिष्ठ मार्क्सवादाला रामराम ठोकायचा निर्णय घेतला. लोकांना पोशाखाचं, शिक्षणाचं, धर्माचं, धंद्याचं, कौटुंबिक जीवनाचं स्वातंत्र्य, मर्यादित का होईना, दिलं. सांस्कृतिक, धार्मिक, शैक्षणिक, शेतकी, औद्योगिक, आर्थिक– सगळ्याच आघाड्यांवर नवीन वैचारिक, प्रगतिशील धोरणं स्वीकारली. जगातल्या अनेक देशांशी संपर्क वाढवला. तंत्रज्ञान विकत घेतलं. परदेशी गुंतवणूक आवर्जून आमंत्रली. परंपरागत शत्रू असलेल्या जपानकडून देखील उत्कृष्ट मोटारी, बसगाड्या, तंत्रज्ञान विकत घ्यायला त्यांनी मागे पुढे पाहिलं नाही. मार्क्सवादान बहाल केलेली कडक शिस्त शाबूत ठेवून इतर अनेक बाबतीत चीनन पोथीनिष्ठ मार्क्सवाद गुंडाळून ठेवला माओचं 'रेड बुक', 'माओ ड्रेस' इतिहासजमा केलं. वैयक्तिक मालकी हळूहळू प्रोत्साहित केली. त्यासाठी कर्जपुरवठाही सुरू केला. रद्दबातल केलेली धर्मसंस्था पुन्हा प्रस्थापित केली. धार्मिक शिक्षण प्रसाराला मुभा दिली. बुद्धिवाद्यांना प्रोत्साहन द्यायला सुरुवात केली कलेक्टिव्हज आणि कॉम्यून्सच्या अतिरेकात कुटुंब संस्था माओ राजवटीत मोडकळीला आली. जवळजवळ नामशेषच झाली. ती पुन्हा प्रस्थापित करण्याचे प्रयत्न आज सुरू आहेत. तीन पिढ्यांमधल्या एकाच कुटुंबातल्या लोकांना एकत्र




चिनी स्वच्छतेचा नमुना–रेल्वे स्थानक

राहण्यासाठी, स्वतंत्र घरात राहण्यासाठी उद्युक्त केलं जात आहे ... ... ...

तिसऱ्या रक्तहीन, शांत व डामडौल नसलेल्या क्रांतीची ही वैशिष्ट्ये होती. नि म्हणून ही क्रांती मला जास्त आकर्षक वाटली. तेव्हापासूनच चीनला भेट द्यावी असं मनात येऊ लागले. त्याप्रमाणे प्रयत्नही मी सुरू केले. हे प्रयत्न सुरू असतानाच एकीकडे मी चीनविषयी जेवढं काही वाचायला मिळेल ते वाचून काढायला सुरुवात केली. चिनी इतिहास चाळून काढला तिथल्या प्राचीन संस्कृतीची माहिती मिळवली तिन्ही क्रांत्या अभ्यासल्या मार्क्सवादही वाचला. हे सगळं वाचत असताना चीन आणि भारत ह्यांच्यातली अनेक साम्यं माझ्या लक्षात आली मिळती-जुळती पौर्वात्य संस्कृती, लोकसंख्या, दारिद्र्य ह्यात तर साम्य होतच; पण चीनची सामाजिक जडणघडण, भौगोलिक परिस्थिती, अनेक वांशिक लोक, सीमा प्रश्न वगैरे अनेक प्रश्नांबाबतही बरंच साम्य मला जाणवलं. नुसतं साम्य जाणवलं असंच नाही तर चीनने त्या प्रश्नांवर योजलेले उपाय अनुकरणीयही वाटले. त्याचा ऊहापोह मी पुढे करीनच, पण चीनविषयीचा असा अभ्यास जसजसा वाढू लागला तसतशी हे सारं प्रत्यक्ष पाहण्याची जिज्ञासाही वाढू लागली; पण मार्ग सापडत नव्हता. चीनला खाजगीरीत्या भेट द्यायला भारतातून कुणी गेलेलेच नव्हते. गेले होते ते सर्व सरकारी वा राजकीय देवाण-घेवाणीच्या कार्यक्रमांतर्गत गेले होते त्यामुळे माझ्यासारख्या 'टूरिस्ट'साठी, इतर देशासाठी असते तशी कुठलीही नियमावलीच तयार नव्हती म्हणून काही वैयक्तिक प्रयत्न पुढे सरकू शकले नाहीत.

ह्याचवेळी माझ्या नशिबानं, अनपेक्षितरीत्या एक घटना घडली. आमच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेतर्फे 'भारताबाहेर संस्कृतचा अभ्यास' या विषयावर एक आंतरराष्ट्रीय परिषद ठाणे येथे १९८३ मध्ये आम्ही भरवली. ब्राझील ते पोलंडपर्यंत तेरा राष्ट्रांनी ह्या परिषदेत आपापल्या देशातील संस्कृत अध्ययनावर आधारित निबंध सादर केले. चीनमधून प्रा हुआन चीन च्युआंग ह्यांचाही एक निबंध ह्या परिषदेत वाचला गेला. त्या निबंधात त्यांनी लिहिलं होतं की, चीनमध्ये बौद्ध धर्म, वेद, उपनिषद, पुराण आदी संस्कृत ग्रंथांची हान भाषेतली भाषांतरं उपलब्ध आहेत. प्रत्यक्ष संस्कृत ग्रंथही उपलब्ध आहेत. अशा ग्रंथांची, हस्तलिखितांची, मूळ प्रतींची संख्या सहा हजारांच्या घरात आहे त्यांचा अभ्यास आता- आतापर्यंत तिथे होत होता. आजही 'प्राचीन भारतीय संस्कृती' अभ्यासनात त्यांचा अभ्यास होतो आहे रामायण, महाभारत, शाकुंतल, ऋतुसंहार, मेघदूत आदींचीही भाषांतरं चीनमध्ये प्रसिद्ध आहेत किंबहुना संस्कृत नाटकाचा पगडा आजही चिनी नाट्यसृष्टीवर दिसून येतो...चीनमध्ये या विसाव्या शतकातही संस्कृतचा व पालीचा पद्धतशीर अभ्यास सुरू आहे...'

डॉ. हुआन च्युआंग यांच्या निबंधावरून चीनमध्ये भारतीय संस्कृतीविषयी, संस्कृतविषयी आपुलकी आहे हे जाणवलं. दुर्मिळ संस्कृत प्राच्य ग्रंथ वा त्यांची अधिकृत भाषांतरं तिथं हजारोंनी उपलब्ध आहेत हे कळलं अन् माझा विचार आणखीनच बळावला परिषदेच्या निमित्ताने चिनी प्राध्यापकांशी झालेल्या पत्रव्यवहारातून मार्गही दिसला संस्थेतर्फे अभ्यास मंडळ नेलं तर परवानग्यांना फारशी अडचण भासणार नाही हे जाणवलं. चिनी प्राध्यापक मंडळी तिथली विद्यापीठे व इतरांनीही ह्या भेटीबाबत उत्सुकता दाखवली. 'चायना इंटरनॅशनल ट्रॅव्हल सर्व्हिसेन' भरघोस मदत केली. सर्व आवश्यक बाबींची पूर्तता केली. सर्व दौऱ्याचं संयोजन 'ट्रान्स कॉंटिनेंटल ट्रॅव्हल्स' ह्या संस्थेकडे सोपवलं. त्यांचीही चीनची ही पहिलीच सफर त्यामुळे त्यांनीही प्रतिष्ठेचा विषय करून आमची सफर यशस्वी व्हावी म्हणून सर्वतोपरी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या सर्व सव्यापसव्यातून शेवटी २६ जून १९८६ ला आम्ही मुंबई सोडली बँकॉकला आमचा पहिला मुक्काम झाला. तिथून हाँगकाँगला पोचलो. लाल चीनचं हे प्रवेशद्वार. ब्रिटिश राजवटीखालचं, पण हळूहळू, म्हणजे १९९५ मध्ये परत मायभूमीला जाऊन मिळू पाहणारं. ब्रिटिश सत्ता तिथे त्यावेळी संपुष्टात येणार आहे। हाँगकाँगमध्ये काही भारतीय भेटले...हाँगकाँगहून कॅथाय पॅसिफीकच्या विमानानं आम्ही लाल चीनकडे झेप घेतली. काही तासातच आमचं कॅथाय विमान बेईजिंग (पूर्वीचं पेकिंग) विमानतळावर उतरणार होतं. लाल चीनमध्ये। तिथं आपलं स्वागत कसं होणार? लोक आपल्याशी बोलतील का? त्यांच्याशी आपल्याला बोलू दिलं जाईल का? भारताविषयी किती द्वेष तिथे असेल? कम्युनिस्ट राजवटीतल्या चीनमध्ये वावरताना काहीतरी मोकळेपणा आपल्याला मिळेल का? असे कितीतरी प्रश्न त्या छोट्याशा प्रवासात मनात घोळत होते काहीसे भीतियुक्तही! पण तरीही तिथे काय आहे ह्याचही औत्सुक्य होतंच!

अन् अशाच भीतियुक्त औत्सुक्यात आमचं विमान बेईजिंग विमानतळावर उतरलं आमचे पाय प्रत्यक्ष लाल चीनच्या मातीला लागले धडधडत्या छातीने आम्ही विमानतळावरून बाहेर जाण्याच्या मार्गिकेकडे वळलो...

## चिनी राजधानीत उतरल्यावर

बेईजिंग विमानतळावर उतरताच तिथल्या विनम्र, मर्यादशील, अदबशीर जकात आणि इमिग्रेशन अधिकाऱ्यांनी आम्हाला पहिला सुखद धक्का दिला. शांत आणि थंड वातावरण, सफाईदार इंग्लिश आणि कुठलीही अडवाअडवी नाही. सहजी भारतातल्या विमानतळावरचं दृश्य डोळ्यासमोर आलं आणि एकछत्री, हुकूमशाही, मार्क्सवादी राजवटीखालच्या देशाच्या राजधानीत आपण पोचलो आहोत ह्यावरच क्षणभर विश्वास बसेना. नंतर हे सुखद धक्के असेच बसत राहिले. विमानतळावर प्रा. हुआन च्युआंग व त्यांचे अन्य सहकारी होते चायनीज इंटरनॅशनल ट्रॅव्हल सर्व्हिसेन पाठवलेला गाईड 'हू' होता. सर्वजण हसतमुख, दिलखुलास स्वागताचा वर्षाव आमच्यावर करत होते. नंतर डौलदार बसमधून आमचा चमू 'हुआ दू' ह्या पंचतारांकित हॉटेलवर गेला. विमानतळ ते हॉटेल रस्ता आपल्याकडच्या कुठल्याही रस्त्यापेक्षा निव्वळ अफलातून होता असंच म्हणावं लागेल. मधोमध दुभागलेला व एकेका भागात सहा पदरी मार्ग असणारा स्वच्छ, सुंदर, भव्य रस्ता. रस्त्याच्या दुतर्फांची हिरवीगार झाडी.. अगदी सहजच मन प्रसन्न होऊन जावं!

हा सुरुवातीचा सुखद अनुभव मग वारंवार येऊ लागला चीनमधल्या संपूर्ण दौऱ्यात सुरुवातीची भीती मग आम्हाला कधीच

जाणवली नाही. आम्ही भारताइतकेच किंवा जगातल्या इतर कुठल्याही लोकशाही राष्ट्राइतकेच चीनमध्ये 'मुक्त' होतो. कुठलाही जाच नव्हता. बंधन नव्हती कुठेही झोपडपट्ट्यातून, शेतातून, कॉम्यून्समधून, रेल्वेतून हिंडण्या-फिरण्याच स्वातंत्र्य आम्हाला मिळत होत.

बेईजिंगमधलाच एक अनुभव. सध्याकाळी आमच्या हॉटेलवर पोचल्यावर सगळेजण विश्रांती घेत होते. मलाही कटाळा आला होता पाय मोकळे करायची किंवा थोड शहर पाहायची इच्छा झाली होती. पण बाहेर पडायच का हा विचार आला. चीनमधल्या मुक्त-स्वातंत्र्याची अद्याप कल्पना आली नव्हती. हॉटेलवरच्या कौंटरवरच्या मॅनेजरला विचारल, 'बाहेर थोडी भ्रमती करावी म्हणतो' माझ्याबरोबर माझे एक सहप्रवासीही होते. मॅनेजरच तात्काळ उत्तर आल– 'अवश्य ! समोर टॅक्सीज आहेत.'

आपल्या देशातल्या अनुभवावरून पुन्हा प्रश्न केला

'रेट्स काय आहेत ? टॅक्सीवाले प्रामाणिक आहेत का ?'

'तुम्ही कसलीही काळजी करू नका दर ठरलेले आहेत. एक युआनसुद्धा कुणी जास्त मागणार नाही' उत्तर आल.

मग आम्ही टॅक्सीसाल्याकडे वळलो. इग्लिश जाणणाऱ्यापैकी एकाची आम्ही निवड केली आणि आख्ख बेईजिंग पालथ घातल, रात्री दोन वाजेपर्यंत.

चीनमध्ये रस्ते फार रुद, प्रशस्त, स्वच्छ बाजूचा परिसरही अगदी स्वच्छ पण ह्या साऱ्याभोवती एक भिंत आम्हाला आढळली भिंतीपलीकडे काय असेल ? आम्ही टॅक्सी ड्रायव्हरला विचारल त्यान टॅक्सीच तिकडे घातली. तिथे मात्र वातावरण एकदम बकाल होत. चाळवजा घर, झोपडया, छोटया छोटया गल्ल्या नाक्यानाक्यावर, पुलावर, खाली बसून गप्पा मारीत असलेले चिनी कामगार, वृद्ध, मुल वगैरे वगैरे. त्या वस्त्यातून मुक्तपणे आम्ही काळ हिंडलो. हातगाडयावर आपल्यासारखेच खाद्यपदार्थ तिथेही होते. काहीशी गप्पा मारण्याचाही प्रयत्न केला प्रश्न भाषेचा आला. पण त्या गिचमिचाडातही एक प्रकारची स्वच्छता होती. सार्वजनिक मुताऱ्या हा प्रकार मात्र फार भयानक होता आपल्याकडील अगदी रेल्वे प्लॅटफॉर्मवरील सडासापेक्षाही भयानक ! त्या विशिष्ट क्षणी आमचा ड्रायव्हरही काहीसा खजिल झाला !

त्या उबगलेल्या परिसरातन मग त्याने वेडीवाकडी, बारीक बारीक वळण घेत मोठया रस्त्यावर आणल प्रशस्त, मोकळया. आणि मग बेईजिंगमधल्या अनेक स्थळाना भेटी देत आम्ही रात्रभर हिंडत राहिलो रात्रीच्या शात वेळी बेईजिंगमधल्या जगप्रसिद्ध तायनामाईन चौकाला आम्ही भेट दिली ह्या इतिहास घडवणाऱ्या जगातल्या मोठ्यात मोठया चौकापैकी असलेल्या चौकाला भेट देण्याची इच्छा माझ्या मनात खूप दिवसापासून घोळत होती. ती तेव्हा पूर्ण झाली दहा दहा लाखाच्या सभा माओ इथे घेत असे. कम्युनिस्ट चीनची घोषणाही त्यान इथनच केली इथेच आजही माओ चिरकाल विश्रांती घेत आहे त्याच शव विशेष रसायन वापरून इथ जतन करून ठेवल आहे त्याच कुणालाही दर्शन घेता येतं तायनामाईन गेटजवळ त्याचा भव्य सगमरवरी पुतळाही आहे. तायनामाईन गेटच्या पलीकडे आहे शाही निवासाचा परिसर 'आरक्षित शहर' म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या, २५० एकर एवढ्या प्रचड भूभागावर वसला आहे भव्य राजप्रासाद व एकापाठोपाठ असलेले, नऊ हजार खोल्याचे वसतिस्थान. पधराव्या शतकात मिंग राजवटीत हे शहर, खास राजे–रजवाडे, त्याचा परिवार व दरबारी ह्याच्यासाठी वसवलं गेल. आजही हिरे, जडजवाहिरे व अनेक अप्रतिम कलाकृतीचा सग्रह पाहायला मिळतो.

हा सगळा अतर्भाग आम्ही दुसऱ्या दिवशी दिवसा पाहिला. पण त्या रात्री शभर एकराचा तो ऐतिहासिक तायनामाईन चौक आणि 'फॉरबिडन सिटी' फारच भव्य वाटली. मनावर कायमच ते दृश्य कोरल गेल...

त्या रात्री परतताना मनावरचं सारं दडपण दूर झाल चीनमधील पुढील वास्तव्याबद्दलच्या आशका दूर झाल्या...

## थोडा इतिहास, भूगोल आणि सीमारेषा

बेईजिंगमध्ये आम्ही खूप भटकलो. अनेकाशी बोललो. अतर्भागातन रेल्वेन प्रवास केला नानजिंग, शाघाय, चिनी भिंत, यागत्सी नदी, पीतनदी आदी अनेक ठिकाणीही गेलो. ह्या सर्व ठिकाणचे अनुभव सागण्याआधी मला वाटत, चीनचा इतिहास, भूगोल थोडक्यात सागायला हवा तो लक्षात आला की पुढील प्रवास-वर्णनाच्या

---

### चीन – एका दृष्टिक्षेपात

| | |
|---|---|
| क्षेत्रफळ | ३६,९१,५२१ चौ. मैल. |
| लोकसख्या | . १०३,४७,५००. (१९८२ जनगणनेनुसार. १९८४ पर्यंत सुधारित ) |
| राजधानी | : बेइजिंग (९५,००,०००) |
| प्रमुख शहर | : शाघाय (१,२०,००,०००)<br>नानजिंग (७८,००,०००) |
| भाषा | : हान किंवा मॅनड्रेन (मूळ सस्कृत शब्द मध्याची भाषा–त्यावरून मॅन्ड्रेन).<br>चिनी लिपीतच लिहिली जाते. लिपी ६००० वर्णाक्षराची लिपी सुधारणा सुरू आहे |
| धर्म | : शासकीयदृष्टया निधर्मी राजवट. पण बौद्ध व ताओ धर्माचा पगडा जास्त. दोन्ही हान पथीय. शिवाय मुसलमान, ख्रिश्चन धर्मीय. |
| चलन | : १ युआन (डॉलर) = १० जिआओ ( माओ )<br>१ जिआओ = १० फेन<br>१०० युआन = ४०० रुपये |
| दळणवळण | : टॅक्सी (खाजगी व सरकारी) बसेस, रेल्वे, विमान सेवा (CAAC). |

औद्योगिक क्षेत्रातल पाचव पुढारलेल राष्ट्र

प्रमुख उत्पादनं . धान्य, कोळसा, तेल, खनिज, रसायन

---

ओघात मांडल्या जाणाऱ्या काही मुद्द्यांची पार्श्वभूमी लक्षात येऊ शकेल...

चीनची लोकसंख्या जगात सर्वाधिक आहे हे सर्वश्रुत आहे. १०५ कोटींचा हा देश विस्तारानंही खूप मोठा आहे. जगात तिसऱ्या क्रमांकाचा आहे. जवळजवळ सदतीस लक्ष चौरस मैल एवढा चीनचा विस्तार. ( भारताचा विस्तार सुमारे तेरा लक्ष चौरस मैल आहे ! ) चीनच्या पूर्वेकडे सुमारे २५०० मैलांचा लांबलचक समुद्रकिनारा आहे. त्यावर शांघायसारखी जगप्रसिद्ध बंदरं आहेत. पश्चिम सीमा हिमालयानं वेढलेली आहे. दक्षिणेला व्हिएटनाम, कॉम्पुचिया, थायलंड, ब्रह्मदेश आहेत तर उत्तरेला रशिया आहे

चीनचा पंचवीसशे मैल समुद्रकिनारा विभागला गेला आहे पूर्व चिनी महासागर, दक्षिण चिनी महासागर व जपानच्या समुद्रात, ह्या भौगोलिक परिस्थितीमुळे चीनला एकूण बारा शेजारी राष्ट्रे आहेत. कोरिया, व्हिएटनाम, कॉम्पुचिया इत्यादी ठिकाणी चिनी हस्तक्षेप सतत चालू असतो. कम्युनिस्ट रशियाच्या प्रभावामुळे चीनमध्ये साम्यवादाचा पुरस्कार झाला. कम्युनिस्ट चीनची निर्मिती झाली. पण लाल चीनच आणि लाल रशियाच अगदी लौकरच बिनसलं. इतकं की आज तो चीनला सर्वांत धोकादायक शत्रू वाटतो. चीननं आज अमेरिकेकडे झुकण्याचं व अमेरिकेशी मैत्री वाढवण्याच हेच महत्त्वाचं कारण आहे. पण चीनमध्ये व सर्वसामान्य चिनी जनतेलाही मनापासून चीड आहे, द्वेष वाटतो तो देश म्हणजे जपान ! जपान्यांनी वेळोवेळी चीनवर हल्ले केले आहेत. भरपूर लूट चीनमधून नेली आहे चीनचे लचके तोडले आहेत. या अतिक्रमणांनी जपानवर भडकलेला चीन, पुढे चीनच्या आर्थिक पुढारलेपणामुळे आणखीनच भडकला. जपानचा द्वेष करू लागला ! रशिया, जपान ह्यांच्या तुलनेत, भारताबद्दल मात्र तिथे खास अशा काही प्रतिक्रिया आढळल्या नाहीत जुने सांस्कृतिक संबंध प्राध्यापकांच्या बैठकीतून, सामान्यांच्या गप्पांतून ऐकायला मिळाले. बुद्धाची जन्मभूमी म्हणून भारताबद्दल आदरही काही ठिकाणी आढळला. जुन्या हिंदी चित्रपट-गीतांचे चिनी शौकिनही आम्हाला पाहायला मिळाले. संबंध दौराभर माझ्या बायकोला राजकपूरच्या आवारामधलं 'मैं आवारा हूं' हे गाणं अनेकदा म्हणून दाखवावं लागलं, तर एका डिपार्टमेंटल स्टोअर-मध्ये 'इना मिना डिका' चे सूर ऐकून आम्ही चकित झालो. ह्या गाण्यावरही माओ राजवटीत, सांस्कृतिक पुनरुत्थान (शुद्धीकरण !) चळवळीच्या काळात बंदी आली होती. आता मात्र ही गाणी अनेक ठिकाणी आवर्जून ऐकली जाताहेत असं सारं असलं तरी भारताविषयी कुठलाही दरारा मात्र त्या देशात अजिबात नाही.

**आंतरराष्ट्रीय प्रश्न असो वा अन्य कुठल्याही आर्थिक, औद्योगिक बाबी असोत, भारतीय भूमिका विचारातही घ्यावीशी चीनला वाटत नाही. बारा शेजारी राष्ट्रांपैकी सर्वांत नगण्य राष्ट्र म्हणजे चीनच्या दृष्टीनं भारत असावं !**

खूपदा असं वाटतं की भारतानं ह्याचा गंभीरपणे विचार करावा. राजीव गांधी जगभर हिंडल्यावर देशोदेशी त्यांचं कौतुक व्हावं, ती ती राष्ट्रं व भारत ह्यांच्यातील स्नेहसंबंधाचा उच्चार व्हावा, म्हणजे भारतीय मताची दखल आंतरराष्ट्रीय राजकारणात घेतली जाते, असं होत नाही. ती अस्तित्वाची दखल तात्कालिक कौतुकामुळे असते. पाहुण्याचं स्वागत करण्याच्या सार्वत्रिक रूढीचा तो एक भाग असतो. जागतिक महत्त्वाच्या प्रश्नावर, मग तो भारताशी निगडित असला तरी, भारताच्या मताची गांभीर्यानं दखल घ्यावी असं कुणाला वाटत नाही. मग तो हिंदी महासागरातल्या बलाढ्य राष्ट्राच्या वाढत्या लष्करी हालचालींचा प्रश्न असो किंवा दिगोगार्सियाचा प्रश्न असो किंवा अगदी अलीकडील, सिलोनमधल्या वांशिक दंगलीमध्ये होणाऱ्या तामिळींच्या हत्याकांडाचा प्रश्न असो. शीख अतिरेक्यांना सर्वत्र, विशेषत. पाकिस्तान, ब्रिटन, अमेरिका, कॅनडा आदी राष्ट्रांनं मिळणारा छुपा पाठिंबा, पाकिस्तानची अधनंमधनं सुरू असणारी कुरवोडी – कुठल्याही प्रश्नावर भारताला, आंतरराष्ट्रीय जनमत आपल्याकडे पूर्णपणे अनुकूल करून घेता येत नाही. छोटे छोटे, ताकदीनं अतिशय कमी लेखले गेलेले शेजारीही भारताच्या भूमिकेला, विचाराना भीक घालताना दिसत नाहीत. भारत मात्र कुणी न विचारता, कॉम्पुचिया, व्हिएटनाम, दक्षिण आफ्रिका, कंबोडिया आदी प्रश्नावर आपली मतं मांडत राहतो. हे असं होण्याचं महत्त्वाचं कारण म्हणजे भारत हे एकजुटीनं, खंबीरपणानं उभं राहिलेलं राष्ट्र म्हणून कधी उभंच ठाकलं

---

## प्राच्य विद्या अभ्यास संस्था, ठाणे

ही एक सेवाभावी संस्था आहे. भारतीय परंपरा, इतिहास आणि संस्कृती व संस्कृत भाषेचा प्रसार, अभ्यास वाढवण्याच्या उद्दिष्टातून ह्या संस्थेची स्थापना १९८३ साली करण्यात आली.

ह्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी आजवर संस्थेनं अनेक परिषदा, चर्चासत्र, शिबिरं आयोजित केली सुमारे अकरा आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांतनं दोनशे भारतीय विद्वानांनी आणि पंधरा पाश्चिमात्य अभ्यासूनी/तज्ज्ञांनी भाग घेतला 'भारताबाहेर संस्कृतचा अभ्यास', 'हिंदू संस्कृती आणि शास्त्र व विज्ञान', 'तंत्र', 'स्मृती', 'हिंदू संस्कृती आणि संगीत' अशा अनेक विषयावर संस्थेनं परिषदा भरविल्या.

कच्छ, तंजावर, तेर–पैठण–नाशिक अशा अनेक ठिकाणी संस्कृती अभ्यास दौरे संस्थेने आयोजित केले.

जागतिक संस्कृत परिषदांना संस्था आपले प्रतिनिधी पाठवते. निबंधांच वाचन करते यंदाही ऑगस्टमध्ये हॉलंड इथे भरणाऱ्या सातव्या जागतिक संस्कृत परिषदेला संस्था काही प्रतिनिधी पाठवणार आहे.

संस्थेनं ठाण्यात दुर्मिळ मराठी ग्रंथांचं एक प्रदर्शन १९८६ मध्ये भरवलं. गेल्या दोनशे वर्षांत प्रकाशित झालेल्या विश्वकोशांच / महाराष्ट्र कोषांच हे प्रदर्शन होतं.


संस्थेनं स्वत.चं वाचनालय, संग्रहालय उभं करण्याचा मानस आहे आजही संस्थेकडे व व्यक्तिशः डॉ बेडेकरांकडेही शेकडो दुर्मिळ संस्कृत, मराठी ग्रंथांचा साठा आहे. तो केवळ जिज्ञासूला गुतवून ठेवणारा आहे.

---

नाही. ती शक्ती, ती जिद्द भारतानं कधी दाखवलीच नाही. राष्ट्रीय शिस्तीचं, राष्ट्रीय बाण्याचं दर्शन कधी जगाला स्वातंत्र्योत्तर भारतानं दाखवलंच नाही. तसं राष्ट्रीय वळण लावणारं नेतृत्वही भारताला मिळालं नाही.

चीनपासून याच बाबतीत भारताला खूप काही शिकण्यासारखं आहे. भारतासारखाच अफाट लोकसंख्येचा प्रश्न चीनला भेडसावतो आहे. दारिद्र्य अफाट आहे आणि तरीही जवळजवळ एकाच वेळी स्वतंत्र झालेल्या या दोन राष्ट्रांच्या जागतिक प्रतिमांमध्ये खूप खूप अंतर आहे. चीन हे तसं बंदिस्त राष्ट्र. बाह्य जगापासून तोडलं गेलेलं. रशियाच्या साह्यानं कम्युनिस्ट चीनची निर्मिती झाली, पण तेही बंध चीननं तोडून टाकले. मार्क्सवादी पोथीबद्धतेमुळे चिनी अर्थव्यवस्था नंतर खरी तर बिकटावस्थेतच पोचली. सांस्कृतिक पुनरुद्धार काळात पिढ्याच्या पिढ्या, बुद्धिजीवींच्या, शास्त्रज्ञांच्या तिथे कापून काढल्या गेल्या. त्यामुळे तर अवस्था आणखीनच वाईट झाली. भारतातली परिस्थिती ह्याच्या नेमकी उलट होती. लोकशाही, धर्मनिरपेक्ष समाजरचना भारतानं स्वीकारली होती. जगाशी सर्वत्र खुले संबंध भारताचे होते. पाश्चात्त्य राष्ट्रांकडून सर्व प्रकारचं आर्थिक–तांत्रिक सहकार्य भारताला उपलब्ध होत होतं. रशिया तर सर्वार्थानं भारताचा जानी दोस्त बनला होता. इतका की त्याच्या मैत्रीपुढे भारताला शेजारी राष्ट्रांबरोबरचे संबंधही कधी फारसे महत्त्वाचे वाटले नाहीत. ह्या साऱ्याचा परिणाम म्हणजे भारतात तंत्रज्ञान खूपच चांगलं विकसित झालं. अत्याधुनिक प्रकल्प आले. याबाबतीत चीन भारताच्या मानानं मागासलेला आहे. हे तिथल्या परिसरातनं फेरफटका मारताना सहज लक्षात येतं. तिथले टेलिफोन्स चिनी बनावटीच्या मोटारी, इतर यंत्रसामग्री पाहिली की ह्या बाबतीतलं भारताचं श्रेष्ठत्व सहज जाणवतं. एवढं असूनही जगात चीनचा दरारा भारतापेक्षा कितीतरी अधिक आहे. आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर निर्णय घेताना चीनची भूमिका काय आहे ह्याचा आवर्जून विचार करावा लागतो आणि ह्याचं कारण म्हणजे ऐन आर्थिक डबघाईच्या काळात देखील नीतिधैर्य उंचावत ठेवून राष्ट्र–उभारणीचं कार्य तिथल्या नेत्यांनी केलं. मग तो नेता डॉ. सन्–येत–सेन असो, चेअरमन माओ असो, चौ एन लाय असो की सध्याचा डेंग असो! सर्वधर्मसमभाव, आंतरराष्ट्रीय बंधुत्व, कम्युनिझम, समाजवाद इत्यादी कशापेक्षाही निखळ चिनी राष्ट्रवादाला तिथे प्राधान्य दिलं गेलं. त्यातनंच चीन हे राष्ट्र खंबीरपणे जगाच्या नकाशावर उभं राहिलं.

एक दोन साधी उदाहरणं देतो या चिनी प्रभावाची. इंग्लंडमधल्या विद्यापीठातून आशियाई अभ्यासदालनं आहेत. तिथे भारतावरील दालनात हजारोंनी पुस्तकं आहेत. तर चिनी दालनातनं त्या मानानं खूपच कमी ग्रंथ उपलब्ध आहेत. भारताचे संबंधही तसे ब्रिटनशी जुने आणि जवळचे आहेत तरीही चीनविषयक अभ्यासासाठी तिथे विद्यार्थ्यांच्या रांगा लागतात. भारतीय दालनात मात्र अगदीच थोडे विद्यार्थी असतात. हाच प्रकार आहे चिनी वैद्यकशास्त्राचा! वास्तविक आयुर्वेदिक वैद्यकीय उपचार पद्धती शास्त्रशुद्ध व उपायकारक असल्याचं सर्वदूर मान्य करण्यात आलेलं आहे. तरीही आयुर्वेदाचं शिक्षण देणाऱ्या शैक्षणिक संस्था भारताबाहेर फारशा नाहीत. ह्या



डॉ. बेडेकर–चिनी दंतवैद्यासमवेत

उलट प्रकार आहे चिनी वैद्यक शास्त्राचा! ते पुरातन शास्त्र शिकवण्यासाठी प्रत्यही नव्या संस्था विविध देशांत निघत आहेत. 'ॲक्युप्रेशर', 'ॲक्युपंक्चर' वर आधारित उपचार केंद्रे निघत आहेत. भारतीय भूप्रदेशावर आपली सैन्ये घुसवताना चीनला यत्किंचितही भारताची धास्ती वाटली नाही. पाकिस्तानलाही भारतावर युद्ध लादताना खास जरब अशी वाटत नाही. एवढंच काय पण श्रीलंकेला देखील विविध भारतीय प्रस्ताव धुडकावून लावताना 'कागदोपत्री' बलाढ्य असलेल्या ह्या शेजारी राष्ट्राची यत्किंचितही तमा बाळगण्याचे कारण वाटत नाही. ह्या उलट रशियन सैन्याची चिनी सीमाप्रदेशावर प्रचंड जमवाजमव होऊनही बलाढ्य अशा रशियाला चीनविरुद्ध प्रत्यक्ष आक्रमण करता आलं नाही. थोड्याच काळात सीमा थंडावल्या. ह्याचं एकच कारण नि ते म्हणजे राष्ट्र म्हणून चीनची ताकद आज जग जाणून आहे.

भारताच्या बाबतीत हे का घडू नये? चीनसारखाच समृद्ध प्राचीन काळ भारताकडे आहे. स्फूर्तिदायक इतिहास आहे. इतिहासापेक्षाही जुनी समृद्ध अशी संस्कृती आहे. चीनपेक्षाही वरच्या श्रेणीचं तंत्रज्ञान आहे. तंत्रकुशल कारागिरी भारताकडे आहे. औद्योगिक प्रगती आहे. असं असूनही भारताची राष्ट्र म्हणून प्रतिमा मात्र उंचावताना दिसत नाही. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रबांधणीच्या कामात

आम्ही कुठे तरी कमी पडलो असाच ह्याचा अर्थ नाही का? चीन, जपान वगैरे राष्ट्राकडून आम्हाला या दृष्टीन काही शिकता येणार नाही का?

कुणी म्हणेल भारतासारख्या अठरा पगड जाती, विविध धर्म, सर्वांना स्वतंत्र विचाराचा मुक्त वाव असे प्रश्न चीनमध्ये नसावेत व म्हणूनच हे घडल असावं. एकसध राष्ट्र उभारणी शक्य झाली असावी. ह्याही प्रश्नाचा चीनच्या सदर्भात गभीरपणे विचार व्हायला हवा. चीनच्या भूगोलाकडे आपण पुन्हा ओझरता दृष्टिक्षेप टाकू. प्रचड लोकसख्येचा, प्रचड विस्ताराचा चीन तीन महत्त्वाच्या व मोठ्या नद्याच्या काठाकाठान, खोऱ्यातन व किनारपट्टीवर असलेला आहे. २९०० मैल लाबीची पीत नदी उत्तरेतून, गगेइतकच महत्त्व असलेली तीन हजार दोनशे चाळीस मैल लाबीची यागत्सी मध्य-भागातून, तर पश्चिमेला असलेली वाय ( Wei ) ही तेराशे मैलाची नदी वाहताहेत ह्या परिसरातन असलेली व इतर मिळून अवघी बारा टक्के जमीन खऱ्या अर्थान लागवडीयोग्य आहे. तर बाकी सारा प्रदेश डोगराळ, पर्वतराजी, दऱ्या-खोऱ्यानी व्यापलेला आहे. आपल्या प्रमाणेच ८०% चिनी जनता खेड्यातून विखुरली आहे. पण एक गमत म्हणजे ९०% जनता देशाच्या अवघ्या १५% परिसरात एकवटलेली आहे उरलेल्या ८५% परिसरात चीनच्या अन्य राष्ट्राशी भिडलेल्या सीमा प्रदेशाचाही समावेश आहे

चीनची जगप्रसिद्ध भिंत पूर्वी उत्तरेकडून होणाऱ्या मगोलियन व अन्य टोळ्याच्या धाडीपासून सरक्षण मिळवण्यासाठी उभारली गेली. मगोलिया आणि चीन ह्याच्यामध्ये ही भिंत उभी राहिली. आज मगोलियाचाच निम्मा भाग चीनमध्ये आहे निम्मा रशियात आहे. भिंतीला 'इतिहासातलं एक आश्चर्य' अस स्वरूप म्हणूनच फक्त आज शिल्लक उरल आहे. पण प्रश्न नवीन निर्माण झाला आहे. निम्मे मंगोलियन चीनमध्ये, निम्मे रशियात. एकमेकाची नाती गोती, आप्तेष्ट-मित्र सबध दोन्ही परिसरात. किरघीज, उझबेक, तिबेट आदी सीमावर्ती परिसरातही हीच परिस्थिती.

मघाशी मी तुम्हाला सांगितल की देशातली ९० % जनता देशाच्या १५% परिसरात एकवटली आहे. ही बहुतेक जनता हान पथीय म्हणजे बहुसख्याक आहे. तर उरलेल्या ८५% परिसरात विखुरलेली जनता ही बहुताशी अल्पसख्याक राष्ट्रीयत्वाची आहे चीनमध्येही पौपन्न भिन्न वाशिक समाज आहेत त्यातले, सीमावर्ती परिसरातले बहुसख्य समाज अल्पसख्य राष्ट्रीयत्वाचे व विशेषत परदेशातील आपल्याच जमातीच्या लोकाशी सबध असलेले आहेत ही परिस्थिती भारतासारखीच नाही का? भारताच्या उत्तर–पश्चिम सीमा पाकिस्तानशी भिडल्या आहेत. तिथे दोन्ही राष्ट्रात परस्पर सबध असणारे अल्पसख्य जमातीचे बहुसख्य लोक आहेत गुजराथ–राजस्थान-पजाब जम्मू–काश्मिर इथे ही परिस्थिती फार बोलकी आहे. चीनमध्येही वर उल्लेखिलेल्या सीमा प्रदेशावर अशीच परिस्थिती होती. काही अशी आजही आहे.

चीनन हा प्रश्न सोडवण्यासाठी एक साधा मार्ग अवलबला 'हान' ह्या बहुसख्य समाजातल्या लोकाच्या वसाहती अत्यत पद्धतशीरपणे व जाणीवपूर्वक ह्या सीमाभागातून त्यानी वसवल्या आज परिस्थिती आहे की बहुतेक सीमावरील प्रदेशातून हान पथीयाची सख्या झपाट्याने वाढत आहे **अल्पसख्यांच्या बहुसख्येऐवजी तिथे बहुसंख्यांक हान पंथीयांची बहुसख्या होत आहे.** त्यातूनच आपोआपच सीमावर्ती प्रदेशातून होणाऱ्या हालचालीवर प्रतिबध यायला लागले आहेत परदेशातून होणाऱ्या भुरट्या हल्ल्याना आता जनतेकडूनच प्रतिकार होऊ लागला आहे छुप्या घुसखोराना कुठलाच प्रतिसाद मिळण बद झाल आहे. परकी राष्ट्राबरोबरच्या सीमावरची डोकेदुखी चीनन अशाप्रकारे थोपवली! भारतात अशा सीमावर काय घडत आहे? अल्पसख्याकाची सख्या ह्या परिसरात कमी होण्याऐवजी वाढत आहे. बिगरकानूनी ये–जा सतत चालू आहे घुसखोरी वाढते आहे! साहजिकच सीमाप्रदेशावर डोकेदुखी वाढत आहे मग ती सीमा गुजराथ-राजस्थान–पजाबलगतची असो, नाही तर काश्मिरातली असो. आसाम सीमेवरही तेच! एकीकडे राष्ट्रहिताचा प्रश्न फक्त डोळ्यासमोर ठेवून, विचारपूर्वक सयोजन करून हान पथीयाची सीमावर्ती परिसरातून बहुसख्या करणाऱ्या चीनचा मार्ग! तर दुसरीकडे 'सेक्युलर', 'समाजवादी' आदी स्वप्नाळू भूमिकानाच जास्त जपणाऱ्या भारताचा मार्ग! राष्ट्र कस घडत जात त्याचच हेही उदाहरण!! कम्युनिस्ट राष्ट्र असूनही माओच्या काळात सुद्धा चीननं राष्ट्रीय हिताकरता तथाकथित निधर्मी धोरण बाजूला ठेवून हान पंथीयाना सीमाप्रदेशात वसवलं. चिनी सस्कृती त्यातून जपली!

---

### अर्थकारणाला गती देण्यासाठी ..

'......१९७९ मध्ये चीनमध्ये आर्थिक सुधारणा सुरू झाल्या. त्यापूर्वी उत्पादनाची सर्व साधने सरकारी मालकीची तरी होती किंवा कलेक्टिव्हजच्या मालकीची होती १९५६ मध्ये सरकारी किंवा सामूहिक मालकीची ही पद्धती रशियन प्रभावाखाली चीनमध्ये अस्तित्वात आली. त्यातही पुढे फार 'डाव्या' विचारसरणीमुळे सरकारी मालकीलाच अती प्राधान्य दिल गेल...आणि पुढे राष्ट्रीयीकृत उद्योग म्हणजे सरकारी खातीच होत गेली त्यानाच प्राधान्य मिळाल... त्यात सामूहिक (सहकारी) मालकीला उच्च मिळाला. व्यक्तिगत मालकी तर मोडकळीतच निघाली...ह्या सर्वांचा चीनवर विपरीत परिणाम होत गेला. विशेषत चीनच्या अनेक प्रश्नाच्या पार्श्वभूमीवर.'

'......एक गोष्ट ह्या ठिकाणी आपण लक्षात घेतली पाहिजे. चीनची लोकसख्या अफाट आहे. साहजिकच बेकारीचा प्रश्न चीनमध्येही आहे चीनची आर्थिक ताकद मर्यादित आहे उत्पादन, घरलोकाच राहाणीमान ह्या समस्या दिवसेदिवस वाढत आहेत. सार्वजनिक क्षेत्रात ह्या गोष्टीना तोड- देण्याची क्षमता अजिबात नाही उलट स्पर्धेअभावी ह्या क्षेत्रातल्या उद्योगात शिथिलता आहे. कृत्रिमपणे किंमती वाढवून आर्थिक डोलारा त्या सामाळण्यासाठी धडपडतात. त्यात सर्वसामान्य जनतेला होरपळूनच जायला होत ..'

'......चीनला आज आधुनिकीकरण, प्रगती अत्यावश्यक आहे. जनतेच राहाणीमान, इतर जगाच्या तुलनेत उचावण आवश्यक आहे बेकारी–निर्मूलन आवश्यक आहे. त्यासाठी म्हणूनच सार्वजनिक क्षेत्राच्या जोडीनच सहकारी आणि खाजगी क्षेत्रालाही वाव देणं आवश्यक आहे. चीनच्या अर्थशास्त्राला गती देण्यासाठीही ते आवश्यक आहे:'

**लिऊ गॉगॉग, अर्थशास्त्रज्ञ**
ह्याच्या लेखातून
(बेइजिग रिव्ह्यू, १२।५।८६)

---

कारण सीमा–रेषा सस्कृती मोडली गेली की देशही मोडतो हे तिथल्या राज्यकर्त्यांनी ओळखलं होतं ! !

## इतिहासातली साम्य स्थळं

चीनचा इतिहास फार पुरातन आहे. ख्रिस्तपूर्व २०० ते ३०० ह्या काळात 'चीन' राजघराण्याच राज्य ह्या परिसरावर होत. त्याच काळात हे राज्य फार भरभराटल चीनशी दळणवळण साधणारा समृद्ध 'सिल्क रूट' त्याच काळात अस्तित्वात आला. जगाला ह्या परिसराची ओळख झाली. त्यावेळच्या 'चीन' राजघराण्याच्या नावावरूनच हा देश चीन या नावाने ओळखला जाऊ लागला ह्याच काळात चीन शिहुआग ह्या चिनी बादशहानं जगप्रसिद्ध चिनी भिंत उभारली. उत्तरेकडून मगोल, मिंग आदी टोळधाकडून होणाऱ्या अतिक्रमणाविरुद्ध प्रतिबधक म्हणून ! तीन हजार सातशे पन्नास मैल लाबीची, ४० फूट उर्च ची, २५००० निरीक्षण बुरूज असणारी ही भिंत बाधायला तीन लक्ष लोकाना दहा वर्षांचा कालावधी लागला. जगातल हे पहिल आश्चर्य मानल जातं. चद्रावर पाऊल ठेवलेल्या अतराळवीरानी अतराळातून पृथ्वीकडे नजर टाकली. त्याना तिथून निश्चितपणे ओळखता आलेली, पृथ्वीवरील एकमेव मानवनिर्मित वास्तू म्हणजे 'चायना वॉलच' होती ! ! बेईजिंगच्या वास्तव्यात आम्ही ह्या अभूतपूर्व भिंतीच वास्तव्य अनुभवल काही काळ तिथे विरमलो. तिथल व भिंतीवरून दिसणार दृश्य तर विलोभनीयच होत. पण स्वच्छताही तेवढीच होती भारतातल्या ऐतिहासिक/धार्मिक स्थळाभोवतीच्या अस्वच्छतेच्या तुलनेत तर ही स्वच्छता, प्रसन्नता खूपच लक्षात राहिली किंबहुना बेईजिंग, नानजिंग, शाघाय कुठेही रस्त्यावरून हिंडताना, पार्केस्मधून विहरताना ही स्वच्छता मनाला मोहून गेली.

ख्रिस्तपूर्व २०० ते ख्रिस्ताब्द २०० हा चारशे वर्षांचा 'हान' राजवटीचा काळ चीनचा भरभराटीचा काळ सास्कृतिक दृष्टयाही ह्या काळात चीनमध्ये नवीन पर्व सुरू झाल हान पथाची सस्थापना झाली. बौद्ध धर्माच्या उदयानतरही हान पथीयाची मूलभूतता तशीच राहिली. तो धर्मही त्यांनी आपला म्हणून आत्मसात केला आजही ९० % चिनी जनता हान पथीयच आहे ! भारतीय सस्कृतीही ह्या काळात व पुढेही अनेक शतकं चीनमध्ये झिरपत राहिली सास्कृतिक बाबतीत चीनन भारताकडून खूप काही उचलल. अध्यात्माच्या प्रातात चीन भारताकडे सतत अपेक्षेन पाहात राहिला. ह्याच काळात चीन जगाच्या, नव्हे विश्वाच्या मध्यभागी आहे ही कल्पना चिनी जनमानसात रूजली. Cathey किंवा 'किताई' म्हणजे मध्यभाग. चीनला ह्या नावानही क्वचित सबोधल गेल आजही आम्ही बेईजिंगला पोचलो कँथे (किताई) विमान सेवेनच !

'हान' राजघराण्याच्या काळात आज चीनचा म्हणून गणला जाणारा बहुसख्य प्रदेश, प्रथमच एकछत्री अमलाखाली आला एकसघ चीन राज्य उभ राहिलं. नतरच्या भरभराटीच्या, सास्कृतिक उत्कर्षाच्या काळात हे राज्य अधिकाधिक एकवटल गेल. काहीस विस्तारल रेशीम, कागद, चिनी वैद्यक आदी प्रकार जगाला कळले. कॉन्फ्यूशियस, ताओ पाठोपाठ बौद्ध धर्म तिथे प्रसारित होत गेला.

भारतात खैबर खिंडीतून चढाया सुरू झाल्या. झुंडी सुरू झाल्या. सुमारे त्याच सुमारास चीनमध्येही परकीय अतिक्रमणं वेगानं आली. मगोल आले. (१२८० ते १३६७) मिंग १३६७–१६४४), मॉच्यू, चिंग राजेशाह्या पाठोपाठ आल्या. हे सर्व परकीय होते मगोल राजवटीत युआन, कुब्लाय खान, खान बालिक ह्यानी आपली राजधानी नानजिंग इथे हलवली. जगभर आपल्या क्रूर कृत्यानी प्रसिद्ध पावलेला चेंगिजखान हाही याच राजघराण्यातला.

ह्यानतर मिंग राजघराण्याची सत्ता जवळजवळ तीनशे वर्षे टिकली. ह्या काळात चीनमध्ये चागलं स्थैर्य होतं. मार्को पोलो ह्या जगप्रसिद्ध प्रवाशाच्या वर्णनानी जगाला चीनच वेड लावल. ती वर्णनं ह्याच मगोल आणि मिंग राजवटीच्या काळातली. बेईजिंगमध्ये आम्ही असतानाच आम्ही तिथल्या तेरा मिंग राजाचे स्मृतिस्तभ असलेल्या दरीला भेट दिली तिआनशाऊ डोंगराच्या पायथ्याशी ही विस्तीर्ण व नयनरम्य वास्तू उभी आहे. एकेक स्मृतिस्तभ, त्या सभोवार एकेक प्रासाद. त्या प्रासादाकडे जाणाऱ्या रस्त्यावर दोन्ही बाजूला भव्य मूर्ती आहेत. वेगवेगळ्या वेषातल्या, वेगवेगळे भाव दर्शविणाऱ्या. अस म्हणतात ह्या स्तुपाखाली सोनं, जडजवाहिर इत्यादीचे प्रचड साठे नतर सापडले मिंग राजवटीतल्या भरभराटीच्या काळाच वैभवच त्यातून लक्षात यावं

शेवटच राजघराणं चिंग. ह्या राजवटीच्या काळात चीनची

---

### भारत – चीन व्यापार

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९७९ | ७२ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स. | | | |
| १९८२ | १४५ दशलक्ष अमेरिकन डॉलर्स. | | | |
| १९८३ | ६४ | ,, | ,, | ,, |
| १९८४ | ५४ | ,, | ,, | , |
| १९८५ | ७३४ | ,, | ,, | ,, |

व्यापाराच प्रमाण : भारत : चीन : : १ : ६.

### भारताकडून चीनला निर्यात होऊ शकतील अशा सेवा

- शेतीची अवजार व मशिनरी. विशेषतः ट्रॅक्टर्स.
- हिऱ्याना पैलू पाडणारी मशिनरी , त्या उद्योगाचं तंत्रज्ञान.
- कापड उत्पादनासाठी मशिनरी, सुटे भाग व कापूस
- पॅकेजिंग मशिनरी / पशुखाद्य प्रकल्प / खाद्यतेल प्रकल्प.
- चीन भारत सयुक्त सहकारात तिसऱ्या राष्ट्रातले प्रकल्प
- चहा.
- वातानुकूल यत्र सामग्री, बॉटलिंग प्लाट्स इत्यादी.
- लघुउद्योगासाठी आवश्यक मशिनरी
- स्कूटर्स.
- औद्योगिक रसायनं, औषधी रसायन.
- खनिज, लोखड

(–ए जी वझिरानी याच्या चीन दौऱ्यावर आधारित लेखावरून; 'भारतरत्न' ह्या हाँगकाँगहून प्रकाशित होणाऱ्या इंग्लिश प्रकाशनातून)

---

परिस्थिती भारतातल्या बहादुरशहाच्या काळातल्यासारखी होती. राज्यसंस्था खिळखिळी होत होती. परकीयांची आक्रमणं वाढत होती. ब्रिटिश, फ्रेंच, डच, पोर्तुगीज साम्राज्ये जगभर पसरत होती. १८३८ मध्ये हाँगकाँग ब्रिटिश साम्राज्यात सामील करून घेतलं गेलं. मकाव, शांघाय आदी प्रदेश जणू वेगवेगळ्या पाश्चात्त्य आक्रमकांना आंदण दिले गेले. १८९३ साली जपानने चीनवर मोठं आक्रमण केलं. ह्या सगळ्या धक्क्यांमुळे चीन खिळखिळा झाला. चिंग राजवटही तशी चिनी लोकांच्या दृष्टीने परकीयच. त्याचवेळी ब्रिटिश, फ्रेंच, जपानी लोकांची आक्रमणं. त्यामुळे ह्या सर्वच सत्ता फेकून देण्यासाठी चळवळी तिथे उभ्या राहिल्या. स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले हा काळही साधारणतः भारतात हे वारे वाहू लागले त्याच काळातला. म्हणजे भारतातल्या राष्ट्रीय कॉंग्रेसच्या उभारणीच्या सुमाराचा. दादाभाई, अॅनी बेझंट, लो. टिळक, सावरकर वगैरेंची धडपड भारतात सुरू होती, त्याच वेळी चीनमध्येही डॉ. सन्-येत-सेन ह्यांची चळवळ उभी राहिली फक्त चीनमध्ये तुलनेनं ती लौकर फलद्रूप झाली १९११ साली राजेशाही झुगारून देऊन डॉ. सन्-यत-सेन यांच्या नेतृत्वाखाली पहिलं राष्ट्रीय सरकार, लोकशाही तत्त्वांवर आधारलेलं अस्तित्वात आलं.

ह्या संपूर्ण राजेशाह्यांच्या काळात, त्या परकीय असूनही, एक



माओ गणवेशातील दोन चिनी भेटतात–डॉ. बेडेकरांना टिपलेले छायाचित्र

मात्र घडलं मंगोल, मांच्यू, मिंग, चिंग वगैरे जमातीचे लोक चीन-मध्ये अल्पसंख्यच राहिले. हान पंथीयच वाढत राहिले. ती संस्कृतीच सर्वांना सामावून घेत समृद्ध होत गेली. भारताच्या दृष्टीने दुसरी महत्त्वाची बाब म्हणजे ह्या प्रत्येक राजवटीनं, प्रत्येक राजानं भारतीय तत्त्वज्ञान, त्यावरील संस्कृत ग्रंथ चिनी भाषेत आणण्यासाठी बौद्ध भिक्षूंना प्रोत्साहन दिलं. नव्हे तसे ते मिळवून आपापल्या काळात त्यांची भाषांतरं घडवून आणण्यात प्रतिष्ठा मानली. त्यामुळेच आज भारतातही उपलब्ध नाही त्यापेक्षा कितीतरी मोठ्या प्रमाणावर संस्कृत साहित्य, वेद–उपनिषदं आदी मूळग्रंथ वा त्यांची प्रमाणित भाषांतरं चीनमध्ये उपलब्ध आहेत. हा सर्व भारतीय प्राचीन विद्येचा अमोल ठेवा चीनमध्ये पौर्वात्य कालीन चिनीभाषेत सुधारत आहे. जसा संस्कृतचा अभ्यास आपल्याकडे कमी कमी होत चालला आहे तसाच पौर्वात्य चिनींचा चीनमध्ये. पौर्वात्य चिनी भाषेच्या पंडितांची संख्याही कमी कमी होत आहे. मला वाटतं हे पंडित उपलब्ध आहेत तोवरच चिनी भाषेत जतन झालेला ठेवा पुन्हा भारतीय भाषांमध्ये आणणं अत्यंत आवश्यक आहे. आपल्या पुढच्या समृद्धीच्या दृष्टीने ज्ञान जतन करून ठेवण्याच्या दृष्टीने.

प्रा. हुआंग चीन च्युआन ह्यांनीही ह्या मुद्द्यावरच भर दिला, नंतर चीनमधील वास्तव्यात मी जेव्हा शांघायमधील फुन्दान विद्यापीठाला भेट दिली. तेव्हाही हाच विचार, तिथली ग्रंथसंपदा पाहून मनात आला. प्रा. युआन चुआन वेई, प्रा. सन पी यंग आदींशी चर्चा झाली. भारतीय इतिहास हा विषय घेऊन एम्. ए. डॉक्टरेट करणाऱ्या विद्यार्थ्यांशी बातचीत झाली. त्याहूनही ही आवश्यकता अधिकाधिक जाणवतच गेली. नंतर पेकिंग रेडियो व चिनी दूरदर्शनवर आमच्या ह्या विषयांवरच गप्पा झाल्या...

□

थोडं विषयांतर इथे झालं. पण संस्कृत भाषेचा अभ्यास, भारतीय संस्कृती म्हटल्यावर मला राहवत नाही आणि सांस्कृतिक बाबतीत परकीय स्वाऱ्यांच्या काळातही चीननं आपली संस्कृती टिकवली. वाढवली ह्याचं मला अप्रूप वाटलं. भारतात मुसलमानी अंमलाखाली मात्र तसं झालं नाही. इस्लामीकरण इथं झपाट्यानं वाढलं. तरीही त्या रेट्याखाली न दबता इथल्या बहुसंख्य समाजानं हिंदुत्व कायम राखलं. हिंदू संस्कृती जोपासली. चिनी व भारतीय इतिहासातलं हेही एक साम्यस्थळ! परकीय राजेशाह्यांमुळे आपल्या देशाप्रमाणेच चीनमध्येही त्या त्या राजवटींच्या खुणा मागे राहाव्यात त्याप्रमाणे अल्पसंख्य अस्तित्वात राहिले. राष्ट्रीय सरकारच्या काळात ह्या अल्पसंख्यांकांचा काही त्रास चीनला होत राहिला. अर्थात ह्या अल्पसंख्यांकांची संख्या भारतातल्या अल्पसंख्यांकांच्या मानाने खूपच कमी होती.

□

डॉ. सन-येत-सेनच्या नेतृत्वाखालच्या राष्ट्रीय सरकारनं मात्र लोकांच्या अपेक्षा तशा पूर्ण केल्या नाहीत. सन्-येत-सेनच्या मृत्यूनंतर म्हणजे १९२५ नंतर सत्ता कोमिटांगच्या हाती म्हणजे चँग-कै शेकच्या हाती गेली आणि नंतर चीनमध्ये अनागोंदीच वाढत राहिली. त्याचं पर्यवसान कम्युनिस्ट क्रांतीत झाल्याचं मी आधी सांगितलंच. आणि तिथूनच चीनभोवतीची गूढतेची वलयं निर्माण व्हायला सुरुवात

झाली. सुरुवातीच्या काळात चीननं राष्ट्रउभारणीबाबत रशियाची सहीसही नक्कल केली. भारताप्रमाणेच चीनन रशियाच्या पावलावर पाऊल टाकून पहिल्या पचवार्षिक योजनेची आखणी केली जड उद्योगाना प्राधान्य दिलं कम्युनिस्ट राज्यक्रांत्याच असल्या तरी रशिया आणि चीनमधल्या चळवळीच्या मूळ गाभ्यातच फरक होता रशियातली कम्युनिस्ट क्रांती कामगाराच्या उठावातून झाली. चीन-मध्ये माओच्या लढयाचा मुख्य भार शेतकऱ्यावर होता. चीन शेतीप्रधान देश असल्यामुळे ते नैसर्गिकही होत. कम्युनिस्ट चळवळीच एक सूत्र होत. राष्ट्राराष्ट्राच्या सीमा पुसून कम्युनिझमचा प्रसार. पूर्व युरोपात रशियाला ते शक्य झाल. तिथली राष्ट्रे भिन्न भिन्न असली तरी ती रशियन आधिपत्याखालीच असल्यासारखी होती. हंगेरी, अफगाणिस्तान ही त्याची उदाहरण चीनला मार्क्सिझम हवा असला तरी स्वत्व गमवायचं नव्हत. म्हणूनच अट्टल मार्क्सवादी असलेल्या माओनं रशियन आधिपत्य फार झपाट्यान झुगारून दिल. एवढंच नाही तर इतरही राष्ट्राशी परखडपणे वागून स्वतंत्र वाट-चालीला सुरुवात केली. जगातल्या सर्वात मोठ्या मानवी प्रयोग-शाळेतल्या प्रयोगाना सुरुवात केली. चिनी अस्मिता इथे जागृत झाली. चिनी राष्ट्रनिर्मिती इथे सुरू झाली. डेंगच्या आजच्या राजवटीत माओ, माओची विचारसरणी, मार्क्सवाद या सगळ्याला सोडचिठ्ठी हलके हलके दिली जात असली तरी माओन राष्ट्रवादाला जे प्राधान्य दिल त्याबद्दल चीन माओला कधीच विसरू शकणार नाही. चिनी जनतेलाही आजच्या बदलत्या काळात देखील म्हणूनच माओबद्दल नितांत आदर आहे !

माओच्या काळात राष्ट्रवादाला प्राधान्य देतानाही एकीकडे पोथीनिष्ठ मार्क्सवादही जोपासला गेला. रशियाशी फारकत झाल्या-नतर माओ पुस्तके, माओ विचार, माओ वचन आदी स्वरूपात तो जनतेवर लादला गेला. फार काय जनतेवर माओ ड्रेस देखील लादला गेला नैसर्गिक विचार–प्रकृतीना फाटा देऊन पोषाखासह सर्व बाब-तीत स्त्री पुरुषाना एकाच मापान मोजल गेलं. घर ही संस्थाच माओच्या काळात नष्ट झाली. सर्वच सरकारच्या मालकीचं. लोकानी तिथे काम करायचं. सरकारी–सामायिक शेतात. सरकारी कार-खान्यात बँकेत. ऑफिसात. राह्यचंही सामायिक कॉम्यून्समध्ये. मुलं राष्ट्राला अर्पण करून ! घर, कुटुंब, प्रेम ह्या सगळ्या बूर्झ्वा कल्पना. त्यांना माओच्या राज्यात तिलांजली दिली गेली. ह्या पद्धतीत एक मात्र माओ शासनान साधल. अन्न–वस्त्र–निवारा ह्या मानवाच्या तिन्ही मूलभूत गरजा भागवल्या गेल्या कुणी उपाशी राहिल नाही गुन्ह्यांच प्रमाण जवळजवळ शून्यावर आल. पण ह्या पलीकडे माओ राजवटीला लोकांचं जीवनमान सुधारता आल नाही. उलट त्या कालावधीत दोन घोडचुकाच झाल्या. त्यातली पहिली घोडचूक म्हणजे 'ग्रेट लीप फॉरवर्ड'चा कार्यक्रम ! अशक्यप्राय उत्पादन उद्दिष्टे आखून लोकाना वेठीला धरण्यात आल. त्या प्रयत्नात प्रचड चलन फुगवटा झाला. आर्थिक कोंडीत चीन त्या प्रयत्नातून ढकलला गेला.

दुसरी घोडचूक १९६६ ते १९७६ या काळातल्या 'कल्चरल रिव्हो-ल्यूशन' काळातली ! सांस्कृतिक पुनरुत्थानाच्या नावाखाली प्रगति-शील विचारांनाच चीनमध्ये खच्ची करण्यात आल. दहा कोटीहून अधिक बुद्धिजीवी, वैज्ञानिक, विचारवंत मंडळीची हत्या करण्यात आली चीनची लोकसख्या आज १०५ कोटीची आहे वयवार ह्या लोकसंख्येची विभागणी धक्कादायक आहे. तीस वर्षाखालील लोकाचं प्रमाण, एकूण लोकसंख्येच्या सदर्भात ६५% एवढ आहे. तीस ते पन्नास वयोगटातल्याच प्रमाण २४% आहे. तर पासष्ट पेक्षा अधिक वयोगटातल्याच प्रमाण जेमतेम चार टक्क्याच्या आसपास आहे. हे प्रमाण इतर राष्ट्राच्या तुलनेत फार भयानक आहे. चीनचे आजचे नेते वयोवृद्ध आहेत ह्याचाच अर्थ सर्वसामान्य चिनी जनतेत आज जुनी पिढीच जवळजवळ नामशेष झालेली आहे हा कल्चरल रिव्हो-ल्यूशन काळातल्या हत्याकांडाचाच प्रकार आहे या काळात (१९७२ ७५ हा चौ-एन लाय ह्याच्या प्रयत्नामुळेच अपवाद वगळता) मादाम माओ त्याच्या चांडाळ चौकडीने चीनमध्ये धुमाकूळ घातला. जगा-साठी चीनचे व चिन्यासाठी जगाचे दरवाजे बंद केले. आणि चीनला अनेक दशक मागे ढकलल ! तिसऱ्या चिनी क्रांतीची बीज ह्या दशकातच रोवली गेली आणि अवघ्या तीस वर्षांच्या काळात मार्क्सवादाची झापड टाकून मोठ्यान आळोखे पिळोखे द्यायला चिनी ड्रॅगनन सुरुवात केली.

गेल्या आठ वर्षांत चीनन केलेली प्रगती क्रांतिकारक तर आहेच पण तितकीच इतराना आश्चर्यानं खिळवून टाकणारी आहे आणि ह्याच प्रत्यतर आम्हाला चीनमधल्या वास्तव्यात सतत येत राहिल.

## बेईजिंगमधली भटकंती

बेईजिंगमधल्या नतरच्या वास्तव्यात आम्ही चिकार भटकलो. अनेकाशी बोललो. प्रदेश पाहता यावा म्हणून रेल्वेचा आश्रय घेतला. चीनमधील रेल्वे भारतासारखीच तुडुंब गर्दीची, खेचाखेच असलेली स्टेशनही आपल्यासारखीच. गाड्याच वेळेनुसार न धावणही आपल्यासारखच ह्या गर्दीचा आम्हाला मात्र फारसा त्रास झाला नाही. कारण परदेशी पाहुण्यासाठी तिथे राखीव डबे असतात. फक्त उच्चपदस्थ चिनी नागरिकाना ह्या डब्यातून, परदेशी पाहुण्याव्यति-रिक्त प्रवास करण्याची परवानगी मिळते ! ह्या साऱ्या भ्रमतीत आमचा गाईड हू ह्याची आम्हाला चागलीच मदत मिळाली त्याला फार अस्खलित हिंदी येत होत न् त्यामुळे त्याची आणि आमची गट्टीही चागली जमली. माओ, माओची राजवट, कम्युनिझम ह्या विषयी आम्ही त्याला आडून आडून प्रश्न विचारले त्यानं कुठलीही उत्तर टाळली नाहीत. आणि दिली ती पोपटपंची नव्हती ! शिकव-लेली नव्हती. खुल्लम खुल्ला उत्तर होती. माओविषयी बोलताना तो म्हणाला, 'माओ काही देव नव्हता. आमचा तो लाडका नेता होता यात वाद नाही. पण तरीही तो एक साधा माणूस होता. आणि माणूस हा कधी ना कधी चुकतोच ! कल्चरल रिव्होल्यूशनला परवानगी ही त्याची घोडचूक होती. चिनी इतिहासातला तो काळाकुट्ट धब्बा आहे. पण म्हणून आजही माओ त्याज्य नाही !' अशीच उत्तर कम्युनिझम, व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तिगत व्यवसाय स्वातंत्र्य, परकी गुंतवणूक आदी नाजूक प्रश्नांवरही आम्हाला अनेकाकडून मिळत गेली. माओच्या काळात बोलणच विसरून गेलेला चिनी माणूस आज इतक्या मुक्त-पणे बोलत होता हेच एक विशेष होत... आणि अशा गप्पा नतर सतत घडत राहिल्या वेगवेगळ्या लोकाशी काहीही आगाऊ कार्य-क्रम न ठरवता

पेकिंग आकाशवाणीवर एक भारतीय दांपत्य आज अनेक वर्षे काम करत आहे. त्रिदीप जोशी व सौ. जोशी ही त्याची नाव. दोघही मूळचे उत्तर भारतीय. उत्तम चिनी बोलतात. बेईजिंगमध्ये त्याची ओळख झाल्यावर त्याचा आम्हाला खूपच फायदा झाला अनेक ओळखी झाल्या दिलखुलास गप्पा झाल्या. आकाशवाणीवर आणखी एका स्वतःला भारतीय म्हणवणाऱ्या महिलेची ओळख झाली ती दार्जिलिंगकडची. आज चीन रेडिओवर हिंदी बातम्या सांगणारी हिंदी कार्यक्रम सादर करणारी. तिच नाव चटकन् लक्षात येत नाही आहे. पण तिच्या म्हणण्याप्रमाणे, बासष्टच्या युद्धात तिच्यावर हेरगिरीचा संशय घेऊन भारत सरकारनं तिला चिनी म्हणून भारताबाहेर हाकललं. ती आज तेव्हापासून चीनमध्येच राहत आहे. भारतात आता तिचे कुणीही संबंधित नाहीत म्हणे ! आणखी एक भारतीय दांपत्य आम्हाला चीनमध्ये भेटल. ते नायजेरियाहून आल होतं आमच्यासारखच प्रवासी म्हणून. अर्थात त्या दांपत्याचाही भारताशी आता नावापुरताच संबंध शिल्लक होता भारतीय वकिलातीतले कर्मचारी वगळता व वरील काही अपवाद वगळता आणखी कुणी भारतीय तिथे आम्हाला आढळले नाहीत काही जुन्या चिनी लोकानी सागितलं की खूप खूप पिढ्यांपूर्वी भारतातून आलेले लोक 'चीनमध्ये स्थायिक झाले आहेत. ते आज स्थानिक लोकात पूर्णपणे मिसळून गेले आहेत. त्याचा शोध घ्यायचा थोडा-फार प्रयत्न आम्ही केला. पण यश मिळालं नाही...

बेईजिंगमध्ये असतानाच तिथल्या एका मोठ्या बौद्ध देवळाला भेट द्यायचीही संधी आम्हाला मिळाली. माओ राजवटीत धर्माला सोडचिठ्ठीच देण्यात आली होती. जशा घर, कुटुंब ह्या संस्था पुनरुज्जीवित करण्याचा आता बदलत्या काळात प्रयत्न सुरू आहे तशीच धर्मसंस्थाही पुन. प्रस्थापित करण्याचा प्रयत्न सुरू आहे. त्याच प्रत्यंतर ह्या भव्य देवळात आल. लामाना तिथे मिनतवारीने बोलावण्यात येत आहे. धार्मिक शिक्षणाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. इतकंच काय पण आम्ही तिथे असतानाच, बेईजिंगमध्येच एक सर्वधर्म परिषद भरवण्याचाही घाट घातला जात होता...हे देऊळ मात्र भव्यदिव्य आहे व्यवस्थित जोपासलेलं आहे स्वच्छतेबद्दल तर बोलायलाच नको ! ...

प्रचंड भिंत, ताईनामाईन चौक, मिंग स्तूप, माओ समाधी वगैरे पाहत पाहत हिंडताना आणखी एक आढळल की बेईजिंगमध्ये फार सुदर सुदर पार्कस् आहेत. अप्रतिम 'झू' आहे. व्यवस्थित जोपासलेले प्राचीन सुबत्तेच्या साक्षी सागणारे उत्तमोत्तम प्रासाद आहेत. भव्य रस्ते, उत्कृष्ट दिवे ह्यानी या शहराची शोभा आणखीनच वृद्धिंगत केली आहे. तर ठिकठिकाणी पसरलेल्या खास चिनी पद्धतीच्या बागानी बेईजिंगची शान वाढवली आहे...

जाण्याआधी ताईनामाईन चौकाला व माओच्या समाधीला पुन्हा भेट दिली. रात्री शात वातावरणात मी ह्या दोन्ही वास्तू पाहिल्या होत्या. दिवसा तिथे प्रचंड गर्दी उसळली होती. दिलखुलास हसणारे, रगीबेरंगी कपडे परिधान केलेले चिनी तिथे मुक्तसचार करीत होते. आपल्या दिवगत नेत्याच दर्शन घेत होते आणि त्या गर्दीतही मला जाणवली ती त्याची शिस्तप्रियता ! स्वच्छता ! आज दिवसा आणखी एका गोष्टीनं माझ मन वेधून घेतल. तिथल्या इमारतीवरचं उत्कृष्ट पेंटिंग, चित्रकारिता ! ! ...

## नानजिंग ते शांघाय

चीन मधलं दुसरं महत्त्वाच शहर म्हणजे नानजिंग ! चोवीसशे वर्षांहूनही अधिक जुना इतिहास सागणार हे शहर, मिंग राजवटीपर्यंत अनेक राजवटींच्या काळात चीनच्या राजधानीच शहर होतं. डॉ सन-यत-सेनच्या सर्व चळवळीचा केंद्रबिंदूही ह्याच शहरात होता. १९२७ पासून कम्युनिस्ट क्रांतीपर्यंतच्या राष्ट्रीय सरकारच्या काळातही राजधानी नानजिंगलाच होती. साहजिकच नानजिंगमधली खास वास्तू आहे सन-यत-सेन ह्याची एका टेकडीवर विसावलेली भव्य समाधी. विशेष म्हणजे ही समाधी परदेशात स्थायिक झालेल्या चिनी लोकाकडून उभ्या केलेल्या निधीतून बांधली गेली आहे

सन-यत-सेन प्रमाणेच मिंग राजवटीनंही आपला ठसा या शहरावर उमटवलेला आहे. हॉंग वू ह्या मिंग राजघराण्याच्या मूळ पुरुषाची भव्य समाधी हेही त्यामुळे नानजिंगचं एक आकर्षण महत्त्व आहे.

पण आधुनिक नानजिंगचं खरं आकर्षण आहे यागत्सी नदीवरचा भव्य पूल. चीनमध्ये दळणवळणाची अवस्था आता आतापर्यंत अत्यंत वाईट होती. आजही तिच्यात लक्षणीय सुधारणा हवी आहे आणि त्यादृष्टीने चीनचे प्रयत्न सुरू आहेत. यागत्सी नदीवरचा पूल हा त्यातला एक महत्त्वाचा टप्पा आहे ! संपूर्ण चिनी बनावटीचा व चिनी तंत्रज्ञ कामगार ह्यानी आठ वर्षे (१९६० ते ६८) राबून बांधलेल्या ह्या पुलाची लाबी आहे पधरा हजार फूट ! त्यावर चौपदरी असा प्रशस्त हायवे आहे. तर रेल्वेचे डबल रूळ सामावून घरणाऱ्या रेल्वे पुलाची लाबी आहे बावीस हजार दोनशे बारा फूट ! यागत्सी नदीचे खोर न् त्या पलीकडच मोठं विहंगम दृश्य ह्या प्रचंड पुलावरून दिसत. हे खोरं आणि राजधानी बेईजिंग ह्याना जोडणारा हा महत्त्वाचा दुवा आहे ! आपल्याकडच्या भाक्रा-नानगल धरणाला जे आपल्या विकासाच्या दृष्टीनं असलेल्या वाटचालीत महत्त्व आहे तसच महत्त्व यागत्सी पुलाला आहे आधुनिक तंत्रज्ञानाचा तो एक परमोच्च बिंदू आहे. आधुनिक तीर्थक्षेत्र आहे ! ...

बेईजिंग प्रमाणेच नानजिंगमध्येही बागाची रेलचेल आहे. उत्कृष्ट सरोवर आहे. प्रचंड वस्तू व इतिहास संग्रहालय आहे. नानजिंगमध्ये हिंडतानाही लोकाचा तोच मोकळेपणा आम्हाला आढळला, बेईजिंगमध्ये सामान्य फळविक्रेते, हातगाडीवाले आम्हाला दिसले. त्याच्याशी आम्ही बोललो. त्याचे फोटो घेतले. नानजिंगमध्येही त्याचीच पुनरावृत्ती घडली..

बेईजिंगहून नानजिंगला आम्हाला घेऊन येणाऱ्या चायना जनरल ॲडमिनिस्ट्रेशन ऑफ सिव्हिल एव्हिएशनच्या विमानसेवेनेच आम्ही नानजिंगचा निरोप घेऊन शाघायकडे कूच केल...

◻

आमच्या चीन भेटीतला शेवटचा टप्पा होता शाघाय ! शाघाय हे चीनमधल अत्यंत गजबजलेलं बंदर आहे. तितकच ते गजबजलेलं धावत शहर आहे. चीनमधलं ते सर्वांत मोठं शहर आहे, तर आशिया खंडातल सर्वाधिक लोकसंख्येच शहर आहे (एक कोटी पचवीस लाख वस्ती ! ) झपाट्यान वाढत असलेल ते एक औद्योगिक आणि व्यापारी शहर आहे आणि शांघायच्या रस्त्यावरनं हिंडायला लागलं तरी ह्या गजबजाटाच्या खुणा सहजी लक्षात येऊ लागतात.

शांघायमध्ये बघण्याजोगत्या काही वास्तू आहेत बुद्ध मंदिरे, प्राच्य वस्तू भांडार, पार्क, वस्तुसंग्रहालय वगैरे पण शांघायची खरी मजा आजूबाजूला बघत बघत शांघायभर हिंडण्यातच आहे बेइजिंग आणि नानजिंगपेक्षा आधुनिकतेची छाप ह्या शहरावर जास्त आहे. इंग्लंडमधल्यासारख्या छान टुमदार, तशाच गल्ल्या शांघायमध्ये आढळतात. तर फ्रेंच छाप असणारा शांघायचा दुसरा भाग तसाच मनाला मोहून टाकणारा आहे. पण शांघायमधला मनाला प्रसन्नता देणारा, पाय मोकळे मनसोक्त हिंडण्यायोग्य भाग म्हणजे 'बंड' बंड म्हणजे बंधारा. व्हँग पू नदीवर मोठाले खडक टाकून तयार केलेला. काहीसा आपल्या मुंबईतल्या नरिमन पॉईंटसारखा. पण त्यापेक्षाही जास्त विलोभनीय बंडच्या समोर दिमाखदार इमारती उभ्या आहेत जुन्या काळातल्या विविध देशांच्या वकिलातींच्या, बँकांच्या आणि ब्रिटिश पद्धतीच्या क्लबसच्या. आज तिथे काही मोठाली हॉटेल्स उभी आहेत. शासकीय कार्यालये आहेत. बंडवरून नदीकडे बघत उभं राहिल की त्या बंदरावरच्या धावपळीत वेळ कसा जातो ते कळतही नाही. निरीक्षण मात्र चांगल पाहिजे.

तर दुसरीकडच्या हॉटेल्सच्या ओळीमध्ये दिसत दिमाखदार 'पीस' हॉटेल. शांघायमध्ये येणाऱ्या प्रवाशाचं अत्यंत आवडतं आणि खूप जुन हॉटेल ह्या हॉटेल्सवरनं एक आठवलं. भारतीय प्रवासी म्हणून अगदी सुरुवातीपासून आमच्या खाण्या-पिण्याविषयी आमचा गाईड दक्ष होता त्यातून आम्ही बहुतेक सर्व पडलो शाकाहारी. त्यामुळे चीनमध्ये आमची खूपच पंचाईत व्हायची. चायना इंटरनॅशनल टूरिस्ट सर्व्हिसच्या वतीनं गाईड आमची चांगली व्यवस्था व्हावी म्हणून कसोशीनं प्रयत्न करायचा. पुढच्या वास्तव्याच्या हॉटेलला आगाऊ सूचना देऊन ठेवायचा. काय हवं नको ते सांगायचा. तरीही खास भारतीय पद्धतीचं जेवण मिळाल नाही की आमच्यापेक्षा तोच खजील व्हायचा. प्रत्येक खेपेला म्हणायचा, 'काळजी करू नका सर! पुढच्या खेपेला नक्कीच चांगल जेवण मिळेल. अगदी इंडियन स्टाईलच!' अर्थात ते मिळाल नाही हे अलाहिदा. पण त्यातनं त्या गाईडची तळमळ मात्र दिसली.

आणि ही तळमळ एकूणच सर्व पर्यटकांबाबत आढळली त्या देशाची! जगासाठी दरवाजे खुले केले आहेत ना, जगभरचे पर्यटक येऊन परकी चलन हवे आहे ना, मग आलेल्या पर्यटकांच्या सोयीत कुठलीही कमतरता राहू न देण्याचा चंग चिनी पर्यटन विभागानं बांधल्याच बेईजिंग विमानतळावर उतरल्यापासून जाणवलं बदल साधायचा आहे, विकास गतीनं घडवून आणायचा आहे म्हटल्यावर चीनन मग वृथा अभिमान, जुने हेवेदावे बाजूला सारून तडजोडी स्वीकारायला सुरुवात केली आहे. अत्याधुनिक, वातानुकूलित जपानी टॅक्सीज परदेशी पाव्हण्यासाठी आता चीनमध्ये आहेत शानदार रस्ते आहेत पाश्चात्त्य राष्ट्रांच्या तोडीची पंचतारांकित हॉटेल्स आहेत आणि हे सार गेल्या सात-आठ वर्षांत घडवून आणलेल आहे

आधुनिकतेकडे वळण्याची ही तळमळ सर्वच क्षेत्रात चीनला लागली आहे बाहेरच्या जगात होणाऱ्या तांत्रिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, राजनैतिक बदलाकडे चीन उत्सुकतेनं लक्ष ठेवून आहे. पण फक्त बघ्याची भूमिका घेऊन अलिप्त राहण्याची आज चीनची

---

## चीनमध्ये पाश्चात्त्य गुंतवणूक

१९८४ च्या तुलनेत, १९८६ मध्ये चीनमध्ये असलेल्या पाश्चात्त्य गुंतवणूक असणाऱ्या उद्योगाची संख्या १३४४ टक्क्यांनी वाढून ५४२३ झाली. ह्यामध्ये चीनचे पाश्चात्त्यांबरोबरचे संयुक्त प्रकल्प आहेत तसेच अनेक फक्त पाश्चात्त्यांचे प्रकल्प आहेत. निव्वळ पाश्चात्त्यांचे असलेले प्रकल्पही आज १५०० च्या घरात आहेत १९८४ च्या तुलनेत ह्या प्रांतातही १९८५ मध्ये ५७.२ टक्के एवढी वाढ झाली.

—बेईजिंग रिव्ह्यू, मे १९८६

---

इच्छा नाही 'ह्याचा अर्थ चीन आज मार्क्सवाद झुगारून देत आहे असाच करायचा का?' असा एक प्रश्न शांघायला भेटलेल्या एका चिनी गृहस्थाला आम्ही विचारला हॉटेलात भेटलेल्या ह्या चाळीस-एक वर्षांच्या चिनी गृहस्थाकडून ताबडतोब उत्तर आलं, 'नाही. अजिबात नाही. पण त्याच बरोबर हेही लक्षात घेतलं पाहिजे की जगातल्या प्रत्येक प्रश्नाला मार्क्सवादात उत्तर सापडलच पाहिजे असं नाही मार्क्सला एकविसाव्या शतकातल्या सामाजिक प्रश्नाची स्वप्नं त्यानं मार्क्सवाद मांडला तेव्हा नक्कीच पडली नव्हती. अर्थात त्याची उत्तरही मार्क्सवादात शोधणही चुकीचंच ज्या प्रश्नाची उकल मार्क्सवादाच्या आधारानं होऊ शकेल तिथे मार्क्सवादच स्वीकारला पाहिजे. नाही तिथे राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवून प्रश्नाची उत्तरं वेगळ्या मार्गांनी शोधलीच पाहिजेत. पुढची वाटचाल चाललीच पाहिजे.' आमच्या गाईडनही काहीस असच उदाहरण आम्हाला दिलं. ह्याच प्रश्नावर चिनी माणूस इतक्या धिटाईनं आपली मतं मार्क्सवादावर मांडू लागला आहे. 'मार्क्सवाद शक्य नसेल तिथे गुंडाळून ठेवा,' 'पोथीबद्ध मार्क्सवाद कुचकामाचा आहे,' 'पाश्चिमात्य संस्कृतीला जवळ करण्यात वाईट काहीच नाही' ह्या नवीन घोषणा आज चीनमध्ये आढळतात अगदी कम्युनिस्ट पॉलिसी राबवणाऱ्या कम्युनिस्ट पार्टीकडून देण्यात येत आहेत नव्हे, त्या तशा अंमलात आणताना आज दिसत आहेत. खाजगी शेतं फुलू लागली आहेत. तिथला माल खुल्या बाजारात येऊ लागला आहे. खाजगी दुकानं, खाजगी कारखाने सुरू होता-हेत. पाश्चात्त्य देशातून अनेकविध वस्तू, तंत्रज्ञान आयात होत आहे दालिआन् सारखं कोरियन सामुद्रधुनीलगतच शहर अत्याधुनिक औद्योगिक शहर निव्वळ पाश्चात्त्य गुंतवणुकीवर उभं राहत आहे......

आणि तरीही चीनच ठाम मत आहे, की चीनन मार्क्सवादाचा त्याग केलेला नाही पोथीनिष्ठ मार्क्सवाद चीनन गुंडाळून ठेवला यात वाद नाही कारण तो मुळातच चिनी प्रकृतीशी मिळताजुळता नव्हता चीनवर रशियन साम्राज्यशाहीन तो लादलेला होता. आणि तरीही आजच्या बदलत्या काळात देखील मार्क्सवादाची काही तत्त्वे चीनला हवी आहेत. कडवेपणा हवा आहे. कठोर शिस्त हवी आहे समाजवाद हवा आहे. तेवढा मार्क्सवाद नियंत्रणाच्या दृष्टीनं चीन

रावबीलही ! बाकी चीन कुठल्याही 'इझम्'कडे झुकायला तयार नाही. चिनी सत्ताधाऱ्याना आज रस आहे फक्त चीनच्या स्वार्थात. बाकी कशातही नाही त्यासाठी त्याना बदल हवा आहे. तडजोड हवी आहे. कशाशीही फक्त चिनी स्वार्थ सोडून !

शाघायच्या हॉस्टेलसवरून हे सार आठवल. मी बोलत राहिलो; पण खरी गमत मला दुसरीच सागायचीय. आपण भारतात किंवा इतरत्रही, 'चायनीच डिशेस' म्हणून आनंदाने मिटक्या मारत अनेक पदार्थ आवडीने खातो. मला प्रयत्न करूनही खुद्द चीनमध्ये मात्र तसे पदार्थ कुठे मिळालेच नाही. आपल्याकडच्या 'चिनी' हॉटेलातन चिनी जेवणाविषयी काही वेगळीच कल्पना मनात साकार होते. चिनी लोकाच जेवण मात्र तस मुळीच नाही अगदीच साध साध आहे...

शाघायमधल मला आवडलेल आणखी एक ठिकाण म्हणजे फुदान युनिव्हर्सिटी व तिथला प्राचीन भारतीय सस्कृतीवरील ग्रंथाचा साठा! निदान तो धुडाळून भारतात आणण्यासाठी तरी मला पुन्हा शाघायला जायला मिळाल तर...? ? तिथ आज चायना एन्सायक्लोपिडीयाचे काम चालू आहे.

शाघायमधला आणखी एक विलोभनीय स्पॉट म्हणजे हॅम्पू आणि यागत्सी नद्याचा सगम. शाघायपासून तीन तासाच्या अतरावरच हे स्थान विहगम तर आहेच पण अनेकाच श्रद्धास्थानही आहे...

## निरोप घेण्यापूर्वी

शाघायहून हॉंगकॉंगकडे विमान झेपावू लागल आणि मी सहलीच सिंहावलोकन सुरू केलं. दोन प्रश्नाची उत्तर मी बेइजिंग–नानजिंग–शाघाय भटकतीत शोधायचा प्रयत्न केला अनेकाशी बोललोही. उत्तरही शोधली, सापडली हे दोन्ही प्रश्न भारताच्याही जिव्हाळ्याचे आहेत.

एक म्हणजे प्रचड लोकसख्या व वाढत दारिद्र्य दारिद्र्याच्या प्रश्नावर तर चीनन प्रहार करायला सुरुवात केली आहेच. आधुनिकीकरणाला चीन सामोरा जात आहे. मिळेल तिथून तत्रज्ञान आयात करून औद्योगिक आर्थिक विकासाचा चग चीनन बाधला आहे १९९५ पर्यंत कोरिया, तैवान, हॉंगकॉंग, सिंगापूर, जपान ह्या राष्ट्राच्या बरोबरीन आपला विकास साधायचा ध्यास सध्या चीननं घेतला आहे गेल्या सात–आठ वर्षातील झेप पाहता हे चीन करूनही दाखवेल अस वाटू लागल आहे. चीनन हे साधल तर आतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतालाही प्रचड स्पर्धेला तोड द्याव लागणार आहे. भारतालाही सावधगिरीचा इशारा चीनच्या ह्या घोडदौडीत आहे.

ह्या बाबत चीनमध्ये आम्हाला आलेला एक अनुभव सागावासा वाटतो. शाघाय विमानतळावरून येताना एका रस्त्याच काम सुरू होत. साहजिकच ठिकठिकाणी खड्डे होते. पोल पडलेले होते. इतर सामान विखुरल होतं. जुलै ८६ ची गोष्ट. सहज विचारल हे काम कधी पूर्ण होणार ? कामावरची पाटी वाचून गाईडन सागितलं सप्टेंबर अखेर भारतातल्या अनुभवावरून हे एक दिवास्वप्नच वाटल पण गाईडच पुढचं वक्तव्य ऐकताच जाणवल तो म्हणतो त्यात तथ्य आहे. गाईड सांगत होता.' सप्टेंबर ८६ मध्ये हे काम पूर्ण व्हायलाच हवं. कन्त्राटच तस आहे. मनुष्यबळ व काम ह्याच गणित घालून काम पूर्ण करण्याची तारीख ठरवली जाते. त्याआधी काम पूर्ण झाल तर बक्षिस मिळतं. म्हणजे उरलेल्या दिवसाइतका जादा पगार बोनस म्हणून मिळतो. ठरलेल्या वेळी झालं तर योग्य पगार मिळतो. उशीर झाला तर लाबलेल्या प्रत्येक दिवसामागे पगार तर मिळतच नाही; पण दड मात्र ठोठावला जातो भारतात परतल्यावर कळलं ठरलेल्या तारखेआधीच काम पूर्ण झाल कम्युनिझममधल्या निग्रहीपणाची ही फळ मानायची का ? असतीलही, पण त्याचमुळे मला असं वाटतं की दारिद्र्यावर चीन मात करू शकेल. मार्क्सवाद म्हणूनच मला वाटत चीन पूर्णपणे झुगारून देऊ इच्छीत नाही

आणखी एक चिनी निग्रहाचा नमुना मला इथे सागावासा वाटतो. स्टेशनवर हमालाना, टॅक्सी–रिक्षावाल्याना, हॉटेल बॉयना किंवा इतर तत्सम लोकाना कुणी टीप देणे किंवा टीप घेणे हा प्रकार अपमानास्पद वाटतो. हाही अलीकडचा, म्हणजे कम्युनिस्ट चीनमधला बदल. राष्ट्र उभारणीच्या प्रयत्नातला आणि अशी टीप घ्यायला चिनी माणूस निग्रहान टाळतो. आमचा गाईड, तिथले प्राध्यापक, कॉम्युन्समधले प्रमुख, इत्यादीसाठी काही भेटवस्तू आम्ही भारतातून नेल्या होत्या. त्याही त्याना स्वीकारायला लावण आम्हाला अत्यत जड गेलं. हॉटेलातले शिपाई–मुल, टॅक्सी ड्रायव्हर वगैरेंनी तर टिप्स चक्क नाकारल्याच !

ह्याच निग्रहाच्या जोरावर चीन आज लोकसख्येच्या प्रश्नावर झगडत आहे. भारतात आमची घोषणा आहे, 'हम दो हमारे दो.' आणि तरीही अल्पसख्याकाचा त्याला भारतात विरोध आहे. चीन मधली घोषणा आहे 'One child family ! – एक मूल कुटुब !' आणि त्यात कुणालाही सुटका नाही. अगदी मुसलमानाना किंवा ख्रिश्चनानादेखील. कारण तो राष्ट्रीय प्रश्न आहे आणि अशावेळी देशातल्या अल्पसख्याकासह सर्वांना एक कायदा लागू केला जातो. ह्यामुळे आज तरी चीनची लोकसख्या वाढ १९६५ च्या २८४ टक्के वरून १०.८ टक्क्यापर्यंत खाली आली आहे. इ स. २००० पर्यंत ही टक्केवारी शून्यावर आणण्याचा चीनचा मानस आहे. 'एकच मूल कुटुब' कल्पनेचा काटेकोर अवलब झाला तर हे शक्य होऊ शकेल अस चिनी तज्ज्ञाच मत आहे. चीन कदाचित हे उद्दिष्ट पार पाडू शकेलही. पण डॉक्टर ह्या नात्यानं मला एक फार मोठा धोका ह्यात दिसतो. एकच मूल व नतर स्टरीलाईझेशन. दुर्दैवाने ते मूल वा पिढी कमजोर निपजली, तर ? मूल दगावली तर ? मला वाटत हा धोका चीननं ओळखला आहे आणि म्हणूनच मुलाची अत्यत काळजी घ्यायचे प्रयत्न चीन कसोशीन करीत आहे त्याच्या शिक्षणाची काळजी घेत आहे. त्याच राहणीमान वाढाव म्हणून झटत आहे. लहान मुलाच्या शाळाना बेइजिंगमध्ये भेटी दिल्या तेव्हा हे वारंवार जाणवल.

दुसरा एक धोका मला जाणवतो तो म्हणजे एक मूल झाल्यानंतर निर्धोक झालेल्या तरुण–तरुणीच्या स्वैराचाराचा. कदाचित तोही धोका चीननं ओळखला असावा. कारण आजच तिथे डिस्को सस्कृती मूळ धरू लागली आहे कम्युनिझमचा निग्रहीपणा हा त्यावरही एक उपाय ठरू शकतो का ? मला वाटतं, नाही. चीनन त्यासाठी दुसरे मार्ग शोधले असावेत. त्यासाठीच कदाचित तीन पिढ्याच्या एकत्र कुटुब पद्धतीला चिनी प्रशासन आज प्रोत्साहित करीत आहे. लामाना

बोलावून धार्मिक संस्थाचं पुनरुज्जीवन करायचा प्रयत्न करीत आहे. या दोन सस्थात तरुण-तरुणींच्या स्वैराचाराला पायबंद घालण्याचं सामर्थ्य पूर्वी असायचं बदलत्या काळात कुणी काय सागावं? काही का असेना, चीन चिनी निग्रहान शून्य प्रतिशत लोकसंख्या वाढीच २००० सालापर्यंत उद्दिष्ट गाठण्यासाठी कटिबद्ध झाला आहे. त्यातले सगळे धोके पत्करूनही!...

दुसरा प्रश्न भारत चीन सीमारेषेचा. अनेक सामान्य लोकाशी मी बोललो. सुशिक्षिताशीही बोललो. आपल्या इतक्या, सर्वसामान्य चिनी जनतेच्या ह्या विषयावरल्या प्रतिक्रिया तितक्याशा भावना-प्रधान मला वाटल्याच नाहीत. बहुतेकाना ह्या प्रश्नाची धड जाणीवही दिसली नाही. ह्या उलट चिनी जनतेची, तिथल्या प्रशासनाचीही भारताशी सास्कृतिक देवाण-घेवाण पुन्हा सुरू व्हावी, वाढावी अशी मनापासून इच्छा मला जाणवली. त्या सधीचा आपण फायदा उचलावा असं मला वाटतं. पंचवीसशे वर्षांचे ऋणानुबंध पुन्हा जागृत करण्याआड गेल्या पंचवीस वर्षांतला संघर्षाचा काळ येऊ देऊ नये असं वाटतं. ह्या सास्कृतिक देवाण-घेवाणीतूनच सबध सुधारतील आणि सुधारलेल्या सबधाच्या काळात सीमारेषेसारखे प्रश्न परस्पर एखाद वेळेला सहज सुटूनही जातील-आज तैवान, हाँगकाँग हे प्रश्न चीनच्या दृष्टीने असेच सुटण्याच्या अवस्थेत आले आहेत...

◻

हाँगकाँगहून भारताकडे आम्ही परत निघालो. विचार चालूच होते. चीन-भारत प्रश्नामध्ये खूपच साम्य आहे. प्रश्न, समस्या सारख्याच आहेत. चीन एकेक प्रश्न सोडवत पुढे जातो. भारत एकेका प्रश्नात गुतत चालला आहे. सीमा प्रश्न, सीमेवरील प्रांतातल्या गडबडी, शेजारी राष्ट्राबरोबरचे कलह-एक ना अनेक. त्याला साथ देताहेत अल्पसख्याकाचे प्रश्न. चीनमध्ये १९४९ मध्ये हान पथियांची सख्या ९३% होती. अल्पसख्याक होते ७%. १९८२ च्या जनगणनेनुसारही हे प्रमाण ९३ आणि ७ टक्के एवढच राखल गेल. तिथेही कुटुब नियोजनाचा अवलब केला गेला. तिथल्या अल्पसंख्याकात मुसलमान, ख्रिश्चन आहेतच-भारतात मात्र असं घडल नाही. हिंदू ८० टक्के वरून ७५ टक्के वर आले...राष्ट्रवादासाठी चीनन रशियाला सोडचिठ्ठी दिली. आज मार्क्सवादाची झापडं चीन दूर करतो आहे. एकत्र कुटुब सस्था पुनरुज्जीवित करतो आहे. धर्मसंस्था पुन:-प्रस्थापित होताहेत आपल्याकडे मात्र समाजव्यवस्था पोखरण्याचेच प्रयत्न अधिक आहेत. राष्ट्रपौरुषाचं निर्माण करण्याची दृष्टी कुठेच आढळत नाही. आमचा समाज, आमचा बुद्धिजीवी वर्ग, राष्ट्रवादी कुणीच ह्याची खंत बाळगत नाही. फक्त सत्ता आणि भ्रष्टाचारच डोळ्यासमोर ठेवून वावरत राहणाऱ्या राजकारण्याना तर ह्या कशात काही स्वारस्यच नाही. खुर्ची टिकवण्यात, गेलेली मिळवण्यात, दुसऱ्याला मिळालेली ओढण्यातच त्याचा सारा वेळ जात आहे. खऱ्याखुऱ्या राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नाकडे लक्ष द्यायला त्याना वेळच कुठे आहे?...

◻

# युद्धस्य कथा रम्याः।

**● रंगा मराठे ●**

महाभारतापासून ते दुसऱ्या महायुद्धापर्यंतच्या कथा वाचताना आपण त्यात रममाण होतो अगावर रोमाच उभे राहतात. जे युद्ध भेसूर, भयानक, क्रूर असत त्या युद्धाच्या कालखंडातील कथा रम्य आणि चिरकालीन ठरतात. महाभारतातील कौरव-पाडवाच कुरुक्षेत्रावर झालेल घनघोर युद्ध. त्या युद्धाच्या पार्श्वभूमीवरच भगवान श्रीकृष्णान अर्जुनाला सागितलेल्या महान् तत्त्वज्ञानाचा-भगवद्गीतेचा जन्म झाला. विसाव्या शतकात झालेल्या पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धावर शेकड्याने ग्रथ, चित्रपट, नाटकं लिहिली गेली. सत्तेचा सघर्ष हे कुठल्याही युद्धाचं मूलभूत कारण असतं. विनाश आणि उत्पत्ती हे सृष्टीचं चक्र अखड चालूच असतं.

दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेनं हिरोशिमा आणि नागासाकी या दोन जपानी शहरावर अणुबॉंब टाकून क्रूर विध्वसाची परमावधी गाठली. त्यानतर दुसरे महायुद्ध समाप्त होईपर्यंत श्री बापट याना व्हिएटनाममधील हॅमाँहे येथे साडेतीन वर्षे जपान्याचे युद्धकैदी म्हणून राहावे लागले. या कालावधीतील म्हणजे फेब्रुवारी १९४२ ते ऑगस्ट १९४५ या कालावधीतील आठवणी श्री. बापट यानी 'मी एक युद्धकैदी' या आत्मकहाणीत ग्रथित केल्या आहेत बेचिराख झालेला देश राखेतून फिनिक्स पक्ष्यासारखा पुन्हा जागृत होतो. तुरुगातूनच पुन्हा राष्ट्र जागृत होते. कारावासाच्या भिंती बोलू लागतात. त्यातूनच पुन्हा नवचैतन्य जागृत होत. अजरामर राष्ट्राला चिरतन स्फूर्ती देणारी काव्य, वाङ्मयही इथंच जन्माला येतं. पुण्याच्या दैनिक काळचे सपादक असताना व्हाइसरॉय कमिशन मिळवून 'रॉयल इडियन आर्मी सप्लाय कोर' या लष्करी पुरवठा विभागात अधिकारी म्हणून भरती झालेल्या श्री. भालचद्र गोपाळ बापट यानी सुविद्य, सुसस्कृत मनान आपला तोल ढळू न देता अलिप्तपणानं युद्धकैद्याच्या बदिवासातील जे जीवन अनुभवल, त्याहाळल त्याचा तपशीलवार आलेख 'मी एक युद्धकैदी' या पुस्तकात करण्यात आला आहे

सध्याचा काळ सगणकाचा आहे. या यत्राच वैशिष्टय असं की ते हजारो-लाखो माहितीकणाची (Computer Data) नोद ठेवू शकते व Computer च्या भाषेत आज्ञा दिल्यावर त्यातल्या हव्या त्या माहितीकणाची-क्षणाची जोड, परस्परपूरकता, योग्यायोग्यता, गुणाकार-भागाकार अशी अनत प्रकारची गणिती सूत्रे हाताळून त्याची उत्तरे, पडताळे क्षणार्धात देऊ शकते. यातील पहिले काम म्हणजे Computer Data Collection चे श्री. बापट यानी यांत्रिकपणाने पण अत्यत चोखपणे पार पाडले आहे व

त्यापुढील भाग म्हणजे मानवी जीवनाच्या स्पदनाचे, हर्ष-दु.खाचे, राग-लोभाचे, हळव्या-कठोर अनुभवाचे काम त्यानी वाचकावर सोडून दिले आहे. Computer पेक्षाही श्रेष्ठ असलेल्या मानवी मनाला हे काम अवघड आहे. वाचकाला तर हे फारच अवघड काम आहे. सूक्ष्म जत्री व बारकावे यामुळे वाचकाच्या मनात ठिणगी पडू शकत नाही. ती पडते फक्त लेखकाच्या चैतन्यशील स्पदनातून; जे स्पदन बापटाच्या लिखाणात जाणवत नाही.

युद्ध कैदी म्हणून या कालखडात श्री बापट यानी अविचल निष्ठेने आणि प्रामाणिकपणे दररोज न विसरता डायरी लिहिली आहे. या आपल्या रोजनिशीत सारे तपशील बारकाव्याने टिपून ठेवले असल्यामुळे त्या बरहुकूमच पुस्तक तयार झाल असाव असं दिसत. दिसलेल्या साऱ्या कथावस्तूची व प्रसगाची जत्री लेखकान अत्यत सरळ मनाने नोदवली आहे ही वस्तूंची, माणसाची, प्रसंगाची बारकाव्यानं केलेली नोंद या प्रदीर्घ प्रवासात वाचकाला अनेकदा हैराण करून सोडते. गीतेत सागितलेला निष्काम कर्मयोग पदोपदी आठवतो व कुठल्याही फळाची अपेक्षा न करता वाचक या वाळवटातून प्रवास करीत रहातो. घशाला कोरड पडली तर त्याला पाणीही सापडत नाही. झरा तर मुळीच नाही.

पिंडे पिंडे मतिर्भिन्ना या उक्तीचा उच्चार श्री. बापट अनेकदा करतात. अर्थात त्यातून तेही सुटलेले दिसत नाहीत. पुस्तकात दिल्या गेलेल्या नोदीचा-तपशिलाचा-डॉक्युमेंटेशनचा अनावश्यक विस्तृत बारकाव्याचा भाग वाचताना दमछाक होते. मधूनमधून लेखकाचे आत्मगत अनुभवाचे उल्लेख येतात. लग्नाचे वाढदिवस व ते युद्धकैद्याच्या चमत्कारिक अवस्थेत साजरे करणे, मन शातीसाठी गीतापाठ व स्तोत्रे म्हणणे, रागावणे, लोभावणे, आश्चर्यचकित होणे, रडू येणे या आठवणी सातत्याने, निर्विकारपणे नोदलेल्या आढळतात.

### अनावश्यक नोंदी

कैद्याचे जीवन हे एकदरीत तोटयाचे आहे. तुरुगात जाऊन तेथील कामे करीत कैदेचे दिवस काढायचे, यात पुरुषार्थ आहे असे नाही असे बापट म्हणतात. जगातल्या व्यवहारात सुष्टापेक्षा दुष्टाशी सबध अधिक येत असतो असेही बापट म्हणतात. या दोन्ही विधानाचा विचार केला तर असं वाटत की बापट यानी आपले कैदेतील जीवन तटस्थपणे सेवावृत्तीनं घालविलं अस म्हटल तर काही क्षुल्लक गोष्टींच्या नोदी अनावश्यक वाटू लागतात. त्यातल्या काही नमुन्यादाखल खाली दिल्या आहेत :

दि. ६-६-१९४३ : जमादार बॅनर्जीनं पायाला बॅंडेज बाधलं. गरम पाण्यान डावा दड रात्री थोडा वेळ शेकला. रात्री त्रास बराच झाला. मनस्ताप नाहीसा झाला. माझा मीच एकटा असे फार फार वाटू लागले आहे

दि. ७-६-१९४३ : सकाळी हॉस्पिटलमध्ये जाऊन बॅंडेज बाधले. पाठीला काहीच औषध नाही. दुपारी फारच दुखू लागल्या मुळे सुट्टीच्या वेळी खडीवरच दहा मिनिटे पडलो. कँपात परत येताच धुवाधार पाऊस सुरू. विजाचा चमचमाट होताच. आज सर्वांना अँटी-डिसेन्ट्री इजेक्शन दिले

दि. १२-६-४३. आज फार मोठी वाईट गोष्ट झाली. या घटनेची फलश्रुती अशुभ आहे हे निश्चित. ह्याची अशुभता किती हे येथे बसून सागता येत नाही, अगर अदाजही करता येत नाही. ही अशुभ घटना म्हणजे माझ्या पत्नीने दिलेले मनगटी घड्याळ आज दुपारी खिशातून खाली पडले. मी तेव्हा तसेच खिशात परत ठेवले नतर सायंकाळी विशवरनाथ ( घड्याळ दुरुस्ती करणारा ) याला दाखवले. त्याने उघडून पाहिले व सागितले 'स्प्रिंग सिलेंडर तुटला आहे' परत हिंदुस्थानात गेल्यावरच त्याची दुरुस्ती शक्य आहे हॅनॉईला धाडले तर १०-१२ पियासारला (स्थानिक चलन) दुरुस्त होईल. पण ते चागले नाही माझ्या पत्नीने हे टिसट ( Tissot ) घड्याळ २४-४-१९४१ रोजी दिले. आज १२-६-४३ रोजी म्हणजे २ वर्षे १ महिना २० दिवसानी ते निरुपयोगी झाले. सिंगापूरचा युद्धातही ते मी साभाळले व आज ते पडून नादुरुस्त व्हावे, फुटावे खरोखरच मला फार दु ख होत आहे. हे घड्याळ आज दुपारी १२ वाजून ५१ मिनिटे १६ सेकदानी बद पडले.

१३-६-४३ दोन्ही वेळा कामाला बाहेर. हल्ली काही दिवस बेचैन आहे त्यात काल घड्याळ फुटले. आज बाहेर १२ केळी एकटयाने खाल्ली. हल्ली मी चष्मा, टोपी वापरत नाही खूप कडक उन्ह असते. खूप वेंधळेपणा वाढला आहे. खूप चमत्कारिक वाटते.'

वर निर्देश केलेल्या अनेक नोदी लेखकाने अत्यत प्रामाणिकपणे केल्या असल्या तरी सुद्धा त्या वाचकाच्या मनाचा ठाव घेऊ शकत नाहीत. उलट ठायी, ठायी अनावश्यक गोष्टीची रेलचेल असल्यान वाचकाला पुढे सरकता सरकता हैराण झाल्यासारखे वाटते. तरी सुद्धा हॅनॉईजवळच्या विमानतळानजीकच्या युद्धकैदी छावणीत तिथल्या तीनशे कैद्याचा वागणुकीतून मत्सर, भाडणे, चोऱ्यामाऱ्या, अंत.कलह, मनमानीपणा, वखवख या मानवी स्वभावाच्या अनेक पैलूचे दर्शन खडकाळ प्रदेशात उगवलेल्या अकुरासारखे जागोजाग होते हे नाकारता येणार नाही.


निलगिरीची शेती

दुसरी आवृत्ती
प्रसिद्ध झाली

किं. रुपये पंधरा

लेखक
विनायक पाटील

राजहंस प्रकाशन
पुणे ३०

## हादरवणारे प्रसंग

या आठवणींच्या उत्तरार्धात अमेरिकन विमानांच्या बाँबफेकी वाढल्यानंतर मन हादरविणारे अनेक प्रसंग भेटतात, सामोरे येतात. स्थानिक अनाथ मजूर माणसांतील एका तरुण बाईला, तिनं तलावातले पाणी परवानगी न घेता प्यायल्याबद्दल देखरेखी-वरच्या जपानी शिपायानं तिथल्या तिथं बडवून मारणे, एक हिंदी कैदी बाँब हल्ल्यात मृत्यू पावल्यावर त्याला लष्करी सन्मानानं जाळण्यासाठी त्याच्या प्रेताशेजारी एकत्र करून ठेवलेले त्याचे कपडे दुसऱ्या हिंदुस्थानी युद्ध-कैद्याने चोरणे, मनाई असलेल्या पण ती माहीत नसलेल्या दोघा जपानी शिपा-यांनी आपल्या वरिष्ठांपुढे आपण मृत्युदंड देण्यायोग्य गुन्हा केल्याचा ठाम कबुली जबाब देणे, युद्धाची प्रखरता वाढल्यावर अन्नटंचाई, अपुरी मजुरी आणि विलक्षण महागाई यामुळे भुकेनं व्याकुळ होऊन रस्त्यातच ठिकठिकाणी पडलेले मुडदे आणि लोकांनी त्यांच्याकडे ढुंकूनही न पाहता आपापले उद्योग करणे. चोरलेल्या फळांची, तांदुळांची विक्री करणे वगैरे अनेक प्रसंग वाचकाला अस्वस्थ करणारे आहेत श्री. बापटांनी ते अगदी तटस्थ वृत्तीने टिपले आहेत. आजूबाजूला हे सारं घडत असताना स्वतःच्या लग्नाच्या वाढदिवशी उपवास करणाऱ्या, कधी अतिव्याकुळतेनं डोळ्यात पाणी येणाऱ्या साहेबाकडून येणाऱ्या २३ डॉलरची काळजी करणाऱ्या कैदी लेखकानं हे सारं आपल्या रोजनिशीत लिहून ठेवावं हा एक कर्मयोगच म्हणायचा.


श्री. बापट यांचे युद्ध कैद्याचे सारे अनुभव वाचताना असं जागोजाग वाटतं की या विपुल अनुभवांवर मानवी मनाच्या व समूहाच्या भीषण तांडव नृत्यावर, प्रसंगावर लालित्याचा संस्कार झाला असता किंवा मार्गदर्शन झालं असतं तर हे अनुभव फारच मोठ्या उंचीला जाऊन पोचले असते.

पुस्तक संपल्यानंतर तीनशे हिंदुस्थानी कैद्यांचं साडेतीन वर्षांतलं हे जग त्याहून खूपच मोठ्या, तुमच्या–आमच्या आजच्या जगाचा, वास्तवतेचा, आजूबाजूला घडणाऱ्या परिस्थितीचा एक संक्षिप्त भागच आहे. फक्त हे तीनशेजण युद्धकैदी होते व त्यावर जपानी शिपायांची देखरेख होती. हे युद्ध-कैदी जीवन एक लहानसे (miniecharised) जगच आहे. आजच्या वास्तवाहून ते फारसं वेगळं नाही. इथेही तथाकथित संस्काराचे, धर्म-जातीचे, पापपुण्याचे, क्रूरतेचे पहारे आहे-तच. हे सारेच जपानी शिपायाइतके क्रूर आणि पाशवी असू शकतात. आहेतही.

श्री. बापट यांच्या सुसंस्कृत मराठी मनाने या साऱ्या घटनांची त्रयस्थपणाने नोंद केली आहे. लेखकाचा अहंभाव, आंधळी पारं-परिकता, त्यांना लाभलेल्या सोई-सवलती व सुख-समाधान या आजूबाजूच्या वातावरणात विरघळून न गेल्यानं हे सारं चित्रण वस्तु-निष्ठ व सापेक्ष असं वाटतं. □

मी एक युद्धकैदी
लेखक : भा. गो. बापट
विश्वमोहिनी, पुस्तक ९७
मूल्य : रु. ५०–००


नवी मुंबई
बंदरापलिकडील नवे योजनाबद्ध शहर



नव्या शहराची खास वैशिष्ट्ये
■ आशिया खंडातील सर्वात मोठा नवे शहर प्रकल्प
■ एकूण क्षेत्र ३४४ चौ. किलोमीटर्स
■ अंदाजे लोकसंख्या २० लाख ■ सुरेखित व्यापारी केंद्र
■ लोखंड, पोलाद आणि कृषि उत्पन्ना साठी सुनियोजित घाऊक बाजारपेठा ■ न्हावा येथे खोल पाण्याचे बंदर-बंदराशी निगडीत असलेल्या उद्योगांसाठी तरतूद
■ विस्तृत मध्यवर्ती व्यवहार केंद्र (सी.बी.डी.)
■ कौशल्यपूर्णतेने नियोजित केलेली २० नगरे
■ निवासस्थानांच्या नजिकच्या क्षेत्रात शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, करमणुकीची साधने इत्यादीची उपलब्धता
■ भरपूर मोकळया जागा ■ सुरेखित रस्त्यांचे जाळे
■ पादचारी आणि वाहनांसाठी वेगवेगळे मार्ग
■ सर्व उत्पन्नगटांतील लोकांना परवडतील अशी भाडेखरेदी तत्वावरची घरे
■ शहरात आणि आजुबाजुच्या दुसऱ्या शहरांशी संपर्क सांधणारी स्वतंत्र बससेवा

सिडको
सिटी अँड इंडस्ट्रीअल डेव्हलपमेंट कार्पोरेशन ऑफ महाराष्ट्र
निर्मल, २रा मजला, नरीमन पॉइंट, मुंबई ४०० ०२१ टेलिफोन २३२४२०

# ओनामा

**● श्रीकांत कार्लेकर ●**

बी. जीं. ची बडबड ऐकणं साहेबांना अशक्य होत होतं.

'माझ्या कामांबरोबरच, तुम्ही दिलेलं हे निवेदनही मला वाचायचंय. निवेदन वाचल्याशिवाय त्यावर मी काही बोलू शकत नाही. त्यासाठी मला एकांत हवाय. मी तुम्हाला नंतर बोलावतो. ओके ?'

साहेबांनी मोठ्या हुशारीनं बी. जी. ना बाहेर जायची सूचना केली.

'ओ. के. देन, अॅज यू प्लीज' असं म्हणत बी. जी. बाहेर पडले.

'लहरी हुकूमशाहांचे राज्य टिकते ते त्यांच्या ताकदीवर नसून त्यांना भिऊन राहणाऱ्यांच्या संख्येवर टिकते हे इतिहासाने वारंवार सिद्ध केलेले आहे.

अनेक वेळा सिद्ध झालेल्या या सत्याचा नेमका अर्थ मला समजलेला आहे आणि म्हणूनच असल्या भेकडांच्या जमावात मी सामील होऊ इच्छीत नाही व आपल्या गैरवाजवी हुकूमशाहीस भीक घालीत नाही.

आपण ज्या विषवल्ली जोपासत आहात आणि ज्यांच्यापुढे दिवसातून शंभरवेळा मान तुकवीत आहात, त्यांचा कायमचा नायनाट करून टाकण्याच्या लांब पल्ल्याच्या लढ्यातला एक सैनिक म्हणूनच आपण मला ओळखावे व त्याप्रमाणे वागावे. ही धमकी नव्हे. प्रेमळ विनंती आहे.

यापुढच्या घटनांचा क्रम आपल्या प्रतिक्रियेवरच ठरणार आहे हे लक्षात असावे '

टेबलावर पडलेल्या कागदावर लिहिलेला तो सुवाच्य अक्षरातला मजकूर वाचून साहेब रागानं थरथरू लागले.

'म्हादू, कोणी ठेवला हा कागद इथं ?' ते दारात उभ्या असलेल्या म्हादबावर डाफरले.

'बी. जी. ठेवून गेले सर–'

'ते मलाही कळतंय्! माझ्यासमोर यायचं धाडस नाही म्हणून असली भंपक चिटोरी ठेवून देतात लेकाचे!' साहेबांनी आवाज चढवून म्हटलं. अन् इतक्यात म्हादूला बाजूला ढकलीत खुद्द बी. जी. च आत आले.

'मला तुमच्या याच वाक्याची अपेक्षा होती. अन् तुम्ही ते म्हणावं म्हणूनच मी ते कागदाचं चिटोरं ठेवून दिलं होतं सर–' बी. जी. मिस्किल हसत म्हणाले.

'यू बास्टर्ड–' साहेब खवळले

'वास्तविक हा किताब मी तुम्हाला द्यायला हवा नाही का ? पण ते राहू दे. हा किताब पुन्हा कधीतरी बहाल करीन. कदाचित ह्याहीपेक्षा मोठा किताब मिळण्याचा आपल्या कुंडलीत योग असेल.'

बी. जी. क्षणभर थांबले, अन् भेदरलेल्या साहेबाच्या डोळ्यांत जळजळीत नजरेनं पाहत म्हणाले,

'त्या चिटोऱ्यात जे लिहिलंय ते प्रीटेक्स्ट आहे, मुख्य मजकूर आता देतोय–' असं म्हणून त्यांनी आपलं दोन पानी निवेदन साहेबांच्या पुढ्यात फेकलं.

'तुम्ही मला 'बसा' म्हणाला नाहीत सर. मी ही तुमच्याचसारखा एक सन्मान्य प्राध्यापक आहे.' बी. जी. नी म्हटलं.

'बसा–' साहेब गुरगुरले.

'थँक्यू! आजकाल आपले हक्कसुद्धा असेच मागून घ्यावे लागतात सर. कुणी सुखासुखी दुसऱ्याला मोठेपणा किंवा साधी माणुसकीही देत नाही. अॅम आय राईट ?'

'हे पहा बी. जी. मला आता बरंच काम आहे. आपण थोड्या वेळानं–' साहेब म्हणाले.

'हो चालेल ना. मी इथंच बसून रहतो. अगदी संध्याकाळपर्यंत म्हटलंत तरी.'

'ट्राय टू अंडरस्टँड बी. जी. तुमच्यासमोर मला माझी कामं–' साहेब अडखळले.

'का ? तुम्हाला काही वेडीवाकडी कामं करायचीत ? विद्यापीठातून आलेल्या कुठल्याही येऱ्यागबाळ्याचा फोन, उभं राहून, 'येस सर, येस सर्' म्हणत घ्यायचा ह्या पलीकडे कामं तरी काय आहेत तुम्हाला ?'

बी. जी. या सगळ्यांना चांगलं ओळखून होता. स्वतःच्या हाताखालच्या प्राध्यापकांना चेपून ठेवणारे, अन् स्वतः विद्यापीठातल्या बरबटलेल्या राजकारणात भाग घेऊन तिथं हुजऱ्यासारखं वागणाऱ्या अनेक साहेबांची कारकीर्द त्यानं पाहिली होती. असल्या भेकड अन् मिळमिळीत माणसांची त्याला विलक्षण चीड होती. त्यांच्या अब्रूची लक्तरं वेशीवर टांगणं हाच त्याचा एकमेव उद्देश होता. आणि ही गोष्ट केवळ आपणच करू शकतो याचा त्याला थोडा अहंकारही होता.

अनेक दिवस तो ज्या संधीची वाट पाहत होता ती आज मिळत होती. त्याचं निवेदन वाचून साहेब त्याच्या हातापाया पडणार याची त्याला खात्री होती.

बी. जी. ला. त्या कॉलेजात येऊन जवळजवळ दहा वर्षं झाली होती. त्यापूर्वी तो ज्या कॉलेजात होता तिथंही तो हट्टी, आग्रही अन् अॅग्रेसिव्ह म्हणूनच नावारूपाला आला होता. कदाचित त्यामुळेच या कॉलेजात आपलं मोठं स्वागत होईल असं त्याला वाटत होतं. पण तसं झालं नव्हतं. कारण इथंही बरेचसे विद्वान, साहेबाच्या अन् इतर भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारातले भागीदार होते. त्यांना बी. जी. चं आगमन कसं रुचणार ? ज्यांना तो यावासा वाटत होता त्यांची संख्या इतकी कमी होती की, त्यांनी काही म्हटलं की, 'गांडुळाने फणा उभारला' म्हणून त्यांची संभावना होत होती.

बी. जी. कॉलेजात येऊ नये म्हणून अनेक प्रयत्न झाले. पण तरीही त्याचा काहीही उपयोग न होता बी. जी. कॉलेजात रुजू झाला होता.

दुसऱ्यावर दबाव आणण्याचं त्याचं तंत्रच

मोठं और होतं. वेळेचं बंधन पाळणं, वर्गात पूर्ण वेळ शिकवणं, एवढ्याशा गोष्टीसाठी कॉलेजच्या कार्यालयात स्वतः खेपा घालणं, कागदी घोडे इकडून तिकडे नाचवणं, रजेवर जाण्यापूर्वी रजेचा अर्ज देणं यांसारख्या गोष्टींना त्याच्या लेखी काहीही किंमत नव्हती. या सगळ्या भेकड वृत्तीच्या माणसांनी करायच्या गोष्टी आहेत असं त्याचं सरळ अन् सोपं गणित होतं. स्वभावानं अतिशय मुक्त अन् मोकळा असल्यानं कुठल्याच गोष्टीचं दडपण त्याच्यावर नव्हतं. ह्या माणसाला राग आलेला तर कुणीच पाहिलेलं नव्हतं. न्याय्य गोष्टींसाठी भाडतानाही त्याचा आवाज कधी चढत नव्हता. अतिशय मोकळेपणानं पण तिरकस अन् प्रसंगी लागट बोलून, आपल्याला हवं ते मिळवण्याच्या कलेत तो मोठा वाकबगार होता.



आजपर्यंतच्या अनेक साहेबांना याचा अनुभव होता. तो कॉलेजात रूजू झाला त्यावर्षीचाच प्रसंग. कॉलेजच्या परीक्षा चालू होत्या. इतरांबरोबर बी. जी च्याही वाट्याला सुपरव्हिजनचं काम आलं होतं. साहेब मुख्य पर्यवेक्षक. परीक्षा सुरू झाली तरी बी. जी. चा पत्ता नव्हता. साहेबाचं माथं भडकलं होतं. या माणसाला डोक्यावर बसवणाऱ्या कमिशनला लाखोली वाहत बसलेल्या साहेबाच्या पुढ्यात हे महाशय पंधरा मिनिटं उशिरा उपस्थित झाले.

'सर, मी कुठल्या वर्गावर जायचं ?'

'मिस्टर बी. जी. ही काय वेळ आहे सुपरव्हिजनला यायची ? तुम्हाला कर्तव्य म्हणून काही कळतं की नाही ? नॉन्सेन्स–' साहेब ओरडले.

'सर, तुम्हाला कारण हवंय ?'

'ऑफ कोर्स–'

'एक की दोन ?'

'म्हणजे ?'

'कारण त्याला दोन कारणं आहेत.'

'बडबड नको. लौकर बोला.'

'खरी कारणं की खोटी कारणं ?'

'व्हाट डू यू मीन ?'

'नाही, म्हणजे लाचार होऊन रडत भेकत विनवण्या करीत सांगितलेली खोटी कारणं हवीत की ताठ मानेनं सांगितलेली खरी ?'

'डोंट बी स्मार्ट– काय ते सांगा अन् कामाला लागा–' साहेब वैतागले.

'सर, खरं म्हणजे सीनिअर सुपरवायझर तुम्ही असल्यामुळे मला यावंसंच वाटत नव्हतं अन् दुसरं म्हणजे सुपरव्हिजन यावर माझा विश्वासच नाही–'

'हे पहा बी. जी.–' असं म्हणत साहेब उठू लागले.

'बसा. उठू नका. माझं उत्तर अजून संपलेलं नाही. समजा मी कॉपी पकडून एखाद्याला धरून आणलं तर पुढची ॲक्शन घेण्याची हिंमत आहे तुमच्यात ? मागच्या वर्षी त्या ज्युनिअर सुपरवायझरने एक कॉपी पकडली, अन् असले उद्योग करीत जाऊ नका म्हणून तुम्ही त्यालाच दम भरलात–'

'तुम्हाला कुणी सांगितलं ?'

'त्याच्याशी तुम्हाला काय करायचंय ?'

'गो टू रूम नंबर फोर–' साहेबानं फर्मावलं.

बी. जी. ला तिथून गेलेला साहेबानं पाहिलं. पण तो वर्गावर गेला असेलच याची खात्री नसल्यामुळं, तसं असलं तर 'फायर' करायची अजून एक संधी मिळेल असा विचार करून साहेबांनी थोड्या वेळानं रूम नंबर फोरकडे मोर्चा वळवला.

मागच्या दरवाज्यातून साहेब वर्गात गेले. वर्गातली मुलं पेपर लिहीत होती. प्रत्येकाच्या उत्तरपत्रिकेवर बी. जी. ची सही व तारीख होती. पण वर्गात बी. जी. नव्हते. मांजराच्या चालीनं चालत साहेब पुढच्या दरवाज्यातून बाहेर पडले.

व्हरांड्यातल्या रेलिंगला टेकून बी. जी. वर्गात पाहत होता. साहेब त्याच्याजवळ आले.

'आर यू सुपरवायजिंग ?'

'येस सर–'

'इथून ?'

'येस सर ! टेलिस्कोपिक सुपरव्हिजन–' हे तो एवढ्या मोठ्यानं म्हणाला की सगळ्या वर्गानं ते ऐकलं अन् सगळीकडे एकच हशा पिकला.

खजील झालेले साहेब मुकाट्याने चालू लागले

हा असा थाट ! वरिष्ठांचा विशेषतः भ्रष्ट अन् भेकड वरिष्ठांचा अपमान करण्याची एकही संधी त्यानं वाया घालवली नव्हती. निदान या नाचक्कीमुळं तरी ही माणसं सरळ वागतील असा त्याचा विश्वास

होता. आपली ही वागण्याची तऱ्हा हाच एक जबरदस्त अंकुश आहे याबद्दल त्याला विलक्षण खात्री होती.

बी. जी. च्या या वागण्यामुळे त्याचं अस्तित्व साऱ्यानाच नाही म्हटल तरी दुःखदायक वाटायच. अतिशय प्रसन्न, मनमोकळ अन् उमदं व्यक्तिमत्त्व लाभलेला बी. जी. विद्यार्थ्यांच्यात मात्र खूपच प्रिय होता.

त्यान वर्गात शिकवताना तस फारस मन लावून काही शिकवल नाही. पण एकूण शिकवण्याचा थाटच असा जिवत असायचा की मूळ विषय सोडून वाटेल ते त्यान सागितल तरी मुलाना ते आवडायच.

मुलामुलीनी प्रेमविवाह करावा, शक्यतो आतरजातीय करावा, सासूसासऱ्याना लग्नानतर काडीचीही किंमत देऊ नये, पाहुण्याना घरात प्रवेश देऊ नये, देवधर्म सब झूठ है, असे बडखोरीचे विचार मुलाच्या मनावर ठसविण्यासाठी तो आटोकाट प्रयत्न करायचा. वर्षानुवर्षे घर, पाहुणे, सासूसासरे, त्याचे मानअपमान यात पिचून जाणाऱ्या मध्यमवर्गीय कुटुंबातून आलेल्या मुलामुलीना या विचाराच प्रचंड आकर्षण वाटायच. त्यामुळे त्याच्या शिकवण्यापेक्षा इतर गोष्टी ऐकण्यासाठीच वर्गात गर्दी व्हायची.

'व्हॉट इज ए सर्कल? कॅन यू डिफाईन?' असा प्रश्न करून अन् आलेल्या उत्तराची अजिबात दखल न घेता थोडया वेळानं उत्तर द्यायचा, 'सर्कल इज ए सर्कल जिकड सरकल तिकडं सरकल–' सगळी मुलं असली शाब्दिक कसरत बघून जाम खूष व्हायची.

बी. जी. ची विद्यार्थिप्रियता हेही अनेकाच्या असूयेच एक कारण होत त्याच्या देखणेपणामुळे आकर्षित झालेल्या अनेक विद्यार्थिनीचाही त्याच्याभावती सारखा घोळका असायचा त्यामुळेही अनेकाना त्याचा मत्सर वाटायचा. हे त्याला कळत होतं अन् म्हणून मुद्दामच मुलीशी तो तासन्तास गप्पा मारीत बसायचा.

प्रस्थापित गोष्टीविरुद्ध बड, नासक्या अन् सडलेल्या विचारसरणीला विरोध, धीट अन् आग्रही विचार यामुळे बी. जी. चा सर्वत्र दरारा होता. याची त्यालाही पूर्ण कल्पना होती. त्यामुळेच नकळत त्याच्या स्वभावात अहकाराच बीज रुजल होतं.

आपल्या आजूबाजूला असणारी सरळमार्गी माणस भित्री होती अन् भ्रष्ट माणसाना शभर हत्तीच बळ होत ही माणस नमवण हेच आपल ध्येय आहे अन् आपल्याशिवाय ते कोणी करू शकत नाही याविषयी त्याला दिवसेंदिवस अधिकच विश्वास वाटत होता.

त्याचा अॅग्रेसिव्ह स्वभाव हेच त्याच बळ होत कुठल्याही सिच्युएशनची कायदेशीर बाजू तपासून मगच त्यावर काही भाष्य करावं, कृती करावी हे त्याच्या लक्षातच येत नव्हतं अन् तो अशा गोष्टीना फारशी किंमतही देत नव्हता.

त्याच्या ह्या स्वभावाचा कॉलेज मॅनेजमेंटने भरपूर वापर करून घेतला होता. जिथ डोक्याची फारशी गरज नव्हती अशी काही खाती त्याला कॉलेजन साभाळायला दिली होती तीसुद्धा ती खाती आपल्या विशिष्ट पद्धतीनं साभाळीत होता

पण ही खाती साभाळताना आताच्या प्रसगाइतका अपमानकारक प्रसग एकदाही त्याच्या वाट्याला आला नव्हता.

श्रमदानाच्या एका कार्यक्रमाच सयोजन करण्याची जबाबदारी त्याच्यावर टाकण्यात आली. त्यानं नेहमीच्या पद्धतीनं उत्साही मुलाचा गट जमवला अन् श्रमदान कुठं करायच, केव्हा करायच वगैरे सर्व त्याना समजावून सागितलं. यापेक्षा जास्त काही करायची त्याला गरज वाटली नाही. कारण विद्यार्थ्यांवर त्याचा प्रचड विश्वास होता अन् आपल्या शब्दाखातर ते काहीही करतील याची त्याला खात्री होती.

आणि श्रमदानाच्या कार्यक्रमाच्या आदल्या दिवशी रात्री त्याच घर शोधीत कॉलेजच्या मॅनेजमेंटची काही मंडळी हजर झाली. त्याला थोडं आश्चर्यच वाटलं आपल्याशी बोलायलाही नाखूष असणारी ही मडळी, अशी तोंड वेंगाडून आपल्याकडे का येत असावीत याचा त्याला अदाज करता येत नव्हता.

'या. बसा, – इतक्या रात्री– ?' तो पुटपुटला.

'सागतो. तुमचं सहकार्य मिळेल अशी खात्री असल्यामुळेच इथपर्यंत आलो–'

त्या मंडळीचा अध्वर्यू लाचार हसत म्हणाला.

'मुद्द्याच बोला' बी. जी. नं फटकारलं.

'उद्याच्या कार्यक्रमाकरता तुम्ही जाऊ नये–'

'का ? दुसरं कोण जाणार ?'

'ते आम्हाला माहीत नाही. तुम्ही जायच नाही.'

'पण का ?'

'तसा विद्यापीठातून साहेबाना फोन आलाय.'

'कुणाचा फोन ?'

त्या अध्वर्यून नाव सागितल.

'त्याचा याच्याशी काय संबंध ?' बी. जी. न विचारल.

'त्यानी फोनवर सागितलय की, बी. जी. उद्या तिथं दिसणार नाहीत याची साहेबानी खबरदारी घ्यावी'

'आणि साहेबानी तुम्हाला पाठवलं माझ्याकडे–'

'साहेबाची विनती आहे आपल्याला–'

'पण या माणसाचा काय सबध या कार्यक्रमाशी ? आणि साहेबानी तरी कशाला एवढं महत्त्व द्याव त्याला ?'

'ते विद्यापीठाच्या कार्यकारिणीचे–'

'असतील ! म्हणून काय वाट्टेल तिथं ढवळाढवळ करायचा परवाना नाही दिलाय त्यांना–'

'सॉरी सर आम्हाला त्यातलं काही कळत नाही पण साहेबानी विनती केलीय !' असं म्हणून त्यान साहेबाच एक विनंतिपत्र बी. जी. ला दिलं.

साहेबानं बी. जी. ची त्या पत्रात खुप स्तुती केली होती. त्याच्या लढाऊवृत्तीचं कौतुक केल होतं. काही वेळा माघार घेणं कस योग्य असत तेही पटवून दिल होतं. अन् शेवटी त्याला प्रेमळ विनती केली होती.

बी. जी ते वाचून खूष झाला. साहेबानं केलेली विनती अन् आर्जव वाचून त्याचा अहकार गोंजारला गेला. अन् साहेबाला कधीही भीक न घालणारा बी. जी. दुसऱ्या दिवशी न जाण्याचं वचन देऊन मोकळा झाला !

दुसऱ्या दिवशी तो गेलाही नाही. पण मग मात्र त्याचं बडखोर मन पुन्हा बड करून उठलं आपल्या न जाण्याच्या कृतीचा त्याला पश्चात्ताप झाला एवढ्याशा कागदाच्या चिटोऱ्यावर साहेबानं केलेल्या विनवणीमुळे

आपण पार फसलो याची त्याला जाणीव झाली.

त्यान लगेच एक भलमोठं निवेदन तयार केलं. त्यात धमकी होती निंदा होती. साहेबाच्या नेभळटपणावर ताशेरे होते भ्रष्ट यंत्रणेची नालस्ती होती ज्याच्या सागण्यावरून त्याला श्रमदानाच्या कार्यक्रमाचं नेतृत्व करायला मज्जाव झाला होता त्याच्या अब्रूचे धिडवडे होते. सारं काही होत.

साहेबाच्या विनतीनुसार त्यान, साहेबाला निवेदन वाचायला वेळही दिला होता. निवेदन वाचून साहेबाच्या तोंडचं पाणी पळणार याची खात्री तर होतीच !

त्या दिवशी सध्याकाळपर्यंत साहेबाचा काहीही निरोप आला नाही. तोही साहेबाकडे गेला नाही. दोन दिवस वाट पाहूनही जेव्हा साहेबाकडून काहीच हालचाल नाही अस दिसल तेव्हा तोच साहेबाच्या केबिनमध्ये घुसला.

'माझं निवेदन–'

'कसलं निवेदन?' साहेबानं मख्खपणे विचारल.

'दोन दिवसापूर्वी तुम्हाला दिल होत ते?'

'त्याच काय?'

'त्याच काय? लाज नाही वाटत असं विचाराला? माझ्या घरी माणसं पाठवून माझ्यावरच दबाव आणलात. कुणा एका दीड दमडीच्या माणसाखातर! का तर तो विद्यापीठाच्या चाडाळ चौकडीचा मेंबर म्हणून. अन् मलाच विचारताय त्याच काय म्हणून?'

'कुणी आणला दबाव?'

'तुम्ही आठवत नाही?'

'कोण म्हणतो मी दबाव आणला म्हणून?'

'कुणी म्हणायला कशाला पाहिजे? तुमचीच माणसं–'

'तुम्ही ते सिद्ध नाही करू शकत बी जी.'

'मी करीन.'

'कस?' साहेबाने कुत्सितपणे विचारलं.

बी. जी क्षणभर थाबला. त्या तेवढ्या क्षणभराचा फायदा घेऊन साहेब म्हणाले,

'सगळ्याच गोष्टी इतक्या सोप्या नसतात बी. जी'

'पण माझ्यावर दबाव आणून–'

'नका सांगू असल्या भाकडकथा! पुराव्याशिवाय कुणीही त्यावर विश्वास ठेवणार नाही.'

बी. जी धावतच केबिनच्या बाहेर पडला. त्याच्या घरी आलेल्या त्या चारपाच मडळीना त्यान साहेबासमोर आणून उभ केल.

पण त्यांच्यापैकी एकालाही आता बी. जी. च्या घरी गेल्याचं आठवत नव्हतं. असं काही घडल्याच कोणीही कबूल करीत नव्हतं.

हताश होऊन बी. जी. खुर्चीत बसला

'मी सांगतो बी. जी.' साहेब म्हणाले, 'तुम्ही हे प्रकरण हातचं घालवलय. माझ्याविरुद्ध आरडाओरड करायची एक नामी सधी तुम्ही तुमच्या खोट्या अहकारापायी घालवलीय. मी तुम्हाला विनंती केली अन् तुम्ही सुखावून गेलात. तुम्ही त्याचवेळी माझ्याकडून लेखी विनतीची मागणी केली असतीत तर कदाचित्–'

'तुमचं तस पत्र माझ्याकडे अजूनही आहे–' बी. जी. म्हणाला.

'असेल. पण ते मी लिहिलेलच नाही. त्यावर माझी सहीसुद्धा नाही. यू काट यूज दॅट अगेन्स्ट मी! तुम्ही त्यावेळी स्वतःवरच एवढे खूष होतात–' साहेब त्याला डिवचत म्हणाले

बी. जी. काहीच बोलला नाही.

केबिनमधल्या पख्याची घरघर अन् साहेबाच्या टेबलावर वाजणारा फोन यातलं काहीही त्याला जाणवत नव्हत तो सुन्नपणे बसून होता. हाताशी आलेली सधी बेसावधपणामुळे गमावल्याच दुःख करीत!

साहेबानी फोन उचलला अन् खुर्चीतून अर्धवट उठत ते बोलू लागले, 'ओ येस, ओ येस नो प्रॉब्लेम. दॅट हॅज बीन मॅनेज्ड. ते काहीही करू शकणार नाहीत. ही हॅज लॉस्ट द कॉनफिडन्स इन हिमसेल्फ!

'मी येतोच आहे तिकडे रिपोर्ट करायला,' असं म्हणून त्यानी फोन खाली ठेवला.

आयाळ झडलेल्या सिंहाकडे पाहावं तसं बी. जी. कडे पाहत ते म्हणाले,

'तुम्ही ज्या लढाईच्या गप्पा मारीत असता त्यातलीच ही एक चाल आहे बी. जी. धीर सोडू नका! या लढाईची तुम्हाला पुरेशी ओळख नाही झालीय अजून. हा तर या लढाईचा ओनामा आहे आणि हेही लक्षात ठेवा की तुमच्यासारख्या आदर्शवाद्याचं अस्तित्वच मुळी आमच्यामुळे आहे. आम्ही नसलो तर विचारतो कोण या तुमच्या लढाऊ तत्त्वज्ञानाला?'

थोडं थाबून ते म्हणाले,

'आय मस्ट गो नाऊ. तिकडून बोलावणं आलय!' असं म्हणून साहेब चालू लागले.

मान खाली घालून–

विद्यापीठात मुजरा करायला!

□


**Phoenix augments its rare stock with the following recent titles :**

(1) Carpet Sahib (Life of Jim Corbett) Martin Booth Rs. 150/–
(2) Highness (Maharajas of India) Ann Morrow Rs. 195/–
(3) Taj Mahal (Colour) Raghu Rai Rs. 650/–
(4) Undiplomatic Incidents – Apa Pant
(5) Sunil Gavaskar (Biography) Dom Moraes Rs. 150/–
(6) Real Coke, Real Story (Coco Cola's Biography) Oliver Thomas £ 9.95

A cross–section of the Phoenix tells its own tale. Need we say more ?

**दि फिनिक्स लायब्ररी**

७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०

# ली अयाकोका

## ओळख

पुढच्या वर्षी अमेरिकेत राष्ट्राध्यक्षपदासाठी निवडणुका होतील. तेव्हा, नवा राष्ट्राध्यक्ष कसा असावा याची सर्व प्रसिद्धी माध्यमात जोरदार चर्चा चालू आहे. अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष म्हणजे जागतिक राजकारणाला दिशा देणारी एक महाशक्ती. त्यामुळे अवघ्या जगाला त्याबद्दल कमालीची उत्सुकता. वैयक्तिक चारित्र्य शंकास्पद असल्याने गॅरी हार्ट तर आता मागेच पडले. ज्या थोड्या व्यक्तींचे या स्पर्धकांमध्ये नाव घेतले त्यात एक आहे – ली अयाकोका.

नव्या युगात बहुधा राजकारणातील आणि चित्रपट व्यवसायातील व्यक्तीच प्रसिद्धीच्या शिखरावर जाऊन बसतात. प्रे. रेगन चित्रपट व्यवसायातले. देमार चित्रपटात त्यांनी भूमिका केल्या. आणि तरीही लागोपाठ दोन वेळा त्यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून लोकांनी निवडून दिलं. आता प्रथमच व्यवसाय क्षेत्रातील व्यक्तीची ह्या पदासाठी चर्चा चालू आहे. मोटार व्यवसायातील निष्णात व्यवस्थापक ली अयाकोका याच्या रूपाने आपल्याला कणखर औद्योगिक नेतृत्व लाभेल असे अमेरिकन लोकांना वाटते.

विशेष म्हणजे, आज अमेरिकेत कुटुंब–व्यवस्था मोडकळीस येत असताना अयाकोका जुन्या नीतिमूल्यांचा पुनरुच्चार करतोय. स्वतःच्या आईवडिलांविषयी आदराने, जिव्हाळ्याने बोलतोय. त्यांचे ऋण मानतोय. बाहेरच्या जगातली आकर्षणे टाळून बायको–मुलात रमतोय... अयाकोकाच्या कर्तृत्वाबरोबरच त्याच्या चारित्र्याच्या या बाजूचेही लोकांना जबरदस्त आकर्षण वाटतेय.

१९०२ साली ली अयाकोकाचे वडील निष्कांचन, निराधार अवस्थेत इटलीमधून अमेरिकेत आले. १९४६ साली ली फोर्ड मोटर कंपनीत नोकरीला लागला आणि १९७० साली स्वकर्तृत्वाच्या जोरावर तिचा प्रेसिडेंटही झाला. फोर्ड कंपनीच्या प्रेसिडेंटचा पगार हा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाच्या पगाराइतकाच असतो. कर्तृत्वाच्या उच्च शिखरावर असतानाच तो कंपनीचा चेअरमन हेन्री फोर्ड याच्या लहरी वृत्तीला बळी पडला. ज्या फोर्ड कंपनीत ली अयाकोकाने बत्तीस वर्षं काम केलं तिथूनच त्याला अपमानास्पदरीत्या काढलं गेलं.

चौपन्न वर्षांच्या अयाकोकापुढे दोन मार्ग होते. उर्वरित आयुष्य गोल्फच्या मैदानावर घालवावं एवढी सुबत्ता गाठीशी होती. तेव्हा सुखाने निवृत्ती स्वीकारावी की नव्याने आव्हान स्वीकारावं हा प्रश्न होता. त्याने दुसरा मार्ग पत्करला. त्याने क्रायस्लर मोटर कंपनीत नोकरी स्वीकारली- ही अमेरिकेतील दहाव्या क्रमांकाची कंपनी. अयाकोका या कंपनीत रुजु झाला तेव्हा ती सततच्या तोट्यामुळे बंद पडायच्या मार्गावर होती. या बुडीत निघालेल्या मोटर कंपनीचा तो १९७९ मध्ये प्रेसिडेंट झाला. प्रचंड विरोधाला तोंड देऊन अमेरिकन सरकारकडून १२०० कोटींचं कर्ज मिळवलं. कंपनीला दिवाळखोरीपासून वाचवलं. दहा वर्षांच्या बोलीनं घेतलेलं हे कर्ज त्याने अवघ्या तीन व ति फेडलं. चौथ्या वर्षी कंपनीला २४०० कोटींचा निव्वळ नफा मिळाला. त्याचे हे कर्तृत्व

व्यवस्थापन क्षेत्रातील चमत्कार मानलं जातं. आज ली अयाकोका एक नेता आहे. जिद्दी, कर्तृत्ववान, निधडा, सडेतोड, स्पष्टवक्ता म्हणून त्याची ख्याती आहे.

फोर्ड आणि क्रायस्लर मोटर कंपनीतील त्याचे कर्तृत्व, अनुभव यांचा आलेख त्याने आपल्या चरित्रात – ' अयाकोका 'त – रेखलाय. हे एका यशस्वी आणि स्वकर्तृत्वाची जाणीव असलेल्या व्यावसायिकाचं आत्मकथन आहे. अर्थात्, या आत्मकथनात त्याने हेन्री फोर्ड (मूळ हेन्री फोर्डचा हा नातू) विकृत, खलनायकी, लहरी रंगवलाय हे अयाकोकाचे मित्रही मान्य करतात.

' अयाकोका 'ने इंग्रजी ग्रंथविश्वात कमालीची खळबळ उडवलीय. सतत काही महिने ते बेस्ट सेलर यादीत अग्रभागी होते. दररोज १५ हजार प्रतींची विक्री होत होती. एकूण १५ लाख प्रती छापल्या. जपानमध्ये तर एकाच महिन्यात दोन लाख प्रतींचा खप झाला. प्रत्येक प्रतीमागे अयाकोकाला ३ डॉलर्स मिळतात. असे आजवर चाळीस लाख मिळालेत. ती रक्कम जोसलीन मधुमेह केंद्रात त्याच्या पत्नीच्या स्मरणार्थ जमा होते. ती मधुमेहाने जर्जर होती. मधुमेहावर संशोधन व प्रबोधन व्हावे ही तिची इच्छा. ली अयाकोका ती पूर्ण करतोय.

ली अयाकोकाच्या भीम पराक्रमाचा अमेरिकन जनमानसावर विलक्षण प्रभाव आहे. कोणी म्हणतो–' हाच खरा अमेरिकन. प्रामाणिक नि सच्चा '... ' विरोधी प्रवाहात पोहून जिद्दीने पैलतीर गाठणारा, ताठ उभा राहाणारा ', तर कोणी म्हणतो- ' कणखर, आर्थिक व्यवहाराचं पूर्ण भान आणि ज्ञान असणारा. '

पूर्ण आत्मविश्वासाने इच्छित ध्येयपूर्तीकडे निघालेला आणि अखेरीस कळस गाठणारा हा अयाकोका अमेरिकनांना जवळचा वाटतो. शिवाय आजवर अनेकदा तो प्रसिद्धी– माध्यमातून लोकांसमोर आलाय. त्यांच्याशी थेट बोललाय. त्यामुळेही तो त्यांना आपल्यापैकीच वाटतो. खंबीर नेतृत्वासाठी आसुसलेल्या अमेरिकनांना त्याचा दिलासा वाटतो. त्याच्याकडे कमावलेलं वक्तृत्व आहे. त्यात भर पडलीय कर्तृत्वाची.

१९८३ साली मिशिगन येथील पदवीदान समारंभासाठी तो गेला होता. त्याचं पाऊण तासाचं भाषण संपलं तेव्हा




**ली – मूर्तिमंत ' महत्त्वाकांक्षा '**

□

१४ हजार उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्याला उत्थापना दिली.

अयाकोकाच्या प्रसिद्धीबरोबरच त्याची श्रीमंतीही वाढतेय. वार्षिक दहा लाख डॉलर्सचा तनखा तर आहेच. वर कंपनी नफ्यानुसार त्याला बोनसही देते. तो आकडा पाच लाखांच्या जवळपास जातो. फोर्डमधून काढून टाकते वेळी त्याला कंपनीने पूर्वसूचना दिली नाही म्हणून त्याने कंपनीवर दावा लावला. त्यात तो जिंकला. त्याची नुकसान भरपाई म्हणून फोर्ड कंपनीकडून त्याला २ कोटी ६ लाख डॉलर्स मिळाले.

ही श्रीमंती त्याच्या कंपनीतील कामगार वर्गापर्यंत पोचलीय. १९८४ साली क्रायस्लरला प्रचंड नफा मिळाला म्हणून १९८५ च्या मार्चमध्ये एक लाख कर्मचाऱ्यांना प्रत्येकी पाचशे डॉलर्स बोनस मिळाला १९८०–८१ सालात क्रायस्लरमध्ये हजारो कामगार घरी बसवावे लागले, पैकी ४१ हजार कामगारांना कंपनीने पुन्हा कामावर घेतलं. आणि म्हणूनच ली अयाकोका कामगार वर्गातही फार प्रिय आहे , अयाकोका 'च्या प्रती घेऊन अनेक कामगार त्याची स्वाक्षरी घ्यायला गर्दी करत असतात.

मुक्त–बाजाराच्या बाजूचा असूनही आयातीवर सरकारी

नियंत्रण असावे, असे तो म्हणतो. १९८४ मध्ये अमेरिकेच्या आयात–निर्यातीत १२३ अब्जाची तफावत आली. आणि ती वाढतच आहे. असेच घडत राहिले तर स्वदेशातील उद्योग सहकार्यासाठी परदेशात जातील. आणि मग त्याना परत आणणे अवघड होऊन बसेल. अमेरिकेत अनौद्योगिकरण वाढेल, असा गभीर इशारा त्याने दिलाय.

आपण राष्ट्राध्यक्षपदासाठी उभे राहाणार नाही असे भले तो म्हणो. पण त्याची धाकटी मुलगी काय म्हणते ते पहा. एका शब्दात तुझ्या वडिलाचे वर्णन कर अस तिला सागितल तेव्हा ती म्हणाली ' महत्त्वाकाक्षी ! '

ली अयाकोकाच्या ' अयाकोका 'चा सहलेखक आहे विल्यम नोवाक. त्याने वीस एक मुलाखती ध्वनीफितीवर घेतल्या. बरीच शिवीगाळ अन् अर्वाच्यता गाळून हस्तलिखित तयार केले. ली अयाकोकाने त्याला मानधन दिले ४५ हजार डॉलर्स

# ली अयाकोका

**१३** जुलै १९७८. अगदी अपमानास्पदरीत्या मला फोर्ड मोटर कपनीतून काढून टाकण्यात आले. एकूण बत्तीस वर्षं मी तिथे नोकरी केली. पैकी शेवटची आठ वर्षे मी तिचा प्रेसिडेंट होतो. कर्तृत्वाच्या अत्युच्च शिखरावरून कडेलोट होणे म्हणजे काय ते मी अक्षरशः अनुभवल. मी आजवर अन्यत्र कुठेच काम केलेल नव्हतं. आणि एकाएकी त्यानी असं मला रस्त्यावर फेकलं.

१५ ऑक्टोबर हा माझ्या ' फोर्ड ' मधील सेवेचा शेवटचा दिवस. नवी नोकरी मिळेपर्यंत व्यवस्था म्हणून कपनीने मला एक छोट ऑफिस आणि टेलिफोन दिला.

ऑफिस कसल ते ? एका गुदामातली अर्धीमुर्धी खोली. आत एक साधं लाकडी टेबल. त्यावर फोन आणि शेजारी दोन प्लॅस्टिकचे कप. छोरोथी कार, माझी सेक्रेटरी, डोळ्यातलं पाणी अडवत तिथे उभी.

अगदी कालपर्यंत मी आणि ती एका वेगळ्याच जगात काम करत होतो. एखाद्या पंचतारांकित हॉटेलचे सुसज्ज दालन शोभावे अशी ती जागा. मागे एकदा इटालीहून माझे काही नातेवाईक मला भेटायला आले होते. त्यानी माझे ऑफिस पाहिले तेव्हा त्याना वाटले होते, आपण जिवंतपणे स्वर्गात पोचलोत.

या गुदामातल्या खोलीत पाय टाकताक्षणी मी एवढा सुन्न, बधिर झालो की काही वेळ काय करावं ते सुचेचना. माझं मन मला बजावत होत, ही माझी जागा नव्हे...तडक मी माघारी वळलो. पुन्हा तिथे कधीच गेलो नाही

नोकरीवरून हकालपट्टी केली त्यापेक्षा ही अवहेलना मला अधिक जिव्हारी लागली.

१५ ऑक्टोबर हा माझा जन्म–दिवस. चौपन्नाव्या वाढदिवशी हे असं झालं माझ्या पत्नीला आणि दोन्ही मुलीना या घटनेपायी किती मनस्ताप झाला असेल ! हेन्री फोर्डने ( द्वितीय ) माझ्या निष्पाप कोवळ्या मुलीचे मनःस्वास्थ्य घालवले. त्याच्या या अपराधाला मी कधीच क्षमा करणार नाही.

आयुष्यात चढउतार, वळणे अनेक असतात. पण आयुष्याचा निर्णय घ्यावा अशी वळणे फारच थोडी.

आर्थिक दृष्टया मी सुस्थित होतो. यशाच शिखर गाठलेलं होतं. उर्वरित आयुष्य गोलफच्या मैदानावर घालवायला हरकत नव्हती.

पण नाही तस करण मला योग्य वाटलं नाही.
मला नव्याने पुढे जायच होत.

¤

माझे वडील निकोला अयाकोका. वयाच्या बाराव्या वर्षी १९०२ साली, इटाली सोडून ते अमेरिकेत आले.

अमेरिका म्हणजे स्वातंत्र्यभूमी. इच्छित ध्येय साध्य करण्याची भूमी. ध्येयपूर्तीसाठी धडपडणाऱ्याची भूमी.

माझ्या वडिलानी पेनसिल्व्हानियामधील ॲलनटाऊनमध्ये आसरा घेतला. मी, माझी बहीण डेल्मा, आणि बाबा अस आमच छोटं, एकजीव कुटुब.

माझ्यात नि वडिलांच्यात विलक्षण सलोखा. मी त्याना नेहमीच खूष ठेवत असे. आणि तेही मला कौतुकात न्हाऊ घालत. लहानपणीच काय पण अगदी ' फोर्ड 'मध्ये असतानाही मी ज्या ज्या वेळी नवीन मोटर बाजारात आणायचो तेव्हा त्याना ती आपणच प्रथम फिरवून पाहायची इच्छा असे. १९७० मध्ये मी ' फोर्ड 'चा प्रेसिडेंट झालो तेव्हा आमच्या दोघापैकी अधिक आनंद कोणाला झाला, हे सांगणं कठीणच.

माझ्या वडिलाकडूनच मला व्यापारी वृत्ती लाभली असावी. निष्काचन, निराधार अवस्थेत ते अमेरिकेच्या किनाऱ्यावर उतरले. अल्पावधीतच ते दोन चित्रपट–गृहाचे मालक बनले. मोटरसायकल, मोटर बाळगली. १९२० च्या सुमारास आम्ही चागलेच श्रीमंत होऊ लागलो होतो. पण १९३० सालच्या आर्थिक मदीच्या लाटेने आम्हाला साफ धुऊन काढल. इतक की, राहात घरही सोडावं लागलं. मी त्यावेळी जेमतेम सहासात वर्षांचा असेन. ते मला म्हणत–' आर्थिक मदी म्हणजे काय हे समजून घेण्यासाठी तुला शाळेतच जायला हव. ' ते स्वतः फक्त चार यत्ता शिकले होते. ' मला जर कोणी आर्थिक मदी म्हणजे काय हे समजावून दिल असतं तर ही वेळ आलीच नसती. '

पण या मदीने मला शहाणं केल. मला कोणतही तत्त्वज्ञान नको होत. पदवी मिळवली खरी. पण जिद्द होती ती पचविशी गाठण्यापूर्वीच सालिना दहा हजार कमावण्याची.

या मदीच्या काळात वडिलाच्या खात्यात पुरेसे पैसे नसल्याने

अनेकदा त्याचे चेक्स् न वटता परत येत. हे त्याना फार लागे. आम्हा दोघा भावडाना ते नेहमी आर्थिक जबाबदारीची सूत्रे सागत पैकी एक म्हणजे– ' मिळकतीपेक्षा अधिक खर्च करू नका ' किंवा ' तुम्ही कधी काही उसनवार घेतलत तर त्याची नीट नोद ठेवा. म्हणजे मग ते परत फेडायला विसरणार नाही मग ती रक्कम अगदी वीस सेंटस् का असेना. '

१९८१ मध्ये मी क्रायस्लर मोटर कपनीसाठी एक अब्ज वीस कोटी डॉलर्सच कर्ज घेतल तेव्हा वडील हयात नव्हते. नाही तर त्याची काय प्रतिक्रिया झाली असती ! पण बाकी हे कर्ज टिपून न ठेवताही लक्षात राहाण्याजोग होत म्हणा.

जेव्हा जेव्हा सकट उभी राहत तेव्हा वडील आमचा धीर टिकवून ठेवत. ते म्हणत ' आयुष्यात थोड–फार दु ख असणारच...आणि सुखाचं मोल ठरवायच म्हटल तर त्याच्याशी तोलून जोखायला काही हवंच की ! '

तसा त्याना अगचोरपणाचाही राग. आवडीच काम निवडाव आणि त्यात स्वतःला पूर्णपणे झोकून द्याव, मुळाशी जाऊन भिडाव ही त्याची वृत्ती मीही तसाच आणखीही एक –' आयुष्य उपभोगाव' कामाचा केवढाही डोंगर असो. स्वतःसाठी वेळ बाजूला काढलाच पाहिजे ही शिकवण त्यानी स्वतः आचरली आणि मलाही दिली.

' धावता येत असेल तर चालाव कशाला ' हा त्याचा खाक्या

१९७३ मध्ये ते वारले

¤

वयाच्या अकराव्या वर्षी जाणवलं की आपण इटालियन आहोत.

त्या काळी, विशेषतः खेड्यातून, इटालियन असण ही अभिमानानं सांगण्यासारखी बाब नव्हती ॲलनटाऊनमधली सारी वस्ती पेनसिल्व्हानिया डच. मला सारे बालमित्र खड्यासारखे वगळत काही शिक्षकही हेटाळणी करत या फाजील अभिमान्यानी मला कडू आठवणी दिल्यात असे असले तरीही माझे शालेय जीवन रम्यच होते. मी हुशार, दक्ष विद्यार्थी शिक्षकाचा आवडताही. त्यावेळी एका शिक्षिकेने आम्हाला रिडर्स डायजेस्ट मासिकातील ' वर्ड पॉवर गेम ' ची गोडी लावली. ती आजही कायम आहे वादविवादात भाग घ्यायला मला आवडे.

शाळेत असतानाच, म्हणजे १९३९ च्या सुमाराला मी सधिवाताने आजारी पडलो. मैदानी खेळ वगैरे बाजूला पडले. बुद्धिबळ, ब्रिज, पोकर खेळू लागलो या पोकरचा पुढे फारच उपयोग झाला म्हणायचा. सधीचा फायदा घेणे, माघार घेणे, थाप मारणे हे शिकता आलं. आणि त्याचा पुढे सघटनाशी वाटाघाटी करताना वापर करता आला. वाचनही भरपूर झाले वाचन, लेखन आणि वादविवाद स्पर्धा यानी मला भविष्यात चागलीच साथ दिली

१९४६ साली लेहे विद्यापीठातून मी इंजिनिअरिंगची पदवी घेतली. या शिक्षणक्रमात आयुष्यालाही काही वळण मिळाले. एकाग्रतेने अभ्यास करणे, वेळेचा सुयोग्य वापर करणे, आयुष्यात अग्रहक्क ठरवून घेणे वगैरे. ज्या व्यक्तीला व्यापारातल्या समस्या सोडवण्याचा व्याप करायचा असेल त्याला अग्रक्रम कशाला द्यावा हे समजणे जरुरीचे असते.

लेहेमध्ये मी मानसशास्त्राचाही चार वर्षं अभ्यास केला. या अभ्यासाचा भाग म्हणून प्रत्यक्ष मनोरुग्णाचाही अभ्यास करावा लागला. यामुळे मानवी मनाचे व्यापार मला अधिक चागले कळू लागले लोक माझ्या बाबतीत गमतीने म्हणतात की मी माझ्या शिक्षणाचा उपयोग गाड्याचे स्क्रू तपासण्यापेक्षा माझ्या व्यवसायातील लोकाचे स्क्रू तपासण्यासाठीच अधिक केला पहिल्याच भेटीत मी माणसाला जोखतो या कसबाचा उपयोग व्यवस्थापनात फार होतो.

मी पदवीधर झालो त्या काळात इजिनिअर्सना मागणी होती. वीस मुलाखतीची बोलावणी माझ्या खिशात होती. त्यात ' फोर्ड ' चेही होते. पण त्याच वेळी मला वॅलेस मेमोरियल फेलोशिप मिळाली आणि प्रिन्स्टन विद्यापीठात पदव्युत्तर शिक्षण घेऊ लागलो ' फोर्ड ' कपनीत दाखल व्हायची एवढी मला घाई की तीन सत्रात मिळून पूर्ण करायचा प्रबध मी दोनच सत्रात पूर्ण केला आणि १९४६ च्या ऑगस्टमध्ये ' फोर्ड 'मध्ये मी रुजू झालो.

¤

' फोर्ड मोटर कपनी 'त मी रुजू झालो आणि माझा उमेदवारीचा काळ सुरू झाला या काळात मोटार बाधणीतील सर्व तत्र हाताळल. कपनीच्या खरेदी खात्यात आणि रुग्णालयातही काम केल माझं सारं शिक्षण पडताळून तपासून घेतल. याच काळात मला कपनीच्या व्यवस्थापनातील ढिसाळ जागा, अतःस्थ तणाव आणि अव्यवस्था लक्षात आली. आणि लवकरच हेही लक्षात आले की मला ' फोर्ड ' मध्येच राहायचय पण इजिनिअरिंग खात्यात नाही तर बाजारपेठ साभाळणाऱ्या विक्री खात्यात. मला यत्रापेक्षा सपर्क हवा होता लोकाशी.

वरिष्ठाशी याबाबत मी बोललो पण ते माझे ऐकून घ्यायला तयार नव्हते मी फारच आग्रह धरला तेव्हा म्हणाले– ' तू फोर्डमध्ये असावस असं आम्हालाही वाटत. पण तुला विक्री विभागातच जायच असेल तर तुझी शिफारस आम्ही करणार नाही. तुलाच तुझा रस्ता शोधावा लागेल.'

*मी पेनसिल्व्हानियातील चेस्टरला गेलो तिथल्या ' फोर्ड ' विक्री व्यवस्थापकाने मला सधी दिली.*

उत्तम विक्रेता असण हा सपादित गुण नसतो, तो स्वाभाविक असतो असं म्हणतात. पण मला मात्र ते वरदान लाभल नव्हतं.

विक्रेत्याच कौशल्य अगी बाणायला खूप मेहनत हवी खूप वेळ द्यायला हवा. एवढी सवय आणि एवढा सराव व्हावा की तो तुमचा स्वभाव बनावा चुका ह्या आयुष्याचा एक भाग आहेत त्या कशा टाळणार ? त्या फार महागात पडणार नाहीत आणि त्याची पुनरावृत्ती होणार नाही एवढी दक्षता घेतली की पुरे

१९४९ मध्ये मी पेनसिल्व्हानियातील विल्कस्–बारचा विभागीय व्यवस्थापक झालो माझ्या अखत्यारीत ' फोर्ड ' चे १८ डिलर्स आले. खूप अनुभवल. खूप शिकलो

डिलर्स मडळीशी फार जवळून सबध आला मी जेव्हा पुढे व्यवस्थापनात आलो तेव्हा त्या अनुभवाची शिदोरी उपयुक्त ठरली. मोटर व्यापाराचा खरा कणा म्हणजे हे डिलर्स व्यवस्थापनाने त्याचं

म्हणणं लक्षपूर्वक समजून घेण जरुरीचं आहे. मग ते म्हणण प्रत्येक वेळी रुचणारं नसेल तरीही.

चेस्टरमध्ये काम करत असताना चार्ली बिचमच्या हाताखाली धडे घेतले. चार्ली हा 'फोर्ड'च्या संपूर्ण पूर्व किनारा विभागाचा व्यवस्थापक एकाच वेळी मृदू आणि कठोर अस हे व्यक्तिमत्त्व. एक वडील सोडले तर चार्ली इतक दुसऱ्या कोणी मला प्रभावित केलं नाही.

चुकाबद्दल चार्लीची तक्रार नसायची. फक्त त्याची जबाबदारी घ्यायला तुम्ही तयार हव, अस तो म्हणे 'प्रत्येकजण चुका करतो. पण त्याचं पितृत्व नाकारतो मग ते खापर पत्नीवर, मुलावर, मैत्रिणीवर, कुत्र्या–माजरावर, अगदी वाट्टेल त्याच्या माथ्यावर फोडेल. स्वतःला मात्र वगळेल. कशाला हव्यात या सबबी !... आणि स्वत ला आरशात तपासा आणि मग माझ्याकडे या.'

माझा जम बसत गेला. व्यवसायातले बारकावे समजत गेले.

चार्लीनं माझ्यावर 'डीलर्सना ट्रक कसे विकावे' हे शिकवण्याची कामगिरी सोपवली. मी नतर त्याविषयी मार्गदर्शनपर पुस्तिकाही छापली.

तांत्रिक बाजू सोडून मी व्यवस्थापनाकडे वळलो ते बरच झाल. फिरत्या विक्रेत्यासारखा सपूर्ण पूर्व किनारा विभाग फिरलो. भित्तिपत्रके, पारदर्शिका, आराखडे इ. सच बरोबर वागवून फोर्ड ट्रक विक्रेत्यांची पाच पाच दिवसाची प्रशिक्षण शिबिरे घेतली दक्षिणेकडचे सर्व डीलर्स आणि विक्रेते परिचयाचे झाले.

हे सार धकाधकीच, यातायातीच होत खरं, पण माझ्या मनासारखं होत. मोटर व्यवसायात मला यत्र व्यवहारापेक्षा लोकव्यवहारात रस होता. आणि तो मला साधत होता.

□

१९५० च्या सुमारास अनपेक्षित सकटास मला सामोर जाव लागल 'फोर्ड'ने कपातीच धोरण आरभल विक्री विभागातले एक तृतीयाश लोक उडवले. मी कसाबसा वाचलो. सावरलो. जोमाने कामाला जुपलो.

१९५३ मध्ये मी फिलाडेल्फिया विभागाचा असिस्टट सेल्स मॅनेजर झालो. डीलर्स मोटारी उचलोत ना उचलोत, त्या तयार होत राहणारच त्याना तातडीने रस्ता दाखवायला हवा नाहीतर स्वत च खड्ड्यात जायला हव.

१९५६ मध्ये तर कहरच झाला. फोर्डने मोटारीची अश्वशक्ती किंवा कार्यक्षमता यावर भर देण्यापेक्षा सुरक्षिततेवर भर दिला. पण ही सुरक्षितता मोहीम तग धरू शकली नाही. फोर्ड मोटारीची मागणी ओसरू लागली, त्यात माझ्या जिल्ह्यात तर आनदच होता.

मी चिंताक्रांत झालो. विचार कर करून एक योजना तयार केली. ५६ साठी ५६. ('56 for 56')

१९५६ सालची ही योजना. दरमहा ५६ डॉलर्सप्रमाणे ३ वर्षांत मोटारीचे पैसे फेडायचे. ही योजना सर्वसामान्य ग्राहकालाही परवडणारी.

## प्रचंड मागणी

त्याच सुमारास नव्या फोर्ड गाड्यांचा ताडा बाजारात येत होता. केवळ तीन महिन्यांच्या कालावधीत माझा जिल्हा विक्री पटावर शेवटच्या क्रमाकावरून पहिल्या क्रमाकावर आला.

फोर्ड विभागाच्या व्हाईस प्रेसिडेंट रॉबर्ट मॅक्नामारा याला ही योजना फारच पसत पडली. तिचा समावेश त्याने फोर्डच्या राष्ट्रीय पातळीवरील विक्री धोरणात केला. या योजनेमुळे ७५ हजार गाड्या अधिक खपल्या.

तर अशा प्रकारे दहा वर्षे उदंड मेहनत घेतल्यावर एका रात्रीत मी प्रसिद्धीस आलो माझ्या श्रमाची, योजनाची दखल बॉस मडळींनी घेतली.

माझी नेमणूक वॉशिंग्टन ( डी सी ) चा विभागीय व्यवस्थापक म्हणून झाली उज्ज्वल भविष्य नजरेच्या टप्प्यात आल.

चेस्टरमधील फोर्ड कार्यालयातील स्वागतिका मेरी मॅकक्लिअरी हिच्या प्रेमात मी पडलो होतो त्याला सुमारे आठ वर्षं झाली होती. अखेरीस २९ सप्टें. १९५६ रोजी आम्ही विवाहबद्ध झालो.

चार्ली बिचम माझ्यावर बारीक लक्ष ठेवून होता. तो आता फोर्डच्या मोटर आणि ट्रक विक्री विभागाचा मुख्य होता. त्याने आपल्या खात्यात मला राष्ट्रीय पातळीवरील ट्रक विक्री व्यवस्थापक म्हणून घेतले वर्षभरातच मी मोटर–विक्रीप्रमुख झालो. १९६० च्या मार्च महिन्यात मोटार आणि ट्रक विक्री विभागाचा प्रमुख म्हणून काम पाहू लागलो.

आता मी माझ्या क्षेत्रात उच्च वर्तुळात गेलो होतो.

माझा वरिष्ठ अधिकारी होता रॉबर्ट मॅक्नामारा. यानेच मला आपले विचार कागदावर माडायला शिकवले आणि हे पथ्य पाळणे फार महत्त्वाचे पुढेही ते मी पाळलेच. कोणी माझ्यापुढे नवे विचार, नव्या योजना माडू लागला की मी त्याला सागतो, आधी ते सारं व्यवस्थित लिहून आण. म्हणजे मग ते हवेतले इमले होत नाहीत.

व्यापारी जगात अर्थव्यवहार साभाळणाऱ्या जमातीला आकडेबहाद्दर म्हणतात. याच्या मेंदूत कॉम्प्युटर असतो. ही जमात स्वभावतःच प्रतिवादी, अपरिवर्तनवादी आणि निवृत्तिवादी याचा सामना असतो तो विक्री खात्यातल्या लोकाशी. ही जमात आक्रमक, सट्टेबाज आणि प्रवृत्तिवादी दोन्ही टोकाच्या या दोन जमाती. कोणत्याही उद्योगधद्यात यशाच समीकरण माडायच तर या दोन्ही जमाती हव्यातच.

आकडेबहाद्दर गहाळ असतील तर कपनीच दिवाळं निघेल. आणि फाजील कठोर असतील तर कपनीचा माल बाजारपेठेपर्यंत पोचू शकणार नाही.

१९७० साली फोर्डमध्ये हेच घडल. फोर्ड आपली बाजारपेठ घालवून बसली.

रॉबर्ट मॅक्नामारा हे एक वेगळच व्यक्तिमत्त्व उत्तम व्यावसायिक पण ग्राहकहितदक्ष. कपनीचा नफा वाढवण्यासाठी मोठ्या, आरामशीर गाड्या ठीक आहेत. पण सर्वसामान्य ग्राहकाची गरज भागवण्यासाठी उपयुक्ततेवर भर दिला पाहिजे असे त्याचे मत. वेगळा दृष्टि-

कोण बाळगूनही तो व्यवस्थापनात टिकून होता तो त्याच्या निष्णात कौशल्यामुळे, अपरिहार्यतेमुळे

१९६० मध्ये मॅक्नामारा फोर्डचा प्रेसिडेंट झाला. मी व्हाईस-प्रेसिडेंट झालो आणि त्याबरोबरच फोर्ड विभागाचा जनरल मॅनेजरही.

तत्पूर्वी १९५९ मध्ये मॅक्नामाराने फाल्कन मॉडेल बाजारात आणल पहिल्याच वर्षी या गाडीने विक्री-उच्चांक गाठला. ४,१७००० गाड्या, हे घवघवीत यश त्याला अध्यक्षपद मिळवून द्यायला पुरेस होतं.

मला बढती मिळताच, गाडीच्या नव्या मॉडेलच्या दिशेने माझे विचार धावू लागले.

## व्यवस्थापन

वयाच्या ३६ व्या वर्षी जगातल्या क्रमांक दोनच्या कंपनीच्या सर्वात मोठ्या विभागाचा मी जनरल मॅनेजर झालो फोर्ड कंपनीतील अर्ध्या अधिक लोकाना मी कोण ते ठाऊकही नव्हत आणि उरलेल्या अर्ध्या अधिकाऱ्याना माझ नाव उच्चारण जमत नव्हत आणि 'हे अयाकोकाच मॉडेल' म्हणून दाखवायला माझ्या नावावर मोटार जमा नव्हती.

मी पदाधिकाऱ्याच्या तिमाही बैठका सुरू केल्या. त्याना त्याच्या हाताखालच्या लोकाच्या तिमाही बैठका घ्यायला सागितलं ही साखळी खालच्या उतरडीपर्यंत पोचली. परिणामतः प्रत्येक व्यवस्थापकाला स्वत:च्या उद्दिष्टांच भान राहू लागल. आपल्या उद्दिष्टाचा टप्पा कायम नजरेसमोर राखण शक्य होऊ लागल.

ज्येष्ठ कनिष्ठ पदाधिकाऱ्यात विशिष्ट उद्दिष्टावाबत एकमत झाले की त्याची कागदोपत्री नोंद व्हायची. मॅक्नामाराकडून लेखी नोंदी ठेवण्याचे धडे मी घेतले होते त्याचा इथे उपयोग झाला.

उद्दिष्ट कार्यवाहीत आणण्याचा पहिला टप्पा म्हणजे ते लेखन-सीमित होणे. असे एकदा झाले म्हणजे मग स्वत:ची वचना होत नाही आणि दुसऱ्याची फसवणूकही टळते.

आता काही बहाद्दर भारभार मेमो देऊन कार्यालय म्हणजे कागद गिरणी करतात तो भाग वेगळा.

या तिमाही बैठकामुळे वैचारिक देवाणघेवाण सुरू होते आणि नवनव्या योजना पुढे येऊ लागतात.

मोठ्या कंपनीला याचा फायदा होतो तो वेगळाच. लोक तिथे स्वत:ला हरवत नाहीत. शिवाय ते एकमेकाच्या संपर्कात येतात. लायक व्यक्तीना सधी मिळते. नालायक व्यक्ती स्वत:ला लपवू शकत नाहीत. वरिष्ठ-कनिष्ठातील अंतर्विरोध जाऊन सुसवाद निर्माण होतो. वरिष्ठाची भूमिका बदलत जाते 'हम करे सो कायदा' उरत नाही.

काय सागावं ! एखाद्या पठ्ठ्यान तुमच्यापुढे चागली योजना माडली. तुम्हाला ती पटल्याने तुम्ही त्याला ती कार्यवाहीत आणण्यासाठी प्रोत्साहन दिलत तर तो पठ्ठ्या आपल्या उद्दिष्ट-प्राप्तीसाठी दगडी भिंतीतूनही आरपार जायला कमी करत नाही.

या बैठकीमुळे कामाचे चुकीचे वाटप टळते लायकीनुसार, आवडीनुसार काम मिळाल की उत्पादन-क्षमताही वाढते.

मी 'फोर्ड' मध्ये असताना आणि नतर 'क्रायस्लर' मध्येही माझ्या अधिकारातील खात्यांना मी तिमाही बैठका घ्यायला लावल्या. या पद्धतीने मी व्यवस्थापनावर अंकुश ठेवतो. अगदी माझ्याच पद्धतीने तुम्ही जा असा माझा आग्रह नाही. पण मी म्हणतो ते मान्य नसेल तर असे फलित देणारा दुसरा मार्ग शोधा.

निर्णयक्षमता हा व्यवस्थापकाचा आवश्यक गुण. बाकी माझा निर्णय घ्यायचा खाक्या पारपरिकच आहे म्हणा. विक्री आणि सशोधन खात्याच्या अहवालावरच मी उत्स्फूर्त निर्णय घेत असतो. माझ्या अत प्रेरणाना वास्तवाचा आधार असतो. हाती आलेली माहिती निरुपयोगी होण्यापूर्वीच निर्णय घ्यायचा असतो. याचा अर्थ, व्यवस्थापकाला वेळेच भान हव योग्य निर्णयही उशिरा घेतला गेला की चुकीचा ठरू शकतो. परिस्थिती हातावाहेर गेली की व्यवस्थापकाची अवस्था दाडगा कुत्रा सावरू पाहाणाऱ्या बालकासारखी केविलवाणी होते. त्या कुत्र्याच्या मर्जीनुसार त्याला फिरवाव लागत.

निर्णय घेण्यापूर्वी हाती किती तपशिल हवा याला काही मोजमाप नाही. अगदी शभर टक्के माहिती हाती आल्यावरच ठरवू म्हणण्यात हशील नाही. शिवाय, इतर धद्याप्रमाणे मोटारधद्यातही अस्थिरता आहेच.

आता हेच पहाना, मी आता १९८४ मध्ये हे लिहीत आहे. १९८७-८८ मध्ये लोकाना कोणत मॉडेल आवडेल ते आम्ही नक्की केलय. खर तर मला अजून एका महिन्याने लोकाना नक्की काय आवडेल ते सागता येणार नाही

पण माझा स्वभावच हा असा. बेधडक. खुर्चीत बसून न सपणारी धोरण आखण मला जमत नाही.

महत्त्वाचे निर्णय घेताना मी काही माझ्या एकट्याच्याच मनाने घेत नाही. त्यासाठी समिती असतेच सारे काही लोकशाही तत्राने चालते. निर्णय घेतेवेळी मी म्हणतो, 'ठीक आहे मी प्रत्येकाचं म्हणणं ऐकल. आता आपण काय करणार आहोत ते सागतो.'

समित्या हव्यातच. पण त्यानी व्यक्तीची जागा घेता नये. तसं झाल की उत्पादन-क्षमता उतरणीला लागते.

अस्थिर भक्ष्याचा वेध घेणारी बदूक फिरतीच हवी. तेव्हा, अति महत्त्वाचा निर्णय घेताना परिस्थितीनुसार समितीही गतिमान राहणार नसेल तर भक्ष्य केव्हाच उडून जाईल.

व्यवस्थापक निर्णयक्षम हवा तसा तो प्रेरकही हवा. आणि लोकाना प्रेरित करायच असेल तर त्याच्याशी सपर्क साधता यायला हवा. मी फोर्डच्या ट्रक ट्रेनिंगचा व्यवस्थापक होतो तेव्हा कंपनीने मला डेल कार्नेजी सस्थेत वक्तृत्वाचे धडे घ्यायला पाठवल होत. त्याचा मला फारच उपयोग झाला. स्वत च म्हणण पटवून देण्यासाठी अस प्रशिक्षण हवच. मी किती तरी तरुणाना हे प्रशिक्षण घ्यायला लावलय.

'बोलाव कस' हे शिकताना 'ऐकाव कस' हेही शिकलेल बरं. कारण उत्तम व्यवस्थापकाला नीट ऐकून घेताही आल पाहिजे. कारण बोलणी ही नेहमी दुतर्फी असतात तुम्ही लोकाचे ऐकल्याशिवाय त्याना आपल्या कार्याची प्रेरणा देणार कसे आणि उद्युक्त करणार कसे ?

खाजगी बोलणे वेगळे आणि सभेत बोलणे वेगळे. सभेत बोलताना

पूर्ण तयारीनेच जावे आणि ऐकणाऱ्याच्या भाषेतच बोलावे. मग ऐकणारे म्हणतात, 'अरे वा ! हा तर माझेच विचार बोलून दाखवतोय.' मग ते तुमचा आदर करतात. तुम्हाला अनुसरतात. खर तर तुम्हीच त्याचा मागोवा घेत असता, त्याना अनुसरत असता

व्यवस्थापकाला त्याच्या सहकाऱ्याच कौतुक करता याव लागतच. चार्ली बिचमने मला एक कानमंत्र दिलाय– 'एखाद्याला श्रेय द्यायचे असेल तर ते लेखी द्या. त्याला घालवायचे असेल तर फोन वापरा' 'सगळी काम एकट्यान निभावायला बघू नकोस. तू फार तर दोघा-तिघाची काम एकट्यानं झेपवशील पाचपन्नास माणसांची कामं कशी निभावशील ?' तेही खरच. फोर्ड विभागात माझ्या हाताखाली ११ हजार माणस होती.

बिचमने मला लोकांना ध्येय द्यायला आणि ते साध्य करण्यासाठी उद्युक्त करायला शिकवल.

व्यवस्थापकाने सहकाऱ्याला आणि त्या सहकाऱ्याने आपल्या हाताखालच्या माणसांना कार्यसिद्धीसाठी उद्युक्त करता येणे हे महत्त्वाचे.

आजकाल अमेरिकेत व्यावसायिक जगात बहुतेक व्यवस्थापकाकडे भोवळ यावी एवढी माहिती कॉम्प्युटरद्वारा जमा केली जाते. पण तिच काय करावं हेच त्याना उमजत नाही.

क्रायस्लर कार्यालयात माझ्या टेबलवर कॉम्प्युटर नाही याचं लोकाना आश्चर्य वाटत पण यशाची गुरुकिल्ली त्याना 'माहिती' नाही. ती आहे 'माणूस '

आज क्रायस्लरमध्ये माझ्या हाताशी जेमतेम डझनभर तयार माणस आहेत अशी पचवीस तयार माणस हाताशी आली तर अमेरिकेचा गाडाही चालवून दाखवीन.

## मस्टांग

'फोर्ड' विभागाचा जनरल मॅनेजर–म्हणून माझी कारकीर्द हा माझ्या आयुष्यातील सुखाचा काळ भव्य स्वप्न आणि त्यासाठी अपार कष्ट...फार मजा आली

काही उद्योगात काळाच्या फार पुढे असणे हे काळाच्या फार मागे असण्यासारखेच तोट्याचे असते. जे लोकाना हव असत तेच त्याच्या पुढ्यात ठेवणे फायदेशीर ठरते. याचे उदाहरण म्हणजे रॉबर्ट मॅक्नामाराच कार्डिनल मॉडेल.

वाहतुकीची गरज भागवणारी आणि कमी इंधन खाणारी ही कार्डिनल गाडी. तिच इंजिन v–4 चं. फ्रट–व्हिल–ड्राईव्ह तन्त्राची. इंधन वाचवणं ही त्यावेळी अमेरिकन ग्राहकाची गरज नव्हती. शिवाय तिचा आकार फारच छोटा होता सामान ठेवायला जागाही नव्हती. फोर्डच हे मॉडेल एकवेळ युरोपच्या बाजारात खपल असत पण अमेरिकन बाजारपेठेत ते टिकण कठीणच होत. दहा वर्षांनतर जेव्हा अमेरिकेत पेट्रोलचे भाव कडाडले तेव्हा हे मॉडेल बाजारात येते तर विक्री उच्चांकाने कळस गाठते.

नुकतच काही वर्षांपूर्वी फोर्डने एडसेल मॉडेल काढलं होत. त्यात चागलीच फसगत झाली होती. आता त्या लागोपाठ हे कार्डिनल मॉडेलही अगाशी आल तर कपनी डबघाईलाच आली असती.

मी हेन्री फोर्डला भेटलो. कार्डिनल का अयशस्वी ठरेल ते पटवून दिल आणि त्याचवेळी तरुण पिढीला भुरळ पाडील असच मॉडेल बाजारात आणणं का जरुरीच आहे तेही पटवून दिलं

तरुण पिढीची क्रयशक्ती भरमसाट वाढली आहे हे मला जेवढ्या तीव्रतेने जाणवत होतं तेवढं आमच्या कपनीत अन्य कोणाला जाणवत नव्हत आणि आपण तरुण पिढीच मनोगत ओळखून उत्पादन करत आहोत याच श्रेय घेणं आमच्या बॉसला–हेन्री फोर्डला–रुचणार होत कारण प्रे जॉन एफ् केनेडीमुळे देशात तारुण्याचे वारे वाहत होते.

कार्डिनल मॉडेल रद्द झाल.

मग मी फोर्ड विभागातली हुशार न् तेज तरुण मंडळी निवडून गोळा केली आमच्या आठवड्यातून एकदा भोजनभेटी होऊ लागल्या. नव्या मॉडेलसबधी विचारविनिमय सुरू झाला.

याच सुमारास आमच्या जनसपर्क कार्यालयात ग्राहकाची पत्रे येऊ लागली. दोन माणसासाठी योग्य अशा छोट्या गाडीसाठी मागणी होत होती. विक्री सशोधन विभागाच्या अहवालाने 'हे दशक तरुणाचे आहे' हा माझा होरा खरा ठरवला. आणि हा वर्ग कधी नव्हे एवढा वाढला आहे याची ग्वाही दिली. या वर्गाला साधी, कमी इंधनावर चालणारी, वाहतुकीची गरज भागवणारी अशी काटकसरीची गाडी नको होती त्याना हवी होती हौस, चैन भागवणारी मस्त गाडी.

एक काळ असा होता की फोर्डचं एडसेल मॉडेल बाजारपेठ धुंडाळत होत; आणि त्याला ते कधीच गवसल नाही. आणि आता बाजारपेठ मॉडेलच्या प्रतीक्षेत होती. बाजारपेठेला अनुरूप असे मॉडेल घडवण्याची गरज होती.

हे मॉडेल ऐटबाज, नखरेल पण व्यवस्थित काम देणारं आणि कमी किंमतीचं असण भाग होतं. असच मॉडेल बाजारपेठ काबीज करू शकल असत

जनसपर्क विभागाच्या अहवालानेही आमच्या विचारांना दिशा दिली. अहवाल दर्शवत होता की, दोन दोन गाड्या ठेवू शकणाऱ्या कुटुबाची सख्या प्रचड प्रमाणात वाढलीय दुसरी गाडी अर्थातच छोटी हवीय स्त्रियाही मोटारी घेऊ लागल्यात. त्याना छोट्या मोटारी हाताळायला सोयीच्या वाटतात. अविवाहित तरुणही छोटी गाडीच पसत करतात. मुख्य म्हणजे प्रवास आणि करमणूक यावर खर्च करण्यासाठी लागणारा पैसा अमेरिकनांच्या हाती पुरेशा प्रमाणात खेळत आहे

फाल्कन गाडीच रेकॉर्ड पाहिल्यावर लक्षात आलं की ही गाडी कमी किंमतीची, स्वस्त म्हणून बाजारात आणली होती खरी पण त्या गाडीसाठी अधिक सोयी उपलब्ध करून घेणाऱ्या मागण्या वाढल्या होत्या.

ॲटोमॅटिक ट्रान्समिशन, पाढऱ्या पट्ट्याचे टायर्स किंवा अधिक शक्तीचं इंजिन या वा असल्या बदलासाठी ते पैसे मोजायला तयार असत. म्हणजे मग ती छोटी गाडी मनपसत व्हायची.

म्हणजे काय तर अमेरिकन ग्राहक भयंकर काटकसरी. ती काटकसर भागवण्यासाठी तो वाट्टेल तसा खर्च करील.

अटकर बांध्याचं मॉडेल घडवण्याच्या मागे आम्ही लागलो. १९६१ साल सपत आल होतं. आम्ही कालमर्यादा आखून घेतली; एप्रिल १९६४. कारण या महिन्यात न्यूयॉर्कला जागतिक प्रदर्शन भरणार होतं.

१९६२ च्या जुलैत मी नव्या मॉडेलचं डिझाईन निवडण्यासाठी स्पर्धा आयोजली.

डेव अॅशचं मॉडेल निवडल गेलं.

मॉडेलच नामकरण हे एक अवघड प्रकरण. एकवेळ मोटारीचं दार, छत बनवण सोपं पण नाव निश्चित करण कठीण. त्यात पुन्हा यात कुणाची किती भावनिक गुतवणूक असेल सागता येत नाही.

या नव्या मॉडेलसाठी आम्ही इटालियन नावाशी मिळत जुळतं असं नाव निवडलं होतं. पण तेवढयात जनसपर्क अधिकाऱ्याने सावध केलं. 'नको ! हेन्री फोर्ड घटस्फोट घेतोय अन् त्याची प्रेयसी आहे इटालियन !' साहेब लोकाना का दुखवा म्हणून मग नाव बदलल.

शेवटी 'मस्टांग' हे नाव मुकर झाल. मस्टाग ही जगली घोडयाची जात. चपळ आणि शक्तिशाली.

आता स्वस्त गाडी म्हटली तरी ती अगदी गरिबाची असून चालणार नव्हती. थोडा नखरा हवाच. तेव्हा जास्तीत जास्त गरजा भागतील, हव असेल तर थोडा अधिक पैसा मोजून अधिक सोयी साधता येतील अशी रचना ठरवली. किंमत ठेवली २,३६८ डालर्स.

तेवढयात म्हणजे १९६४ च्या जानेवारीत सरकारने आयकरात सवलती दिल्या आणि अमेरिकन लोक थोडे अधिक खर्चिक झाले.

हे नवं मॉडेल प्रदर्शनात पोचण्यापूर्वी आमच्या सर्वच्या सर्व ८१६० डीलर्सकडे ही मोटार पोचलेली असेल असे आम्ही योजले.

न्यूयॉर्क ते डिअरबॉर्न अशी सातशे मैलाची ७० मस्टाग गाडयाची स्पर्धा घेतली. तिच्यात शभर पत्रकारानी भाग घेतला अर्थातच, वारेमाप प्रसिद्धी मिळाली. वृत्तपत्रे, नियतकालिके, दूरदर्शनवरही जाहिराती झळकल्या एकच धमाका उडाला.

पहिल्या वर्षी ७५ हजार मस्टांग गाडया खपतील असा आडाखा होता. पण काही आठवडयातच लक्षात आले की हा आकडा २ लाखाचा आकडा ओलाडणार फोर्डचा दुसरा प्लाटही मस्टाग निर्मितीसाठी वापरावा लागला. आणि लवकरच तिसराही. आमची वार्षिक निर्मितीक्षमता ३ लाख ६० हजार झाली फाल्कन मॉडेल बाजारात आणलं तेव्हा मागणीला पुरून उरेल एवढी उत्पादनक्षमता राखली नाही. आता पुन्हा तीच चूक होऊ देण्यात अर्थ नव्हता

आम्ही पहिल्याच वर्षी फाल्कनचा ४,१७,१७४ चा उच्चांक मोडला. ४,१८,८१२ मस्टाग गाडया विकल्या

ज्याला ज्या अधिक सोयी हव्यात त्या बसवून आणि बदलून घेण्याची सोय ह्या मॉडेलमध्ये होती. अनेक पर्याय होते निवडीला भरपूर वाव होता. मूळ २,३६८ डॉलर्स किंमतीत अधिक एक हजार डॉलर्स घालून नवी सोय करता येत होती.

पहिल्याच वर्षी मस्टागने अकरा कोटीचा नफा दिला.

लोकाची तक्रार एकच, मस्टाग पुरेशा प्रमाणात बाजारात उपलब्ध नाही लोकाची मागणी वाढतच होती.

या मस्टांगने बाजारात धुमाकूळच घातला. मस्टाग गॉगल्स, मस्टांग की चेन्स्, मस्टाग टोप्या, खेळण्यातली मस्टाग गाडी... एवढच नव्हे तर एका बेकरीच्या दारावर पाटी होती–

'आमचे गरम केक मस्टागसारखे विकले जातात.'

दुर्दैवाने काही वर्षांतच मस्टाग गाडी आपले मूळ स्वरूप हरवून बसली. चिकणा अवखळ वाजपणा लोपला. फताड्या डुकरासारखी ती दिसू लागली. १९६९ साली बकी नडसेन फोर्डचा नवा प्रेसिडेंट बनला. त्याने मस्टागची अश्वशक्ती वाढवली. ते इंजिन पेलण्यासाठी गाडीचा आकार वाढवला. १९७१ मध्ये तिची लाबी ८ इंचानी रुदी ६ इचानी आणि वजन ६०० पौंडानी वाढल.

आणि खप उतरत गेला.

१९६६ मध्ये तिचा आकडा साडेपाच लाख होता तर १९७१ मध्ये अवघा दीड लाख आणि किंमत झाली होती ३,३६८ डॉलर्स.

आणि मग मोटार उद्योगाच्या विश्वात जे आजवर घडल नव्हतं ते कराव लागल. प्रस्थापित गाडी सुधारून वाढवली जाते; पण मी ती लहान करण्याच्या उद्योगाला लागलो. आम्ही चूक केली हे कबूल करण्यासारखच होतं ते पण नाइलाज होता.

हाल स्परलिचच्या सहकार्याने मी मस्टाग–२ ची योजना आखली. मस्टाग–२ यशस्वी झाली. पण तरीही मूळ मस्टाग एवढी नाहीच.

¤

मस्टागच्या पहिल्या वाढदिवसापूर्वीच म्हणजे जानेवारी १९६५ मध्ये मला बढती मिळाली. फोर्ड कपनीच्या मोटर आणि ट्रक या दोन्ही विभागाचे उपाध्यक्षपद मिळाले. 'फोर्ड' आणि तिची शाखा 'लिंकन–मर्क्युरी' याच्या सर्व मोटर आणि ट्रक सबधातील योजना उत्पादन आणि विक्री व्यवस्था हे माझ्या अधिकारात आले.

माझ नव कार्यालय आता 'ग्लास हाऊस' मध्ये होत. फोर्ड कपनीत ह्या स्थानाला 'वर्ल्ड हेडक्वार्टर्स' म्हणतात. मी आता या कपनीच्या अत्युच्च वर्तुळात पोहोचलो होतो. हेन्री फोर्ड म्हणजे कपनीचा राजा. त्याच्या दर्शनासाठी आणि कृपादृष्टीसाठी सर्वांची कोण धडपड असायची. या राजाच्या पक्तीचा लाभ दररोज मिळणाऱ्यातला मीही एक झालो.

रॉबर्ट मॅक्नामारा १९६० साली केनेडी प्रशासनात दाखल झाल्याने त्याच्या जागेवर हेन्री फोर्डने माझी नेमणूक केली.

माझी काम आणि जबाबदाऱ्या वाढल्या. विक्री कशी वाढेल हीही एक कायमची चिंता. त्यापायी मी जाहिरात क्षेत्रातही लक्ष घातलं. लिंकनमर्क्युरी शाखेला काही मस्टाग धर्तीची जडीबुटी वापरता येते का ते पाहू लागलो

'फोर्ड' कुटुबातलीही लिंकन मर्क्युरी शाखा एकदम दुबळी होती. वीस वर्षांपूर्वी, म्हणजे १९४० मध्ये, जन्माला आल्यापासूनच तिची रड चालू होती. तिनं बाळस म्हणून काही घेतल नव्हतं. ती काढून टाकावी की काय असा व्यवस्थापनाचा विचार चालू होता.

लिंकन–मर्क्युरी अस्तित्वात आली होती ती किंमती श्रीमंती गाडयासाठी फोर्ड विकत घेणारा ऐपत आली की लिंकन किंवा मर्क्युरी विकत घेईल अशी अपेक्षा होती.

पण फोर्ड घेणारा तिथपर्यंत जाण्याऐवजी 'जनरल मोटर्स'ची ब्युक, ओल्डस् मोबाईल किंवा कॅडिलॅक घेत होता. थोडक्यात, आम्ही जनरल मोटर्सची भावी गिऱ्हाइकं वाढवत होतो.

मी या शाखेची पाहाणी केली तेव्हा लक्षात आल की लिंकन मर्क्युरी गाड्या वाईट होत्या किंवा चागल्या नव्हत्या अस नव्हे. पण त्याच्यात वैशिष्ट्य, नावीन्य अस काहीच नव्हत. छोट्या फाल्कन किंवा फोर्ड गाड्याचीच मोठी आवृत्ती असं त्यांच स्वरूप होत. परिणामत: त्याचा बाजार भुईसपाट झाला होता. या शाखेच आता पुनरुज्जीवन होणं भाग होत.

या शाखेच्या गाड्या खपत नव्हत्या यात डीलर्सचाही दोष नव्हता पण त्याच्यात या गाड्याविषयी उमेद-उत्साह नव्हता.

दोन वर्षं खटपट करून १९६७ मध्ये आम्ही दोन नवीन मॉडेल्स बाजारात आणली. मर्क्युरी कामगर आणि मर्क्युरी-मार्क्विस श्रीमती थाटाच्या, नखरेबाज, आरामशीर-ऐश्वर्याचा गड पोसणाऱ्या या गाड्या.

त्याच्या प्रथम-दर्शनाचा समारभ नाट्यपूर्ण, सनसनाटीचा असा केला.

मधल्या काळात डीलर्स एकत्र यावेत, आपला त्याच्याशी सपर्क वाढावा, सलोखा वाढावा म्हणून मी अनेकदा सहली, मेजवान्या आयोजित केल्या.

याचा अपेक्षित परिणाम घडून आला. डीलर्समध्ये उत्साहाचे वारे वाहू लागले. 'ग्लास हाऊस' मधला साहेब आपल्या पाठीशी आहे, आपल्या हिताचा विचार करतोय या अनुभवाने ते सुखावले. विक्री खात्याच्या फ्रँक झिमरमानने मला या कामी फार मोलाचे सहकार्य दिले. महाडोकेबाज आणि धडपड्या गृहस्थ. खप वाढवण्यासाठी काय अफलातून शक्कल लढवील ते सागता येत नसे. एकदा तर जाहिरातीत त्याने ख्रिस्तोफर कोलबसालाही बसवला. 'ख्रिस्तोफर कोलबसाने आत्ताच नवी मर्क्युरी शोधलीय' म्हणे.

आमच्या जाहिरात एजन्सीनेही अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग केले 'तुमची गाडी इतर गाड्याच्या तुलनेत श्रेष्ठ आहे असे म्हणता तर ते सिद्ध करा' अस आम्हाला ते लोक म्हणाले. तेव्हा आमच्या तत्र-ज्ञानी एजन्सीवाल्याना डोळे बांधून ओल्डस् मोबाईल, ब्युक, कॅडि-लॅक आणि मर्क्युरी मार्क्विस अशा वेगवेगळ्या गाड्यातून पाळी-पाळीने फिरवले. सर्वांनी मार्क्विसला पहिला क्रमाक दिला.

ह्या परीक्षेचीच मग जाहिरात झाली. पोटातल पाणीही हलू न देणाऱ्या या गाडीच्या नाना जाहिराती आल्या. चालत्या मार्क्विस गाडीत दाढी करणारा न्हावी किंवा फोनोग्राफवर फिरणारी तबकडी, खडबडीत रस्त्याच्या बाकदार वळणावरही चालत्या गाडीत आरा-मात हिऱ्याला पैलू पाडत बसलेला कारागीर, अशा एक ना अनेक.

मर्क्युरीच्या मार्क्विस आणि कामगर गाड्याची बाजारपेठ वधा-रली आता मी लिंकनवर लक्ष वळवल. त्या प्लँटमध्ये कॅडिलॅकच्या तोडीचं एखाद मॉडेल घडवायच होत या शाखेने पूर्वी मार्क, मार्क-२ अशी उत्तम मॉडेल्स बाजारात आणली होती आणि त्यानी व्यापारही उत्तम केला होता. अमेरिकन मोटार उत्पादनातल्या या रोल्स राईस म्हणायच्या. लोकाचं मोटारीबद्दलच स्वप्न साकार करणाऱ्या या गाड्या. पण फारच थोड्याना परवडणाऱ्या

मग मी १९६८ मध्ये मार्क-३ मॉडेल बाजारात आणल त्याने पहिल्याच वर्षी कॅडिलॅकवर मात केली पुढची पाच वर्षं आमची सुगीच चालू होती. आमच्याच आधीच्या गाड्यासाठी तयार असलेले बरेचसे भाग वापरून आम्ही हे नवं मॉडेल घडवल होतं त्यामुळे उत्पादन खर्च आमच्या मर्यादेत राहिला.

या मार्क-३ चा अवतरण समारभही आम्ही झोकात केला.

मोटार व्यवसायात एक असतं, तुम्ही एक मोटार घडवा नाही तर लाखभर घडवा. तुम्हाला कारखाना हा उभारावाच लागतो. त्यामुळेच, तुम्ही उत्पादनाचं लक्ष्य गाठून बाजारपेठ काबीज केलीत तरच तुम्हाला पैसा दिसतो. नाही तर सार बुडीत जात.

मार्क-३ बाजारात येण्यापूर्वी लिंकनमर्क्युरी शाखा तोट्यात होत्या. वर्षभरात जेमतेम १८ हजार लिंकन खपत. व्यवहार आत-बट्याचा होत होता.

मार्क-३ चा खप वाढला. प्रत्येक गाडीमागे आम्हाला २ हजार डॉलर्स सुटू लागले. आणि तेही एवढ्या वेगाने की त्यांचा हिशेब ठेवता ठेवता तारांबळ उडू लागली. एकट्या लिंकन शाखेने आम्हाला एक अब्ज नफा दिला. हे माझ्या आयुष्यातलं अपूर्व आणि संस्मरणीय यश.

मग १९७१ मध्ये मार्क-४ काढली. अलीकडेच फोर्डने याच मालिकेत मार्क-७ काढलीय मार्क ही आता फोर्डची सर्वात मोठी कमावती गाडी.

मोटार व्यवसायातील सर्वमान्य तज्ज्ञ म्हणतो त्याप्रमाणे 'प्रत्ये-काला काही तरी देण्यासारख तुमच्याकडे हवच. मग तो ग्राहक कामगार असो नाही तर उद्योगपती.' अमेरिकेत एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते-इथला श्रीमत हा श्रीमतच होत जातो. अगदी आर्थिक मदी असली तरीही. तेव्हा त्याची मिजास राखण्यासाठी तुमच्याकडे काही तरी हवच.

## यशाच्या शिखराकडे

१९६८ सालापर्यंतची माझी ही अशी वाटचाल. अशा या कर्तब-गारीनतर मी आता कंपनीचा प्रेसिडेंड होण्यासाठी लायक झालोय अशी माझी खात्रीच झाली होती. ते शिखर आता अगदी दोन पावलावर होत.

आणि तेवढ्यात बकी नडसेन आडवा आला. बकी जनरल मोटर्स-मध्ये व्हाईस प्रेसिडेंट होता. त्याला डावलून जनरल मोटर्सने दुसऱ्या-लाच अध्यक्ष केल तेव्हा बकीने राजीनामा दिला.

जनरल मोटर्सच्या कारभारावर हेन्री फोर्ड बारकाईने लक्ष ठेवून असे. त्याने बकीला गाठल. ही भेट आणि ती मागील आपली इच्छा कोणाला समजू नये आणि वृत्तपत्राना तर तिचा मुळीच सुगावा लागू नये, म्हणून हेन्री फोर्ड अगदी जेम्स् बॉण्ड स्टाईलने बकीला भेटला. गेली पाच वर्षे आर्जे मिलर 'फोर्ड'चा प्रेसिडेंट होता. त्याला व्हाईस चेअरमन करून हेन्रीने बकीला प्रेसिडेंट केले

मला हे सार जरा लागलच; पण हेन्रीने माझी समजूत घातली की तू अजून लहान आहेस. जनरल मोटर्ससारख्या कपनीतला हा वरिष्ठ पातळीवरचा माणूस आपल्या फायद्याचा आहे. नंतरची पाळी तुझीच. तू तर आमचाच आहेस अजून खूप शिकून घे. इ इ.

आमच्या सचालक मडळातील एका मित्राने मला टिप देऊन

ठेवली–घाबरू नकोस. हा वर्षभरापेक्षा जास्त टिकणार नाही. जनरल मोटर्सचं व्यवस्थापन त्याला कटाळलेलच होतं. इथेही हा फार काळ टिकायचा नाही

यावेळी राजीनामा द्यावा असा विचार मनात तरळून गेला पण एकतर मोटार व्यवसाय मला अतिप्रिय आणि फोर्ड मोटार कंपनीवर माझा जीव शिवाय हेन्री फोर्डने मला शब्दही दिला होताच. मी धीराने घ्यायचं ठरवल.

या बंकी नडसेननेच मस्टांगची वाट लावली. तिला मोठी वजनदार करून ग्राहकांच्या मनातून उतरवली. फोर्डच्या पूर्वीच्या थंडरबर्ड मॉडेलला पाँटिआकचा बाज द्यायला गेला, तिथेही फसला हे अपयश आणि पुन्हा तो काही हेन्री फोर्डची अपेक्षापूर्ती करू शकला नाहीच.

हेन्रीला वाटत होत, बंकी आपल्याबरोबर जनरल मोटर्सचे तज्ज्ञ लोक इकडे पळवून आणील. तेही घडल नाही. तसच प्रेसिडेंट म्हणून कंपनीवर तो जमही बसवू शकला नाही. शिवाय मी व माझे सहकारी याविषयी त्याला अविश्वास.

बंकी फक्त १९ महिने टिकला. मात्र तो जाण्यामागचे कारण वरीलपैकी एकही नव्हते. ते कारण हेन्री फोर्डच्या मदतनिसाने सांगितले– कोणतीही पूर्वसूचना न देता बंकी सरळ हेन्रीच्या कार्यालयात घुसत असे. हेच हेन्रीला सहन होत नसे.

हेन्री कंपनीचा राजा. त्याला इतर कोणी आपल्या बरोबरीने वागलेले मानवणारे नव्हते. हे बंकीला कधीच उमगले नाही. तो हेन्रीशी बरोबरीने वागायला गेला आणि हेन्रीच्या मर्जीतून उतरला.

चार्ली बिचमने मला एक बजावून ठेवल होत– 'फोर्डमध्ये काम करताना एक गोष्ट कायम लक्षात ठेव. त्याच्या सिंहासनाच्या जवळपासही फिरकायच्या भानगडीत पडू नकोस.'

राजा हेन्रीने बंकीची हकालपट्टी केली तेव्हा माझ्या भावना संमिश्र होत्या. माझी संधी जवळ आली होती म्हणून आनंदित झालो होतो खरा पण ज्या तऱ्हेने आणि ज्या प्रकाराने कंपनीचा प्रेसिडेंट काढून टाकला जातो ते पाहून वैषम्यही वाटले.

नेहमीप्रमाणेच हेन्रीने हे घाणेरडे काम स्वत: न करता दुसऱ्याच्या हातून करवले. जनसंपर्क खात्याचा उपाध्यक्ष टेड मेकद्वारे हा निरोप बंकीकडे पोचवला. हा सारा प्रकार उबग आणणाराच होता. पुन्हा एकदा राजीनामा देण्याची उबळ मला आली. पत्नीशी मी तसं बोललोही. तेव्हा तीही सहमत झाली. पण पुन्हा विचार बदलला. राहिलो.

अखेरीस १० डिसें. १९७० रोजी मी फोर्ड कंपनीचा प्रेसिडेंट झालो.

मी प्रेसिडेंट झालो त्यावेळी फोर्ड मोटार कंपनीत ४,३२,००० कामगार होते. १९७० सालची एकूण विक्री १५ अब्जाच्या जवळपास होती. आमचा नफा ५१ कोटी ५ लक्ष डॉलर्स. म्हणजे विक्रीच्या साडेतीन टक्के. पण १९६० मध्ये तो पाच टक्के होता. पुन्हा त्या टक्क्यांवर पोचायचं मी ठरवलं

अधिक नफा कमावण्याचे मार्ग दोन : अधिक विक्री किंवा उत्पादन खर्चात काटछाट आमची विक्री व्यवस्थित चालू होती म्हणून खर्चात काटछाट करायचे मी ठरवले. ही काटछाट कशाप्रकारे केली याचे एक साध उदाहरण पाहा– मोटारीची पार्सलं बांधताना पॅकिंग थोड घट्ट केल्यावर त्याचा आकार दोन दोन इंचांनी कमी झाला. त्याबरोबर वाघिणीत अधिक मोटारी बसू लागल्या. प्रचंड प्रमाणावर जेव्हा व्यापार चालतो तेव्हा अर्ध्या–पाव टक्क्याच्या पोटात वीस पंचवीस लाख डॉलर्स अडकलेले असतात

उत्पादन तंत्रात, वाहतूक खर्चात कपात केली तशी तोटयात चालणारी बारकीसारकी खातीही बंद केली. सांगायचच झालं तर फिल्को इलेक्ट्रॉनिक खात १९६१ मध्ये 'फोर्ड'ने ही छोटी कंपनी सुरू केली पण ती फारच तोटयात चालली होती. व अशा प्रकारची एकूण वीस प्रकरणे निघाली. त्यात एक लाँड्री विभागही होता. हे सार मी बंद केले.

वाचवलेला पैसा हा कमावलेल्या पैशासारखाच असतो. आमचे आकडे बहाद्दर माझ्यावर बेहद्द खूश.

हा काळ फार घाईगर्दीचा नि धक्काधकीचा गेला खरं पण माझा प्रत्येक शनिवार–रविवार मी माझ्या कुटुंबियासाठीच राखला.

हेन्री फोर्ड राजा होता तर मी युवराज.

हा राजा हेन्री एकदा सपत्निक माझ्या घरीही आला होता. माझे आई–वडीलही त्यावेळी माझ्याच घरी आलेले होते अर्धी रात्र उलटेपर्यंत हेन्री माझ्या वडिलांसमोर माझे गुणगान गात होता. तो एकदा मला त्याच्या मित्राकडे – प्रे. एल्. बी. जॉन्सनकडेही–घेऊन गेला होता.

एकूणच ते दिवस फार सुखासमाधानाचे होते. मी आणि माझे साथीदार अगदी स्वर्गसुख अनुभवत होतो म्हणा ना. ग्लास–हाऊसमधल्या भोजनगृहाचा सगळा थाटच राजेशाही ! जगातली सर्वोत्कृष्ट सेवा आम्हाला तिथे लाभत होती तोंडातून शब्द काढायची खोटी की वस्तू, पदार्थ ताटात हजर. इंग्लंडच्या डोव्हरमधून रोज खास विमानाने उत्कृष्ट मासा मागवला जायचा म्हणजे बघा जगभरची उत्कृष्ट फळ समोर हजर असायची. मग त्याचा मोसम चालू असो–नसो. सर्वसामान्यपणे १०४ डॉलर्सची थाळी आम्हाला अवघ्या २ डॉलर्सना लाभत होती

पण आमचा राजा हेन्री मात्र साध्या हॅंबर्गरवरच पोट भागवायचा. वर्षाकाठी ४० हजार डॉलर्स वसूल करणाऱ्या त्याच्या खाजगी बल्लवाचार्याला ग्लास–हाऊसमधल्या चवीचा हॅंबर्गर साधत नाही अशी त्याची तक्रार होती.

## बिघडले स्वर्गाचे दार

मी अत्युच्च वर्तुळात समाविष्ट होताच आजवर अलभ्य असणारा राजा हेन्रीच्या दर्शनाचा लाभ मला वारंवार घडू लागला...त्याची अधिकाधिक ओळख होत गेली आणि कंपनीच्या आणि माझ्या भवितव्याची मला काळजी वाटू लागली.

सत्तेचा अमर्याद वापर हा त्याच्या हाडीमासी रूजलेला. कधी तो कोणाला उचलेल आणि कोणाला आपटेल हे सांगता येणे कठीण. त्यामुळे त्याची मर्जी सांभाळायला साऱ्यांची धावपळ. तो सामोरा आला किंवा बैठकीत प्रवेशला की वातावरणच बदलून जाई.

मी प्रेसिडेंट झालो तेव्हा या हेन्री फोर्डने मला गुरुमंत्र दिला होता– 'कोणी माणूस तुझ्यासाठी खपत असेल तर त्याला निर्धास्तपणे जगू देऊ नकोस. सुरक्षित वाटू देऊ नकोस त्याचा अपेक्षाभंग होत राहील असाच वाग. म्हणजे मग तो कायम अस्वस्थ आणि चिंतामग्न राहील.'

हे असं त्याला का वाटत असावं ?

त्याला कधीच कोणत्या कामासाठी झोकून द्यावं लागलं नाही म्हणून ! आयतं सारं मिळत गेलं म्हणून ! त्याला भेडसावणाऱ्या असुरक्षिततेमागचं कारण काय ? कदाचित् त्याचं बालपण त्याच्या आजोबाने–पहिल्या हेन्री फोर्डने–फार कडेकोट बंदोबस्तात जाऊ दिलं म्हणूनही असं असेल. त्यामुळेच तर तो कोणावर विश्वास टाकायला धजत नसेल !

तो कधीच कोणत्या गोष्टीचा लेखी पुरावा ठेवत नाही कागदपत्रे, फाईल हा प्रकार त्याच्या बाबतीत संभवत नाहीच कशावर स्वाक्षरी, सही म्हणून देणार नाही.

प्रे. निक्सनला राजीनामा द्यायला लावणारे 'वॉटरगेट' प्रकरण घडल्यावर तो म्हणाला– 'बघा, मी काही लेखी पुरावा ठेवू नका म्हणतो ते यासाठीच.'

त्याने त्याचे एक उत्तम छायाचित्र मला भेट म्हणून दिलं. मी त्याची स्वाक्षरी मागितली तेव्हा या गृहस्थाने टाळाटाळच केली जणू काही माझ्या विरोधात कधी उभं राहावं लागलं तर मैत्रीच्या ओळख्याचा जराही पुरावा मागे नसावा म्हणून ही दक्षता.

□

१९७३ साली अरब–इस्रायली झगडा सुरू झाला आणि पेट्रोलचे भाव कडाडले. आणि त्याचे दुष्परिणाम अमेरिकेत मोटार कंपन्यांना भोगावे लागले. गाड्यांचा खप सपाट झाला. छोट्या, कमी इंधन खाणाऱ्या, फ्रंट–व्हिल–ड्राईव्ह गाड्यांची मागणी वाढली तशी जपान्यांचं फावलं. त्यांच्याकडे अशा गाड्या पूर्वीपासूनच विक्रीसाठी होत्या; त्यांचा खप झपाट्याने वाढला.

आम्हालाही आता अशा गाड्यांचा विचार करणं निकडीचं होतं. पण आमच्या हेन्रीला छोट्या गाड्या म्हटलं की घशात घास अडके. लहान गाडी म्हणजे कमी नफा. पण आपण युरोपात विकण्यासाठी तरी लहान गाड्या बांधू या. तिथल्या अरुंद रस्त्यांना आणि महाग पेट्रोलला त्याच सोयीच्या असे मी त्याला पटवून दिले आणि ते त्याने पटवून घेतले.

मी आणि हाल स्पर्लिचने मिळून तीन वर्षांत फिएस्टा हे नवं मॉडेल बाजारात उतरवलं. युरोपात त्याचा प्रचंड खप झाला.

१९७९ मध्ये आम्ही अमेरिकेतील बाजारपेठेसाठी फिएस्टा मॉडेल उभं करायचं ठरवलं. कारण अमेरिकेत छोट्या जपानी गाड्यांची आयात वाढली होती जनरल मोटर्स आणि क्रायस्लर मोटर कंपनीने छोट्या गाड्या काढून आघाडी घेतली होती. फोर्डकडे तसं काहीच नव्हतं.

फिएस्टात थोडा बदल करून आम्ही वुल्फ मॉडेल घडवलं.

जपानमधील होंडा कंपनीच्या सहकार्याने या गाड्यांचं उत्पादन करण्याचा सविस्तर प्रस्ताव मी हेन्रीपुढे मांडला.

युरोपवर मनस्वी प्रेम असणाऱ्या हेन्रीला जपानचा मात्र विलक्षण राग होता. त्याने माझा प्रस्ताव फेटाळला.

अमेरिकेतलं 'वॉल स्ट्रीट' आणि युरोप ही राजा हेन्रीने स्वतःसाठी खास राखून ठेवलेली क्षेत्रं. या क्षेत्रात आपला सहकारी वरचढ होऊ नये, आपल्या प्रभावाला जराही धक्का लागू नये म्हणून तो दक्ष असे.

१९७४ मध्ये आम्ही वरिष्ठ व्यवस्थापक न्यूयॉर्कला बँकर्स, भागधारक, शेअर दलाल यांच्या बैठकीसमोर बोलण्यासाठी गेलो. आणि हे असे काही प्रथमच गेलो होतो अशातला भाग नाही. प्रत्येक सार्वजनिक कंपनीला व्यापाराचा एक भाग म्हणून तसे करावेच लागते. (आमची कंपनी १९५६ मध्ये पब्लिक लिमिटेड झाली.)

या बैठकीसमोरच्या आपल्या भाषणात हेन्री थोडा बहकलाच. मग त्याला सावरून घेणारे भाषण मी केले

आणि हीच बहुधा माझ्या शेवटाची सुरुवात.

कारण या बैठकीनंतर लागलीच सॅनफ्रान्सिस्को आणि शिकागो इथे अशा सभा व्हायच्या होत्या. त्या राजा हेन्रीने तडकाफडकी रद्द केल्या.

तसं म्हणाल तर मला प्रसिद्धी मिळू नये अशा मताचा तो नव्हता. 'न्यूयॉर्क टाईम्स् मॅगझिन'च्या मुखपृष्ठावर माझं छायाचित्र आलं तेव्हा मी रोमला होतो. तिथल्या हॉटेलात मला हेन्रीची अभिनंदनाची तार मिळाली. पण त्याच्या राखीव क्षेत्रात मी वरचढ ठरलो. माझी चाहा झाली हे त्याला खपलं नाही.

कंपनीच्याबाबतीत काय किंवा सरकारच्या बाबतीत काय त्याचा कारभार मनमानीच. आपला खाजगी प्रवासखर्च तो कंपनीच्या माथी मारी आणि आयकर भरण्याची टाळाटाळ तर नेहमीचीच

रेनसान्स सेंटर उर्फ रेनसेन हे प्रकरण तर फारच विलक्षण.

अनेक उद्योगधंदे डेट्राईटमधून बाहेर गेले तेव्हा डेट्राईटची शान राखायला हेन्रीने हे संकुल उभारायचं ठरवलं. कार्यालये, भांडारगृहे, जगातील सर्वांत उंच हॉटेल यांना सामावून घेणारे संकुल उभारण्याच्या खटपटीला तो लागला. फोर्ड समूहाने साठ लाख डॉलर्सची देणगी कबूल केली हा आकडा शेवटी दहा कोटींवर पोचला म्हणतात. शिवाय त्या संकुलात फोर्डचं कार्यालय उभारलं गेलं. तिथे काम करण्यासाठी आमचे शेकडो कर्मचारी हलवावे लागले. या यातायातीत खर्च झाला तो वेगळाच. अर्थात फोर्डच्या एकूण उलाढालीत हे आकडे नगण्यच. एवढं होऊनही रेनसेनचं काम आटोक्यात आलं असं झालं नाहीच. अन्य उद्योगपती, उद्योगसमूह यांच्याकडून देणग्या मिळवण्यासाठी खास माणसं रवाना झाली.

हे सारं घडत असताना आमचे पत्रकारमित्र कुठे बरं हरवले होते !

मोटार व्यवसायातील या राजाकडे बोट दाखवायला कोणी धजावत नव्हतं, हे खरं.

स्वारी जरा खुशालचेंडूच. मदिरा, मदिराक्षी आणि संगीत यात त्याला विलक्षण रस वाईनची तिसरी बाटली एकदा त्याच्या पोटात रिचली की त्याचा मुखवटा गळून पडे.

बिचम आणि मॅक्नामारा यांनी मला फार पूर्वीच लाल कंदील दाखवून ठेवला होता. 'सांभाळ, हा एकदा दारूच्या आहारी गेला की

त्याच्या वाऱ्यालाही उभा राहू नकोस. त्याच अब्जावधी डॉलर्सचं नुकसान केलस तरी तो तुला उडवणार नाही पण एखाद्या दिवशी दारूच्या नशेत, तू इटालियन म्हणून, जातिवाचक शिव्या देईल आणि तू उसळशील. मग काहीच जमणार नाही'

त्याच्या अशा बदलत्या मुखवटयाचा अनुभव मी घेतलेला आहेच. एक आठवण सांगतो. १९७४ मध्ये एका सभेत त्याने कृष्णवर्णियानाही कर्मचारी वर्गात मोठ्या प्रमाणात सामावून घ्यावे, त्याना समान संधी द्यावी म्हणून हिरीरीने आपले विचार मांडले. उपस्थित व्यवस्थापकाना समज दिली. हृदयाला हात घालणारं, डोळे ओलावणार ते भाषण ऐकून मी धन्य झालो.

सभा संपल्यावर आम्ही व्यवस्थापक आमच्या भोजनगृहात गेलो. मी त्याच्या शेजारीच बसलो होतो. तेव्हा हाच गृहस्थ आपले तळमळीचे भाषण विसरून कृष्णवर्णीयाना लाखोली वाहू लागला. जिथे त्याची सावलीही अंगावर पडणार नाही अशा ठिकाणी निवृत्तीनतर वास्तव्य करणार म्हणाला.

तेव्हाच माझ्या लक्षात आले की आपण एक कमअस्सल, भोंदू माणसासाठी खपतोय

माझ्या फोर्डमधल्या कारकिर्दीत त्याने कधी इटालियनाचा उद्धार केला नाही खरा. पण तिथनं मी निघताच त्याने वचपा काढला असणारच.

## १९७५ दुर्दैवी वर्षं

हेन्री फोर्डच्या छातीत दुखू लागलं आणि त्याला काळजीन घेरलं. आपल्या पश्चात हा इटालियन घुसखोर आपल्या घराण्याच्या मालकीची ही कंपनी गिळकृत तर करणार नाही? त्याला माझा काटा काढायचा होता.

ढासळलेली तब्येत, मोडीत निघत असलेला विवाह आणि फोर्डमधला वाढता तोटा यामुळे हेन्रीचा धीर सुटू लागला. तो धास्तावला.

आता माझे फोन चोरून ऐकू जाऊ लागले माझ्या गैरहजेरीत माझ्या फायलींची उचकाउचक होऊ लागली

कंपनीत अंत:स्थ लाथाळी सुरू झाली. ही वृत्तपत्राना जाणवली नसली तरी डीलर्सना तिची चाहूल लागलीच. १० फेब्रु १९७६ च्या त्याच्या बैठकीच्या मिनिट-बुकात त्यानी 'फोर्ड कपनीच्या वरिष्ठ वर्तुळात राजकारण चालू आहे, त्याची झळ डीलर्स मडळीना लागत आहे' असा स्पष्ट उल्लेख केलाय.

डीलर्समडळीचा पाठिंबा माझ्या पारड्यात पडतोय हे हेन्रीला जाणवताच आगीत तेल पडलं.

मला अतिशय दुःखद अनुभव दिला तो फुगाझी प्रकरणाने. बिल फुगाझी हा माझा स्नेही. सन्मित्र. याची न्यूयॉर्कमध्ये प्रवासी कंपनी होती. पण हा फुगाझी कुप्रसिद्ध माफिया टोळीतलाच गुंड आहे असा संशय व्यक्त करून त्याला त्याने माझ्याकरवी उडवले.

लवकरच माझ्या ध्यानी आले की हेन्रीच्या पुढच्या डावपेचातली ही एक चाल होती. त्याचं खर निशाण मीच होतो. ली अयाकोका.

याहीवर कळस चढवला तो त्याने वीस लाख डॉलर्स खर्च करून नेमलेल्या चौकशी आयोगाने.

ऑगस्ट १९७५ मध्ये लास वेगासला फोर्ड डीलर्स मडळीची बैठक झाली. त्यानिमित्त झालेल्या खर्चाची शहानिशा करण्याच्या मिषाने हे ऑडिट होते. वेन्डेल कोलमन ह्याने ह्या बैठकीचा हिशेब ठेवला होता. त्याची कसून झडती घेण्यात आली. नाना उलट सुलट प्रश्न विचारले गेले. त्या प्रश्नाचं स्वरूप पाहता या आयोगाचा हेतू समजत होता. सारा रोख होता तो माझ्यावर. मी कुठे बाई, बाटली, जुगार या भानगडीत अडकू शकतो का हे शोधण्यावर.

ह्या आयोगाच्या निमित्ताने हेन्रीने माझ्या व्यावसायिक आणि खाजगी जीवनाचा कसून शोध घेतला. यासाठी पचावन्न जणांच्या मुलाखती घेतल्या.

पण हा सारा खटाटोप वायाच गेला.

हा आयोग चालू असताना कपनीतल वातावरण तंगच होतं. जो तो संशयाच्या छायेत वावरत होता. अस्थिर आणि उन्मनस्क मनःस्थितीत जगत होता.

वारसा हक्काने मालमत्ता मिळवून मातबर झालेला एक माणूस बाकीच्यांचे जीव टांगणीला लावत होता

ह्या वेळी खर तर मी कपनी सोडायला हवी होती ..पण नाही सोडली.

या चौकशी आयोगाने हेन्रीच्या हाती काहीच दिलं नाही. माझे चाहते आणि मित्र म्हणाले-' सुटलास!' मी म्हटलं-नाही. त्याच्या मूर्खपणाने तो उघडा पडलाय...आत्ताच खरा त्रास सुरू होणार आहे.'

## अखेरचा वार

मी १९७५ मध्येच कपनी का सोडली नाही आणि हेन्री फोर्डने जे भवितव्य वाढून पुढे आणलं ते मी का स्वीकारलं, ते कळत नाही.

जेव्हा मला मनस्ताप असह्य व्हायचा तेव्हा मी माझे मन कागदावर मोकळे करत असे. माझी पत्नीही म्हणायची, सगळ्या नोंदी ठेव. त्या साऱ्यांचा उपयोग आज हे पुस्तक लिहिताना होतोय.

मी फोर्डमध्ये का राहिलो? एक तर अन्य कुठे नोकरी करणं याची कल्पनाही मला सहन होत नव्हती. माझी ऐन उमेदीची वर्षं मी याच कपनीत घालवली होती मस्टांग, मार्क-३, फिएस्टा ही माझी अपत्य. माझा एक चाहता वर्गही तयार झाला होता. डीलर्स आणि सुटे भाग पुरवणारे याचा एक गट माझ्या पाठीशी होता. माझ्या कर्तृत्वाचा प्रभाव त्याच्यावर होताच. आणि मला मनापासून खात्री होती की आमची कपनी आता खाजगी नसल्याने लायक माणसाचीच सरशी होणार.

फोर्ड कपनीत माझी किंमत काय ते मी जाणून होतो. हेन्रीपेक्षा निश्चितच ती अधिक होती. तेव्हा माझीच सरशी होईल असा विश्वास मला होता.

दुसरं म्हणजे-माझी हाव. अध्यक्षपदाची झिंग. आनुषगिक मानमरातब. यामुळे मी सुखावलो होतो. सुस्तावलो होतो. माझा पीळ ढिला पडला होता.

वार्षिक ९ लाख ७० हजाराचा तनखा लाथाडून जायला मन धजावत नव्हतं. त्यामुळेच वास्तवाकडे काणाडोळा करत होतो.

मोह हा माणसाचा महाशत्रू.

दरम्यान, हेन्री मला उडवायची तयारी करत होताच. चौकशी आयोगाने हाती काही दिल नाही म्हणून माझी एक एक बाजू खच्ची करू लागला.

एक एक बाजू म्हणजे माझे एक एक दिलदार साथी...सहकारी... चाहाते.

बिल वीन, हाल स्पर्लिच.

डेट्राईटमध्ये म्हणायचे या हालच्या नसातून पेट्रोल वाहतय. दर्दी अन् जाणकार. गेली दहा वर्षं मला साथ देणारा. मस्टाग आणि फिएस्टाच्या घडणीत सहभाग उचलणारा.

याच हाल स्पर्लिचला उडवण्याची कामगिरी हेन्रीने माझ्या कपाळी मारली मी हेन्रीला समजवण्याचा खूप प्रयत्न केला...खूप हुज्जत घातली. पण उपयोग झाला नाही

हे हाल स्पर्लिचच्या जिव्हारी लागलं. आपल्या गुणावर आणि कर्तबगारीवर आपण फोर्डमध्ये जम बसवू असा त्याचा विश्वास होता. पण फोर्डमध्ये लोकशाही नव्हती हुकूमशाही होती तिथे त्याचा पाड लागला नाही

पण झालं ते बऱ्यासाठीच म्हणायच. हेन्रीने उडवताच क्रायस्लरने त्याला झेलले तिथे त्याच्या कर्तृत्वास उत्तम वाव मिळाला, आणि काय सांगू, दोन वर्षं जातात न जातात तोच मीही क्रायस्लरचा प्रेसिडेंट झालो आणि आम्ही पुन्हा एकत्र काम करू लागलो.

जे हेन्री फोर्डने आपल्या कपनीत हालला करू दिल नाही ते त्याने क्रायस्लरमध्ये केलं छोटया गाडयाची पैदास फ्रट-व्हिल-ड्राईव्हची सोय असणाऱ्या या गाडयानी फोर्ड मोटारीची बाजारपेठ आधाशासारखी गिळकृत केली.

◘

१९७७ मध्ये हेन्री नवी चाल खेळला. व्यवस्थापन तज्ज्ञाच्या सल्ल्याने फोर्ड कपनीच्या वरिष्ठ वर्तुळाची फेररचना केली.

महिनाभर अभ्यास करून आणि गाडाभर पैसा खाऊन या तज्ज्ञानी नवी रचना सुचवली होती. त्यानुसार चेअरमन आणि प्रेसिडेंट याच्या मध्ये व्हाईस चेअरमन घुसला हेन्री फोर्ड चेअरमन आणि तोच चीफ् एक्झिक्युटिव्ह ऑफिसर व्हाईस चेअरमन म्हणून काल्डवेल आणि मी प्रेसिडेंट इथवर ठीक होत. पण हेन्रीने खास फतवा काढून आदेश जारी केला त्याच्या गैरहजेरीत व्हाईस-चेअरमन हा चीफ् एक्झिक्युटिव्ह ऑफिसर म्हणून काम पाहिल. याचा अर्थ मी दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर फेकला गेलो.

म्हणजे मेजवानी, पार्टीच्या प्रसगी पहिल्या टेबलाच्या शिरोभागी हेन्री, दुसऱ्याच्या काल्डवेल आणि तिसऱ्याच्या मी. ही माझी जाहीर अवहेलनाच होती. माझ्या पत्नीला आणि मुलीना याचा फार मनस्ताप झाला.

एवढ होऊनही मी बाहेरच्या जगात गुहछिद्र झाकण्यासाठी नव्या त्रिसदस्य पद्धतीची भलावणच करत होतो.

दीड वर्ष गेल्यावर हेन्रीने आणखी एक बदल घडवून आणला. आपल्या धाकटया भावाला, विल्यम उर्फ बिल फोर्डला, उच्च वर्तुळात समाविष्ट केले. म्हणजे आता मी चौथ्या स्थानावर घसरलो. हा बदल कार्यवाहीत येण्याच्या आदल्या दिवशी समजला.

मी याविषयी तक्रार करायला हेन्रीकडे गेलो तेव्हा तो म्हणाला, 'हा माझा आणि सचालक मडळाचा निर्णय आहे '

चार दिवसानतर हेन्री सचालक मंडळाच्या नऊ जणाना भेटला. मला काढून टाकणार असल्याचे त्यांना सांगितले. त्या सर्वांनीच त्याला विरोध केला.

महिनाभर धीर धरून पुन्हा त्याने सचालक मडळाची बैठक बोलावली पुन्हा तेच जाहीर केल. अनेकांनी ठासून विरोध केला. तेव्हा 'हेन्री किंवा अयाकोका' असा पर्याय समोर ठेवून तो बैठकीतन चालता झाला.

त्याच रात्री 'ऑटोमोटिव्ह न्यूज'च्या प्रकाशकाचा मला फोन आला खरच तुला काढून टाकलय का विचारल.

प्रकाशक क्रेन हा हेन्रीपुत्र एडसेल फोर्डचा दोस्त. बहुधा हेन्रीनेच एडसेलला ही बातमी त्याच्याकडे पुरवायला सांगितले असावे.

नेहमीप्रमाणे स्वत: बाजूला राहून हेन्रीने वृत्तपत्राद्वारे माझ्या कानी बातमी घातली.

दुसऱ्या दिवशी दुपारी ३ वाजता हेन्रीने सचिवाकरवी निरोप धाडून मला बोलावून घेतल.

तिथे हेन्रीबरोबर बिल फोर्डही होता. दोघाच्या चेहऱ्यावर ताण जाणवत होता. मी मात्र सैलावलेल्या मनःस्थितीत होतो. काय तो सोक्षमोक्ष लागल्याने मनावर ताण असा उरला नव्हता.

बिलशी माझी चागलीच मैत्री होती. पूर्वी एकदा तो मला म्हणालाही होता की कठीण प्रसग गुदरलाच तर तो माझ्याबाजूने उभा राहील.

पण पूर्वीही कधी हेन्रीला आव्हान देऊन तो त्याच्यासमोर उभा राहिला नव्हता आणि आताही नाही. रक्ताच नातच शेवटी वरचढ ठरल.

पाऊणतास आमची बोलणी झाली.

मी राजीनामा देऊन १५ ऑक्टोबर १९७८ पासून कपनी सोडत आहे असे दप्तरी राहावे असे ठरले. माझे निवृत्तिवेतन आणि नुकसानभरपाई वगैरेबाबत रीतसर सारे होईल हे हेन्रीने मान्य केले

मग मी कपनीसाठी काय काय केल ते हेन्रीला ऐकवल मला घालवून तो किती नुकसान करून घेणार आहे त्याचा हिशेब माडला. मी हे सार बोलत असताना तो माझी नजर टाळतच होता. मी त्याला म्हणालो- 'माझ्याकडे बघ... नीट ऐक. मला घालवण्यासाठी तू अत्यत चुकीची वेळ निवडलीस. आपण लागोपाठ दुसऱ्या वर्षी अठराशे कोटीचा नफा खेचलाय. गेल्या दोन वर्षांचा मिळून तो आकडा पस्तीसशे कोटीचा होतो. नीट लक्षात ठेव हे आकडे आता पुन्हा नशिबी नाहीत. आणि हे मी कशावरून म्हणतोय ? हा नफा खेचण्यासाठी जे काही करावं लागत त्यातलं तुला काडीचही कळत नाही.'

आणि ते खरच होतं.

बैठक सपता संपता बिलने समझोता घडवून आणण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला पण त्या साऱ्याला फार उशीर झाला होता मी आणि

बिले बाहेर पडलो तेव्हा त्याच्या डोळ्यात अश्रू होते. म्हणाला–'असं व्हायला नको होतं. तो अगदी निर्दय आहे. किती थंडपणे घेतलस तू हे सारं ! ... गेली बत्तीस वर्षं तू आमच्यात आहेस पण तुला काढ-ताना साध कारण सुद्धा पुढ करत नाही ! ...पण तू आज वरचढ ठरलास. त्याची जागा त्याला दाखवलीस. अस खडसावून ऐकवणारा आजवर त्याला कोणी भेटला नव्हता.'

'थँक्यू, बिल ! पण मी संपलो. आणि तुम्ही दोघं तिथेच अडळ आहात, '–मी म्हणालो.

त्या दिवशी माझ कार्यालय सोडताना मला मोकळं मोकळं वाटत होत. माझी हकालपट्टीच व्हायची होती तर ती निदान उत्तम कामगिरी करून दाखवल्यावर झाली हे तरी बर झाल. फोर्डच्या इतिहासातले उत्कृष्ट सहा महिने नुकतेच पार पडले होते.

घरी पोचतो न पोचतो तोच माझ्या धाकट्या मुलीचा फोन आला. टेनिसच्या शिबिरानिमित्त ती प्रथमच घरापासून दूर गेली होती. मला काढून टाकल्याची बातमी तिने रेडियोवर ऐकली. ती रडत रडतच फोनवर बोलत होती. तिला विश्वासात घेऊन मी ही बातमी तिला आधी सागितली नाही याचे तिला वाईट वाटत होते आणि रागही आला होता. शिबिराचे उर्वरित आठ दिवस तिला फार त्रासाचे गेले. बरोबरीच्या मुलानी तिला याविषयी छेडून अधिकच दु खी केलं.

हा प्रसग मी माझ्या उभ्या आयुष्यात कधी विसरणार नाही. हेन्रीला यासाठी मी कधीच क्षमा करणार नाही. जगाला माहीत होण्यापूर्वी मी माझ्या मुलीशी ह्याविषयी बोलण्याची सधी त्याने मला दिली नाही. त्याला माझ्याकडे क्षमा नाही.

¤

अस म्हणतात की तुम्ही जितके वरवर चढत जाता तितके खाली आपटल्यावर जाणवणारा दणका तीव्र.

१५ ऑक्टोबर नतर जणू माझ अस्तित्व पुसलं गेल होत. माझ्याबरोबर, माझ्यासाठी काम करणारे सहकारी मित्र मला भेटायला घाबरू लागले.

अयाकोका–प्रेमीना कपनीत आता स्थान नाही हे प्रत्येकाला जाणवल होत. जो तो मला टाळत होता. स्वत.ला वाचवत होता. सहकारी मित्राचे साधे फोनही मला येईनात आपले फोन चोरून ऐकले जातील याची त्याना मनोमन धास्ती वाटत होती. एखाद्या मेजवानी, पार्टीप्रसगी जुने सहकारी मला पाहून नजरा टाळत एखादा धीट घाईघाईने येऊन हॅलो करून नाहीसा होई

मला घालवल्यानतर आठवडाभराने हेन्रीने वॉल्टर मर्फीला फोन केला. मर्फी हा फोर्डच्या जनसपर्कखात्याचा आतरराष्ट्रीय पातळीवरून गेली वीस वर्षे कारभार साभाळणारा ज्येष्ठ अधिकारी. त्याला मध्यरात्री फोन करून हेन्रीने उठवले. त्याला विचारले–

'तुला अयाकोका आवडतो ?'

'हो, नक्कीच !' त्याने उत्तर दिले

'मग तूही जा त्याच्या मागोमाग.'

दुसऱ्या दिवशी हेन्रीने आपला हुकूम परत घेतला ही गोष्ट सोडा. पण वीस वीस वर्षे आपल्या कपनीत काम करणाऱ्या व्यक्तीलाही तो काय वागणूक देत होता ते यावरून लक्षात याव. अशाप्रकारचा त्रास अनेकाना त्याने दिला. आपली नोकरी जाण्याच्या भीतीपायी अनेक सहकारी मित्र मला दुरावले. पचवीस पचवीस वर्षे मैत्री असलेले, आजवर अनेकदा एकत्र सहली–भोजने याचा आनद लुटलेले सहकारी माझ्या जवळपासही फिरकेनात. मला आणि माझ्यापेक्षा मेरीला ते फार लागले

माझे वडील म्हणत– 'मरण घटकेच्यावेळी तुमच्याजवळ पाच जरी सच्चे मित्र असतील तरी तुमच आयुष्य धन्य झाल, सार्थकी लागल म्हणा' त्याना काय म्हणायच होत त्याचा अर्थ मला समजला.

माझ्या पत्नीला–मेरीला–याच सुमारास हृदयविकाराचा पहिला झटका बसला

कपनीच्या पगारदार नोकराच सोडा एकवेळ; कारण त्यांना आपल्या पोटासाठी, परिवारासाठी मिंध व्हाव लागत. पण सचालक मडळातील सदस्याच काय ? सत्तेचा कोणताही गैरवापर होऊ नये म्हणून त्यानी दक्ष राहायच स्वत.च वजन वापरायचं. पण त्याचं आपलं–'आमची मिजास साभाळली जातेय ना ! मग म्होरक्याला का दुखवा ?' अशी भूमिका. म्हणूनच तर 'हेन्री किवा अयाकोका' असा पर्याय त्याच्यापुढे हेन्रीने ठेवला तेव्हा त्याला तूच जा म्हणायची कोणालाही छाती झाली नाही एकही हरीचा लाल माझी बाजू घेऊन आपला नि`ध नोंदवू शकला नाही.

त्या बैठकीत या लोकाची मन.स्थिती नेमकी कशी होती आणि त्याची खरी प्रतिक्रिया नेमकी काय होती याविषयीची माझी उत्सुकता आजही कायम आहे

मोटार व्यवसाय जगातल्या अनेक वृत्तपत्रे आणि नियतकालिकातून माझ्या हकालपट्टीवर लेख, अग्रलेख, सपादकीय आले. फोर्डचा कारभार कसा मनमानी चालतो यावर ताशेरेही आले.

एकाने तर त्याला साठ वर्षाचा नवथर किशोर म्हटले. आणि शेवटी विचारलय– 'जर अयाकोका सारख्याच्या नोकरीची शाश्वती नाही, तर तुमच्या आहे ?'

¤

फोर्ड डीलर्स सघाचे बाराशे सदस्य आहेत. त्याच्या अध्यक्षाने आपला निषेध नोदवला आणि आपल्यातर्फे मला फोर्डच्या सचालक मडळात आणण्याचा प्रयत्न केला. हे डीलर्स कपनीचे भागधारक होते. परतु त्याचा हा प्रयत्न फसला

मला काढून टाकण्यात आल्याने डीलर्स मंडळी अस्वस्थ झाल्याचे हेन्री फोर्डला जाणवले आणि मग त्याने सर्व डीलर्सना भराभर आश्वासक पत्रे रवाना केली.

माझे निवृत्ति वेतन आणि नुकसानभरपाईची रक्कम वसूल करण्यासाठी अखेरीस मला वकील नेमावा लागला.

¤

माझ्या पदच्युतीच्या दिवशी त्या लोकानी मला गुदामातल्या खोलीत पाठवून अपमानित केलं नसत तर मी काही काळ इकडे तिकडे गोल्फ खेळण्यात किंवा सुखाच्या दिवसाच्या आठवणी चघळण्यात घालवला असताही. पण माझ्या रागाच्या उद्रेकामुळेच मी क्रायस्लरला चटकन होकार दिला.

आणखीही एक-बरीच वर्षे जनरल मोटर्सचा प्रेसिडेंट आमच्या शेजाराला असूनही आमच्या घरी त्याला मी भोजनासाठी बोलावू शकलो नव्हतो. आता मात्र मी त्याला राजरोस भेटू लागलो. जनरल मोटर्स, फोर्ड आणि क्रायस्लर ह्या बड्या तीन मोटर कंपन्यांच्या वरिष्ठांच्या उच्च वर्तुळातील जगात एक अलिखित नियम काटेकोरपणे पाळला जातो हे लोक एकमेकांच्या घरी जाणे तर दूरच पण एकमेकांना साधी ओळख पण दाखवणार नाहीत. आता हे नियम पाळण्याची मला गरज नव्हती. माझी आणि जनरल मोटर्सच्या प्रेसिडेंटची दोस्ती वाढली. आम्ही सहकुटुंब एकमेकांच्या घरी येऊ जाऊ लागलो. पण ही मैत्री अल्पजीवीच ठरली. मी क्रायस्लरमध्ये डेरेदाखल झालो आणि आम्ही पुन्हा एकमेकांना परके बनलो. बाकी हा आमच्या जगातला न्यायच आहे.

थोड्याच दिवसांनी हेन्रीने मला का घालवले त्याची कारणे माझ्या वाचनात आली. म्हणे माझ्या 'वागण्यात अदब, सौजन्य नव्हते' पेनसिल्व्हानियामधल्या एका छोट्या अॅलनटाऊनमधील इटालियन स्थलांतरिताचा हा मुलगा.' म्हणजे उच्चभ्रू समाजाच्या जवळपासही फिरकण्याची लायकी नव्हती. मी माफिया टोळीचा सभासद आहे असा त्याने गॉडफादर सिनेमा पाहिल्यापासून समज करून ठेवला होता.

हेन्री फोर्डने अनेकांची आयुष्ये उधळली पण कोणतही हिंसक कृत्य न करता मी त्याचा बदला घेतलाय. तो अजूनही माझं देण देत असतो. आणि याला कसा धडा शिकवता येईल याचा निश्चित मनाने विचार करायला ते पैसे पुरेसे आहेत. कदाचित त्यामुळेच तो अधिक पिसाळत असावा.

१९७६ च्या जानेवारीमध्ये हेन्रीला हृदयविकाराचा झटका आला. आणि त्यावेळी मी चिंतित झालो माझ्यानंतर फोर्ड कंपनीच काय होणार असा प्रश्न मला पडला. काहीही झाल तरी माझ्यानंतर अयाकोकाला कंपनीचा चेअरमन होऊ द्यायचा नाही असा निर्णय मी घेतला.' अशी त्याने 'फॉर्च्यून' मासिकाच्या वार्ताहराला मुलाखत दिली होती.

हेन्रीला आपल्यानंतर आपल्या मुलाला एडसेलला-चेअरमन करायच होतं आणि त्यात मी आड येणार अस त्याच्या मनान घेतल होतं.

फोर्डमधून मी बाहेर पडल्यानंतर साडेचार वर्षांनी फक्त एकदाच हेन्रीची नि माझी समोरासमोर गाठ पडली 'न्यूजविक' च्या पन्नासाव्या वर्षानिमित्त रेनसेन संकुलात समारंभ होता. मी सपत्नीक गेलो होतो.

आपण दोन पेग रिचवलेत आणि अशा वेळी हेन्री पुढ्यात आला तर काय होईल ह्याविषयी माझ्या मनाने चित्रे रंगविली होती. मी तीन प्रतिक्रिया कल्पिल्या होत्या. पहिली, तो मला ओळख दाखविल, हॅलो म्हणून मग गर्दीत नाहीसा होईल. त्यात त्याचा आबही राखला जाईल. दुसरी, तो सामोरा येईल. दोन-चार शब्द बोलेल. हस्तांदोलन करील. कदाचित माझ्या खांद्यावर हात ठेवून मैत्री दर्शवेल, आणि ते पक्क्वपणाचही दिसेल. तिसरी प्रतिक्रिया म्हणजे-जीव घेऊन पळून जाईल.

आणि त्याने तसंच केलं. मी आणि माझी पत्नी दिसताच तो आपल्या पत्नीला घेऊन अक्षरशः पळाला. हेच त्याचं शेवटचं दर्शन.

## क्रायस्लरमध्ये

क्रायस्लरची नोकरी स्वीकारल्यानंतर माझ्यावर जी काही संकटे कोसळली त्याची पुसटशी जरी कल्पना मला असती तर, वाट्टेल तेवढा पैसा देऊ केला असता तरी, मी त्या फंदात पडलो नसतो. देव आपल्याला भविष्यात काय आहे हे पाहू देत नाही हे एका रीतीने बरेच आहे नाहीतर माझ्यासारख्याने गोळी झाडून आत्महत्याच केली असती. पण ईश्वर तसा दयाळू आहे तो आपल्याला आता दिवसच पाहू देतो उद्या काय वाढून ठेवलंय हे माहीत नसल्याने निदान आल्या दिवसाला तोंड देण्यासाठी तरी आपल्याला बळ एकवटता येते.

फोर्डमधून मला काढून टाकल्याची बातमी पसरताच इतर बऱ्याच कंपन्यांनी मला बोलावले. पण त्यात मोटार कंपनी नव्हती. माझे उभे आयुष्य ह्या व्यवसायात गेले. ह्या व्यवसायाशीच मी एकरूप झालो. आता नव्याने वेगळ्या क्षेत्रात उतरायची माझी इच्छा नव्हती.

चौपन्नाव्या वर्षी निवृत्त होण्याइतका मी वयस्कर नव्हतो पण नव्या उमेदीने नव्या क्षेत्रात पडावे इतका तरुणही नव्हतो. गाड्यांचा व्यवसाय माझ्या रक्तात उतरला होता तसे पाहायला गेले तर एक ऑफर कार कंपनीची होती. फ्रान्समधील रेनॉल्ट कंपनीने मला जागतिक सल्लागार म्हणून बोलाविले होते. पण असली कामे मला जमत नाहीत. सल्ला वगैरे देत बसण्यापेक्षा जेथे आपण प्रत्यक्ष निर्णय घेतो असेच क्षेत्र मला आवडते. प्रत्यक्ष जबाबदारी घेऊन काम करावे. पार पडले तर त्याचे समाधान लाभते. अपयश आले तर दोषही पत्करावा. मला त्यात कधीच कमीपणा वाटला नाही.

परंतु फोर्डमधून मी बाहेर पडल्या दिवसापासूनच क्रायस्लरमध्ये जाणार अशी वदता होती. मला नोकरी नव्हती आणि क्रायस्लर संकटात होती. लोकांनी ह्या दोन गोष्टींचा संबंध जोडला. प्रत्यक्ष विचारणा मात्र फ्लॉरिडा प्रांताचा गव्हर्नर कीर्क ह्यांच्यातर्फे झाली. कीर्क तसा जुना मित्र. त्याने मला क्रायस्लरच्या बोर्डावरील दोन सदस्यांना भेटायची इच्छा असल्याचे सांगितले. डिक डिलवर्थ आणि लुईस वॉरेन. आमची पहिली भेट न्यूयॉर्कमध्ये झाली.

पण ही भेट एकमेकांशी ओळख करून घेण्यापुरतीच होती. त्यामुळे प्रत्यक्ष कामाबाबत काहीच चर्चा झाली नाही. डिलवर्थ आणि वॉरेनच्या बोलण्यावरून क्रायस्लरच्या एकूण परिस्थितीविषयी त्यांना चिंता वाटत होती हे उघडच होते.

ह्या भेटीनंतर थोड्याच दिवसात क्रायस्लर बोर्डाचा चेअरमन जॉन रिकार्डो ह्याने मला फोन केला. त्याला आणि डिक डिलवर्थला मला भेटायची इच्छा होती. माझा कोणत्या पद्धतीने कंपनीला उपयोग करून घेता येईल ह्याबद्दल त्यांना चर्चा करायची होती. ह्या भेटीविषयी आम्ही कमालीची गुप्तता राखली. अगदी क्रायस्लरचा प्रेसिडेंट जी काफीरो ह्यालाही तिचा सुगावा लागला नाही. रिकार्डो आणि काफीरो ह्यांच्यातून विस्तव जात नव्हता ह्याची सर्वांनाच कल्पना होती.

'क्रायस्लरची परिस्थिती तितकीशी चांगली नाही. आम्हाला

काही बदल करायची इच्छा आहे.' ते म्हणाले.

त्यांच्या अशा बोलण्यावरून मला निश्चित अर्थबोध होणे कठीण होते.

'आपण आज असे भेटण्यामागे उद्देश काय आहे' मी अगदी सरळ प्रश्न केला.

'तू क्रायस्लरमध्ये यावस असे आम्हाला वाटते. आपण ह्याच व्यवसायात राहावे असे नाही का तुला वाटत?'

मी त्यांना स्पष्ट केले की अगदी डोळे मिटून त्यांची ऑफर मला स्वीकारता येणार नाही. क्रायस्लरबद्दल माझ्या मनात बऱ्याच शंका होत्या. त्या शंकांना समाधानकारक उत्तरे मिळाल्याखेरीज मला निर्णय घ्यायचा नव्हता.

आमच्या दुसऱ्या भेटीत रिकार्डोने मला क्रायस्लरच्या सध्याच्या स्थितीबद्दल माहिती दिली. त्याचा एकूण सूर निराशाजनकच होता. रिकार्डोच्या बोलण्यात स्पष्टवक्तेपणा आणि प्रांजळपणा होता. त्याच्या बोलण्यावरून मला वाटले सुधारणेला अजूनही वाव आहे.

माझ्या पूर्वीच्या अनुभवाने माझ्या लक्षात आले की, क्रायस्लरच्या व्यवस्थापनातील लोकाना कपनीत नेमके काय चालले आहे ह्याचा अंदाज नव्हता कपनी नुकसानीत चालली आहे याची त्याना कल्पना होती. परतु पाणी इतके गळ्याशी आले आहे ह्याची त्याना जाणीव दिसली नाही.

मला हे आव्हान स्वीकारायची इच्छा होती. त्या दिवशी घरी आल्यावर मी मेरीशी बोललो. 'ह्या वयात घरी बसून राहणे तुला आवडणार नाही आणि गाड्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही व्यवसायात तुझे मन रमणार नाही. शिवाय इथेच तू तुझ कर्तृत्व दाखविलेस तर हेन्रीला तुला धडा शिकवता येईल' मेरी म्हणाली. मी मुलीशीही बोललो. 'तुम्हाला आनद आहे ना त्यात? मग मागचा पुढचा विचार करण्याची गरज नाही,' त्यांचे म्हणणे पडले.

आता फक्त प्रश्न होता पगाराचा आणि मला नेमके कोणते पद दिले जाते त्याचा. मला माझ्या कामात सपूर्ण स्वातत्र्य हवे होते. रिकार्डोची इच्छा मी प्रेसिडेंट आणि चीफ ऑफिसर म्हणून यावे अशी होती. स्वत कडे रिकार्डो चेअरमन आणि चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसरचे पद ठेवणार होता. मला वाटले येथूनच आमच्या वादाला तोंड फुटणार. इतक्या वर्षांचा माझा अनुभव जमेस घेता, मला फक्त पहिल्या क्रमाकाचे पदच मानवले असते. मी माझी इच्छा त्याला स्पष्ट बोलून दाखविली.

रिकार्डो म्हणाला, 'मला ही जागा फार काळ अडवून धरायची नाही. कंपनीचा बॉस एकच राहील. आता तू रुजू होत आहेस, तेव्हा ती जागा तुझी होईल. एरवी तुझ्याशी इतकी चर्चा करण्याचा खटाटोप मी कशाला असता?'

रिकार्डोचे शब्द माझ्या मनात अजूनही घर करून आहेत. माझ्या येण्याने त्याची स्वत.ची नोकरी धोक्यात येणार आहे याची त्याला कल्पना होती. मला क्रायस्लरमध्ये आणण्याचा निर्णय त्याचा स्वत चा होता. ह्या कंपनीला सावरणे आता आपल्याला जमणार नाही याची त्याला कल्पना होती. त्याने आपणहून बाजूला व्हायचे ठरविले. मी सुरुवातीस प्रेसिडेंट म्हणून कपनीत यायचे आणि १ जानेवारी १९८० पासून मला कपनीचा चेअरमन करण्यात येईल असे ठरले. पण रिकार्डोने थोडा आधीच राजीनामा दिला आणि सप्टेंबर १९७९ मध्येच मी क्रायस्लरचा सर्वेसर्वा बनलो. क्रायस्लरला पुन्हा नावारूपाला आणण्यासाठी रिकार्डोने स्वत.ची कारकीर्द सपुष्टात आणली. असे निर्णय घ्यायला धैर्य लागते. रिकार्डो आणि त्याची पत्नी थेलमा हे माझ्या आयुष्यात आलेल्या मोजक्या सत्शील दापत्यापैकी एक. क्रायस्लरच्या कामात मी इतका गुंतून गेलो की एकमेकाच्या फार जवळ येण्याची सधी आम्हाला कधीच मिळाली नाही.

मी क्रायस्लरमध्ये रूजू झालो ह्या बातमीने हेन्रीला धक्काच बसला असेल. ज्या प्रकारे मला फोर्ड कपनीतून बाहेर पडावे लागले त्यावरून आता मी निवृत्तिवेतन घेऊन घरी बसेन असा बऱ्याचजणाचा समज झाला होता. पण मी निवृत्तीचे सोडाच, क्रायस्लरमध्ये जात आहे हे समजल्याने हेन्रीची झोपच उडाली असेल. फोर्डमधल्या माझ्या काही मित्रानी मला सागितले की, त्यानतर हेन्रीचे पिण्याचे प्रमाणही थोडे वाढले.

फोर्डमधून मला काढल्यानतर भरपाई म्हणून मला १५ लाख डॉलर्स मिळणार होते पण त्याबाबत एक अट होती मी ताबडतोब दुसरीकडे नोकरी स्वीकारली तर मात्र ही रक्कम दिली जाणार नव्हती ह्यातून मार्ग काढण्यासाठी रिकार्डोने मला आश्वासन दिले की क्रायस्लरबरोबरच्या करारावर मी सही केल्याबरोबर फोर्डकडून मिळणारी रक्कम मला क्रायस्लरतर्फे देण्यात येईल क्रायस्लरकडून मला मिळालेल्या ह्या पैशाबद्दल वृत्तपत्रातून बरीच ओरड झाली खरे पहाता हे पैसे फोर्डमधून इतक्या वर्षांच्या नोकरीनतरचा हक्क म्हणून मला मिळणार होते फोर्डच्या अटीचा अडसर दूर करण्यासाठी क्रायस्लरला हे पैसे देणे भाग होते. १९७० च्या दशकात हेन्री फोर्ड आणि मी अमेरिकेतील सर्वांत जास्त पगार मिळवणारे व्यावसायिक होतो.

मी फोर्डमध्ये असताना प्रतिस्पर्धी म्हणून माझे लक्ष सतत जनरल मोटर्सकडेच असायचे. जनरल मोटर्स कपनीही एखाद्या देशासारखीच अवाढव्य आहे. तिच्या त्या अजस्र शक्तीचा मला नेहमीच हेवा वाटत आला आहे क्रायस्लरवर फोर्डने १९५० साली मात केली

त्यानतर ह्या स्पर्धेत क्रायस्लर माझ्या खिजगणतीतही नसायची. मात्र तत्रज्ञान हा क्रायस्लरचा खरा आधार क्रायस्लरने स्थापन केलेल्या क्रायस्लर इजिनिअरिंग इन्स्टिटयूटमुळे म्हणा, कदाचित् क्रायस्लरच्या तत्रज्ञाचा दर्जा नेहमीच उत्तम असायचा. अशा स्वरूपाची सस्था निर्माण करण्याविषयी मी हेन्री फोर्डजवळ नेहमीच आग्रह धरला पण त्याने ह्याकडे कधीच लक्ष दिले नाही

क्रायस्लरकडे ही तत्रज्ञाची परपरा असण्यापाठी ऐतिहासिक कारणे आहेत. पहिल्या हेन्री फोर्डने प्रथम मोटारीचा शोध लावला. त्याने धडाडीने त्याची मोठ्या प्रमाणावर निर्मितीही सुरू केली. तो हेन्री फोर्ड स्वभावाने विक्षिप्त होता. कधी कसा वागेल याचा नेम नसायचा पण त्याच्यापाशी सशोधकाची बुद्धिमत्ता होती.

कारखान्यात 'असेंब्ली लाईन' वर मोठ्या प्रमाणावर गाड्याची निर्मिती करण्याच्या तत्राचे श्रेय हेन्री फोर्डला दिले जाते खरे पण त्या तत्राचे जनक दुसरेच आहेत. मात्र दिवसाला पाच डॉलर्स पगारावर कामगार घेण्याची मूळ कल्पना त्या हेन्रीची. १९१४ मध्ये त्याने

अशा प्रकारे कारखान्यात मजूर घेतले बाहेर मिळणाऱ्या वेतनापेक्षा इथे दुपटीने मिळत होते. त्यावेळी पदरी गाडी असणे हे केवळ श्रीमंतीचे लक्षण समजले जायचे हेन्री फोर्डने कामगाराचा असा एक वर्ग निर्माण केला की त्याच्या पगारात त्याना गाडी घेणे शक्य झाले. हळूहळू ती त्याच्या गरजेचीच वस्तू बनली. त्या हेन्रीने गाडीचा शोध लावला आणि ती वापरणारा वर्गही निर्माण केला

त्या हेन्री फोर्डनंतर ह्या क्षेत्रातील महत्त्वाची व्यक्ती म्हणजे वॉल्टर क्रायस्लर. वॉल्टरला यंत्राच्या रचनेत गती होती त्याने १९२० मध्ये जनरल मोटर्स कपनी सोडली. त्या कंपनीचा तेव्हाचा प्रेसिडेंट विल ड्युराट याच्याशी त्याने पटत नव्हते वॉल्टर हा काही कळपात राहून जगणारा प्राणी नव्हता. त्याच्या कामाची स्वत ची एक पद्धती होती. ब्यूक गाड्याचा विभाग चालवण्यासाठी वॉल्टरला हवे असणारे स्वातंत्र्य विल ड्युराट देत नव्हता. जनरल मोटर्स सोडल्यावर वॉल्टरला पुन्हा काम करण्याची इच्छा नव्हती परतु तीनच वर्षात वॉल्टरला निवृत्तीमुळे बाहेर पडावे लागले. मॅक्सवेल अॅण्ड कॉमर्स मोटर कार कपनी डबघाईला आली होती. तिची पुनर्रचना करण्याची जबाबदारी वॉल्टरवर पडली. ते आव्हान त्याने स्वीकारले. त्याने गाड्याची एका पाठोपाठ एक नवीन मॉडेल्स काढली. ती लोकप्रिय केली. बऱ्याचशा जाहिरातीत तो स्वत असे. १९२० च्या सुमारास मॅक्सवेल कपनी हा एक थट्टेचा विषय होता. पाच वर्षात वॉल्टरने त्या कपनीचे क्रायस्लर कार्पोरेशनमध्ये रूपातर केले,

पण तो तिथेच थांबला नाही. १९२८ मध्ये त्याने डॉज आणि प्लायमाऊथ ह्या मोटारकपन्या विकत घेतल्या. १९४० मध्ये वॉल्टर क्रायस्लर मरण पावला. तेव्हा क्रायस्लर कपनीने फोर्डलाही मागे टाकले होते पहिल्या क्रमांकावर होती जनरल मोटर्स.

क्रायस्लर कपनीचे हे यश जरी नतर ओहोटीला लागले तरी डिझायनिंग आणि इजिनिअरिंग ह्या अजूनही कपनीच्या मजबूत बाजू होत्या. क्रायस्लरचा भूतकाळ देदीप्यमान होता भविष्यकाळ उज्ज्वल करण्याची माझी उमेद होती.

पण इराणमधल्या राजकीय उलथापालथीने माझे सारे मनोरथ कोलमडले तिथला शहा जाऊन खोमेनी सत्तेवर येताच तेलाच्या किंमती दुप्पट झाल्या. गाड्याच्या खपात प्रचड घट आली. ह्याचा फटका फोर्ड आणि जनरल मोटर्सलाही बसला. पण क्रायस्लरची परिस्थिती आधीच नाजूक नि त्यात हे सकट. गेल्या पन्नास वर्षांत अनुभवली नव्हती अशी मंदीची लाट आली मी क्रायस्लरमध्ये रुजू झाल्यानतर काही महिन्यातच घडलेल्या ह्या घटना.

## बुडत्या जहाजावर

२ नोव्हेंबर १९७८ च्या डेट्राईट फ्री प्रेसमध्ये दोन मथळे होते. 'क्रायस्लरच्या इतिहासातील सर्वात मोठी तूट '' आणि 'ली अयाकोका अखेर क्रायस्लरमध्ये दाखल.' मला गमत वाटली. नव्या नोकरीत रुजू होण्यासाठी मी अगदी नेमकी वेळ शोधून काढली होती. मी कपनीत दाखल झालो त्या दिवशीच कपनीने आपली तृतीय तिमाही तूट जाहीर केली होती– १६ कोटी डॉलर्स.

आपण आता अगदी तळालाच पोचलो आहोत तेव्हा इथून पुढे परिस्थिती फक्त सुधारू शकते असा आशावादी विचार करून मी कामाला लागलो.

मी क्रायस्लरच्या कार्यालयात पोचलो तेव्हा रिकार्डोंने स्वतः माझ्या बरोबरीने फिरून माझी सर्वांशी ओळख करून दिली. दुपारी व्यवस्थापनातील वरिष्ठांबरोबर बैठक झाली. बैठकीत स्थानापन्न झाल्यावर फोर्डमधील माझ्या जुन्या सवयीनुसार मी चिरूट ओढायला सुरुवात केली. रिकार्डो त्याच्या सहकाऱ्याकडे वळून म्हणाला– 'तुम्हाला ठाऊक आहेच मला बैठकीत कोणी धूम्रपान केलेले आवडत नाही. पण आजपासून हा नियम आपण रद्द करून टाकू.'

मला ही सुरुवात म्हणजे शुभशकुन वाटला. जुने नियम बदलून आता नव्या नियमाची आखणी करायला हवी

पहिल्याच दिवशी बऱ्याच लहानसहान गोष्टी माझ्या लक्षात आल्या त्यातली पहिली म्हणजे प्रेसिडेंटच्या ऑफिसमधून निर्धास्त-पणे लोकाची ये–जा चालायची. लोक कसे अगदी व्यवस्थित हातात चहाचा कप घेऊन गप्पा मारत जायचे कुठलाही अधिकारी जागेवर सापडेल याची शाश्वती नव्हती. व्यवस्थापनातील महत्त्वाचा नियम म्हणजे शिस्त तिचाच तिथे अभाव.

आणखीही एक गोष्ट लक्षात आली. ती म्हणजे रिकार्डोची सेक्रेटरी फोनचा वापर सतत खाजगी कामासाठी करत होती. चेअरमनच्या फोनचा अशा प्रकारचा वापर मला नवीन होता सेक्रेट-रीज् जेव्हा त्याच्या कामाकडे दुर्लक्ष करतात तेव्हा त्याचे परिणाम अधिकाऱ्यानाही भोगावे लागतात, असा माझा जुना अनुभव आहे. ह्या अगदी बारीक सारीक गोष्टी. पण त्यातूनच कपनीच्या एकूण स्वरूपाचा अंदाज मला येत होता अशा अव्यवस्थेची मला सवय नव्हती.

माझी भीती निराधार नव्हती. व्यवस्थापन या शब्दाला क्रायस्लर-मध्ये काहीच अर्थ उरलेला नाही, हे काही दिवसातच माझ्या लक्षात आले. १९७८ मधली क्रायस्लरची अवस्था १८६० सालातल्या इटली-सारखी होती प्रत्येक विभागाचा प्रमुख एखाद्या राजासारखा स्वतंत्र होता. कपनीला एकसघ असे स्वरूपच नव्हते कुणाचाच पायपोस कुणाच्या पायात नव्हता

क्रायस्लरमध्ये एकूण पस्तीस (३५) व्हाईस–प्रेसिडेंट्स् होते. पण त्याच्या निर्णयात सुसूत्रता राखण्यासाठी एकही समिती नव्हती. वेगवेगळ्या विभागातील लोकाच्या सतत भेटी व्हायला हव्यात. चर्चा व्हायला हव्यात, तसा काही प्रकार इथे नव्हता. म्हणजे संशोधन विभागाच्या प्रमुखाला निर्मिती विभागाच्या प्रमुखाची मागणी काय याची कल्पनाच नसायची आणि निर्मितिविभागाला विक्रीखात्याच्या गरजा काय आहेत याचा पत्ता नसायचा प्रत्येक खात स्वतत्रपणे आपला कारभार पाहायच दुसऱ्या खात्याशी आपला काही सबध आहे ह्याची त्याना जाणीवही नव्हती.

ह्या सगळ्या विभागात एकसूत्रता आणण्याऐवजी रिकार्डो आणि कपनीचा खजिनदार बिल ह्याचा सगळा वेळ बँकाच्या मागे धाव-ण्यात जायचा कपनीची सगळी कर्जे साभाळून रोजच्या खर्चासाठी पैशाची व्यवस्था करण्याची सतत निकड असायची. आल्या दिवसावर मात करण्यासाठीच सारे प्रयत्न असायचे. पुढच्या वर्षासाठी योजना

आखून तयार ठेवायला हव्यात ह्याचे कुणाला भानच नव्हते.

थोड्याच महिन्यात मला आणखीही एक शोध लागला. आमचं खेळत भांडवल संपत आलं होतं. मला धक्काच बसला. क्रायस्लरमध्ये येण्यापूर्वी तिचे व्यवस्थापनाचे काही प्रश्न आहेत याची मला जाणीव होती. परंतु अर्थव्यवस्थेतही इतका भयानक गोंधळ असेल याची मला कल्पनाच नव्हती. क्रायस्लरच्या अर्थखात्यातील लोक फार सुपीक डोक्याचे आहेत असा पूर्वीपासूनच डेट्राईटमध्ये समज होता. आणि मीही त्यावरच विसबून होतो. लवकरच माझ्या लक्षात आले की एवढी ही मोठी कंपनी हे लोक एखादे किराणासामानाचे छोटेसे दुकान चालवावे अशा पद्धतीने चालवताहेत.

फोर्डमध्ये मी प्रेसिडेंट झाल्याच्या पहिल्या दिवशीच प्रत्येक विभागामधील आर्थिक गुंतवणूक आणि मिळणारा वार्षिक नफा ह्या बद्दल माहिती विचारली होती. क्रायस्लरमध्ये असली काही माहिती मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती निर्णय घेण्याची कोणतीच व्यवस्था नसल्याने प्रत्येक गोष्टीत फोर्ड किंवा जनरल मोटर्सचे अनुकरण करण्यावर क्रायस्लरचा भर असायचा. खरं पाहता क्रायस्लरचा कारभार आटोपशीर असल्याने तिला प्रत्येक बाबतीत त्या दोन मोटर कंपन्यांच्या पुढे राहण्याची संधी होती. पण इथे सारा प्रकारच उलटा होता

☐

व्यवस्थापनातल्या बऱ्याच लोकांचा समज झाला होता की माझी नेमणूक कंपनी पुन्हा पायावर उभी करण्यासाठी झालेली असल्याने मी बऱ्याच लोकांना काढून टाकणार आहे त्यामुळे प्रत्येकाला डोक्यावर टांगती तलवार असल्यासारखे वाटत होते. संपूर्ण झोकून देऊन काम करायची कुणाचीच तयारी नव्हती. अर्थात त्यांच्या भीतीत अगदीच तथ्य नव्हते असे नाही. गेल्या तीन वर्षांत पस्तीसपैकी तेहेतीस व्हाईसप्रेसिडेंट्सना काढणे मला भाग पडलेय. म्हणजे दरमहा एक.

काही काही लोकांच्या नोकऱ्या वाचवण्याचाही मी प्रयत्न केला. पण यश आले नाही. चार्ली बिचम नेहमी म्हणायचा, 'एकदा माणूस वीस वर्षांचा झाला की त्याच्या सवयी तो कधीच बदलायचा नाही. आपलं काही चुकतय हे समजून घेण्याचा प्राजळपणा कोणाच्यातही नसतो आपल्याला वाटत आपण त्यांना बदलू शकू पण तसं होत नाही.'

दुर्दैवाने चार्लीचे बोलणे खरेच होते लोकांच्या सवयी बदलत बसण्यापेक्षा त्यांना काढणेच जास्त सोयिस्कर पडत होते.

बाजारातही क्रायस्लरची पत कमी होत होती. एकेकाळी क्रायस्लरच्या गाड्या ह्या तरुण वर्गाच्या गाड्या होत्या. आता आमचा बराचसा ग्राहकवर्ग हा निवृत्त झालेल्या उतारवयातील लोकांचा होता. एकेकाळी डॉज डायटोनाज, क्रायस्लर ३०० सॅटेलाइट, बाराकुडाससारख्या यशस्वी गाड्या ह्याच कंपनीने बाजारात आणल्या होत्या आणि आज हीच कंपनी फोर्ड आणि जनरल मोटर्सचे अनुकरण करण्यासाठी धडपडत होती.

क्रायस्लरमध्ये निर्मिती विभाग आणि विक्री विभाग यात कोणताच ताळमेळ नव्हता हा एक महत्त्वाचा दोष माझ्या लक्षात आला होता. सर्व कारखाने चालू ठेवण्यासाठी निर्मिती विभाग गरजेनुसार गाड्यांचे उत्पादन करत असे ह्या उत्पादनाचा प्रत्यक्ष ग्राहकांच्या मागणीशी काहीही संबंध नसायचा. डीलर्सच्या मागण्या नसतानाही कित्येक मॉडेल्सची मोठ्या प्रमाणावर निर्मिती होत रहायची. ह्या साऱ्या गाड्यासाठी सोईस्कररीत्या सेल्सबँक तयार करण्यात आली होती त्यामुळे विक्री तर काहीच नाही, उत्पादन मात्र भरपूर असा सगळा प्रकार होता. कंपनीचे विक्रेते हॉलमधल्या आपल्या खोलीत बसून फोनवरून जमतील तितक्या गाड्या विकत असत १९७९ च्या मध्याशी जेव्हा आम्ही सरकारपुढे पहिल्यांदा मदतीसाठी हात पसरला तेव्हा क्रायस्लरच्या सेल्सबँकमध्ये ८० हजार गाड्या पडून होत्या. एक वेळ तर अशी आली होती की, ही संख्या एक लाखावर जाऊन पोहोचली. म्हणजे जवळजवळ ६० कोटी डॉलर्स किमतीच्या गाड्यांची निर्मिती झालेली होती. परंतु त्यांच्या विक्रीची काही एक व्यवस्था केलेली नव्हती. गाड्या महिनोन्‌महिने तशाच पडून गंजत होत्या. अशा वेळी विक्री वाढवण्यासाठी विक्रीखात्यातील लोक मोठ्या प्रमाणावर सूट देऊन डीलर्सना गाड्या विकत असत. डीलर्सनाही याची हळूहळू सवय होत गेली. दर महिन्याला, ते सूट मिळण्याची वाट पाहत असत. कंपनी दिवाळखोरीत काढणारी ही सारी पद्धत बदलताना मला फारच त्रास घ्यावा लागला. फोर्डमध्येसुद्धा गाड्यांचा साठा कमी करण्यासाठी सूट देण्याच्या योजना अधूनमधून आखल्या जात पण क्रायसलरमध्ये मात्र हा परिपाठच होऊन बसला होता.

मी वेळोवेळी डीलर्सना समजावून सांगितले की या सेल्सबँकमुळे कंपनी पद्धतशीरपणे रसातळाला चाललीय. हा प्रकार मला बंद करायचा आहे. त्यांची मागणी असेल त्यानुसारच गाड्यांची निर्मिती होईल त्यांच्या गरजेप्रमाणे गाड्यांचा साठा त्यांनी बाळगावा आम्ही बाळगणार नाही यात कंपनीचे आणि त्यांचेही हित आहे.

अर्थात, हे काही एका रात्रीत घडले नाही. सतत बैठका घेऊन मला हे डीलर्स लोकांच्या गळी उतरवावे लागले. मग हळूहळू गाडी रूळावर आली. आता नव्या व्यवस्थेनुसार आमचे विक्रेते प्रत्येक महिन्याच्या शेवटी डीलर्सकडे बसून पुढच्या दोन महिन्यांच्या मागणीचा अंदाज घेतात. बाजारातल्या निश्चित मागणीची कल्पना आली की त्याप्रमाणे उत्पादनावर नियंत्रण ठेवणे आम्हाला शक्य होते.

प्रश्न बरेच होते पण ते सोडविण्याच्या पद्धतीचा मला अंदाज आला होता आता माझी महत्त्वाची गरज होती ती चांगल्या सहकाऱ्यांची कंपनी पार रसातळाला जाण्यापूर्वी तिला वाचवण्यासाठी व्यवस्थापनात समर्थ लोकांची फळी उभी करणे आवश्यक होते.

**खरं पाहता कोणत्याही प्रकारच्या व्यवसायात तीन महत्त्वाचे घटक असतात. लोक, उत्पादन आणि नफा. ह्यात माणूस पहिला. जोवर तुमच्याकडे चांगल्या दर्जाची माणसे नाहीत तोवर बाकीच्या दोन गोष्टी साध्य होणे कठीण.**

फोर्डमधल्या माझ्या बत्तीस वर्षांत मी काळजीपूर्वक माझ्या सर्व सहकाऱ्यांचा अभ्यास केला होता. त्या माझ्या सगळ्या नोंदीच्या वह्या मी फोर्ड कंपनी सोडताना बरोबर घेतल्या होत्या. त्यांचाच मला क्रायस्लरमध्ये बराचसा उपयोग झाला. त्या त्या खात्यात नेमण्यासाठी योग्य मनुष्य हुडकून काढणे ही किती कठीण गोष्ट आहे, हे व्यवस्थापन क्षेत्रातल्या माणसालाच कळेल.

ह्याच नोंदीतून मी जिराल्ड ग्रीनवॉल्डला निवडले. ग्रीनवॉल्ड हा फोर्ड कंपनीचा व्हेनिझुअेलातील कार्यालयाचा प्रमुख होता. क्रायस्लरच्या अर्थव्यवहारात सुरळीतपणा आणण्यासाठी मला त्याची गरज होती. त्याचा सारा अनुभव फोर्ड कंपनीतला. क्रायस्लरमध्ये आल्यावर त्याला पहिला धक्का बसला तो हा की, वेगवेगळ्या ठिकाणाहून कंपनीची बिले दिली जात असत. त्यामुळे बाहेर जाणाऱ्या पैशावर काही नियंत्रणच राहत नव्हते. ग्रीनवॉल्डने हळूहळू साऱ्या अर्थव्यवहारात शिस्तबद्धता आणायला सुरुवात केली.

पण ग्रीनवॉल्डने मला सुरुवातीलाच सांगितले होते की, त्याला केवळ अर्थव्यवहारच पाहायचा नव्हता. त्याची काम करण्याची पद्धत काही महिने पाहिल्यावर मी त्याला म्हणालो, 'इतर कामासाठी तुला मोकळा करायला मी तयार आहे. पण त्याआधी तुझ्या जागी दुसरा कोणी लायक मनुष्य शोधून आण.'

त्याने लागलीच स्टिव्ह मिलरला आणले हा स्टिव्ह ग्रीनवॉल्डच्या हाताखाली व्हेनिझुएलात काम करत होता. त्याचीही क्रायस्लरला फार मदत झाली.

मी क्रायस्लरमध्ये येण्याआधीपासूनच हाल स्पर्लिच तिथे होता १९७७ मध्ये हेन्री फोर्डने त्याला काढले. एका रीतीने हेन्रीने माझ्यावर उपकारच केले. हाल हा माझा क्रायस्लरमधला मोठा आधार ठरला. हालने क्रायस्लरमधली बरीच हुशार माणसे हेरून ठेवली होती. त्याच्यात बुद्धिमत्ता, कौशल्य आणि उत्साह होता परंतु अजूनपर्यंत त्याना कुणी संधीच दिली नव्हती.

मी आल्यानंतर काही काळातच हालला व्हाईस-प्रेसिडेंट केले. नवीन गाड्या तयार करण्याच्या विभागाचा तो प्रमुख होता. क्रायस्लरमधील त्याने सुचवलेल्या बऱ्याच जणाना आम्ही योग्य जागी नेमले. हाल स्पर्लिच आणि मी चोवीस वर्षे एकत्र काम केलेय. तो फार कृतिशील माणूस आहे. विचारपूर्वक तो निर्णय घेतो. पण विचारात फार काळ दवडत नाही निर्णय घेणे हे जितके महत्त्वाचे तितकेच तो वेळीच अमलात आणणेही जरुरीचे.

फोर्डमधून निवृत्त झालेल्या लोकातूनही काही चांगली माणसे मी निवडली. त्यातला महत्त्वाचा माणूस म्हणजे गर लव्ह ह्याने फोर्डमधील डीलर्सचा विभाग आणि विक्री विभागही हाताळला होता. मस्टांग प्रथम बाजारात आली तेव्हा तो फोर्डचा सेल्स मॅनेजर होता

गाड्यांच्या दर्जावर देखरेख ठेवण्यासाठी मी हॅन्स मॅथ्यूअसला बोलावून घेतले. हॅन्स फोर्डमध्ये आधी चीफ इंजिनियर होता. निवृत्त झाला तेव्हा तो फोर्डच्या उत्पादन विभागाचा प्रमुख होता. फोर्ड गाड्यांचा दर्जा वाढवण्यात त्याचा सिंहाचा वाटा होता. तो निवृत्त झालेला असतानाही मी त्याला बोलावून घेतले. मी हॅन्सला सल्लागार म्हणून नेमले होते. रोज सकाळी तो कारखान्याला भेट द्यायचा त्याची एक पद्धत होती. तो नवी कोरी जपानी टोयोटा घेऊन यायचा आणि कामगारापुढे उभी करून विचारायचा, 'आपल्या गाडीत आणि हिच्यात काही फरक वाटतो का तुम्हाला ?' कामगाराना वेगळ्या सूचना द्यायची गरज भासायची नाही.

१९७९ च्या काळात आम्ही सर्वच विभागात मोठ्या प्रमाणावर कपात करत होतो आणि त्यावेळी हा हॅन्स २५० लोक त्याच्या खात्यात भरती करण्याची एक योजना घेऊन माझ्याकडे आला. क्रायस्लर मोटारीचा दर्जा वाढविण्यासाठी त्याला या माणसांची गरज होती. आम्हाला हे परवडण्यासारखे नव्हते पण मी त्याच्याशी. वाद घातला नाही. कंपनीला जर काही भवितव्य असेल तर ते केवळ गाड्यांचा दर्जा सुधारण्यामुळेच असेल ह्याची मला जाणीव होती.

डिक डाऊचला मी जनरल मोटर्समधून आणलं. फोक्स्‌वॅगनमध्येही डिकने काम केले होते त्या दोन कंपन्यातून त्याने आणखी पधरा माणसे आमच्याकडे आणली. विक्री खात्यासाठी मी फोर्डमधून माणसे घेतली तर उत्पादन विभागासाठी जनरल मोटर्स आणि फोक्स्‌वॅगनमधून काही निवृत्त माणसेही पुन्हा परत बोलावली.

एका विशिष्ट वयात माणसाने निवृत्त व्हावे हे मला पसत नाही. जोवर माणसात काम करण्याची धमक आहे, इच्छा आहे, तोवर त्याला काम करू द्यावे. जपानमध्ये पचाहत्तर वर्षांची माणसेही कंबर कसून काम करताना पाहिलेली आहेत मी. या धोरणाने जपानचे काही नुकसान झालेय, असे मला वाटत नाही.

नुसती माणसेच बदलून मी थांबलो नाही तर नवी जाहिरात संस्थाही आणली. मला क्रायस्लरची जनमानसातील प्रतिमाच बदलून टाकायची होती. केनयॉन अँड एक्‌हार्ट ह्या जाहिरात संस्थेने मी फोर्डमध्ये असताना आमच्यासाठी काम केले होते. मला त्याची कामाची पद्धत आवडली होती. फोर्डच्या लिंकन-मर्क्युरी विभागाच्या यशात ह्या संस्थेच्या जाहिरातीचा मोठाच वाटा होता

मी या संस्थेशी नुसता करारच केला नाही तर आमच्या कारभारातच तिला गुंतवले ही जाहिरातसंस्था जितकी आमच्या कंपनीशी एकजीव होईल तेवढ दोन्हीकडच्याना फायद्याचं होतं. संस्थेच्या अनेकाना मी कंपनीतील निरनिराळ्या समित्यात घेतलं. अगदी नियोजन, विक्री या खात्यातील समितीत सुद्धा. असा हा प्रकार, यापूर्वी मोटार व्यवसायात कधीच झालेला नव्हता. ज्या जाहिरात संस्थेला मी दहा कोटी डॉलर्ससाठी ५ वर्षांकरता बांधून घेतलं होतं त्यानी एका रात्रीत चमत्कार करून दाखवावा असं कसं म्हणणार ? त्यापेक्षा त्याना आमच्या गाडीच्या संबधातील सर्व गोष्टी माहीत असण भाग होतं. आमच्या विचाराची दिशा त्याच्या नजरेसमोर असली की तेही आम्हाला पदोपदी सूचना देऊ शकणार होते. 'हे नाव देऊ नका. चालणार नाही.' 'ह्याला उठाव मिळणार नाही, कारण...' इ

अशाप्रकारे एकत्र येण्याच्या पद्धतीमुळे कामाची गती वाढणार होती. आम्ही एखादी गोष्ट जाहीर करायची म्हटली की त्या बाबतीतला पूर्ण अदाज असलेली ही जाहिरात संस्था लागलीच चित्रीकरणाला सुरुवात करायची दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत फिल्म तयार की ती लगेच दुसऱ्या दिवशी प्रसार माध्यमातून झळकायची.

जेव्हा तुम्हाला काही घडवून दाखवायच असत तेव्हा अशा वेगवान हालचाली झाल्या पाहिजेत. मला असा वेग आवडतो

एकदा अशी मनाजोगती माणस हाताशी आल्यावर आपण क्रायस्लरला पुन्हा उर्जितावस्थेत आणू शकू असा मला विश्वास होता. आणि नेमका ह्याच वेळी इराणचा शहा पदच्युत झाला. इराणमधल्या या उलथापालथीनंतर तेलाचे दर दुप्पट झाले. ह्याचा अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेवर फार विपरीत परिणाम झाला. असे काही घडेल याची पुसटशीही कल्पना मलाच काय पण खुद्द राष्ट्राध्यक्ष जिमी कार्टरनाही नव्हती.

क्रायस्लरबद्दल बाजारात नाना प्रकारच्या वावडया उडत होत्या. त्याचा विक्रीवरही वाईट परिणाम व्हायचा आणि ते साहजिकच होतं. *गाडी विकत घेणारा आठदहा हजार डॉलर्स खर्ची घालणार.* कंपनीच जर बंद पडणार असेल तर दुरुस्तीच्या सुटया भागांचा, साऱ्याचाच प्रश्न निर्माण झाला असता. अशा परिस्थितीत क्रायस्लर गाडी हौसेने विकत घेण्याचा विचार सहसा कोणी केला नसता. आमच्यापुढील प्रत्यक्ष प्रश्नापेक्षा या अफवानीच आमचे नुकसान अधिक केले. क्रायस्लर हळूहळू विनोदाचा विषय बनत चालली होती.

एका मासिकात आलेला हा विनोद ऐका–

पहिला : 'तो मनुष्य अगदीच दुष्ट आहे '

दुसरा . 'अगदी म्हणजे नक्की किती ?'

पहिला : 'त्याने आज सकाळी सकाळीच क्रायस्लर कंपनीला फोन करून विचारले–धंदा कसा चाललाय ?'

¤

तेलाच्या किंमती भडकल्याने आमच्या मोठया गाडयांचा खप साफ बंद पडायची वेळ आली. लोकांच्या टीकेचा सूर असा असायचा की इराणमधील ह्या घडामोडींची कल्पना आम्हाला असायला हवी होती. पण हे संकट आमच्यापुरतच मर्यादित नव्हतं. तर फोर्ड आणि जनरल मोटर्सपुढेही बिकट प्रश्न उभा होता. जपानच्या होंडा, टोयोटा ह्या छोटया गाडयांनी ह्या काळात विक्रीचा विक्रमी उच्चांक गाठला होता. या दोन कंपन्या गेली तीस वर्षं छोटया गाडयांचीच निर्मिती करत आल्या आहेत. नेमक्या ह्याचवेळी तेलाच्या किंमती दुप्पट झाल्याने त्यांच्या मालाला भरपूर उठाव मिळाला. १९७९ च्या सुरुवातीच्या पाच महिन्यात या लहान गाडयांचा खप ४३% वरून ५८% वर गेला. या व्यवसायात २% जरी खपात बदल झाला तरी त्याचा अर्थव्यवस्थेवर परिणाम होतो. ह्या ठिकाणी तर १५% चा फरक पडला होता. एकटया मे महिन्यात आमचा व्हॅनचा खप ४२% नी खाली उतरला. ह्या व्यवसायाच्या इतिहासात असा बाका प्रसंग कधीच कोणावर ओढवला नव्हता. ह्याच्या पाठोपाठ मंदीची लाट आली. गाडयांचा वार्षिक खप निम्म्यावर आला. अशा परिस्थितीत तग धरून ठेवणे कठीण जात होते. आमची गुंतवणूक दुप्पट झाली होती आणि खप निम्म्यावर उतरला होता. अशा प्रकारची ही पहिलीच वेळ असल्याने ज्याचा मार्ग त्यानेच काढणे भाग होते.

आमच्यापुढे आमचे अस्तित्व टिकवण्याचा एकच मार्ग शिल्लक होता, तो म्हणजे जमतील तितके कारखाने बंद ठेवणे. ह्यात मिशिगनमधील आमचा सर्वात जुना कारखानाही बंद करावा लागला सुटे भाग पुरवणाऱ्या कंपन्यांना आम्हाला पटवून द्यावे लागले की सारी कंपनीच बंद करण्याचा आमचा विचार नाही ह्या तात्पुरत्याच उपाय–योजना आहेत. काटकसर म्हणून आम्ही अगदी बारीकसारीक गोष्टीतही अनावश्यक खर्च टाळत होतो. वार्षिक अहवालही नेहमीप्रमाणे रंगीत गुळगुळीत कागदावर न छापता साध्या कागदावरच छापून भागधारकांना पाठवला. ह्या मंदीच्या लाटेत आमचा रणगाडे तयार करण्याचा विभागही बंद ठेवावा लागला.

कंपनी तगवण्यासाठी केलेले सर्वच उपाय कठीण होते. परीक्षा पाहणारे होते. कामगारांना काढण्याची वेळ यायची तेव्हा मला फार वाईट वाटायचे. १९७९–८० च्या काळात हजारोंच्या संख्येने कर्मचारी बेरोजगार झाले. एकटया एप्रिल १९८० मध्ये तर ७,००० कामगार घरी बसवावे लागले. त्यामुळे आमचे वर्षाला वीस कोटी डॉलर्स वाचणार होते. त्याच्या आधी काही महिने एकूण ८,५०० कामगारांना आमच्या वेगवेगळया कारखान्यातून आम्ही कमी केले होते. ह्या दोन्ही कपातीनंतर आमचे वर्षाकाठी ५० कोटी डॉलर्स वाचणार होते.

*ह्या कपातीशिवाय आम्हाला गत्यंतरच नव्हते.* मात्र प्रत्येकवेळी कपात करताना मी त्या लोकांशी प्रत्यक्ष बोलत असे. हेन्री फोर्डप्रमाणे ही जबाबदारी दुसऱ्यावर सोपवत नसे. ज्याची नोकरी जाते त्याला काय वाटत, हे मला अनुभवाने ठाऊक होत. मी कधीच माझी लहर म्हणून लोकांना कामावरून काढले नाही आणि त्यांना नुकसानभरपाई देताना कधीही हयगय केली नाही.

## शेवटचा उपाय – सरकारची मदत !

१९७९ च्या उन्हाळयात मला समजून चुकले की अत्यंत कठोर उपाययोजना केली तरच क्रायस्लर वाचवता येईल. जमेल त्या मार्गांने आम्ही खर्च कमी करण्याचा प्रयत्न करत होतो. पण साऱ्या देशाचीच अर्थव्यवस्था कोलमडून पडायला आली होती. तोटा दिवसेंदिवस वाढतच होता.

मला फक्त एकच मार्ग दिसत होता– सरकारची मदत घ्यायची. खर तर मला ही गोष्ट टाळायची होती पण समोर कोणताही इलाज शिल्लक राहिला नाही तेव्हाच सरकारची मदत घेण्याचा विचार मी केला. तात्त्विकदृष्टया मी नेहमीच व्यापारातील खुल्या स्पर्धेचा पुरस्कर्ता होतो. बळी तो कान पिळी असेच धोरण असायला हवे. फोर्डमध्ये असतानाही वॉशिंग्टनची माझी प्रत्येक फेरी सरकारची बंधने कमी करण्याच्या प्रयत्नासाठी असे. सरकारने आमच्या कारभारात लक्ष घालू नये ह्यासाठी मी सतत वाद घालत असे. आणि आता मात्र क्रायस्लरचा चेअरमन म्हणून मला ह्या मदतीची आवश्यकता सरकारला पटवून द्यायची होती. दुसरा मार्गच माझ्यापुढे नव्हता.

सगळया उपायांचा विचार करून झाला होता. जर्मन कंपनी फोक्सवॅगनशी भागिदारी करण्याचेही प्रयत्न केले अरब देशातून मदत मिळवून देण्याची आमिषेही मला बऱ्याच लोकांनी दाखवली. परंतु प्रत्यक्षात मात्र काहीच घडल नाही· अगदी शस्त्रास्त्रांच्या व्यापारात कुबेर म्हणून नावाजलेल्या अदनान खाशोगीलाही भेटलो. सौदी अरेबियाने क्रायस्लरमध्ये पैसे गुंतवले तर ते दोघानाही कसे फायद्याचे होईल ते पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण प्रत्यक्षात कोणत्याही प्रयत्नाला यश आले नाही

सरकारकडची आमची सुरुवातीची मागणी 'लोन गॅरंटी 'साठी नव्हती. माझ्याप्रमाणेच रिकार्डोलाही कंपनीच्या दिवसेंदिवस खालावत चाललेल्या परिस्थितीची जाणीव होती. त्याने सुरुवातीस *वॉशिंग्टनला जाऊन निदान दोन वर्षे तरी सरकारने क्रायस्लरला*

सरकारी बंधनातून सूट द्यावी अशी विनती केली. त्यालाही यश आले नाही. निदान काही काळासाठी तरी सरकारने करातून सूट द्यावी आणि नंतर अधिक दराने पैसे वसूल करावेत अशीही योजना सुचवली. परंतु तिलाही सरकारकडून प्रतिसाद मिळाला नाही.

काही कारखाने बंद ठेवूनही आमच्या उत्पादन खर्चात अपेक्षित घट होत नव्हती. पेट्रोल वाचवणाऱ्या नव्या गाड्यांच्या निर्मितीपोटी आम्ही दरमहा १० कोटी खर्च करत होतो. दर आठवड्याला २५ कोटी डॉलर्स कामगारांच्या पगारापोटी आणि आधीच्या आठवड्यात घेतलेल्या सुट्या भागासाठी खर्च करावे लागत होते. हा खर्च फार काळ आम्हाला झेपणार नाही याची पूर्ण कल्पना आम्हाला होती.

६ ऑगस्ट १९७९ रोजी विल्यम मिलरने फेडरल रिझर्व बोर्डाचे अध्यक्षपद सोडले आणि त्याची नेमणूक सरकारात ट्रेझरी सेक्रेटरी म्हणून झाली आमच्या दृष्टीने ही नेमणूक महत्त्वाची होती. फेडरल रिझर्व बोर्डाचा अध्यक्ष असताना मिलरने रिकार्डोला सुनावले होते की सरकारकडून मदत मागण्यापेक्षा क्रायस्लरने दिवाळखोरी जाहीर करावी. पण आता ह्या नवीन पदी नेमणूक झाल्यावर त्याच्या विचारात इष्ट बदल घडून आला होता. त्याने नव्या पदाची सूत्रे हाती घेताच जाहीर केले की जनहिताचा विचार करता क्रायस्लरच्या मदतीच्या मागणीला त्याचा पाठिंबा आहे. मिलरने करात सूट द्यायला मात्र विरोध दर्शवला. कंपनी वाचवण्याच्या दृष्टीने सरकार 'लोन गॅरंटी'चा मात्र विचार करील असे आश्वासन त्याने दिले.

सुरुवातीपासूनच सरकारच्या या कर्जहमीला प्रचंड विरोध झाला. सर्वांत प्रखर विरोध झाला तो व्यापारी वर्गाकडून. वेगवेगळ्या कंपनी प्रमुखानी जोरदार टीका केली. सरकारचा हा निर्णय म्हणजे मुक्त–व्यापाराच्या मूळ तत्त्वालाच बाधा आणणारा आहे. असे करणे म्हणजे अयशस्वी माणसाला बक्षीस देण्यासारखे आहे. या अशा टीकेला तोंड देण्यासाठी माझ्याकडे उत्तरे होती पण पुरेसा वेळ नव्हता. अमेरिकन कंपन्यात क्रायस्लर दहाव्या क्रमांकावर होती. ही कंपनी बंद पडली असती तर त्याचे परिणाम देशाच्या अर्थव्यवस्थेवर होणार होते.

कंपनी बंद पडली असती तर आमचे कामगार फोर्ड आणि जनरल मोटर्समध्ये गेले असते, असा युक्तिवाद काहीजण करतात पण त्यात तथ्य नव्हते. क्रायस्लर बंद पडली असती तर तिचे सर्वच कामगार रस्त्यावर आले असते देशातील बेकारीत अशा प्रकारे वाढ होण्यात कुणाचेच हित नव्हते. शिवाय क्रायस्लर बंद पडल्याने पोकळी निर्माण झाली असती आणि ती जपानी गाड्यांनी भरून काढली असती. अमेरिकेत निर्माण झालेल्या बेकारीचा फायदा जपानमधील उत्पादन वाढवण्यासाठी झाला असता. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे क्रायस्लर बंद पडली असती तर बेकारासाठी असलेल्या विमा योजनेपोटी पहिल्या वर्षातच सरकारला २ अब्ज ७० कोटी डॉलर्स द्यावे लागले असते. मी सरकारपुढे दोन पर्याय ठेवले. एकतर आम्हाला आता १ अब्ज २० कोटीच कर्ज द्या नाही तर कंपनी बंद पडल्याच्या पहिल्याच वर्षी बेकारासाठी वाटायला २ अब्ज ७० कोटी तयार ठेवा. बेकारासाठी एवढी रक्कम खैरात करण्यापेक्षा तिच्या अर्ध्यानेच आम्हाला कर्ज द्या. ते कर्ज फेडले जाण्याची शक्यता तर आहेच. मग काय स्वीकारता बोला ? शिवाय आम्हाला सुटे भाग पुरवणाऱ्या एकूण अकरा हजार कंपन्या आणि चार हजार डीलर्स या साऱ्यांचे भवितव्य काय ?

कर्जहमीचा प्रस्ताव संमत होण्यापूर्वी सिनेट आणि काँग्रेस कमिटी-पुढे साक्षीदारासाठी उभे राहणे ही काही सोपी गोष्ट नव्हती. हे काम दुसऱ्यावर सोपवण्यापेक्षा आपणच पार पाडावे असे मी ठरवले. साक्ष चालू असताना टेलिव्हिजनचे लोकही कॅमेरे फिरवत हजर असतात. त्यामुळे प्रत्येक वेळी मानसिक दडपण वाढत असते

माझ्या साक्षीत मी पैशाच्या प्रश्नापेक्षाही माणसाच्या प्रश्नावर अधिक भर दिला. क्रायस्लर कंपनीवर हजारोंचे भवितव्य अवलंबून होते. आम्हाला सरकारकडून दयेची अपेक्षा नव्हती. आम्हाला कर्ज हवे होते. त्यातली पै न् पै सव्याज फेडण्याची आमची तयारी होती.

मी काँग्रेस कमिटीपुढे सात मुद्द्यांवर बोललो.

**पहिला** – आमची सद्य:स्थिती अनेक कारणांमुळे उद्भवलेली होती. आमचे व्यवस्थापन चांगले नव्हते. सरकारची बंधने, पेट्रोलचे वाढते भाव आणि मंदी ह्यांचाही हातभार होता आम्ही आता व्यवस्थापन संपूर्णतः बदलून टाकले होते. परंतु इतर गोष्टींवर आमचा ताबा नव्हता.

**दुसरा** – आमच्याकडून शक्य तेवढे सर्व प्रयत्न आम्ही केले होते. अनावश्यक असलेली बरीचशी स्थावर मालमत्ता आम्ही विकून टाकली होती. आमचा वार्षिक खर्च आम्ही ६० कोटी डॉलर्सनी कमी केला होता. कंपनीच्या १७०० वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या पगारात कपात केली होती.

**तीन** – कंपनी फायद्यात चालवायची असेल तर त्यासाठी आम्हाला काही कारखाने चालू ठेवणे आवश्यकच होते. केवळ एक-दोन मॉडेल्स तयार करून आम्ही तग धरू शकलो नसतो. मोटर-गाड्यांबरोबर आम्हाला ट्रकची निर्मिती करणे आवश्यक होते. जपानी मालाशी स्पर्धा करणे सोपे नव्हते. आमची करपद्धती जपानी उत्पादकानाच फायद्याची ठरत होती. जपानमधील कामगारांचे कामाचे दरही कमी होते

**चार** – दिवाळखोरी जाहीर करून आम्हाला स्वतःला वाचवणे जमले नसते.

**पाच** – अमेरिकन व इतर कोणत्याही परदेशी कंपनीशी भागी-दारी करण्याची आमच्यापुढे योजना नव्हती आणि सरकारने कर्ज हमी कबूल केल्याखेरीज तसे धाडस करण्यासाठी कोणी पुढे येईलसे दिसत नाही.

**सहा** – आमच्या आधीच्या गाड्या या अधिक पेट्रोल खाणाऱ्या होत्या. पण आमची नवी मॉडेल्स इंधनात बचत करणारी होती. त्यांचे सरासरी मायलेज जनरल मोटर्स आणि फोर्ड गाड्यांइतकेच होते.

**सात** – कंपनीची स्थिती सुधारण्याच्या दृष्टीने पुढील पाच वर्षां-साठी आम्ही योजना आखलेली आहे. या कालावधीत कंपनी पूर्ववत फायद्यात येईल याची आम्हाला खात्री वाटते.

कमिटीपुढे मी या सर्व मुद्द्यांवर सविस्तर बोललो, सिनेटपुढेही सविस्तर खुलासेवार साक्ष दिली १९७९ सालाच्या अखेरीचे तीन महिने माझ्या मनावर प्रचंड दडपण होते कंपनी चालवण्याच्या जबाबदारी बरोबरच आठवड्यातून चार–पाच वेळा मला वॉशिंग्टनला जावे लागत असे. मेरीचा मधुमेहाचा विकारही अधिक तीव्र झाला होता. दोन तीन वेळी तर वॉशिंग्टनमधील काम अर्धवट टाकून मी

तिच्याकडे लक्ष देण्यासाठीं डेट्राईटला परत आलो होतो. वाशिंग्टन-मध्ये असताना मी दिवसाला दहा दहा बैठका घेत असे. प्रत्येक सदस्याला नव्या उत्साहाने आमचे म्हणणे पटवून द्यावे लागे.

पण अखेर या कष्टाना फळ आले.

कांग्रेसमध्ये दोनतृतीयांश मतानी आम्हाला पाठिंबा मिळाला. ( २७१ वि १३६ ). सेनेटमध्ये मात्र हा पाठिंबा तितकासा प्रभावी नव्हता ( ५३ वि ४४ ). ख्रिसमसच्या थोडे दिवस आधी कर्ज हमीला मान्यता मिळाली. लोन गॅरंटी ॲक्ट संमत झाला.

मी प्रचड थकलो होतो, पण मनावरचा ताण गेला होता, कंपनी पूर्ववत सुस्थित करण्याची सधी प्राप्त झाली होती,

म्हणजे–

आताच खरी कामाला सुरुवात झाली होती.

## समान त्याग

'लोन गॅरंटी ॲक्ट 'मुळे आता आम्हाला कपनी जगवण्यासाठी लढण्याची सधी मिळाली. खरोखर, लढणच म्हणायचय मला.

आमची ही आर्थिक पातळीवरची लढाईच ! या लढाईचा सेनापती मी. सहकार्याने किती अन् केवढी बाजी मारता येते हे मी सिद्ध करू शकलो ह्याचाच अभिमान मला वाटतो.

क्रायस्लरमध्ये मी सुरुवात केली ती माझ्यापासूनच. माझा वार्षिक पगार मी १ डॉलर केला नेत्याचे अनुकरण अनुयायी करतात म्हणूनच नेत्याने काळजी घ्यायची असते. ही कपात जाहीर करूनच मग मी कामगार सघटनेचा नेता डग्लस फ्रासर याच्यासमोर उभा राहिलो आणि नजरेला नजर भिडवून आव्हान केलं–' आता तुमचं सहकार्य बोला. '

मी पगार–कपात करून घेतल्याने काही अन्नाला महाग होणार नव्हतो हे खरं, पण त्यामुळे डेट्राईटमध्ये केवढी खळबळ उडाली आम्ही सर्व एक आहोत, एकाच ध्येयपूर्तीसाठी कटिबद्ध आहोत ही भावना वाढली.

बत्तीस वर्षं फोर्डमध्ये घालवून माणसाविषयी जे मला समजलं नाही ते मला क्रायस्लरमध्ये अवघ्या तीन वर्षांत समजल. सर्वांनी एकत्रितपणे सकट पार करताना लोकाची सहनशक्ती खूप असते. सहवेदना, समवेदना प्रचड कार्य पार पाडते. याचा हृद्य अनुभव मी घेतला

*'समान त्याग' ही भावना प्रेरक ठरते. ह्या वृत्तीमुळेच* क्रायस्लर वाचली. आम्हाला मिळालेल्या कर्जामुळे आम्ही वाचलो नाही, तर आम्ही प्रत्येकाने स्वीकारलेल्या कपातीमुळे लोकशाही तत्र आणि सहकार याचे हे आदर्श उदाहरण

खर्च वाचवण्यासाठी आम्हाला काही लोकांना घरी बसवावं लागल. त्यामुळे त्याच्या आयुष्यात उलथापालथ झाली. आम्ही कंपनी वाचवली खरी पण त्यापायी काहीना खर्ची घालाव लागल.

आमच्या जाहिरातीच्या मोहिमा सुरू झाल्या. बॉब होप, फ्रँक सिनात्रा, बिल कॉस्बी याच्यासारख्या चित्रपट–ताऱ्यानी आमच्या जाहिरातीत भाग घेतला. त्याचा फारच उपयोग झाला.

माझ्या पगार–कपातीनंतर मी वरिष्ठ अधिकाऱ्याच्या पगारात १० टक्के कपात केली अस आजवर मोटार व्यवसायात कधीच घडल नव्हत निम्नस्तरावरील कामगार वगळता इतर सर्वांच्या पगारात कपात केली.

¤

' कामगार संघटनाच्या अधिकाऱ्याना गाठल. विश्वासात घेतलं. पटवल कपनीची सत्य परिस्थिती समजावून दिली. सघटनेचे लोक या कार्यकारी अधिकाऱ्याना सोकावलेले बोके समजतात. पण याच्याही पगारात दहा टक्के कपात केल्याने आता कपात स्वीकारायची पाळी कामगार सघटनेची होती. मी त्याना स्पष्टपणे ऐकवलं. म्हटल, ' हे पहा, तासाला १७ डॉलर्स दराने माझ्याकडे हजारो नोकऱ्या आहेत वीस डॉलर्स दराची मात्र एकही नाही. तेव्हा काय ते ठरवा. ' त्यानी मानल.

वर्षभराने परिस्थिती अधिकच बिकट झाली पुन्हा मी त्यांच्यासमोर उभा राहिलो. रात्रीची १० ची वेळ. ठोक शब्दात त्यांना ऐकवल. ' दोस्तानो, सकाळपर्यंत काय ते ठरवा. माझ्या पाठीशी उभे राहणार नसलात तर कपनीची दिवाळखोरी जाहीर करतो. फक्त आठ तास देतो विचार करायला. बघा काय ते. '

सघटनेचा नेता नतर मला म्हणालाही, 'ह्या कसल्या वाटाघाटी ? ' राहा किंवा जा ' हा काय पर्याय झाला ?'

त्याच म्हणण खरच होतं.

पगारात आणखी कपात झाली. सागायचे म्हणजे १९ महिन्याच्या त्या कालखडात प्रत्येक कामगाराने सरासरीने दहा हजार डॉलर्सचा त्याग केला. तासाला १.१५ डॉलर कपात सुरू केली होती ती वाढत वाढत २ डॉलर्सवर गेली होती

वर्षभर १ डॉलर पगारावर मला राबताना पाहायला सरावलेल्या कामगार सघटनेला दुसऱ्या वर्षी मी त्याची पुनरावृत्ती केली नाही तेव्हा थोडा रागच आला.

*कर्जाची हमी म्हणून आम्ही कामगाराना भागधारक केले.* याचा खर्च प्रतिवर्षी ४ कोटी डॉलर्सप्रमाणे पुढची ४ वर्षं भोगावा लागला. या पद्धतीचा एक उत्तम फायदा म्हणजे जेव्हा कामगाराला नफ्यात वाटा मिळू लागतो तेव्हा तो अधिक आत्मीयतेने काम करू लागतो.

आज आमच्या कामगार वर्गाकडे कपनीची १७ टक्के मालकी आहे

या सघटनेच्या साहाय्याने आम्ही कामचुकार किंवा वरचेवर दाडी मारणाऱ्या कामगाराना ठिकाणावर आणल

सगळ्याच स्तरावर कपातीच धोरण चालू होतं, म्हणून कोणत्याही एका वर्गाला तक्रारीला जागा नव्हती. १९८० मध्ये मी कामगाराना अगदी आवर्जून सागितल की, अडचणीचा काळ सपताच मी काढून टाकलेल्याना पुन्हा कामावर घेईन अगदी फोर्ड किंवा जनरल मोटर्स मध्ये देतात तेवढ्या पगारावर.

. काढून टाकलेल्या कामगारामुळे निवृत्ती वेतन घेणाऱ्याची संख्या बेसुमार झाली. त्याचे निवृत्तिवेतन, आरोग्यविषयक सेवा, विम्याचे हप्ते याचा खर्च कपनीवरच होता

सर्वसामान्य परिस्थितीत ही झळ जाणवत नाही. दोन काम-

गारांच्या उत्पादनातून एका निवृत्ताचा खर्च सुटतो. पण १९८० मध्ये हे गुणोत्तर आम्हाला ९३ : १०० पडत होते. म्हणजे कामावर असणाऱ्यापेक्षा निवृत्ताची सख्या अधिक होती. काम करत असलेल्या प्रत्येकावर स्वतःबरोबर अधिक एका निवृत्ताची जबाबदारी पडत होती. हे जरा जास्तच होतं.

मी पूर्वीच सघटना अध्यक्ष डग्लस फ्रासरला संचालक मंडळावर घेतलं होतं. आणि वृत्तपत्रे म्हणतात तसं हे काही 'पॅकेज डील' नव्हतं. डग्लस हा डोकेबाज माणूस. अल्पावधीतच त्याला कंपनीच्या कारभाराची, अडचणीची कल्पना आली. कारखाना केवळ कामगारावर चालत नसतो हेही त्याला उमगलं. त्याच्या विचारात एवढा फरक पडला की कामगार त्याला घरभेदी, फितूर म्हणू लागले.

पण या डग्लस फ्रासरने उत्तम कामगिरी बजावली. मी त्याला संचालक मडळात घेतला तेव्हा व्यापारी मंडळीत कमालीची खळबळ उडाली. ते म्हणाले– 'सांभाळ, तू कोंबडयाच्या खुराडयात कोल्हा सोडतोयस्.' अर्थात, कामगार म्हणजे व्यवस्थापनाचा नंबर एकचा शत्रू मानणारीच ही वृत्ती

आपण आता अमेरिकेचं आर्थिक भवितव्य सरकार, कामगार संघटना आणि व्यवस्थापन यांच्या परस्पर सामजस्यावरच अवलबून आहे, हे विसरून चालणार नाही. व्यवस्थापन आणि कामगार वर्ग याच्यात परस्पराविषयी विश्वास हवा सहकार्य हवे. पूर्वापार समजुती बदलून नवा विचार रुळवला पाहिजे तस झाल नाही तर जपान आहेच न्याहारीच्या वेळी तोंडी लावण्यासाठी, आपली चटणी उडवायला.

फ्रासरचा प्रयोग आम्ही आमच्यावर करून घेतलाय. त्यावरून काही धडा तुम्हाला घेता येत असेल तर पहा.

□

सरकारकडून दीड अब्ज डॉलर्स आणि बँका आणि पतपेढया मिळून एकूण चारशे संस्थाकडून साडेपासष्ट कोटी डॉलर्स मिळणे अखेरीस शक्यतेच्या कोटीत आले.

अर्थात् बँकानी सुरुवातीला बरीच खळखळ केली. वहिवाटीनुसार आमच्यासारख्या डबघाईला आलेल्या कपनीने दिवाळीखोरी जाहीर करून मोकळ व्हावं, हे बरं, असं त्यांच म्हणणं होतं. पण माझा त्याला विरोध होता मला क्रायस्लरच पुनरुज्जीवन करायच होत.

लोन गॅरंटी अ‍ॅक्ट १९७९ मध्ये समत झाला, तेव्हा क्रायस्लर कंपनीवर पूर्वीपासूनचा आणि आत्ताचा असा एकूण मिळून पावणेपाच अब्ज डॉलर्स कर्जाचा बोजा होता. बँका आणि विमा कपन्याचे असे एकूण चारशे सस्थाचे आम्ही देणेकरी होतो त्याना कुणालाही आमच्या कंपनीच्या नाजूक अवस्थेची काळजी करण्याच कारण नव्हतं. जोवर क्रायस्लर नेहमीच्या व्याजदराने गेली पन्नास वर्षं व्याज बिनचूक भरत होती तोवर त्याना काळजी करण्याच काय कारण ? क्रायस्लर हीच तर त्याचं मोठं गिऱ्हाईक.

जनरल मोटर्स एवढी नफ्यात होती की तिची स्वतःची बँक होती. फोर्ड किंवा जनरल मोटर्स याची जेवढी बँकांत पत होती तेवढी क्रायस्लरची नव्हती. त्यामुळे आमचा तोटाच व्हायचा.

क्रायस्लर जेव्हा सुगीचे दिवस पाहत होती तेव्हा ह्याच बँका तिच्या पाठीशी होत्या. दिवस पालटताच मात्र त्या फटकून वागू लागल्या होत्या.

जेरी ग्रीनवॉल्डने कंपनीची दिवाळखोरी जाहीर करण्याची भाषा सुरू करताच मात्र आम्हाला कर्ज देणाऱ्या बँकाची धाबी दणाणली. कारण तसं झालं तर सर्वांची कर्जे कोर्टात पाच-दहा वर्षांसाठी भिजत पडणार अशाप्रसगी कर्जाच्या व्याजाचा दर ६% वर उतरणार. यात बँकांचा तोटाच होता. त्यापेक्षा सवलतीच्या दराने अधिक कर्जे पुरवून आमचं पुनर्वसन होऊ देणे, हेच बँकाच्या दृष्टीने फायद्याचे होते शहाणपणाचे होते.

केवळ अमेरिकन बँकाकडूनच आम्ही कर्ज घेतले होते असे नाही. लंडन, टोरोंटो, ओटावा, पॅरिस, टोक्यो, अगदी तेहरानचीही बँक आम्ही वगळली नव्हती.

कोणा बँकेला त्या प्रदेशातील आमच्या कारभारात ठराविक टक्के नोकऱ्या देण्याचे मान्य करून तर कोणाला आमच्या कंपनीचे कर्जरोखे मान्य करून ही जुळवाजुळव झाली. या सर्व खटाटोपात जेरी ग्रीनवॉल्ड आणि स्टिव्ह मिलर यांची खूप मदत झाली.

त्याच्या ठिकठिकाणी सतत बैठका चालू असायच्या. विचारविनिमय, पटवापटवी चालू असायची.

त्याच्या एका बैठकीच्या वेळची मजेशीर आठवण सांगतो–

बराच वेळ बैठक चालली लोकाना आता काही खाऊ घालावं म्हणून जवळच्याच दुकानातून सँडविचेस् आणायला माणूस पाठवला. तो हात हलवतच परत आला दुकानदाराने त्याला ऐकवल– 'तू क्रायस्लरकडून आलायस का ? माफ कर. आगाऊ पैसे भर अन् मग काय ते बोल.'

इकडे आमचे लोक कोटयवधी डॉलर्सच्या उलाढालीची भाषा करताहेत पण साधा दुकानदार अर्ध्या तासासाठी आमचा विश्वास धरायला तयार नाही अशी आमची पत !

सुरुवातीला स्टिव्ह मिलर बँक अधिकाऱ्याला वेगवेगळा भेटत होता. त्यात वेळ फार जाऊ लागला आणि त्याच्यात एकवाक्यताही होईना. शेवटी त्याने सर्व सबधिताना एकत्रच बोलावून मोठी बैठक घेतली.

परिस्थिती इतकी विकोपाला गेली होती की या बैठकीत प्रश्न तडीला लागणं भागच होत.

राष्ट्र आधीच आर्थिक पेचात सापडल होतं. तशात जर क्रायस्लर कपनी दिवाळखोर ठरली असती तर त्याचा दुष्परिणाम राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेवर जाणवण्याइतका झाला असता.

पण या बैठकीत सर्वांची मने वळवण्यात स्टिव्ह मिलर यशस्वी झाला. सर्वांकडून मिळून सवलतीच्या दराने ६६ कोटी डॉलर्स नवे कर्ज आणि आधीच्या ४ अब्ज कर्जासाठी साडेपाच टक्के दराने चार वर्षासाठी मुदतवाढ पदरी पाडून घेण्याची कामगिरी त्याने साधली.

आम्हाला कोणत्या अटीवर कर्ज द्यायच हे एकदा सर्वानुमते निश्चित झाल्यावर करारावर सर्वांच्या सह्या घेणे एवढा कार्यभाग उरला. अशी कागदपत्रे एकूण दहा हजार होती. त्याच्या छपाईचा खर्चच मुळी वीस लाख डॉलर्स झाला. ती दप्तरे एकांवर एक रचली असती तर सात मजली इमारतीचं छत त्यानी गाठलं असतं.

ही सर्व कागदपत्रे काटेकोरपणे जतन करणे हेही महत्त्वाचे काम

होते. यातला एकजरी कागद गहाळ झाला असता तरी सर्व मेहनती-वर पाणीच पडले असते.

तेवढ्यात एक नाट्यपूर्ण आणि भयप्रद घटना घडलीच.

२३ जून रोजी सध्याकाळी शेवटचा शिक्कामोर्तब करण्यासाठी वेस्ट वाको इमारतीत बैठक होती. या उत्तुंग इमारतीच्या तिसाव्या मजल्यावर एका फ्लॅटमध्ये ही कागदपत्रे होती. आणि २३ जूनला सकाळी ७–३० वाजता इमारतीत आग लागली. स्टिव्ह मिलर त्यावेळी ३३ व्या मजल्यावरच्या हॉटेलात चहा पीत होता. त्याच्या मनात येऊन गेले ' आपल मुक्त–व्यापार प्रकरण देवालाही आवडलेलं दिसत नाही तर ! '

पण सुदैवाने आग विसाव्या मजल्यावरच आडवली गेली आणि आमच्या भवितव्याची राख होणे टळले.

२४ जूनला दुपारी १२–२६ वाजता हा करार सर्वांच्या सही-शिक्क्याने एकदाचा मान्य झाला.

आमच्या आर्थिक सल्लागारांनी आमच्याकडून १,३२,५०,००० डॉलर्स फी वसूल केली आणि स्टिव्ह मिलरने कर्जाचा पहिला हप्ता ४८,६७,५०,००० डॉलर्सचा चेक ताब्यात घेतला आणि कंपनीच्या खात्यावर जमा केला.

## K-CAR के–कार

हाल् स्पर्लिच १९७७ साली क्रायस्लरमध्ये आला. तेव्हापासूनच तो ' के–कार ' साठी धडपडत होता. फोर्डमध्ये असतानाही अशा पद्धतीचं मॉडेल बाजारात उतरवण्याच स्वप्न मी आणि हाल् पाहात होतो. पण राजा हेन्रीला ही छोटी मोटार स्वप्नातही मान्य नव्हती !

हाल् स्पर्लिचने घडवलेली ही के–कार सुदर, खाशी, सुबक तर होतीच पण बांधणीनेही मजबूत होती. वजनात हलकी होती तिला तिचा स्वतःचा नखरा होता. ढब होती. मुख्य म्हणजे अगदी कमी शक्तीच्या इंजिनवर ती चालू शके. तिला इंधन कमी लागे फ्रंट–व्हिल–ड्राईव्हची बनावट होतीच. छोट्या गाड्यासाठी ' अमेरिकन पर्याय ' म्हणून आम्ही तिची जाहिरात केली. या जाहिरातीत अमेरिकन राष्ट्रध्वजाच्या रंगाचा–लाल, पांढरा, निळा–वापर केला होता जाहिरातीत आम्ही एक खास वाक्य टाकल होतं–' सहा अमेरिकनाना' एकाच वेळी प्रवास करता येईल अशी ही गाडी. हा जपानी स्पर्धकाना टोला होता.

के–कार हे आमच शेवटचं आशास्थान होतं.

*कोणतंही नव मॉडेल मोटर कारखान्यात घडत असतं तेव्हा त्याचं* नामकरण होण्यापूर्वी एखाद्या सांकेतिक नावानेच त्याचा उल्लेख होत असतो. के–कार माडेल तयार झाल्यावर डॉज् विभागात तयार होणाऱ्या त्या मॉडेलच्या गाड्याना ' एरिईझ ' आणि क्रायस्लर विभागात तयार होणाऱ्याना ' रिलायट ' अशी नावे निश्चित केली होती. परंतु हे मॉडेल घडत असताना आणि त्यानंतर त्यानुसार गाड्या बांधल्या जात असतानाही या के–कार मॉडेलची चर्चा कारखान्यात, *कार्यालयात आणि बाहेरही चालू असे. आणि शेवटी* तेच नाव सर्वत्र एवढं रुळल की एरिईझ आणि रिलाएंट नावे मागे पडली आणि जनमानसावर उमटलेलं के–कार हेच नाव रूढ झालं. ह्या गाड्या बाजारात उतरवताना आम्हालाही तेच वापरणं भाग पडलं. असा असतो एकेका नावाचा महिमा.

या के–कारनं आम्हाला सुस्थित तर केलंच पण पुढच्या मोटर मालिकाना मजबूत पायाही दिला नंतरच्या आमच्या जवळजवळ सर्व गाड्या याच ढाच्यावर तयार झाल्यात. अगदी लबॅरन, क्रायस्लर इक्लास, डॅाज–६००, न्यूयॅार्कर, डॅाज, डॅटोना, क्रायस्लर लेसर...

आमच्या या पद्धतीवर ' द वॅालस्ट्रीट जर्नल 'ने आगपाखड केलीय. पण खर ते सागतो, अशा पद्धतीने गाड्या बनवणारे आम्हीच पहिले नाही आहोत. अशा पद्धतीने यापूर्वीही इतर कपन्यानी लोकाना बनवलय. आम्ही त्याचे आद्यप्रवर्तक नाही आहोत.

एक खरं की पूर्वी कोणे एके काळी नवीन मॉडेल घडवताना प्रामाणिकपणे ते सपूर्णतः नव्या पद्धतीने, नव्या ढाच्यात घडवले जाई. पण आता चालू काळात संपूर्णतः नवीन मॉडेल घडवायचं तर एक अब्ज डॉलर्स तयार हवेत. तेव्हा आता सपूर्णतः नवीन मॉडेलचा दावा करणं ही फसवणूक आहे. प्रत्येक नव मॉडेल हे जुन्या नव्याच मिश्रण असतं. अगदी कोणी म्हणजे कोणीही–जनरल मोटर्ससुद्धा– सपूर्णतः शंभर टक्के नव मॉडेल देऊ शकत नाही. तसं देणं परवडत नाही.

जुन्याच घडणीवरून आणि ढाच्यावरून नव मॉडेल घडवणं ही पद्धत गेली पन्नास वर्षे डेट्राईटमध्ये रूढ आहे जपानी लोक हे पूर्वी-पासूनच करत आलेत. जनरल मोटर्सही काही वेगळं करत नाहीए. फोर्डमध्येही तेच चालत

के–कारन आम्हाला घवघवीत नफा दिला हे खरं पण विक्रीच्या दृष्टीने पहिल वर्ष तापदायकच गेल.

त्याच एक कारण म्हणजे के–कार बाजारात आणताना किमान ३५ हजार गाड्या तरी ठिकठिकाणच्या शो–रूम्समधून एकाच दिवशी प्रदर्शित व्हायला हव्या होत्या. पण आमच्या कारखान्यातील यांत्रिक बिघाडामुळे फक्त दहा हजार गाड्याच उपलब्ध होऊ शकल्या

दुसरं कारण म्हणजे, जनरल मोटर्सचं एक्स–कार मॉडेल आणि आमची के–कार याच्यात किंमतीवद्दल चुरस होती. त्यानी लेबल लावल होत ६,२७० डॉलर्स तर आम्ही लावलं होत ५,८८० डॉलर्स.

मग जनरल मोटर्सला मागे टाकण्यासाठी आम्ही पर्यायी सोयी पुढे केल्या वातानुकूलित असलेली गाडी, ऑटोमॅटिक ट्रान्समिशनची सुविधा असलेली गाडी, मखमली गिर्द्याची बैठक इ. इ अशापैकी पर्याय निवडला की दोनएक हजारांनी मूळ किमतीत वाढ व्हायची.

*आणि इथेच आम्ही चुकलो. लोकांना मॉडेलच्या मूळ बांधणीत* अधिक गम्य होत आणि ही माहिती आम्हाला आधीच मिळालेली होती. त्यादृष्टीने इतर कोडकौतुक पुरवत बसण्यापेक्षा मूळ घडणी-वरच अधिक लक्ष केंद्रित करायला हव होतं. ही चूक आम्हाला भोवली. पर्यायी सुविधामुळे गाडीची एकूण किंमत ८ ते ९ हजार डॉलर्सवर थडकली

के–कार मॉडेल आम्ही बाजारात आणल होत ते सर्वसामान्य *ग्राहकाला समोर ठेवून. त्याच्या मनात एकदा के–कार नीट ठसल्या-* वर इतर सुविधा पुढे केल्या असत्या तर एक वेळ चालल असतं.

पण तिकडे दुर्लक्ष करून आम्ही श्रीमतीचे चोचले पुरवण्यासाठी आधीच सुविधाचा विचार करू लागलो. आणि एवढ करूनही ते श्रीमत लोक काय हे मॉडेल उचलणार होते थोडेच !

पण ही चूक फार उशीर होण्यापूर्वीच आमच्या लक्षात आली. आम्ही सावरलो, शहाणे झालो. गाडीच्या मूळ बाधणीवर अधिक लक्ष दिले लवकरच त्या गाडयाचा उत्तम उठाव होऊ लागला.

आणि तेवढ्यात डिसेंबर १९८० ला व्याजाचा दर १३.५%वरून १८.५% वर गेला म्हणजे एकदम ५% नी वाढला. घर विक्री आणि मोटरविक्रीचे व्यवहार ठप्प झाले. व्याज दर १३.५% वर थावला असता तरी एकवेळ चालल असतं पण दिसामासानी तो वाढतच गेला. त्याला आवर घालण माझ्या हाती नव्हत मग माझ्या हाती होतं ते मी केल

आमच्याकडून हप्त्यावर गाडी घेणाऱ्याला आश्वासन दिल की १३% हा व्याजदर हिशेबात घेऊन आम्ही गाडीची किंमत लावू. यापेक्षा दर वाढला वा कमी झाला तर ती तफावत कपनी सोसेल.

ह्याने विक्री वाढली.

तसच, आमची गाडी इतर गाडयाशी तुलना करून पाहाण्यासाठी, त्या चालवून पाहाणाऱ्याला आम्ही ५० डॉलर्स इनाम जाहीर केलं. तो दुसऱ्या कपनीची गाडी घेण्याची शक्यता असूनही आम्ही हा धाडसी प्रकार केला माल पसत न पडल्यास पैसे परत करण्याची हमी दिली गाडी घेतल्यानतर ५ वर्षं मुक्त सेवा देऊ केली. हे सार पदराला खार लावणार होतं खर पण ग्राहकाला आमचा विचार करायला लावणार होतं. ते तस एकदा झाल की पुढच आपोआप घडून येणार होत.

आणि तसच घडलही.

१९८१ च्या सुरुवातीला विक्रीने चागलाच जोर धरला. ते साल संपता सपता के-कारने २०% मोटार बाजार बळकावला... आणि नंतरही कधी तिला कसला अटकाव झाला नाही.

१९८० पर्यंत सरकारी कर्जाचे पहिले दोन हप्ते आमच्या हाती पडले होते. शेवटचा एक हप्ता बाकी होता. ह्या तिसऱ्या हप्त्याने आम्हाला फार मन.स्ताप दिला.

सर्वसामान्य जनतेला औद्योगिक जगातल्या अशा घडामोडीचे ज्ञान नसतं. त्या समजल्या तरी त्याचे पुरते आकलन होत नसते आम्हाला कर्जाचा हप्ता दिला गेला की त्याची माहिती लागलीच टेलिव्हिजनवर यायची मग लोक म्हणायचे– 'आले हे पुन्हा... मागच्या वेळेला यांनाच दीड अब्ज दिले होते की... आता आणि कशाला ?'

खर म्हणजे मी हे कर्ज तीन हप्त्यांत स्वीकारायला नको होत. अगदी एकाच नाही तर निदान दोन हप्त्यात देण्याचा आग्रह धरायला हवा होता. कारण जेव्हा जेव्हा म्हणून आम्ही पैसे मागायला जात असू तेव्हा तेव्हा त्याची बाहेर चर्चा व्हायची. त्याचा परिणाम आमच्या विक्रीवर व्हायचा लोकाना वाटायच, क्रायस्लर म्हणजे बिनबुडाचा खड्डा कितीही ओता.. ! आणि अशा कर्जबाजारी कपनीचा माल तो काय असणार ? अस म्हणून ते इतर कपनीच्या मोटारीकडे वळत माझा तर अंदाज आहे की आम्हाला मिळालेल्या कर्जाचा तिसरा हिस्सा या घातक प्रसिद्धीमुळेच वाया गेला.

◻

- १९८१ च्या सुरुवातीला बँकाकडून त्यानी देऊ केलेल्या कर्जाचा शेवटचा ४० कोटी डॉलर्सचा हप्ता यायचा होता आणि आम्हाला ६० कोटी डॉलर्स आणखी हवे होते. हे वाढीव कर्ज कपनीच्या रोख्याच्या बदल्यात द्याव अशी मागणी केली. कामगाराच्या पगारात मोठी कपात केली. सुटे भाग पुरवणाऱ्या कपन्याची बिले भागवण्याची मुदत वाढवून मागितली आणि काही महिन्याकरता ५% सूटही मागितली आणि या सर्वांसाठी पर्याय ठेवला होता एकच– दिवाळखोरीचा.

यावेळी बँकानी १ अब्ज २० कोटीच कर्ज कपनीच्या रोख्याच्या बदल्यात दिल.

वस्तुत: कपनीच्या रोख्यावर नफ्याचा हिस्सा द्यावा लागतो. पण आम्ही मात्र सरकारच कर्ज सपूर्णपणे फिटेपर्यंत रोख्यावर डिव्हिडड देणार नव्हतो. अर्थात्, या रोख्यानी नतर त्याना धोधो पैसा दिलाच.

सरकारी कर्जाचा व्याप प्रचडच होता. तो साभाळण्यासाठी सरकारने आम्हाला एकूण रकमेच्या एक टक्का फी लावली होती तीच वर्षाला १ कोटी २० लाख व्हायची. शिवाय वरचेवर अहवाल सादर करावे लागत, तो एक व्याप वेगळाच. कागदाचे डोंगर इकडून तिकडे हलवावे लागत आणि तो खटाटोप करूनही ती कागदपत्रे वाचली जात अशातला भाग नाहीच. त्याना काही शका, अडचण आली की लागायचे आमचे फोन खणखणायला.

त्यानी मला एक चागला तोडगाही सुचवला होता म्हणा–क्रायस्लर कपनीचे विलिनीकरण करण्याचा. आणि अशा सधीवर देशी–परदेशी कपन्याचा डोळा असतोच पण आमची बँकेतली शिल्लक पाहून कोण पुढे यायला धजावल असत ? आम्ही मात्र आशाळभूतपणे त्या योजनेचा विचार करू लागलो.

फोर्ड कपनीशी आमचं जुळेल असं वाटल

अर्थात या बाबतीत सर्वांत मोठी अडचण येणार होती ती हेन्रीचे व माझे जुळून येण्यात.

पण हेन्रीने अलीकडेच जाहीर केल होत आपण निवृत्त होत आहोत. आणि कपनीच भलं होत असेल तर वर्षभरात मीही बाजूला झालो असतो.

मध्यस्थानी ही गोष्ट काल्डवेलद्वारा हेन्री फोर्डच्या कानी घातली. त्याने हा प्रस्ताव साफ उडवून लावला.

' तेव्हाच काय पण आजही क्रायस्लर सुस्थित झाल्यावरही असं विलिनीकरण दोन्ही कपन्याच्या दृष्टीने फायद्याच आहे असं मला वाटत. कारण आज जनरल मोटर्सचे एकूण पाच विभाग आहेत. तर क्रायस्लर आणि फोर्डचे प्रत्येकी दोन. जनरल मोटर्सच्या वर्चस्वाला शह देण्यासाठी अशी युती जरुरीचीच आहे

आहे ती परिस्थिती न बदलता असच चालू राहिल तर इ. स. २००० मध्ये मोटार व्यवसायातील स्पर्धेत दोनच कपन्या रिंगणात दिसतील. जनरल मोटर्स आणि जपानी कपन्या जपानी मोटार व्यवसायाला टक्कर देण्याच्या दृष्टीने अमेरिकन मोटार उद्योग समर्थ बनवण्यासाठी ही युती हवीच.

हेन्री फोर्डने विलिनीकरणाचा प्रस्ताव फेटाळून लावला तरी मला खात्री होतीच की आम्ही १९८१ च्या अखेरीस सुस्थिर होऊच पण व्याजाच्या वाढत्या दराने आणि आर्थिक दु:स्थितीने आपला फणा वर

काढलाच. एक नोव्हेंबरला आमच्या तिजोरीत फक्त १० लाख डॉलर्स शिल्लक होते.

क्रायस्लरचा रोजचा खर्चच मुळी ५ कोटी. १० लाखाची रक्कम म्हणजे हातखर्चासाठी वरच्या कप्प्यात ठेवलेली फुटकळ रक्कम. दर महिन्याला सुटे भाग पुरवणाऱ्या कपन्याचच देण ८० कोटी असायचं. मोठा बाका प्रसग– या कंपन्यांचा विश्वास टिकवून धरायचा आणि पुरवठा चालू ठेवायला लावायचा ही महत्त्वाची पण कटकटीची कामगिरी.

एक एक दिवस असा उजाडायचा की आम्ही देवाला काकुळतीने विनवायचो–' गलबतावर आणखी हजारभर मोटारी अधिक जाऊ देत म्हणजे मग गुरुवारच २ कोटी ८० लाखाचं देणं देता येईल.' किंवा 'शुक्रवारचा ५ कोटीचा पगार वाटता येईल.' एका एका दिवसाचा असा हिशेब व्हायचा. पण सुटे भाग पुरवणाऱ्या कपन्यांनी खरोखरच आम्हाला सहकार्याचा हात दिला. हेही दिवस मागे पडले.

आणि आता?

आता तुमच्या खात्यावर बँकेत शिल्लक किती आहेत ते पाहून तुम्हाला एकाच काय पण शंभर दिवसाचीही मुदतवाढ देतील.

पैसा असला की पत असते.

## 'तू खरा अमेरिकन आहेस'

आमच्या केनयोन अँण्ड एकूहार्ट जाहिरात संस्थेने मला जाहिरातीत झळकवण्याचा घाटच घातला. आमच्या व्यवस्थापक-प्रशासकाच्या बैठका चालू असतानाही सस्थेचे लोक येत. निरनिराळ्या प्रसंगाच्या चित्रफिती घेत. मी डीलर्सशी बोलत असल्याचा एक प्रसग त्यानी टिपला. त्याना तो फारच आवडला. एका जाहिरातीत त्यानी तो टाकला. आणि अशा प्रकारे जाहिरातीच्या चित्रीकरणात माझा प्रवेश झाला. मग कधी मी 'मी तुम्हाला आमचीच मोटार घ्या अशी गळ घालत नाही. पण तिला एकदा जोखून पाहा तर खरं!' असं किंवा 'तुम्ही क्रायस्लरला विचारात न घेताच एखादी मोटार विकत घ्याल तर आपल्या दोघाच्याही दृष्टीने ते हिताचे नाही' असं सागताना नाही तर 'तुम्हाला यापेक्षा अधिक उत्तम मोटार आढळली तर जरूर घ्या' असं आव्हान देताना टेलिव्हिजनवर घरोघरी दिसू लागलो.

हळूहळू याही क्षेत्रात मी तरबेज झालो.

आम्ही पूर्वी लोकाना परिचित झालो होतो ते आमच्या हलाखीमुळे आमची ही प्रतिमा बदलायची होती. म्हणून या अशा काहीशा आक्रमक जाहिरातीतून आम्ही लोकासमोर येण भाग होत.

लोकाची आपली एक धारणा की कितीही म्हटल तरी जर्मन किंवा जपानी बनावटीच्या गाड्याच उत्तम डेट्राईटमध्ये तयार होणाऱ्या गाड्याना त्याची सर नाही. पण ती स्थिती तशी आता उरलेली नाही हे त्याना स्पष्टपणे पटवून द्यायला हव होतं. पण तस करताना लोकात आमच्याविषयी विश्वास निर्माण व्हायला हवा होता. आम्ही नुसती प्रौढी मारून काम झालं नसतं. आपण आपल्याच निर्णयानुसार वागत आहोत अशी भावनाही ग्राहकात निर्माण व्हायला हवी होती. त्या दृष्टीने आम्ही जाहिराती तयार करून प्रसृत करत होतो कारण आम्हाला एक पूर्णपणे खात्री होती की केवळ उत्सुकतेपोटी जरी ग्राहक आमच्या शो रूम्समध्ये आले तरी आमचीच फत्ते ठरलेली.

आणि झालही तसच.

आणखीही एक फायदा-लोक आता मला कुठूनही ओळखू लागले. एकदा न्यूयॉर्कमध्ये एका वृद्धेने मला रस्त्यात थाबवलं. म्हणाली– 'अयाकोका, मी तुला बरोबर ओळखलं. मला फार अभिमान वाटतो तुझा तुझ कार्य असच चालू ठेव. तू खरा कणखर माणूस आहेस, आणि सच्चा अमेरिकनही.'

मला असं ओळखलं जातं याचा मला आनंदच होतो. पण गमत म्हणजे बहुतेक लोक मला ओळखतात ते जाहिरातीमुळे. मी मस्टांग, फिएस्टा बाजारात आणल्या, फोर्डला सुगीचे दिवस दाखवले किंवा क्रायस्लरला खड्डयातून वर काढली म्हणून नव्हे आणि याचच वैषम्य मला वाटतं. जनमानसावर प्रसारमाध्यमाचा, त्यातल्या त्यात टेलिव्हिजनचा विलक्षण प्रभाव आहे हे बाकी खर

स्वदेशीचा घोषा लावणाऱ्याने विदेशी फ्रेंच बनावटीचा चष्मा वापरणं अयोग्य. म्हणून जाहिरातीच चित्रीकरण चालू असताना त्या लोकानी मला चष्माही बदलायला लावला.

या जाहिरातीमुळेच, राष्ट्राध्यक्षपदासाठी मी धावपळ करतोय असा लोकाचा समज झाला. तशा अफवाही उठू लागल्या माझ्या तोडची– 'अमेरिका ही काय चीज आहे हे आपण सिद्ध करूया' या प्रकारची वाक्य त्याला कारणीभूत झाली असावीत.

१९८४ च्या निवडणुकीत मी उभा राहीन असा अनेकांनी अदाज वर्तवला होता पण मी १९८३ मध्ये पुढील ३ वर्षांसाठी क्रायस्लरशी करारबद्ध झालो आणि त्या अफवा विरल्या.

या अफवाविषयी जाहिरात क्षेत्रातला एकजण मला म्हणाला– 'त्याच कारण उघड आहे लोकाचा आता कोणावर विश्वास उरलेला नाही. तू त्याच्याशी बोलतोस. तू काहीतरी मोठं कार्य हाती घेतलयस आणि ते जिद्दीने पार पाडतोस यावर त्याचा विश्वास बसलाय तू थापाड्या नाहीस हे त्याना मनोमन पटलय. आजवर त्यानी अनेकाना वावड्या उडवताना पाहिलय. पण तुझ वेगळेपण त्याना निश्चितच जाणवलंय'

लोकाना माझं व्यवस्थापन कौशल्य जाणवलय. खर्चात कपात करून, पगारात कपात करून, किंमती उतरवून मी पैसा उभा करतो आणि कपनी चालवतो याचे ते साक्षीदार आहेत अदाजपत्रकावर ताबा कसा ठेवावा, कपनीला ऊर्जितावस्था कशी प्राप्त करून द्यावी हे मला साधत यावर त्याचा विश्वास बसलाय. एखादा चाहता मला लिहितो– 'तू या देशाला काही दिशा दाखव गाड्या विकण्यात तुझा वेळ वाया का घालवतोस?'

लोकाना कणखर नेतृत्वाची आस आहे. प्रे. आयसेन हॉवर नतर विश्वासून राहाव असा नेता या देशाला लाभलेला नाही. केनेडीची अकाली हत्या झाली जॉन्सनने आम्हाला युद्धात खेचल. निक्सनने अप्रतिष्ठा आणली फोर्ड तात्पुरता होता. कार्टर गुणी पण अवेळी आलेला म्हणून अयशस्वी ठरला रेगन तर भूतकाळातच जगतोय. थोडक्यात लोकाना खबीर नेतृत्व हवय.

१९८२ मध्ये वातावरण निवळलं. त्यावर्षी आम्हाला बऱ्यापैकी नफा झाला. आम्ही कामगार वर्ग वाढवायला सुरुवात केली. डील-र्संची संख्याही वाढली.

नफ्याच्या दिशेने वाटचाल सुरू होताच प्रथम ऊर्मी निर्माण झाली ती तातडीने वार्ताहर परिषद घेण्याची. क्रायस्लरसाठी आजवर वापरलेली विशेषण– 'पैशाचे भुकेले', 'आर्थिकदृष्ट्या संकटात असलेले', 'घडपडणारे' वगैरे – आता संपवा. आम्हाला हव तर नबर तीनचे म्हणा. पण ती विशे णे आता कायमची संपलीत हे नीट लक्षात ठेवा, हे मला सागायचं होत.

१९८३ साली क्रायस्लरच्या संपूर्ण इतिहासात झाला नव्हता एवढा प्रचड नफा झाला. ९२,५०,००,००० डॉलर्स ! कंपनीच्या शेअर्सचा भाव भरमसाठ वाढला. लोक त्यावर तुटून पडू लागले.

शेअर्सची विक्री जोरदार होऊ लागली.

लवकरच आम्ही सरकारकडून घेतलेल्या ४० कोटीचा पहिला हप्ता फेडला.

आणि नंतर काही आठवड्यातच मी नॅशनल प्रेस क्लबमध्ये घोषित केल–की आम्ही सरकारचे उर्वरित संपूर्ण कर्ज एकरकमी फेडत आहोत. तारीख दिली १३ जुलै १९८३. योगायोग म्हणजे हेन्री फोर्डने मला काढून टाकल्याला त्या दिवशी नेमकी ५ वर्षं पूर्ण होत होती.

८१ कोटी ३४ लक्ष ८७ हजार ५०० डॉलर्स एक रकमी चेकने आम्ही सरकारला देणार होतो. आजवर वॉशिंग्टन नगरीने अनेकाना कर्ज घेताना पाहिलय. अस परत फेडताना क्वचितच पाहिलं असेल

ह्या एवढ्या मोट्या रकमेचा चेक स्वीकारताना नेमके कोणकोणते व्यवहार पुरे व्हावे लागतात, कशा पद्धतीने तो स्वीकारायचा असतो हे सरकार दरबारी माहीत नसल्याने आम्ही जाहीर केलेल्या तारखे-नंतर एक महिन्याने त्यानी तो चेक स्वीकारला.

सरकारी कर्जाचं ओझं आमच्या पाठीवरून उतरले आणि आम्ही मोकळे झालो. आता थोडी गंमत करून पाहायला हरकत नव्हती.

बदलता येणारं 'कन्व्हर्टिबल' मॉडेल बाजारात आणायच ठरवल. 'क्रायस्लर–लबॅरॉन' थोडी ठीकठाक करून मी फिरवू लागलो. तर कॅडिलॅक आणि मर्सिडिजवाले थाबथाबून माझी दखल घेऊ लागले. चौकशी करू लागले. 'आपल्यालाही पहा बुवा अशी एखादी' म्हणून तिथल्यातिथे मागणीही नोदवू लागले.

आणि 'पाहू या तरी' म्हणून आम्ही लबॅरॉन बाजारात आणली. पहिल्या वर्षी जेमतेम ३ हजार खपतील असा अंदाज होता. २३ हजार खपल्या.

मग १९८४ मध्ये टी ११५ मिनीव्हॅन काढली. धोधो नफा. कहरच...

१९७४ मध्ये मी आणि हाल स्पर्लिच फोर्डमध्ये फिएस्टावर काम करत होतो तेव्हाही मिनीव्हॅनची कल्पना राबवण्याचा आम्ही प्रयत्न केला. सशोधनखात्याने अशा ८ लाख गाड्याचा खप होईल असा हिरवा बावटाही दाखवला. पण राजा हेन्रीला आमची कल्पना रुचली नाही. ती त्याने उडवून लावली.

१९८४ मध्ये मी आणि हाल् स्पर्लिचने क्रायस्लरमध्ये मिनीव्हॅन घडवली. ती आता फोर्डच्या ग्राहकावर जगतेय. हे मी लिहीत असताना १९८४ साल अर्धअधिक उलटलय आणि आमच्याकडच्या मीनिव्हॅनचा साठा पार सपलाय.

¤

१९८० मध्ये सरकारी कर्जाचा पहिला हप्ता स्वीकारण्यापूर्वी आम्ही सरकारला कपनीची १ कोटी ४४ लाख डॉलर्स किंमतीची तारणपत्रे दिली होती.

त्यावेळी आमच्या शेअर्सचा भाव चालू होता ५ डॉलर्स. तो आता १३ वर पोचल्यावर सरकार १ कोटी ४४ लाख किंमतीचे शेअर्स ताब्यात घेणार होते.

पण आता भाव चालला होता ३३ डॉलर्सचा. कर्जाची मुदत १९९० पर्यंतची ठरलेली होती. तोवर त्यानी ती तारणपत्रे अडवून ठेवली असती तर आम्हाला फारच महागात पडल असतं. आम्ही सरकारी कर्ज १० वर्षांसाठी घेऊनही अवघ्या तीन वर्षात फेडलं होत. या तीन वर्षांत व्याजापोटी आम्ही ४० कोटी ४० लाख डॉलर्स आणि प्रशासकीय कामकाजाची फी म्हणून ३ कोटी ३० लक्ष डॉलर्स दिले होते. ६ कोटी ७० लक्ष डॉलर्स वकीलमंडळीनी वसूल केले होते चालू भावाने तारणपत्राची किंमत ३० कोटी डॉलर्स होत होती. हा सारा हिशेब लक्षात घेता आमच्याकडून सरकारला २४टक्के दिले जात होते. हे आम्हाला फारच तोटच्याच ठरत होत.

काहीही झालं तरी ह्या तारणपत्राचा सोक्षमोक्ष लावायचाच असे ठरवून आम्ही बोलणी सुरू केली. वाटाघाटी होत होत तो व्यवहार ३१ कोटी १० लाखावर सुटला. हेही महागातच पडलं.

पण अडकलेलं घोंगडं एकदाच सुटल. अशा या कडूगोड आठवणी.

फोर्डमधल्या आणि नतर क्रायस्लरमधल्या माझ्या कामगिरीत माझ्या पत्नीने–मेरीने–माझी मनःस्थिती साभाळण्याचे काम कसोशीने पार पाडले. ती माझी निःसीम चाहती. माझा मोठा आधार.

मेरीला मधुमेहाचा विकार होता. अशा रुग्णाना मानसिक ताण सहन करावा लागू नये. पण दुर्दैवाने मी निवडलेला रस्ता ताण-तणावांचाच होता.

मला १९७८ मध्ये फोर्डमधून काढून टाकल त्यावेळी तिला हृदयविकाराचा पहिला झटका आला.

१९८० मध्ये प्रे. कार्टरनी 'लोन गॅरंटी ॲक्ट'वर नुकतीच सही केली होती. मी आणि माझे सहकारी एका हॉटेलात हा विजय साजरा करत होतो. तिथली मेजवानी अर्ध्यावर सोडून मला तिच्या सेवेसाठी यावं लागल. कारण तिला हृदयविकाराचा दुसरा झटका आला होता तिची तब्येत ढासळत गेली

जेव्हा जेव्हा मला कामानिमित्त दौऱ्यावर जावे लागे तेव्हा तेव्हा कुठेही मी असलो तरी दिवसातून दोनतीन वेळा फोनवरून मी तिची चौकशी करत असे. तिच्या आवाजावरून तिला इन्सुलीनचा केवढा डोस द्यायला हवा ते सांगे. घरी तिच्या सोबतीसाठी कोणी असल्या-खेरीज मी दौऱ्यावर जात नसे. ती कधीही कोमात जाऊ शकली असती म्हणून ही काळजी घ्यावी लागे.

माझ्या मुलीनीही तिची जिवापाड काळजी घेतली. तिची कधीच हेळसाड होऊ दिली नाही.

१९८३ मध्ये तिचा विकार बळावला. १५ मे १९८३ रोजी वयाच्या सत्तावन्नाव्या वर्षी ती मला सोडून गेली.

तिच्या मृत्यूनंतर दोनच महिन्यांनी आम्ही सरकारी कर्ज एकरकमी फेडले. ते पाहायला ती दुर्दैवाने हयात नव्हती.

१९७५ मध्ये हेन्री फोर्डने चौकशी आयोग नेमून माझे चारित्र्यहनन करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी ती फार संतापली होती. त्याला कोर्टात खेच म्हणत होती. पण ते सारं होऊनही मी फोर्डमध्येच राहिलो तेव्हा तिला ते रुचले नसूनही ती माझ्या पाठीशीच राहिली.

फोर्डमधील माझ्या शेवटच्या दोन वर्षात जे काही कंपनीत घडत होतं आणि मला ताप होत होता त्याची झळ मी मेरी आणि माझ्या मुली, कॅथी आणि लिया, यांच्यापर्यंत पोहोचू दिली नाही. फोर्डमधून माझी हकालपट्टी झाली तेव्हा या तिघींची मन:स्थिती काय झाली असेल, या विचारानेच मी अधिक अस्वस्थ होतो.

माझी फोर्डमधनं हकालपट्टी झाल्यानंतर मेरी माझ्यापाठी पहाडासारखी उभी राहिली. कुठून तिला हे बळ येत होतं ?

मला मोटर व्यवसायच प्रिय आहे हे तिला माहीत असल्याने तिने क्रायस्लरमध्ये जाण्यासाठी मला प्रोत्साहन दिलं. 'कदाचित् फोर्डने तुला काढलं हीच तुझ्या आयुष्यातली सर्वोत्तम घटना असू शकेल' असं ती म्हणाली.

१९७९ मध्ये इराण–समस्या आणि वाढते व्याजदर यांनी मी हताश व्हायची वेळ आली. कारण मोटर व्यवसायात इंधन हे रक्त तर व्याजदर हा प्राणवायू आहे. एक वेळ अशी आली होती की हे सारं सोडून माघारी वळावं वाटू लागलं. तेव्हाही ती म्हणाली – 'हा कडा सरळ उभा आहे. तो पार करून जाणं तुला झेपत नसेल तर सोडून दे. अशक्य गोष्टी सोडून देण्यात मानहानी ती कसली ?'

फोर्ड सोडावी लागल्यानंतर माझ्या मित्रांनीही मला सोडलं. हा दुरावा तिच्या मनाला फार लागला. पण ती खचली नाही. ती नेहमीच सरळमार्गी आणि शक्तिशाली राहिली. खचून जाणं तिच्या स्वभावातच नव्हतं. कठीण प्रसंगी तिच्यात विलक्षण बळ संचारायचं. मग तो घरातला प्रसंग असो की बाहेरच्या जगातला.

ती स्वत: मधुमेहाने ग्रासलेली होती आणि या विकाराविषयी लोकांना पुरेसे माहीत नाही याचे तिला वाईट वाटे. या विकारावर अधिक संशोधन आणि सामान्य लोकांचं प्रबोधन व्हावं म्हणून ती प्रयत्नशील होती. तिच्या हयातीतच मी बोस्टनच्या 'जोसलीन डायबेटीस सेंटर'मध्ये मेरी अयाकोका शिष्यवृत्ती सुरू केली.

आमच्या दोघांच्याही जीवनात गृहसौख्याला प्रथम स्थान होते, गृहस्वास्थ्याला प्राधान्य होते. माझ्या सुट्टीचा प्रत्येक शनिवार–रविवार हा मी माझ्या कुटुंबासाठीच राखून ठेवी.

उच्च वर्तुळातील अधिकाऱ्यांसमवेत गोल्फ खेळणे ही माझी करमणुकीची कल्पना नव्हती. नेहमीच त्या विश्वात गरगरत राहिलं पाहिजे असं थोडंच आहे ? काहींची अशी प्रामाणिक समजूत आहे की उच्चपदी पोचलात की तुम्ही तुमच्या गृहस्वास्थ्याकडे दुर्लक्ष केलं तरी चालतं मला मात्र हे साफ अमान्य आहे. तुमच्या घरातल्या मुलाबाळांना त्यांच्या लहान वयात तुमचा सहवास मिळणार नसेल तर तो तुम्ही पुढे कधी देणार ?


तुम्ही तुमच्या कुटुंबातूनच मनोधैर्य मिळवत असता. कठीण समयी तुम्हाला धीर कोण देतं ?

मृत्यूपूर्वी दोन आठवडे मेरी टोरोंटोत होती. आम्ही नुकताच पहिला तिमाही नफा जाहीर केला होता. तिने मला जवळ बोलावून सांगितलं, 'मला तुझा अभिमान वाटतो.'

गेल्या काही खडतर वर्षात माझं तिला सांगायचं राहूनच गेलंय– 'मला तुझा किती म्हणून अभिमान वाटतो.'

मी यशस्वी कारकिर्दी अनुभवल्या. पण त्या अनुभवाला माझ्या गृहसौख्याची रुची नाही.

**समाप्त**



स्वस्त व दर्जेदार औषधांसाठी

# लो कॉस्टची चळवळ

**● डॉ. अरुण बाळ ●**

खूप औषध लिहून देणारा डॉक्टर चांगला अशी अंधश्रद्धा सुशिक्षित समाजातसुद्धा दिसून येते. आपल्या आरोग्याची काळजी डॉक्टरवर टाकून मोकळं होणं, हा सार्वत्रिक अनुभव आहे. हे अज्ञान एका बाजूला तर दुसऱ्या बाजूला वारेमाप नफा कमावणाऱ्या औषधी कंपन्या. यावर उपाय म्हणून तुम्हा–आम्हा सर्वांच्या शिक्षणासाठी, मदतीसाठी, स्वस्त व दर्जेदार औषधं करण्यासाठी स्थापन झालेल्या संस्थेचा परिचय.

Health for all by 2000 AD हे सरकारचे घोषवाक्य आपणास वारवार प्रचार–माध्यमातून पाहावयास व ऐकावयास मिळते. हे उद्दिष्ट साधण्यासाठी चाललेल्या वेगवेगळ्या योजनाची माहिती वेगवेगळ्या प्रचारमाध्यमांतून सरकार प्रसारित करत असते. जागतिक आरोग्य सघटनासुद्धा याच उद्दिष्टांचा पाठपुरावा करते बऱ्याचशा सस्थाही या दृष्टीने बरेच प्रयत्न करत असतात. या प्रयत्नात Well Baby Clinics, ग्राम आरोग्य सेवकाचे शिक्षण, Audio-visual aid चा उपयोग, गर्भवती स्त्रियांसाठी वेगळी क्लिनिक्स याचा समावेश होतो. बहुताशी सार्वजनिक आरोग्य, Rational Drug Therapy, स्वच्छ पिण्याचे पाणी, आरोग्य शिक्षणातील मूलभूत बदल याबाबत फारच थोडे प्रयत्न केले जातात. प्राथमिक आरोग्य केंद्राद्वारे जनतेस आरोग्यसेवा उबरठ्यापर्यंत पुरवण्याचे सरकारचे धोरण आहे. परतु प्रत्यक्षात परिस्थिती अत्यत वेगळी आहे. एकच उदाहरण द्यावयाचे असले तर अँटिबायोटिक्सचे देता येईल. संसर्गजन्य रोगासाठी या औषधाचा उपयोग होतो, पण या गटातील योग्य ती औषधे आजही प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळत नाहीत. लहान मुलांसाठी लागणारी अँटिबायोटिक्स Syrups तर बऱ्याचशा प्राथमिक आरोग्य केंद्रात मिळतच नाहीत.

आरोग्य हा आपल्या देशाच्या घटनेप्रमाणे प्रत्येक नागरिकाचा हक्क आहे. हा हक्क बजावण्याचे आज कुठलेही साधन सामान्य जनतेच्यापाशी सहज उपलब्ध नाही. देशाच्या एकदर योजनेचा अत्यत अल्प भाग आरोग्यावर खर्च केला जातो. या अल्पशा भागातून फारच थोडा भाग देशाच्या खऱ्या आरोग्य-समस्यावर खर्च केला जातो आपल्या देशाच्या आरोग्य बजेटच्या १८–२० टक्के भाग ह्या औषधावर खर्च होत आहे. १९८६ साली देशातील एकदर औ ध उत्पादन २९०० कोटी रु. झाले आहे यापैकी फक्त ५३ टक्केच औषधे ही आवश्यक आहेत. देशातील फक्त २०–२५% जनतेसच योग्य ती औषधे उपलब्ध आहेत. आज देशात साधारणतः ४०,००० औषधे बाजारात उपलब्ध आहेत. परतु त्यातील फक्त २५०–३०० औषधेच आवश्यक आहेत.

### अंधश्रद्धा सुशिक्षित समाजातही

एका बाजूला ही वस्तुस्थिती आहे तर प्रत्यक्षात आज आपल्याला ग्रामीण भागातसुद्धा औषधाचा वापर वाढत असल्याचे दिसून येते. जास्तीत जास्त औषधे लिहून देणारा डॉक्टर हा सर्वांत चागला डॉक्टर ही गैरसमजूत हळूहळू समाजात रूढ होत आहे इजेक्शननेच सर्व रोग लवकर बरे होऊ शकतात ही अंधश्रद्धा सुशिक्षित समाजातही दिसून येते.

औषध उद्योगधंद्यावर अवास्तव नफा मिळवण्याबद्दल टीका केली जाते. ती बहुताशी खरी आहे. आवश्यक औषधाचे कमी उत्पादन करून त्याची कृत्रिम टचाई निर्माण करून अनावश्यक व धोकादायक औषधे बाजारात जास्त विकली जातात. यास औषध उद्योगधद्याकडून साचेबद उत्तर दिले जाते ते असे की, आवश्यक औषधाच्या उत्पादनातून पुरेसा नफा न मिळाल्याने त्याचे उत्पादन कमी होते. सरकारच्या विविध धोरणामुळे आवश्यक औषधाच्या उत्पादनात तोटा होतो विविध ग्रामीण आरोग्य प्रकल्पात व इतर विकास प्रकल्पात काम करणाऱ्या डॉक्टराना व कार्यकर्त्यांना हा वस्तुस्थितीमधील विरोधाभास मोठ्या प्रमाणात जाणवत आला आहे. यातून मार्ग काढण्यासाठी समविचारी कार्यकर्त्यांनी बराच विचार-विनिमय केला आहे औषध उद्योगधद्याच्या टीकेला चोख उत्तर म्हणजे स्वस्त व दर्जेदार औषधे उपलब्ध करून देणे हेच आहे! या कल्पनेचा उदय अशाच प्रदीर्घ विचारविनिमयातून झाला. ही कल्पना प्रत्यक्षात कशी कार्यरत करावयाची यावर बराच विचार केल्यावर अशा स्वस्त औषधाचे उत्पादन करून त्याचे सरळ ग्राहकानाच वितरण करणे हाच खरा उपाय ठरू शकेल असे जाणवले व लो कॉस्ट स्टँडर्ड थेराप्युटीक्स या सघटनेचा जन्म झाला. ग्रामीण भागात व शहरातील झोपडयांत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना या उपक्रमामुळे जास्तीत जास्त

फायदा होऊन त्यांचे काम जास्त परिणामकारक ठरावे या मूळ तत्त्वावर या उपक्रमाची कार्यप्रणाली तयार करण्याचे ठरविण्यात आले.

## स्वस्त व दर्जेदार औषधे

'लो कॉस्ट' या संघटनेने स्वतःच्या कामाचे स्वरूप ठरवण्याआधी स्वस्त व योग्य दर्जाची औषधे उपलब्ध करण्याच्या प्रश्नाचा सर्वांगीण विचार केला होता. या वेळी या प्रश्नाचे दोन पैलू लक्षात आले. पहिला पैलू असा की देशातील अनावश्यक औषधाचा अवाजवी वापर हा मोठ्या प्रमाणात डॉक्टराच्या अवास्तव प्रिस्क्रिप्शन्समुळे होत आहे. यात प्राथमिक आरोग्य केन्द्रातील डॉक्टरांपासून मोठ्या मोठ्या वैद्यकीय महाविद्यालयातील डॉक्टराचा समावेश होतो. या अवास्तव प्रिस्क्रिपशन्सची अनेक कारणे या पाहणीमध्ये आढळून आली. मुख्यतः बऱ्याचशा डॉक्टराचे औषधाबद्दलचे अज्ञान व औषध कपन्याचे जाहिरातबाजीचे धोरण हे या समस्येचे मूळ आहे असे दिसून आले. बऱ्याच वेळा डॉक्टराच्या अज्ञानामुळे रुग्णाला वेगवेगळ्या तज्ज्ञाकडून तपासण्या करून घ्याव्या लागतात. यात पैशाचा, वेळाचा अपव्यय होतो जरी डॉक्टरानी बरोबर निदान केले तरी बऱ्याच वेळा डॉक्टर अवास्तव प्रिस्क्रिप्शन लिहून देतात. यामागे कदाचित वर नमूद केलेली, जास्त औषधे देणारा डॉक्टर जास्त चागला–ही गैर समजूतही असू शकेल. बऱ्याचशा डॉक्टराचे औषधाबद्दलचे अज्ञान हे अचूक माहिती न मिळाल्यामुळे असते. यास बहुताशी आपली वैद्यकीय शिक्षणाची पद्धत कारणीभूत आहे काही संस्थाच्या रुग्णालयात स्वस्त व वाजवी औषधाऐवजी महागड्या औषधाचाच साठा केला जातो. त्यामुळे जरी डॉक्टराना स्वस्त व वाजवी औषधाचे प्रिस्क्रिपशन द्यावयाचे असले तरी ते शक्य होत नाही. वेगवेगळ्या प्रचारमाध्यमातून होणाऱ्या औषधाच्या जाहिरातीचा प्रभाव रुग्णावर व डॉक्टरांवरही पडतो टी. व्ही वरील जाहिरातीचा आवर्जून उल्लेख करावा लागेल

स्वस्त व मुबलक औषधे उपलब्ध करण्याच्या प्रश्नाचा दुसरा महत्त्वाचा पैलू हा की–देशातील उपलब्ध औषधापैकी बरीचशी मिश्रणे ही अशास्त्रीय व महागडी आहेत. या बरोबरच आवश्यक औषधेही योग्य किंमतीत व मुबलक उपलब्ध नाहीत बऱ्याचशा छोट्या कपन्या मोठ्या प्रमाणात जातिवाचक ( Generic ) नावाने औषधाचे उत्पादन करत आहेत. परतु त्याच्या औषधाचा दर्जा शंकास्पद आहे. लेन्टिन कमिशनच्यामुळे अशा छोट्या कंपन्याच्या औषधाचा दर्जा किती टाकाऊ असतो ते दिसून येतच आहे. औषधाच्या किंमतीचे विश्लेषण केल्यावर असे दिसून आले की किंमतीचा मोठा भाग हा जाहिराती, पॅकेजिंग व तत्सम दर्जाशी जास्त संबध नसलेल्या बाबीशी निगडीत आहे

स्वस्त व योग्य ती औषधे मुबलक प्रमाणात उपलब्ध करून देण्याबरोबरच औषधांबद्दलचे वैद्यकीय व्यवसायाचे अज्ञान व समाजातील या बाबतच्या गैरसमजुती या बाबतही काही धोरण आखणे महत्त्वाचे आहे हे या प्रश्नाच्या सर्वांगीण अभ्यासावरून दिसून आले. किंबहुना हे अज्ञान व गैरसमजुती याचा वैद्यकीय व्यवसाय व समाजावरील प्रभाव कमी केल्याशिवाय लो कॉस्ट सारखा उपक्रम परिणामकारक ठरू शकणार नाही हे लक्षात आले तेव्हा दुहेरी स्तरावर या संघटनेचे काम चालू करण्याचे ठरले.

## विविध टप्पे

स्वस्त व योग्य ती औषधे उपलब्ध करण्याबाबत प्रथमतः खालील काही टप्प्याप्रमाणे काम करण्याचे ठरले. ते असे.

१) या उपक्रमाबद्दल प्रथमतः विकास प्रकल्प व तत्सम उपक्रमामध्ये काम करणाऱ्या समविचारी कार्यकर्त्यांशी चर्चा करून त्यांच्या औषधाच्या गरजेची वास्तव कल्पना करून घेणे.

२) औषध वितरण केंद्र–प्रथमतः महाराष्ट्र व गुजराथसाठी चालू करणे. या केंद्राद्वारे *विविध संघटनाच्या मागण्या नोंदवून* वेगवेगळ्या छोट्या उत्पादकांकडून त्या पुरविणे औषधाचा दर्जा लो कॉस्टने तपासण्याचे ठरले

३) तिसऱ्या टप्प्यात जास्त उत्पादन क्षमता असलेल्या उत्पादकाकडून लो कॉस्टच्या देखरेखीखाली औषधाचे उत्पादन करून घेणे.

४) लो कॉस्टने स्वतंत्र उत्पादनासाठी कारखाना चालू करणे व त्याबरोबरच वेगळी औषधाच्या दर्जाचे नियत्रण करणारी प्रयोग शाळा स्थापन करणे

५) लो कॉस्टच्या वेगवेगळ्या शाखा व उत्पादन केन्द्रे स्थापन करणे.

६) मूलभूत औषधाचे उत्पादन करणे.

समाजातील व वैद्यकीय व्यवसायातील गैरसमज व अधश्रद्धा हे फक्त शैक्षणिक प्रयत्नानतरच दूर होऊ शकतात. त्या दृष्टीने लो कॉस्टने आपले धोरण पुन्हा विविध टप्प्यामध्ये आखले होते. ते असे–

प्रथम विविध विकास प्रकल्प व सस्था याच्याशी विचारविनिमय करून लो कॉस्टची भूमिका समजावून सागणे. या सस्थाना या शैक्षणिक प्रयत्नात सामावून घेणे. किंबहुना लो कॉस्टच्या तत्त्वप्रणालीचा प्रसार अशा संघटनामार्फतच करणे. यासाठी जरूर त्या कार्यकर्त्यांची तयारी करणे याच वेळी वैद्यकीय व्यवसायास औषधाबद्दलची अचूक माहिती पुरवून त्याबाबतचे व्यवसायातील अज्ञान कमी करणे–हे विविध टप्पे ठरवण्यात आले.

वरील सर्व योजनेनुसार लो कॉस्ट या संघटनेची सुरुवात १९८४ च्या मध्यास झाली. वर नमूद केलेल्या टप्प्याप्रमाणे सुरुवात करून लो कॉस्टने गेल्या ४ वर्षांत स्वतःची प्रयोग शाळा स्थापन करण्यापर्यंत मजल मारली आहे. गुजराथ, महाराष्ट्र यामधील ४०–५० सस्थाना लो कॉस्ट स्वस्त व दर्जेदार औषधे पुरवत आले. जास्त उत्पादन क्षमता असलेल्या उत्पादकाकडून लो कॉस्ट औषधे तयार करून घेते व औषधाचा दर्जा–प्रत्येक वेळी लो कॉस्टचा कार्यकर्ता नमुने घेतो व दोन वेगवेगळ्या प्रयोगशाळात तपासून घेतो. या बाबत कुठल्याही प्रकारची तडजोड करण्यात येत नाही. लो कॉस्ट फक्त जातीवाचक नावाने ( Generic names ) *जागतिक आरोग्य संघटनेच्या आवश्यक औषधाच्या* यादीनुसार औषधे बनवते सोबत दिलेल्या यादीवरून लो कॉस्टच्या औषधाची किंमत व इतर बाजारातील कपन्याच्या औषधातील तफावत दिसून येईल नुकतीच लो कॉस्टने बांगलादेशच्या डॉ झफरुल्ला चौधरीच्या गोणोशास्थ केंद्राच्या बरोबर करार करून त्याना आपल्या देशातून कच्चा माल व यत्र सामग्री पुरवण्याचे कबूल केले आहे लो

कॉस्टच्या सुरुवातीस ऑक्सफॅ व मिसरिओर या दोन आतराष्ट्रीय सघटनानी लो कॉस्टला आर्थिक मदत केली होती. परंतु आता लो कॉस्ट आपल्या स्वतःच्या पायावर उभी आहे. लो कॉस्ट जरी औषधाचे उत्पादन करत असले तरी लो कॉस्टचे कोठेही प्रतिनिधी नाहीत. किंवा लो कॉस्टकडून डॉक्टराना कधी भेटी देऊन औषधाची जाहिरात करण्यात येत नाही लो कॉस्टचा खर्च त्यामुळे अत्यत कमी होतो. लो कॉस्टच्या व्यवस्थापनात मोजकेच लोक असून बहुताशी काम मानदरीत्या ( Horonary ) चालते. अवास्तव व अवाजवी खर्च टाळल्यामुळे औषधाच्या किमतीही कमी होतात. याच तत्त्वानुसार लो कॉस्टचा प्रयोग विविध ठिकाणी सहकारी तत्त्वावर चालवल्यास आवश्यक औषधे योग्य किमतीस व मुबलक मिळू शकतील.

लो कॉस्टचे शैक्षणिक प्रयत्नही प्राथमिक टप्प्याच्या पुढे गेले आहेत. यातील काही महत्त्वाच्या घडामोडी खालीलप्रमाणे आहेत.

**प्रिस्क्रिपशन गाईडन्स व इन्फर्मेशन सर्विस**

लो कॉस्टचा हा अभिनव प्रयत्न आहे सामान्य ग्राहकाना औषधाची तुटपुजी माहिती असते. बहुतेक वेळा डॉक्टरानी दिलेली औषधे बिनतक्रार घेतली जातात. आपल्या देशात आरोग्याची सर्व जबाबदारी डॉक्टर व देव याच्यावर टाकून जनता मोकळी झालेली असते. डॉक्टरही त्याच्या अज्ञानामुळे किंवा जाहिरातबाजीमुळे रुग्णाला जास्त औषधे लिहून देतात यामुळे बहुतेकवेळा रुग्णाची औषधयोजना अशास्त्रीय दृष्टिकोणातून होते. या अशास्त्रीय दृष्टिकोणामुळे रुग्णाचीच जास्त हानी होते. या योजनेनुसार–औषधाची डॉक्टराना अचूक व योग्य ती माहिती पुरवणे व रुग्णाना डॉक्टराच्या प्रिस्क्रिप्शन्सबाबत योग्य तो सल्ला व गायडन्स देणे. बडोद्यामध्ये सध्या ही योजना चालू करण्यात आली आहे. या योजनेनुसार व्यक्तिशः डॉक्टरानाही प्रिस्क्रिप्शन्स लिहिताना जर औषधाची माहिती पाहिजे असली तरी ती तज्ज्ञ डॉक्टरामार्फत पुरवली जाते. जर रुग्णानी एकादे प्रिस्क्रिप्शन सल्ल्यासाठी पाठविले तर लो कॉस्टचे तज्ज्ञ डॉक्टर त्याचे विश्लेषण करून त्याबाबत रुग्णाला सल्ला देतात त्याचप्रमाणे प्रिस्क्रिप्शन लिहिणाऱ्या डॉक्टराबरोबर चर्चा करतात. या योजनेचा उद्देश रुग्णाना डॉक्टराविरुद्ध तक्रार करण्यास प्रवृत्त करणे हा नसून ग्राहकाचे व डॉक्टराचे शिक्षण करणे हा आहे. रुग्णाना त्याच्या रोगाबद्दल व औषधाबद्दल सर्व माहिती मिळवायचा हक्क आहे. हा हक्क या योजनेनुसार बजावणे काही प्रमाणात शक्य आहे.

लो कॉस्टने बडोदा व मुबई येथे तज्ज्ञ डॉक्टराचे एक मडळ स्थापन केले आहे. हे मडळ दर दोन महिन्यानी मीटिंग घेऊन बाजारातील प्रत्येक विविध गटाच्या विविध प्रकारच्या औषधाची छाननी करते त्यातील जी अवास्तव व अनावश्यक औषधे आहेत त्याची यादी करून ती विविध भाषामधून प्रसिद्ध केली जाते नुकतीच लो कॉस्टने बाजारातील खोकल्यावरील औषधाची छाननी करून त्यातील अनावश्यक औषधाची यादी करून प्रसिद्ध केली होती. त्याची MRTP Commision ने विशेष दखल घेऊन त्याबाबत या औषधाच्या उत्पादकाना ही औषधे बाजारातून का काढून टाकू नयेत याची कारणे दाखवा अशी नोटीस पाठवली आहे. वेदनाशामक औषधाबद्दलही लो कॉस्टने अशीच पाहणी केली आहे या पाहणीनुसार बाजारात आज १५३६ वेदनाशामक औषधे आहेत त्यातील ६०० पेक्षा जास्त अनावश्यक आहेत अशाच पाहण्या व्हिटॅमिन्स, पोटदुखीवरची औषधे याबाबत केल्या आहेत.

डॉक्टराना अचूक व योग्य ती माहिती देण्यासाठी प्रत्येक औषधाबाबत उपलब्ध असणारी नवी शास्त्रीयदृष्ट्या योग्य माहिती या योजनेद्वारे पुरवली जाते. Newsletter द्वारे नियमितपणे वेळोवेळी उपलब्ध होणारी नवी माहिती पुरवली जाते. हीच माहिती विविध सस्थानाही पुरवली जाते. लोकॉस्टच्या औषधाच्या पॅकिंगमध्ये ही पत्रके ठेवली जातात. ही पत्रके लवकरच विविध भाषामध्ये तयार केली जाणार आहेत.

वरील योजनाशिवाय लो कॉस्टद्वारे वर्तमानपत्रात विविध भाषांत ग्राहकाच्या माहितीसाठी वेळोवेळी लेख प्रसिद्ध केले जातात.

कुठल्या संस्थाना औषधे पुरवावयाची याबद्दल लो कॉस्ट जास्त चिकित्सक आहे. याबाबत लो कॉस्टचा दृष्टिकोण स्पष्ट आहे. फायदा करणाऱ्या सस्थांना लो कॉस्ट मुद्दामच औषध पुरवत नाही. लो कॉस्टचे सर्वात मोठे भांडवल हे विश्वासार्हता आहे. सध्याच्या प्रचलित वैद्यकीय व्यवसायात औषधे पुरवल्यास त्याचा नफेबाजीसाठी उपयोग केलाच जाणार नाही याचा विश्वास अजून लोकॉस्टला नाही. म्हणूनच अजूनही लो कॉस्टने व्यक्तिश. डॉक्टराना औषधे पुरवण्यास सुरुवात केली नाही अजूनही हा टप्पा आला नाही असे लो कॉस्टला प्रामाणिकपणे वाटते.

प्रचलित वैद्यकीय व्यवस्था, वैद्यकीय शिक्षण पद्धत यात मूलभूत फरक होणे जरुरीचे आहे त्याशिवाय औषधाचा वापर समाजात योग्यरीतीने होऊ शकणार नाही. लो कॉस्टचे प्रयत्न हे उद्दिष्ट पुरे करण्याच्या दृष्टीने पहिले पाऊल आहे. लो कॉस्टच्या भविष्य–योजनात या प्रयोगाच्या प्रत्येक राज्यात शाखा काढणे, स्वतःचे उत्पादन करण्यासाठी स्वतत्र कारखाना काढणे, Rational Dry Theropy चा प्रसार करण्यासाठी एक वेगळयाच धर्तीवर कॉलेज चालू करणे ह्याचा समावेश आहे. लो कॉस्ट हा एक प्रयोग आहे व त्यावर एकाच संस्थेचा हक्क न राहता हा प्रयोग सर्व ठिकाणी चालू (Duplicate) करणे महत्त्वाचे आहे. जागतिक आरोग्य सघटनेच्या आवश्यक औषधाचा प्रसार करण्याच्या मोहिमेत अशा प्रयोगाची जरूर आहे व लो कॉस्ट या मोहिमेत एक महत्त्वाची जबाबदारी पार पडू शकेल असा विश्वास लो कॉस्टच्या कार्यकर्त्यांना आहे.

□

लो कॉस्टचा पत्ता :
लो कॉस्ट, पहिला मजला
प्रेमानंद साहित्य सभा हॉल
लकडी पुलासमोर, दाडीया बाजार
बडोदा – ३९०००१.

# फेअरफॅक्स, जर्मन पाणबुड्या आणि बोफोर्स

● निरंजन आगाशे ●

राजकीय क्षेत्रात गेल्या काही दिवसांत एका मागोमाग एक वादळी घटना घडत आहेत. १९८४ च्या लोकसभा निवडणुका झाल्यानंतर प्रथमच विरोधकांच्या आघाडीत थोडेसे चैतन्य निर्माण झाल्यासारखे वाटत आहे. या घटनांवर वृत्तपत्रांमधून सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या मजकुरामुळे जनमानसातही काहीशी खळबळ उडाली आहे. हे सगळे वातावरण पाहून येथे फार मोठा राजकीय बदल होऊ घातला आहे का ? या प्रश्नाचे उत्तर देणे मात्र अवघड आहे. कारण भारतीय राजकारणाची तीच गोची आहे. येथे फार मोठी उलथापालथ सहसा घडत नाही. (ती घडायची असेल तर आणीबाणीच यावी लागते !) आणि शांत असे दीर्घकालीन स्थैर्यही कधी जाणवत नाही. तत्कालीन परिस्थितीत एकेक लाट निर्माण होते. आणि काही काळानंतर ती विरूनही जाते.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर झालेली लोकसभा निवडणूक आणि त्यानंतरचे १ वर्ष या काळात आशावादाची एक लाट निर्माण झाली होती. नव्या तरुण पंतप्रधानांवर राजकारणी, विचारवंत, पत्रकार आणि सर्वसामान्य जनता या सगळ्यांकडूनच भलभलत्या गुणांचे आरोप होत होते. मिस्टर क्लीन, २१ वे शतक, संगणक संस्कृती, आधुनिक व्यवस्था हे परवलीचे शब्द बनले होते. भारतीय समाजात जणू काही मन्वंतर घडून येत आहे असाच भास होत होता.

परंतु १९८७ या वर्षाच्या सुरुवातीलाच एकामागोमाग अशा घटना अक्षरशः येऊन आदळल्या की, त्यावेळच्या आशावादाच्या लाटेत आपण वाहवत होतो, हे जून ८७ मध्ये कोणाला खरेसुद्धा वाटणार नाही.

मार्चमध्ये संसदेच्या अर्थसंकल्पी अधिवेशनाला सुरुवात झाली. सत्तारूढ पक्षाचे ४२५ 'होयबा' आणि विरोधकांच्या बाकावर जेमतेम १०० सदस्य. अशा स्थितीत हे अधिवेशन फारसे रंगेल असेही वाटले नव्हते. ठराविक अर्थसंकल्प व त्यावरील ठराविक प्रतिक्रिया यापलीकडे फारसे काही घडेल हे अपेक्षित नव्हते.

परंतु पंतप्रधान–राष्ट्रपती वाद, फेअरफॅक्स, जर्मन पाणबुड्या आणि बोफोर्स अशी प्रकरणे बाहेर येण्याचा एकदम धडाकाच सुरू झाला.

या घटना इंदिरा काँग्रेस पक्ष व सरकार यांच्या भ्रष्टाचारावर लख्ख प्रकाश टाकणाऱ्या आहेत. राष्ट्रपती व पंतप्रधान यांच्यातील वादातून या घटनामालिकेला प्रारंभ झाला, त्यातून नवी नवी माहिती उजेडात येत गेली आणि प्रत्येक टप्प्यावर राजीव सरकारचा पाय खोलात जात आहे असेच चित्र दिसू लागले. आपल्या कारकिर्दीत राजीव गांधींनी राष्ट्रपतिपदाचे सर्वांत जास्त अवमूल्यन केले. परदेश दौऱ्यांना जाण्यापूर्वी राष्ट्रपतींना भेटण्याचे त्यांनी टाळले, एवढेच नव्हे तर महत्त्वाच्या धोरणात्मक निर्णयांच्या बाबतीत राष्ट्रपतींना त्यांनी अंधारात ठेवले. साहजिकच पंतप्रधान व राष्ट्रपती यांच्यातील वादाचे पडसाद वृत्तपत्रांतून उमटू लागले. मार्चच्या सुरुवातीला विरोधी पक्षांनी संसदेत हा प्रश्न उपस्थित केला, व त्यावर चर्चा घडून आली. त्यामध्ये हस्तक्षेप करून पंतप्रधानांनी निःसंदिग्धपणे असे जाहीर केले की, महत्त्वाच्या प्रश्नांवर वेळोवेळी मी राष्ट्रपतींना माहिती दिलेली आहे !

परंतु अहमदाबाद येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'संदेश' या गुजराती दैनिकाने व प्रख्यात इंग्रजी वृत्तपत्र 'इंडियन एक्सप्रेसने' अनुक्रमे १२ व १३ मार्च रोजी राष्ट्रपतींनी पंतप्रधानांना लिहिलेले एक पत्रच प्रसिद्ध केले. राजीव गांधी यांच्या संसदेतील वक्तव्याचा तीव्र निषेध करणाऱ्या या पत्रात 'महत्त्वाच्या विषयांवर आपण मला कधीही माहिती दिली




इंडिया टुडे अंकावरून साभार

¤

या मोहिमेच्या सुरुवातीलाच एक गोष्ट त्यांच्या स्पष्टपणे निदर्शनास आली की, अक्षरशः कोणतीही उद्योगसंस्था या देशाचे नियम पाळत नाही. विशेषतः परकीय चलन विषयक नियमांचा सर्रास भंग केला जात आहे. महसूल गुप्तचर, अंमलबजावणी आणि करबुडवेगिरीविरोधी पथक यांच्यामार्फत निरनिराळ्या उद्योगसंस्थांवर श्री. सिंग यांनी छापे घातले तेव्हा अनेक भारतीयांची बेहिशेबी मालमत्ता परकीय बँकांमध्ये दडवून ठेवण्यात आली आहे हेही त्यांच्या लक्षात आले. अंबानी, बिर्ला, मोदी, थापर, टाटा, किर्लोस्कर यांच्यासह अनेक उद्योगसंस्थांवर एकतर छापे घालण्यात आले किंवा त्यांची चौकशी झाली. एकंदर ५ हजार उद्योग संस्थांवर त्यांनी छापे घातले आणि ३०० उद्योगसंस्थांविरुद्ध आर्थिक गुन्हेगारीचे खटले दाखल झाले. किर्लोस्कर व थापर या उद्योगपतींना तर अटकही करण्यात आली.

नाहीत' असे राष्ट्रपतींनी स्पष्टपणे म्हटले होते. हे पत्र प्रसिद्ध झाल्यामुळे राजीव गांधी संसदेत खोटे बोलले व संसदेची त्यांनी दिशाभूल केली हे सिद्ध झाले.

हे पत्र प्रसिद्ध झाल्याच्या दुसऱ्या दिवशीच 'इंडियन एक्स्प्रेस'चे चालक व उद्योगपती रामनाथ गोएंका यांच्या मद्रास येथील निवासस्थानावर केंद्रीय गुप्तचर खात्याच्या अधिकाऱ्यांनी धाड घातली. तसेच या वृत्तपत्राचे एक स्तंभलेखक श्री. गुरुमूर्ती यांना अटक करण्यात आली. राष्ट्रपतींच्या पत्राला दिलेली प्रसिद्धी व सीबीआयची ही कारवाई या घटना पाठोपाठ घडाव्यात हा योगायोग आहे काय याविषयी निरनिराळे प्रवाद आहेत.

परंतु या धाडीनंतरच फेअरफॅक्स प्रकरणाला तोंड फुटले. अर्थात त्याचा प्रारंभ आधीच झाला होता. त्यावेळचे केंद्रीय अर्थमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग हे या सगळ्या नाट्याच्या सूत्रधारपदी होते.

लोकसंघटनाच्या माध्यमातून पुढे आलेले राजकीय नेतृत्व या अर्थाने सिंग हे कधीच राजकीय नेते नव्हते. त्यामुळेच कदाचित सुरुवातीला त्यांचे व राजीव गांधी यांचे सूत जमले असावे. एका संस्थानिकाने श्री. सिंग यांना दत्तक घेतले. त्यामुळे मूळचे जमीनदार असलेले श्री. सिंग हे 'राजासाब' बनले. अणुशास्त्रज्ञ व्हायचे ही खरे म्हणजे त्यांची महत्त्वाकांक्षा होती. परंतु १९६० मध्ये ते काँग्रेसमध्ये गेले, आणि आपल्या राजकीय कारकिर्दीत त्यांना भराभर महत्त्वाची पदे मिळत गेली. १९७१ मध्ये उत्तर प्रदेशातून खासदार म्हणून ते निवडून आले, १९७४ मध्ये त्यांच्याकडे केंद्रीय व्यापारमंत्रिपदाची जबाबदारी आली. त्यानंतर उत्तर प्रदेशचे ते मुख्यमंत्रीही झाले. परंतु तेथील दरोडेखोरीला आळा घालण्यात अपयश आल्याने त्यांनी १९८३ मध्ये आपल्या पदाचा राजीनामा दिला. एकंदरीत, कोणताही विधिनिषेध न बाळगता सत्तेला चिकटून राहण्याच्या काँग्रेसच्या सर्वसाधारण परंपरेत ते कोठेच बसत नव्हते.

१९८४ च्या लोकसभा निवडणुकीत 'मिस्टर क्लीन' यांनी स्वच्छ प्रशासन आणि २१ व्या शतकाची 'लाट' निर्माण केली होती; त्यानुसार श्री. सिंग यांच्याकडे अर्थमंत्रिपद सोपविण्यात आले. प्रारंभापासून 'स्वच्छता मोहीम' हे श्री. सिंग यांनी आपले कार्यक्षेत्र ठरविले होते. कोणतेही विशिष्ट आर्थिक तत्त्वज्ञान किंवा विचारसरणी त्यांच्या जवळ नव्हती हे खरे आहे; पण उद्योगक्षेत्रात चाललेला भ्रष्टाचार, लाचखोरी निपटून काढण्यास त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न सुरू केले हे मान्य करावे लागेल. अगदी बड्या बड्या उद्योगपतींची गचांडी धरण्याचा निर्भीडपणा त्यांनी दाखविला.

## अंबानी–वाडिया स्पर्धा

श्री. सिंग यांची ही स्वच्छता मोहीम व फेअरफॅक्स प्रकरण यांत आणखी एक महत्त्वाचे उपकथानक घडले. उद्योगपतींमधील स्पर्धा व संघर्ष यांचा राजकीय धोरणावर कसा परिणाम होतो आणि काही वेळा उद्योग संस्थांच्या हितासाठी वृत्तपत्रांची प्रसिद्धी यंत्रणा कशी राबविली जाते याचे प्रत्यंतर या उपकथानकातून घडले. पॉलिस्टर फॅब्रिक्स साठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन करण्याचा निर्णय रिलायन्स इंडस्ट्रीजचे धीरूभाई अंबानी व बॉम्बे डाईंगचे नसली वाडिया यांनी घेतला आणि त्यातून या दोन उद्योगपतींमध्ये स्पर्धा सुरू झाली.

जनता राजवटीत नसली वाडिया यांना ६० हजार टन DMT ( Dimethyl Terephathalate ) उत्पादनाची परवानगी मिळाली. त्यासाठी अमेरिकेतील प्लँटही त्यांनी विकत घेतला. परंतु परवानगी पत्राबरोबर परवाना ( Licence ) मिळण्याआधीच जनता राजवट कोसळली आणि १९७९ मध्ये इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. त्यामुळे प्रणव मुकर्जी व धवन यांच्याशी लागेबांधे असणाऱ्या अंबानींचे भाग्य उजळले, व त्यांना ७५ हजार टन Purified Terephathalic Acid उत्पादनाची परवानगी मिळाली.

हा संघर्ष इतका टोकाला गेला की, वृत्तपत्रांच्या माध्यमातून एकमेकावर चिखलफेक करण्याचा उद्योग या दोघानी आरंभला. याचवेळी रामनाथ गोएंका व त्यांचा इंडियन एक्सप्रेस हे वाडियाच्या बाजूने या संघर्षात उतरले. १५ मार्च ८६ पासून गोएंका यांचे आर्थिक सल्लागार व मद्रास येथील चार्टर्ड अकौन्टंट श्री. एस. गुरुमूर्ती यानी एक्स्प्रेस मधून शोध वृत्तलेखाचा एक धडाकाच सुरू केला व त्यामध्ये राजकीय व्यक्तींशी असलेल्या संबधांचा उपयोग करून घेऊन रिलायन्स उद्योगसस्था कसा फायदा करून घेत आहे याचे साधार विवेचन त्यानी केले. केवळ अंबानींच्या फायद्यासाठी औद्योगिक धोरण कसे प्रसंगी लवचिक बनवले जाते, रिलायन्स उद्योग सरकारकडून आयात-निर्यात विषयक सवलती कशा मिळवतो, यावरही श्री. गुरुमूर्ती यानी आपल्या लेखांमधून झगझगीत प्रकाश टाकला. गोएन्का यांच्या मालकीच्या सर्व वृत्तपत्राच्या सर्व आवृत्त्यांमधून एवढा जोरदार हल्ला झाल्यानंतर अडचणीत आलेल्या अंबानींनी राजीव गांधींचा मित्र असलेल्या अमिताभ बच्चनकडे धाव घेतली. परिणामतः ऑक्टोबर ८६ मध्ये गांधी-अंबानी भेट घडून आली यावेळी गांधींनी आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी तर नाहीच, पण उलट अंबानींचे अनेक खोळंबून राहिलेले परवाने मोकळे केले.

आणि येथेच श्री सिंग व श्री. गांधी यांचे मार्ग वेगवेगळे असल्याचे स्पष्ट झाले. यावेळी श्री. सिंग यांची स्वच्छता मोहीम चालूच होती. त्यानुसार अंमलबजावणी खात्याचे संचालक श्री. भुरेलाल रिलायन्सविरुद्धचे पुरावे गोळा करीत होते. काही परकीय गुंतवणुकदार संस्थानी रिलायन्समध्ये गुंतवणूक केल्याचे उघडकीस आले होते. त्यांच्या चौकशीसाठी श्री. भुरेलाल व श्री. गुरुमूर्ती लंडनला जाऊन आले. परंतु त्या दौऱ्यात चौकशीत व ठोस पुरावे मिळवण्यात त्याना फारसे यश आले नाही. हा अनुभव लक्षात घेऊन श्री. भुरेलाल यानी बेकायदा आर्थिक व्यवहारांची चौकशी करण्यासाठी परकीय गुप्तचर संस्थेची मदत घ्यावी अशी सूचना श्री. सिंग याना केली, पण त्यास मान्यता मिळू शकली नाही. दरम्यान १४ ते १७ नोव्हेंबर या दिवसात फेअरफॅक्स या अमेरिकेतील गुप्तचर सस्थेचे अध्यक्ष हर्शमन हे दिल्लीतील ओबेरॉय हॉटेलमध्ये उतरले होते. भुरेलाल, गोएंका व वाडिया यानी यावेळी त्यांची भेट घेतली असे म्हणतात. हर्शमन यांच्या या भेटीनतर मात्र श्री. भुरेलाल व महसूलसचिव श्री. विनोद पांडे यांच्या योजनेला श्री. सिंग यांनी मान्यता दिली आणि कोणतीही आगाऊ रक्कम न देण्याच्या अटीवर रिलायन्स व इतर उद्योगसस्थांच्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी फेअरफॅक्सची नेमणूक करण्यात आली.

## बच्चन बंधू ओढले गेले

कोणत्या का हेतूने असो पण समोरून पोलिस चालला आहे म्हटल्यावर ज्याप्रमाणे प्रत्येक चोराच्या मनात धडकी भरते तसेच येथे झाले. फेअरफॅक्सची नेमणूक झाल्यानंतर ही सर्व चौकशी अमिताभ बच्चनविरुद्धच चालली आहे अशी कुजबूज सुरू झाली—तशा वार्ताही प्रसिद्ध झाल्या.

स्वित्झर्लंडमधील एका एजन्सीने जानेवारीत भारतीय अर्थमंत्रालयाला एक अहवाल सादर केला होता. त्यात असे म्हटले होते की, 'Macny Adol Brothers' या फर्मच्या नावाने अमिताभ व अजिताभ या बच्चन बंधूचे स्वीस बँकेत खाते असून तेथे ६५० कोटी रुपये ठेवण्यात आले आहेत. त्यामुळेच 'फेअरफॅक्स' मार्फत सुरू असलेला चौकशीचा खटाटोप बच्चनविरुद्ध असल्याचा गवगवा झाला.

रिलायन्ससारख्या उद्योगसस्था आणि अमिताभसारखे मित्र यांच्याकडून राजीव गांधी यांच्यावर दबाव आला आणि 'मि. क्लीन राजीव गांधी' यानी आपल्यापेक्षा 'क्लीन' होऊ पाहत असलेल्या विश्वनाथ प्रतापसिंगांचे खातेच बदलून टाकले व त्याना सरंक्षणमंत्री केले

भारत–पाक सीमेवर याच काळात तणाव निर्माण झाला होता त्यामुळे गांधींच्या हेतूविषयी कोणाला फारशी शंका आली नाही. त्यांची ही एक 'राजकीय खेळी' यशस्वी झाली श्री. सिंग यांच्याबरोबरच त्यांचे साथीदार भुरेलाल व विनोद पांडे यांचीही खाती बदलून त्यांना पूर्णपणे 'निरुपद्रवी' करण्यात आले.

३१ मार्चला संसदेत 'फेअरफॅक्स' प्रकरणावर वादळी चर्चा झाली. राष्ट्रपती—पंतप्रधान वादानंतर विरोधकांना सरकारवर हल्ला करण्यासाठी मिळालेले हे आणखी एक प्रकरण होते व यानंतर सरकार चांगलेच अडचणीत सापडू लागले. विरोधकानी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना अर्थराज्यमंत्री श्री. ब्रह्मदत्त म्हणाले की, केवळ माहिती देणे हे फेअरफॅक्सच्या कार्याचे स्वरूप आहे तर सरंक्षणमंत्री व आधीचे अर्थमंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी स्पष्टपणे सांगितले की, आर्थिक गैरव्यवहारांच्या चौकशीसाठी फेअरफॅक्सची नियुक्ती करण्यात आली आहे.

श्री सिंग यांच्यामुळे इंकाँतील, विशेषतः राजीव गांधींच्या वर्तुळातील बडी प्रस्थे उघडी पडताहेत हे लक्षात घेऊन श्री. सिंग यांच्याविरुद्ध एक मोहीमच सुरू झाली. उ. प्रदेशातील इं. काँ चे खासदार श्री. दिनेशसिंग यानी याबाबतीत पुढाकार घेतला.

दरम्यान, फेअरफॅक्स प्रकरणावर पुनः पुन्हा जाब देण्याची वेळ येऊ नये म्हणून या प्रकरणाच्या चौकशीसाठी पंतप्रधानानी न्या. ठक्कर यांच्या अध्यक्षतेखाली एक आयोग नेमून टाकला. अर्थात याचा हेतू श्री. सिंग यानी कोणकोणत्या चुका केल्या हे दाखविणारा अहवाल सरकारकडे यावा हाच होता हे उघड आहे फेअरफॅक्स प्रकरणावर फार आरडाओरडा होऊ नये म्हणून कसाबसा त्यावर पडदा टाकण्याचा हा प्रयत्न होता. दि. २९ मे रोजी अखेर फेअरफॅक्सशी करण्यात आलेला करारच रद्द करण्यात आला.

## जर्मन पाणबुड्या

अर्थमंत्रिपदावरून बदली झाल्यानंतर सरकारला अडचणीत येईल असे काही करण्यास श्री. विश्वनाथ प्रतापसिंग यांना वावच राहणार नाही असे राजीव गांधींना वाटले असावे. परंतु काही दिवसातच त्यांचा भ्रमनिरास झाला. कारण कोणतेही खाते भ्रष्टाचारापासून अलिप्त नसल्याने, 'खाते, कोणतेही असले तरी श्री. सिंग ही व्यक्ती

संबधितांची डोकेदुखी ठरणार हे उघड होते. ९ एप्रिल रोजी त्याचा प्रत्यय आला.

सरक्षण खात्याची सूत्रे हाती घेतल्यानतर तीनच महिन्यात भ्रष्टाचाराचे एक मोठे प्रकरण श्री. सिंग याच्या निदर्शनास आले. प. जर्मनीतील बॉन येथे असलेल्या भारतीय वकिलातीकडून श्री. सिंग याना दूर मुद्रकावरून एक सदेश मिळाला. त्यात म्हटले होते की, भारताने केलेल्या एका संरक्षणसामग्री खरेदीच्या व्यवहारात भारतातील एका मध्यस्थाला ७ टक्के दलाली देण्यार आली आहे. दलालीची ही रक्कम ३० कोटी रुपये इतकी आहे. भ्रष्ट राजकीय व्यवस्थेत मुरलेल्या एखाद्या राजकारण्याप्रमाणे या सदेशाकडे श्री. सिंग यानी डोळेझाक केली नाही. त्यानी तावडतोब दि. ९ एप्रिलला चौकशीचा आदेश दिला. व त्यासाठी संरक्षणखात्याचे सचिव श्री. एस. के. भटनागर याच्या नेतृत्वाखाली समिती नेमली.

जर्मन पाणबुड्या खरेदी करण्याच्या वाटाघाटी १९८० मध्येच सुरू झाल्या होत्या व १९८३ मध्ये यासबधीच्या व्यवहारावर अतिम शिक्कामोर्तब झाले. त्यानुसार दोन वर्षांनी दोन पाणबुड्या भारतीय नाविक दलात दाखल झाल्या. त्यानंतर पाणबुड्याची आणखी एक जोडी खरेदी करण्यासबधी वाटाघाटी सुरू झाल्या. यावेळी पाणबुड्यांच्या खरेदी किमतीत २० टक्के सवलत मिळावी अशी मागणी भारतातर्फे करण्यात आली. परतु जर्मन कंपनीने केवळ दहाच टक्के सवलत देऊ केली. जर्मन कपनीचे एक पथक यावेळी भारतात आले होते. उर्वरित १० टक्क्याच्या सवलतीबाबतचा निर्णय आम्ही दूरमुद्रकावरून कळवू असे या पथकाने सागितले. परतु नंतर आणखी १० टक्के कपातीचा प्रस्ताव मान्य नसल्याचे कपनीने भारतीय वकिलातीला कळविले.

SSK (Submarine to Submarine Killer) असे या पाणबुड्याचे नाव आहे. भारताच्या नाविक दलात अशा प्रकारच्या पाणबुड्या प्रथमच दाखल झाल्या होत्या. या पाणबुड्या खरेदी करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी भारताच्या सरक्षण खात्यातील एका पथकाने प. जर्मनी व स्वीडन येथील कपन्यांना भेट देऊन त्याची चाचणी घेतली वास्तविक या पथकाने परत आल्यानंतर स्वीडन बनावटीच्या पाणबुड्याची शिफारस केली होती. सुटे भाग मिळण्याची खात्री मिळत नसल्याने व या पाणबुड्यांमध्ये कपनीला बरेच तात्रिक स्वरूपाचे बदल करावयाचे आहेत या दोन कारणामुळे या पथकाने प. जर्मनीच्या पाणबुड्या खरेदी करू नयेत अशी सूचना केली होती. परतु त्यानतर १९८१ मध्ये पुन्हा जर्मन कंपनीचे शिष्टमडळ भारतात आले, व यावेळी मात्र काही अटी घालून पाणबुड्या खरेदीच्या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. त्यावेळीच विरोधकानी या व्यवहाराबद्दल शका उपस्थित केली होती. पण पुराव्या अभावी हे प्रकरण उघडकीस आले नाही आता ६ वर्षांनतर श्री. सिंग यानी या चौकशीचा आदेश दिला. आणि फेअरफॅक्समुळे गोधळलेल्या इकॉ पक्ष व सरकारला आणखी एक धक्का बसला.

श्री. सिंग यानी ससदेत चौकशीच्या निर्णयाची घोषणा केली पण त्याचदिवशी केंद्रीय गृहमत्री श्री. बुटासिंग यानी श्री. सिंग याच्या ससदेतील विधानाना कोणताही आधार नसल्याचे सागून त्याना तोडघशी पाडायचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे तर केंद्रीय मत्रिमडळाच्या राजकीय व्यवहार समितीच्या तातडीच्या बैठकीत श्री सिंग यांच्यावर जोरदार टीका केली, नरसिंहराव यांनी तटस्थ मौन स्वीकारले व अर्थातच राजीव गांधी, श्री. सिंग यांच्या पाठीशी उभे राहिले नाहीत.

याचवेळी दिनेशसिंग प्रणीत श्री. सिंग यांच्यावरील 'चिखलफेक-मोहीम' चालूच होती. या विषयावर लोकसभेत पुन्हा घडून आलेल्या चर्चेत एच. के. एल. भगत, बुटासिंग, फोतेदार, शीला दीक्षित, दिनेशसिंग आदीनी सामूहिकपणे सिंग याच्यावर आरोप केले 'श्री सिंग याच्या वागण्यामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली आहे, देशात अस्थैर्य माजविण्याचा परकीयाचा कट असून श्री. सिंग हे या कटाला सहाय्यभूत होत आहेत,' असे मुद्दे या इकाँजनानी माडले.

अखेर रविवार दि. १२ एप्रिलला श्री. सिंग यानी आपल्या पदाचा राजीनामा दिला. तो स्वीकारताना पंतप्रधानानी त्याना अशी विनती केली की, 'या विषयावर कृपया ससदेत तुम्ही निवेदन करू नये.'

श्री. सिंग याच्या राजीनाम्यामुळे राजीव गाधीचा पक्ष व सरकार याचे अतरग उघडे पडले. खरे म्हणजे 'मिस्टर क्लीन' या शब्दाचा अर्थ सिंग याना कळलाच नाही. ते खरोखरच स्वच्छतेच्या मागे लागले. पण बरोचशी घाण त्याच्याच पक्षातील असल्याने त्याच्यावरच बुमरँग उलटविण्यात आले.

भारत-चीन युद्धाच्यावेळी त्यावेळचे सरक्षणमत्री कृष्ण मेनन यांची धोरणे संशयास्पद असल्याचे सिद्ध झाले. त्यामुळे त्याना राजीनामा द्यावा लागला. पण आता २५ वर्षानंतर आपण खूपच प्रगती केली आहे कारण सरक्षणपदावरील मत्री 'स्वच्छ' असल्याचे सिद्ध झाले. म्हणून त्याला राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले.

श्री. सिंग गेल्यानतर शंकरराव चव्हाण केंद्रात जाणार असल्याच्या बातम्या येऊ लागल्या– का? तर म्हणे केंद्रात स्वच्छ प्रतिमेचा एखादा मत्री असणे राजीव गांधीना आवश्यक वाटते. म्हणजे जात, प्रात, धर्म, भाषा याना जसे मत्रिमडळात प्रतिनिधित्व देण्यात येते तसे 'एखाद्या' मि. क्लीनला मत्री करण्याचा हा नवाच पायंडा आहे. राजीव शैलीचे भारतीय राजकारणाला काही योगदान असेल तर ते हेच!

## बोफोर्स

सिंग याती राजीनामा दिल्यानंतरही भगत-केसरी-फोतेदार मडळी त्याच्या विरोधात बोलत होती इदिरा काँग्रेस पक्षात किती अस्वस्थता निर्माण झाली होती त्याचेच हे द्योतक होते. या मडळीची मजल सिंग याची पक्षातून हकालपट्टी करावी अशी मागणी करण्यापर्यंत गेली. उ. प्र. मुख्यमंत्री, अर्थमत्री व सरक्षणमत्री या पदावर काम करताना सिंग यानी कोणकोणती गैरकृत्ये केली याच्या 'कथा' तयार करण्यात आल्या. सिंग हे कोणत्यातरी भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अडकावेत यासाठी अक्षरशः आटापिटा केला गेला आपल्या कारकिर्दीत ज्या भ्रष्ट अधिकाऱ्यांच्या बदल्या श्री. सिंग यानी केल्या होत्या, त्यांच्याकडून काही कथित भ्रष्टाचाराचे पुरावे मागण्यात आले आणि देश अस्थिर करण्याचा परकीयाचा प्रयत्न अस-

त्याची हाकाटी पिटून इंका पक्षाची प्रतिमा सावरण्याचा प्रयत्न झाला

परंतु आधीच्या धक्क्यातून स्वतःला सावरू पाहत असतानाच स्वीडनच्या नभोवाणीने इंका पक्ष व सरकारवर 'बोफोर्स'चा आणखी एक तोफगोळा टाकला आणि अक्षरशः दाणादाण उडवून दिली.

स्वीडन येथील स्वीडिश ब्रॉडकास्टिंग कॉर्पोरेशनच्या सेव्हेरिज ( Severiges ) रेडिओने १६ एप्रिलला एक खळबळजनक वृत्त प्रसारित केले. त्यात असे म्हटले होते की, बोफोर्स कंपनीच्या हॉविट्झर्स तोफा खरेदीचा जो व्यवहार झाला त्यामध्ये लाचखोरी झाली असून या व्यवहारात ज्याला 'दलाली' मिळणार आहे ती व्यक्ती राजीव गांधी याच्या पक्षातील आहे.

बोफोर्स कंपनीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याचा हवाला देऊन या वृत्तात असेही म्हटले होते की, गेल्या वर्षीच्या नोव्हेंबर व डिसेंबरमध्ये ३२.२ मिलियन क्रोनर्स इतकी रक्कम गुप्तपणे स्वीस बँकेत ठेवण्यात आली व हे खाते भारतातील लष्करी खरेदीशी संबंधित अशा एका जबाबदार व्यक्तीच्या नावाने उघडण्यात आले आहे.

हे वृत्त प्रसारित होताच भारतातर्फे घाईघाईने त्याचा इन्कार करण्यात आला. हे वृत्त खोटे, निराधार व खोडसाळ आहे असे पत्रक केंद्र सरकारने प्रसिद्धीस दिले. पाठोपाठ स्वीडन सरकार व बोफोर्स कंपनी याच्याकडूनही लाचखोरी झाली नसल्याचे खुलासे आले.

पण एवढ्यावर हे प्रकरण निभावणार नव्हते. कारण आपले वृत्त खरे असल्याचा ठाम पुनरुच्चार स्वीडिश नभोवाणीने केला व या लाचखोरीबद्दल आणखी काही माहिती सादर केली. बोफोर्स तोफा खरेदीच्या या व्यवहारात जी दलाली ठरली ती गुप्तपणे ४ हप्त्यांत देण्यात आली 'लोटस' या नावाने स्वीस बँकेत उघडलेल्या खात्यात १३ नोव्हेंबरला २ व २२ डिसेंबरला २ हप्त्यात ही रक्कम भरली आहे.

स्वीडिश नभोवाणीचे दक्षिण-पूर्व आशियातील प्रतिनिधी योगायोगाने याच सुमारास दिल्लीत होते. त्यांनीही या लाचखोरीच्या प्रकरणाचे ठोस पुरावे त्याच्याकडे असल्याचा दावा केला.

भारताला तोफा विकण्यासाठी स्वीडनच्या बोफोर्स कंपनीबरोबरच ऑस्ट्रिया, फ्रान्स व ब्रिटन येथील कंपन्याही प्रयत्नशील होत्या प्रत्यक्ष चाचणीत ऑस्ट्रियाच्या कंपनीच्या तोफा सर्वांत चांगल्या असल्याचे आढळून आले परंतु या कंपनीला भारततर्फे ऑर्डर देण्यात आली नाही. व गेल्या वर्षी स्वीडनचे दिवंगत पंतप्रधान ओलोफ पाल्मे याच्या भारत भेटीनंतर 'बोफोर्स' कंपनीला हॉविट्झर्स तोफांची ऑर्डर मिळविण्यात यश आलं, त्याची एकूण खरेदी किंमत ३ हजार कोटी रुपये इतकी होती.

भारताच्या इतिहासातील सर्वांत मोठी अशी ही शस्त्रखरेदीची ऑर्डर होती. त्यामध्ये लाचखोरी होणे हे देशाचे दुर्दैव म्हणावे लागेल. परंतु यावेळीही त्याची गंभीर दखल घेण्याची सरकारला आवश्यकता वाटली नाही. १८ एप्रिलच्या इंका कार्यकारी समितीच्या बैठकीत पुन्हा एकदा देशात अस्थैर्य माजविण्यात येत आहे हेच तुणतुणे वाजविले गेले. 'बोफोर्स' प्रकरण म्हणजे भारताच्या राजकीय व्यवस्थेत अस्थैर्य निर्माण करण्याच्या अमेरिका व पाकिस्तानच्या प्रयत्नाचा एक भाग आहे असा आरोप या बैठकीत एका ठरावाद्वारे करण्यात आला. आणि परकीयाचा कट आहे म्हणूनच एका मागोमाग एक प्रकरणे पुढे आणली जात आहेत असाही युक्तिवाद करण्यात आला.

वास्तविक जर्मन पाणबुड्या प्रकरण व स्वीडिश नभोवाणीचे वृत्त याची वेळ एकच येणे हा योगायोगच होता. कारण 'बोफोर्स' कंपनीने काही संशयास्पद व्यवहार केले आहेत हे समजल्यानंतर वर्षापूर्वीच स्वीडन सरकारतर्फे या कंपनीची चौकशी सुरू झाली होती. त्यामुळे तेव्हापासून स्वीडनची वृत्तपत्रे, नभोवाणी याना तो एक बातमीचा विषय बनला. त्यातूनच तोफा खरेदीच्या व्यवहारात एका भारतीयाने 'बोफोर्स' कंपनीकडून लाच घेतल्याची बातमी स्वीडिश नभोवाणीला मिळाली.

त्या वेळचे स्वीडनचे पंतप्रधान ओलोफ पाल्मे याना 'बोफोर्स'ने अनेक आश्वासने देऊन सवलती मिळविल्या. परंतु कंपनीने पुढे वेळोवेळी ही आश्वासने मोडली. कंपनीचे अनेक व्यवहार संशयास्पद ठरले व तिने विश्वासार्हता गमावली. म्हणूनच या दलाली लाचखोरीचा इन्कार केल्यानंतरही स्वीडन सरकारने 'बोफोर्स' प्रकरणाच्या चौकशीसाठी समिती नेमली.

'बोफोर्स' प्रकरणाचा स्फोट झाल्यानंतरही सरकारची वागणूक अत्यंत संशयास्पद होती. पंतप्रधान राजीव गांधी म्हणाले की, तोफा खरेदी व्यवहारात लाचखोरी झाल्याचा पुरावा वृत्तपत्रांनी किंवा विरोधी पक्षांनी सादर केलेला नाही. पंतप्रधानांनी काढलेली ही पळवाट होती. कारण स्वीस बँकेत ज्या सांकेतिक क्रमांकावर पैसे ठेवण्यात आले होते तो क्रमांकच स्वीडिश नभोवाणीने जाहीर केला होता. नंतरची चौकशी करणे, सुरक्षा विषयक व्यवहारात लाचखोरी करणाऱ्याला पकडून त्याच्यावर कारवाई करणे ही जबाबदारी राजीव गांधींची आहे, स्वीडिश नभोवाणीची नव्हे. पण हेही प्रकरण दडपण्याचा प्रयत्न सरकारने केला.

## १३०० कोटींचे काय ?

स्वीस बँकेत बेकायदारीत्या जमविलेली मालमत्ता, शस्त्रखरेदीतील दलाली, उद्योगपतींनी केलेले आर्थिक गैरव्यवहार हे सगळे गेल्या ६ महिन्यात उघडकीस आले आणि या प्रकरणामध्ये गुंतलेल्या आर्थिक गुन्हेगारांना राजीव गांधींचे सरकार पाठीशी घालत आहे अशी या सरकारची प्रतिमा निर्माण झाली. पण प्रस्थापित सरकारविरुद्ध निर्माण झालेल्या या वादळाचे राजकीय बदलात रुपांतर होईल हा आशावाद अवास्तव ठरण्याचीच शक्यता आहे अमेरिकेत 'वॉटरगेट' प्रकरण बाहेर आले तेव्हा तेथील कायदेमंडळ, न्यायमंडळ, विरोधी पक्ष, वृत्तपत्रे आणि बुद्धिवादी वर्ग या सर्वच घटकांनी केलेल्या सामूहिक प्रयत्नामुळे राष्ट्राध्यक्ष निक्सन याना पदावरून जावे लागले.

भारतातील लोकशाही संस्था तेवढ्या परिपक्व नाहीत. म्हणूनच अशा वादळामधून एकदम प्रस्थापित सरकार कोसळावे, राजकीय क्रांती घडावी अशी अपेक्षा गैर आहे. पण निदान या लोकशाही संस्था बळकट व्हाव्यात या दिशेने प्रयत्न झाले पाहिजेत. फेअरफॅक्स, बोफोर्स आदी प्रकरणामध्ये जे घडत होते ते मात्र नेमके याच्याविरुद्ध होते.

सत्तेवर नियंत्रण ठेवणारे जे जे घटक आपल्या लोकशाही राज्यव्यवस्थेत अस्तित्वात आहेत त्याचे खच्चीकरण– अवमूल्यन करण्याचे सत्ताधीशाचे प्रयत्न आहेत असे या प्रसंगाच्या निमित्ताने दिसून आले आहे.

या घातक प्रवृत्तीचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे. घटनात्मक प्रमुख असलेल्या राष्ट्रपतीचे अनेक नियोजित पर-

देश दौरे पंतप्रधानांनी रद्द केले. महत्त्वाच्या निर्णयाची त्यांना माहिती देण्याचे टाळले. हाच प्रश्न संसदेत उपस्थित झाला तेव्हा मात्र 'आपण राष्ट्रपतींना वेळोवेळी माहिती देतो' असे धडधडीत खोटे बोलून वेळ मारून नेण्याचा खुद्द पंतप्रधानांनी प्रयत्न केला.

फेअरफॅक्सचा विषय संसदेपुढे आला तेव्हा अर्थराज्यमंत्री ब्रह्मदत्त व त्यावेळचे संरक्षण-मंत्री विश्वनाथ प्रतापसिंग यांनी परस्पर-विरोधी उत्तरे दिली. जर्मन पाणबुड्या खरेदीच्या प्रश्नावर जेव्हा गदारोळ उठला तेव्हा तर संरक्षण – राज्यमंत्र्यांनी दिलेले उत्तर मासलेवाईक होते. 'या व्यवहारात कोणा मध्यस्थाचा सहभाग आहे काय ?' या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, 'मी याला दुजोराही देणार नाही किंवा त्याचा इन्कारही करणार नाही.' 'बोफोर्स'च्या बाबतीत स्वीडनचे पतप्रधान पाल्मे यांच्या-कडून कोणत्याही मध्यस्थाचा व्यवहारात सहभाग नसेल असे आश्वासन मला मिळा-ल्याचे पंतप्रधानांनी सांगितले. परंतु नंतर विरोधकांनाच त्यांनी 'पुरावे असल्यास सादर करा' असे आव्हान दिले.

सरकारला होत असलेला विरोध दड-पण्यासाठी न्यायमंडळाचाही कसा उपयोग करून घेतला जातो हे ही या घटनांमधून दिसून आले. आर्थिक गैरव्यवहार उघडकीस आणण्यासाठी 'फेअरफॅक्स'ची नेमणूक श्री. सिंग यांनी केली. पण या सगळ्याची चौकशी करण्यासाठी पंतप्रधानांनी न्या. ठक्कर यांचा आयोग नेमला आणि या आयोगाच्या कार्य-कक्षेचे स्वरुप आर्थिक गैरव्यवहार शोधून काढणारे नसून 'फेअरफॅक्स'ची नेमणूक योग्य किंवा अयोग्य आहे ठरविणारे आहे.

वृत्तपत्रात यानिमित्ताने भरपूर माहिती प्रसिद्ध झाली. ती अडचणीत आणणारी अस-ल्याने 'वृत्तपत्र स्वातंत्र्याचा पुनर्विचार करण्याची गरज आहे.' अशी वक्तव्ये करून मंत्र्यांनी धमक्याच दिल्या.

भ्रष्टाचाराच्या अतिरेकामुळे आंतर-राष्ट्रीय क्षेत्रातही देशाची हास्यास्पद स्थिती होते. विकासाच्या नावाखाली जेव्हा भारत सरकार आंतरराष्ट्रीय नाणेनिधी किंवा जागतिक बँक यांच्यापुढे कर्जासाठी झोळी पसरते तेव्हा 'स्वीस बँकेत तुमचे कोट्यवधी रुपये बेकायदारीत्या पडून असताना आमच्या-कडे कशाला भीक मागता ?' अशी विचारणा या संस्थांनी केल्यास ती त्यांची चूक म्हणता येणार नाही.

स्वीस बँकेत गुप्तपणे भारतीयांनी ठेव-लेली रक्कम १३०० कोटी रु. असल्याचे नाणेनिधीच्या गेल्या वर्षीच्या अहवालात म्हटले आहे.

एकंदरीत, भ्रष्ट व्यवस्थेच्या विरोधात उभे राहण्याची धमक आपल्या तरुण पंत-प्रधानांजवळ नाही व ती थोडीफार ज्याच्या-जवळ आहे त्याला सत्तेत काहीही स्थान नाही, हे या प्रकरणांमधून सिद्ध झाले आहे.

□


## महाराष्ट्र आपल्या स्वागतास अनेक प्रकारे सिद्ध

**म. प. वि. म. चे**

**पर्यटक निवास :**

**थंड हवेच्या ठिकाणांचे निवास :**
महाबळेश्वर, पाचगणी, माथेरान, आंबोली, चिखलदरा, तोरणमाळ आणि जव्हार.

**तीर्थस्थानांच्या ठिकाणांचे निवास :**
औंढा-नागनाथ, पंढरपूर, त्र्यंबकेश्वर, रामटेक, तुळजापूर, भीमाशंकर

**ऐतिहासिक ! पुराणवस्तू शास्त्रदृष्ट्या महत्त्वाच्या ठिकाणांचे निवास :**
औरंगाबाद, कार्ला, फर्दापूर, पन्हाळा, रायगड, वर्धा

**निसर्गरम्य ठिकाणांचे निवास ;**
घोडबंदर, भंडारदरा, अकलोली, गणेशपुरी, माळशेजघाट

**समुद्रकिनाऱ्यांच्या ठिकाणांचे निवास :**
गणपतीपुळे, मुरुड-जंजिरा

**युवक वसतिगृह :**
औरंगाबाद

**हॉटेल :**

**"दि पिल्ग्रिम्स् इन" शिर्डी**

**"हॉटेल सारस" पुणे "हॉटेल फाईव्ह हिल्स्" पाचगणी**

**इतर सेवा :**

**दैनिक बस सेवा :**
मुंबई-कोल्हापूर-मुंबई, मुंबई-औरंगाबाद-मुंबई,
मुंबई-महाबळेश्वर-मुंबई (एप्रिल, मे, जून)
मुंबई-पणजी (गोवे)-मुंबई, मुंबई-नासिक-शिर्डी

**नगर दर्शन सेवा :**
मुंबई, पुणे, कोल्हापूर, महाबळेश्वर

**विशेष सहली :**
काश्मीर, हिमाचल प्रदेश इ.

**स्मृतिचिन्ह विक्री :**
तुमच्या सहलीची स्मृती चिरंतन ठेवतील अशा स्मृतिचिन्हांची विक्री : ही स्मृतिचिन्हे म्हणजे हस्तकलेचे विशेष नमुने असून ती लाकूड, धातू, काच, कागद, चामडी, कापड आणि चिनी माती यापासून कुशल कारागिरांनी बनविलेली आहेत.

**मुंबईहून भारतात कोठेही जाण्यासाठी सहलीही आम्ही आयोजित करतो.**

अधिक माहितीसाठी आम्हाला भेटा : आम्ही आपल्या सेवेसाठी तत्पर आणि उत्सुक असल्याचे अनुभवाल, नेहमीच.

MAHARASHTRA TOURISM

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ मर्यादित**

**सहली आणि पर्यटक निवास विभाग**

मादाम कामा रोड, योगक्षेम, अेल. आय. सी. बिल्डिंगसमोर, मुंबई–४०० ०२०.
फोन : २०२६७१३, २०२७७६२, २०२७७८४
प्रादेशिक कार्यालये :
**पुणे, औरंगाबाद, नागपूर, पणजी–गोवा, नवी दिल्ली.**

# पहाटेचा दूद आणि राधा

**● फिरोज रानडे ●**

**त्या** दिवशी पहाटे-पहाटे श्याम दचकून उठला तो दूरदर्शनच्या घरघरीनं वा खरखरीनंच. त्याने किलकिले डोळे करून दूदकडे पाहिले तर कोणी षोडषवर्षी अंग कुठे संपतं आणि कपडे कुठे सुरू होतात ह्याचा संभ्रम पडावा अशा पेहरावात हात-पाय खाली वर करत होती. 'म्हणजे मुंबईला पण कोणा परदेशीय दूदचे स्टेशन लागायला लागले म्हणायचे!' असे श्यामने मनाशी म्हटले व वाक्य संपताच राधाच्या कॉटकडे नजर टाकली. तिथं नेहमीप्रमाणे शांतपणे पहुडलेली राधा त्याला दिसली नाही.

श्यामनं छानसा नि:श्वास टाकला, उशी-खाली हात घातला व चष्मा काढून डोळ्याला लावला. आता मघाचंच पण फार स्पष्टपणे दिसत होतं. ती षोडशवर्षा तरतरीत होती, देखणी होती पण मुख्य म्हणजे इंग्रजीत ज्याला 'सपल्' वा मराठीत सडसडीत म्हणतात तशी होती. श्यामच्या जवळच्या नातेवाईकातच नव्हे तर त्यांच्या ओळखी-च्यातही अशी कोणीही 'सपला' नव्हती. बायका इतक्या सडसडीत असतात? म्हणजे असू शकतात? असा भाबडा प्रश्न त्याला पडला.

श्यामचं आजकाल असं फार होऊ लागलं होतं. आजकाल म्हणजे गेली पाच-सहा वर्ष. त्याच्या डोक्यावरचे सगळे केस पांढरेशुभ्र झाल्यापासून कोणा काळ्याभोर केसाच्या माणसाला पाहिले किंवा दूदवर तशी छबी पाहिली की 'माणसाचे केस खरंच इतके काळे असतात?' असा प्रश्न त्याला पडत असे.

आतासुद्धा त्या सडसडीत मुलीला पाहून तो प्रश्न त्याच्या मनात आला व तो दूद-वरचा कार्यक्रम जास्तच आत्मीयतेने व रस घेऊन पाहू लागला.

पण हे सुख फार वेळ टिकणारे नव्हते. दोन-चार मिनिटांतच राधा लबालबा खोलीत आली व तिनं खोलीचं दार लावून घेतलं. तिच्या चेहऱ्या-मोहऱ्यावरून सकाळचं तोंड धुणं वगैरे आटपायचे कार्यक्रम तिने आटप-लेले दिसत होते. ते तर होतेच पण सका-ळच्या मानानं तिनं साडीसुद्धा जितकी चापून-चोपून नेसता येईल तितकी नेसली होती.

खोलीत आल्या आल्या तिनं प्रथम दूद-कडे व नंतर श्यामकडे पाहिलं. श्याम पडल्या पडल्या दूद पाहतो आहे हे बघून तिचे माथे भडकले.

'अहो, उठा! हे कार्यक्रम असे पडल्या-पडल्या पहायचे नसतात.' राधा ज्याला कडाडणे म्हणतात त्या पद्धतीनं म्हणाली.

श्यामला तिच्या प्रश्नाचा रोखच कळला नाही. त्यांनी दूद झोपायच्या खोलीत आणल्या-पासून सगळे कार्यक्रम ते असे पडल्या पडल्याच पाहत असत. किंबहुना तसे ते पाहता यावेत म्हणून तर त्यांनी दूद बाहेरच्या खोलीतून झोपायच्या खोलीत आणला होता. आता हा कार्यक्रम पडल्या पडल्या बघायला राधानं आडकाठी का करावी हे त्याला लक्षात येईना.

'का? त्याला काय झालं? आपण सगळे कार्यक्रम असे पडल्या-पडल्या तर पाहतो.' आश्चर्यचकित श्यामनं विचारलं.

'ते कार्यक्रम वेगळे आणि हा कार्यक्रम वेगळा.' राधानं ठोक उत्तर दिलं.

'अग तसं बघितलं तर सगळे कार्यक्रम वेगवेगळेच असतात.' श्याम सहजासहजी हार खाणारा नव्हता.

'आता आमची माती आणि आमची माणसं आणि ज्ञानदीप हे वेगळे वेगळे कार्यक्रम असतात तरी पण आपण ते पडल्या-पडल्याच पाहतो की नाही? माणसांचं आणि मातीचं राहू दे. पण ज्ञानदीपच्या वेळी तर तुझा चक्क डोळा लागतो'

खरं म्हणजे तू चक्क झोपतेस असं श्यामला म्हणायचं होतं. पण बायकांना 'झोपतेस' ह्यापेक्षा 'डोळा लागला होता' असं म्हटलं तर राग येत नाही हे श्यामनं बघून ठेवलं होतं. तेव्हा त्या खबरदारीनं तो म्हणाला होता.

तरीही भडकलेली राधा भडकलेलीच राहिली. पण तिच्या रागाचे कारण ती षोडशवर्षा आपला कार्यक्रम आटपून निघून गेली होती व कोणी सुकड्या चष्मेवाला समाचार देऊ लागला होता, हे होतं. राधानं तरातरा जाऊन दूदचा कान पिरगळला व त्याला शांत केले.

दूद शांत झाला तरी राधा अशांत ती अशांतच राहिली. 'बघितलंत का? तुमच्या बोलण्यात तो कार्यक्रम सपून सुद्धा गेला!'

मी बोललो नसतो तरी तो संपला असताच की! हे शब्द श्यामच्या अगदी ओठांपर्यंत आले होते पण राधाचा रंगीत चेहरा पाहून त्याने ते ओठापर्यंत आलेले शब्द गिळले. तो अत्यंत समजुतीच्या स्वरात म्हणाला, 'पण असा काही कार्यक्रम पहाटे-पहाटे लागणार आहे हे मला काय माहीत? नाहीतर मीही लवकर उठलो असतो.'

तरीही राधाचा राग एका फ्रिक्वेन्सीनंही कमी झाला नव्हता.

'काय सांगता? तुम्हाला माहीत नव्हतं की एक तारखेपासून सकाळचे कार्यक्रम सुरू होणार आहेत म्हणून? त्याप्रमाणे कालचा कार्यक्रम झालासुद्धा!'

'म्हणजे? जाहीर केलेल्या तारखेपासून सरकारनं हा कार्यक्रम सुरू केला सुद्धा?' श्याम विजेचा झटका बसल्याप्रमाणे ओरडला. त्या झटक्याच्या मागे त्याची सत्तावीस-अठ्ठावीस वर्षांची सरकार-सेवा होती. सरकारचा कोणताही कार्यक्रम ठरल्या दिवशी सुरू होत नाही, आत्तापर्यंत कधी झाला नाही व ह्यापुढेही कधी होणार नाही ह्याबद्दल त्याची खात्री होती.

ह्या सकाळच्या कार्यक्रमांचं पण असंच झालं होतं. पूर्वी दोनदा फलाण्या-फलाण्या दिवशी हा कार्यक्रम सुरू होणार असं जाहीर करूनही तसा तो सुरू झाला नव्हता. त्याला काही तरी तांत्रिक कारण होतं म्हणे. म्हणजे तांत्रिक बाबींचा सरकारनं आधी विचार केला नव्हता हे कबूल करण्यासारखं होतं. सांगायचा मुद्दा म्हणजे ह्यावेळी

श्यामने तारखेकडे लक्ष दिलं नव्हतं तर सरकारनं खरच तो कार्यक्रम ठरलेल्या दिवशी सुरू करून श्यामची दाडी घेतली होती.

'अग एक तारखेपासून हा ब्रेकफास्ट कार्यक्रम सुरू होणार आहे हे मी सुद्धा वाचलं होतं. पण खरंच तो तसा सुरू होईल ह्याची मला काय कल्पना ?'

'तुम्हाला कशी कल्पना असणार ? हा कार्यक्रम सुरू होऊन चागले चोवीस तास झाले. त्या 'दस कदम' मधला पहिला कदम टाकलासुद्धा गेला. सगळ्या जगान तो पाहिला, त्या कर्वेबाईनं पाहिला आणि तुम्ही मात्र मला काय कल्पना म्हणून बसून राहिलात तसेच.'

खर म्हणजे सगळ्या जगानं हा कार्यक्रम पाहिला असता तरी राधाला त्याचे वाईट वाटले नसते. पण कर्वेबाईंनी तो पाहिला आणि त्यानी आपल्यापुढे एक कदम टाकला व आघाडी मारली ह्यान राधाचा मस्तकशूळ उठला होता. कर्वेबाईंचं डालडा ती श्यामवर काढत होती

राधाला शात करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे तिला जास्तीत जास्त अशांत करणं हा होय हे त्याला गेल्या अठ्ठावीस वर्षांच्या अनुभवानतर कळून चुकल होतं राधा कोणत्या विषयाने अशात होते हेही श्यामला माहीत होत. तेव्हा त्यान विषयाला हात घातला.

'ह्या राजीव गाधीला दुसरा, काही उद्योग नाहीये सध्याकाळचा दूद होता आता त्याला सकाळीही कामाला जुंपला. काय तर म्हणे ब्रेक-फास्ट कार्यक्रम !'

'मग त्यात काय बिघडल ?' अपेक्षेप्रमाणे राधा चवताळून उठली 'सगळ्या देशातून असे कार्यक्रम असतात.'

'त्याची गोष्ट वेगळी. आपला देश किती बिकट परिस्थितीत आहे...'

'तसा बिकट परिस्थितीत गेले हजार वर्ष आहे.' श्यामला मधेच तोडून टाकत राधा म्हणाली. 'तस बघितल तर मग देशात दूदही नको, रेडिओसुद्धा नको उलट अशा बिकट परिस्थितीतही राजीवजीनी आम्हा बायकाच्या फायद्याचा कार्यक्रम सुरू केला ह्याबद्दल त्याच कौतुक करायला हव.' राधा पक्की राजीवधार्जिणी होती.

'ह्यात बायकाचा काय फायदा ? उलट त्याना भल्या पहाटे सात-साडेसात वाजता उठाव लागणार.'

श्यामच्या बोलण्यातला खडूसपणा लक्षात न येण्याइतकी काही राधा 'ही' नव्हती. 'उगाच काहीतरी बोलू नका सात-साडेपर्यंत मी हमखास उठलेली असते पण ते महत्त्वाचं नाही. ह्या कार्यक्रमात व्यायामाचे वेगवेगळे प्रकार सागणार आहेत. देशी आणि विलायती. त्यामुळे आम्हा बायकाचा किती फायदा होणार आहे.'

'हे मात्र खर.' वातावरण नॉर्मलवर आलेल पाहून श्याम समजुतीच्या स्वरात म्हणाला, 'चला, कचेरीत जायची तयारी करायला हवी.' व उठला.

'आज झाल ते झाल. उद्या मात्र अगदी साडेसातच्या आधी उठून कार्यक्रमाकरता तयार रहा.'

'जरूर', श्याम उत्साहानं म्हणाला. त्याला डोळ्यासमोरून अजूनी ती षोडश वर्षा गेली नव्हती. तो म्हणून गेला, 'इतक्या चागल्या-चुगल्या मुली आजकाल पाहायला कुठे मिळताहेत ?'

'ह्या मुलीना पाहण्याकरताचा कार्यक्रम नाहीये. व्यायामाचे धडे देऊन शरीर सडसडीत करण्याचा मार्ग दाखवणारा हा कार्यक्रम आहे.' राधाने त्याला योग्य मार्गावर आणल.

◻

दुसऱ्या दिवशी खरंच राधा अन् श्याम लवकर उठले. साडेसात वाजता श्यामनं दूद सुरू केला राधा आतल्या खोलीत आपल आवरत होती दूदवर प्रथम काही गप्पासप्पा होणार होत्या. मग 'समाचार' व दस कदम. आता राधा आली की आपण आपल सगळ आटोपून दूद लावून बसलो आहोत हे बघून राधा अगदी खूष होऊन जाईल ह्या आनदात श्याम होता.

पण कसली खूष अन् कसल काय. राधा आत आली तर तिला श्यामन तोड पुसून ओला झालेला टॉवेल कॉटवर टाकलेला दिसला आणि दूदवर 'समाचार' सुरू होण्याआधीच तिन श्यामचा समाचार घ्यायला सुरुवात केली.

'हज्जार वेळा तुम्हाला सागितलंय की ओला टॉवेल असा कॉटवर टाकत जाऊ नका म्हणून...'

'अग पण....अग....पण....' श्यामच्या तोडून शब्द फुटेना. तरी तो धीर करून म्हणाला, 'अग साडेसातला म्हणजे साडेसातला दूद लावायचा होता म्हणून ..'

'ते आजचं कारण झालं, तुमचं नेहमीचच आहे'

सुदैवान दूदवरचे समाचार सपले त्याचबरोबर राधाच समाचार घेणपण संपलं. पण साध्या बातम्यांना हिंदीत समाचार का म्हणतात हा प्रश्न श्यामच्या मनात घोघावत राहिला

आता दूदवर तिसरा कदम सुरू झाला होता. राधा पण तयार होऊन उभी होती. जशी ती षोडशवर्षा आपले अग वाकवत होती तस वाकवण्याचा राधा प्रयत्न करत होती.

हे बघून श्यामच्या मनात विचार आला की अशी सडसडीत म्हणजे सपल मुलगी दाखवून काय उपयोग ? खरं म्हणजे दूदवाल्यानी कोणी भारदस्त बाई दाखवायला पाहिजे म्हणजे मग ह्या व्यायामाचा खरा काय फायदा होतो ते कळल असत. पण लगेच ह्या विचाराला काटशह देणारा विचारही त्याच्या मनात आला. भारदस्त बायका तर काय नेहमीच पाहतो, अशी षोडशवर्षा ह्या कार्यक्रमाच्या निमित्तानंच पाहायला मिळणार तेव्हा आहे ते ठीक आहे.

◻

दुसऱ्या दिवशी, तिसऱ्या दिवशी तसेच ते दोघे साडेसातच्या आधी उठले. राधा व्यायामाचे धडे घेत होती आणि श्याम विस्फारलेल्या नजरेन एकदा दूरदर्शनकडे व जवळ-दर्शनकडे म्हणजे राधाकडे पहात होता सपल होण्याचा म्हणजेच सडसडीत होण्याचा राधाचा हा काही पहिलाच प्रयोग नव्हता.

खरं म्हटल तर राधाने 'माझे सपलतेचे प्रयोग' नावाचं पुस्तक लिहायला हरकत नव्हती. असे पुस्तक महात्मा गाधीच्या 'सत्याच्या प्रयोगा' पेक्षा जास्त मोठं व जास्त चविष्ट झाल असत. ह्या प्रत्येक सपलतेच्या प्रयोगाचा श्याम साक्षीदार होता प्रयोग नानातऱ्हेचे होते. दोरीवरच्या उड्या, सकाळी-सकाळी फिरायला जाणं, उठा-बशा काढणं, नंतर योगासन वगैरे.

त्याचबरोबर भात, बटाटा वगैरे गोष्टी न खाणं हेही ह्या प्रयोगात सामील होतं.

कोणताही नवा प्रयोग सुरू होऊन दोन-चार दिवस झाले की राधा लगेच 'काहो माझ्यात काही फरक वाटतोय का?' म्हणून विचारत असे.

आता श्याम म्हणजे काही युधिष्ठिर नव्हता की बुवा खोटं बोललं तर त्याचा रथ जमिनीवर येणार होता आणि समजा असता अगदी धर्मराज तरीही तो ह्याबाबत खोटं बोलला असता. रथाचं काय? चार अंगुळं वरून गेला काय अन् जमिनीवरून गेला काय, निदान तो पुढे तर जाणार होता. राधाच्या प्रश्नाचं खरं उत्तर दिलं असतं तर त्याचा संसाररथ जागच्या जागीच ठप्प होऊन गेला असता. ते तसे होऊन चालणार नव्हत.

बायकोच्या 'काहो माझ्यात काही फरक वाटतोय का?' ह्या प्रश्नाचं ताबडतोब उत्तर द्यायचं नसतं हे श्यामला माहीत होतं. कारण ताबडतोब उत्तर दिलं की ते बायकांना खोटं वाटतं. तेव्हा प्रथम थोडे डोळे किलकिले करून बायकोला निरखून पहायचं असतं, मग थोडा विचार करायचा असतो. तसं करून झालं की श्याम म्हणत असे, 'फरक पडलाय का, म्हणून काय विचारतेस? चांगलाच पडलाय. तुझे दंड बघ किती कमी झालेत.'

लगेच राधा खूष होऊन जात असे. बाकी इतर बाबतीत वस्ताद असणारी राधा ह्या सपलपणाच्या बाबतीत अगदी भोळी-भाबडी होऊन जात असे. प्रत्येक बाबतीत श्याम खोटं बोलतो अशी खात्री असणाऱ्या राधेला श्याम ह्या बाबतीतही खोटं बोलत असेल असा संशयसुद्धा येत नसे.

जवळ जवळ प्रत्येक सपलतेच्या प्रयोगाच्या वेळी हा किंवा अशातऱ्हेचा संवाद वा परिसंवाद होत असे. पण काही वेळा असं खोटं बोलणं श्यामलाही जड जायचं. तेव्हा तो मूळ प्रश्नाला बगल मारून 'राधा, तू शरीराच्या आकारापेक्षा त्याच्या विकाराची पर्वा का नाही करत?' म्हणून विचारत असे.

'उगाच गडकऱ्यांसारखे आकार-विकार वगैरे अनुप्रास करून बोलू नका.' राधाचे उत्तर. हे गडकरी म्हणजे चौफेर गडकरी नसून नाटककार गडकरी राधाच्या मनात



असत हे कोणालाही कळावे.

काही वेळ श्याम 'पण तू लठ्ठ दिसण्याबद्दल इतकी काळजी का करतेस?' म्हणून विचारत असे.

'का म्हणजे? अशा लठ्ठ बायकोला बरोबर घेऊन इकडे-तिकडे जायला तुम्हाला मनापासून आवडतं?'

'मला आवडतं, अगदी मनापासून आवडतं.' श्याम संसाररथ बंद न पडण्याच्या दृष्टीनं खबरदारी घेत म्हणत असे. 'उलट एखादी बाई लठ्ठ आहे म्हणजे ती खाऊन-पिऊन सुखी आहे, त्यांच्या घरचं चांगलं चाललं आहे, नवरा हिला सगळ्या तऱ्हेचं स्वातंत्र्य देतो आहे असाच लोक अर्थ काढतील, माहीत आहे?'

राधाला माहीत होतं, चांगलं माहीत होतं. श्यामनं जाता जाता मुक्ती चळवळीला चिमटा काढला आहे हेही तिच्या लक्षात आलं होतं. पण ह्या घडीला काही वाद घालण्याचा तिचा मूड नव्हता.

'हं,' मोठा निःश्वास टाकून ती म्हणत असे, 'तुम्हाला कदाचित आवडत असेल पण आम्हा बायकांना नाही आवडत. आमचं मन तुम्हाला कसं कळणार?'

□

होता होता 'दस कदम'ची दहा पावलं संपली. श्यामला एकदा जिन्यात कर्वेबाई दिसल्या होत्या पण त्यांच्यात एका पावलाचा

फरक पडलेला त्याला जाणवला नाही. राधाची पण तीच परिस्थिती होती. दहा पावल टाकून सुद्धा तिची शारीरप्रकृती होती तिथच होती.

'दस कदम' कार्यक्रम संपला अन् 'कीप फिट' कार्यक्रम सुरू झाला. सत्यनारायण म्हणा की सत्यविनायक म्हणा शेवटी पूजा व्हायची तीच होते. तसच 'दस कदम' म्हणा वा 'कीप-फिट' म्हणा शेवटी त्याचा अर्थ सपलता मिळवा वा मराठीत सांगायचं म्हणजे लठ्ठपणा कमी करा ह्याच होता.

असेही काही दिवस गेले. एका सकाळी काही कारणान श्यामला जाग आली नाही. उठला तो अगदी चमकूनच. घड्याळाकडे पाहिलं तर चागली आठ वाजून आठ मिनिटं झाली होती. आता आपली चांगली कबक्ती निघणार ह्याची त्याला खात्री वाटली. त्यान मोठा धीर करून शेजारच्या कॉटकडे पाहिल आणि त्याच्या जीवात जीव आला. राधा नुसती पहुडलीच नव्हती तर मंदस्वरात घोरत पण होती.

जीवात जीव आलेला श्याम उठला व राधाचा खांदा हळूच हलवून म्हणाला, 'राधा, ए राधा, उठायच नाहीये का ? अग आठ वाजून गेलेत बघ.'

राधाने डोळे किलकिले उघडले व परत मिटले. श्यामचा हात हातात घेऊन हलक्या आवाजात म्हणाली, 'तुम्ही म्हणत होता तेच खरंय. अशा पहाटेच्या दूद कार्यक्रमांचा काही उपयोग नाही. मी पडते जरा. तुम्हीही पडा... इथेच.'

श्यामला काय ? पडत्या फळाची आज्ञा मानण्यात त्याचा नफाच नफा होता.

# ताओवादाच्या निमित्ताने

**अवंती भावे**

दोन वर्षापूर्वी एक अमेरिकन स्नेही अगदी भारावून घरी आले होते; वेळ संध्याकाळच्या आणि रात्रीच्या मध्याची. अदमुरा, अंधुक उजेड. हे गृहस्थ पन्नाशीचे. वाङ्मय, तत्त्वज्ञान, कला ह्यांचा दांडगा अभ्यास. शैक्षणिक पार्श्वभूमी भौतिकशास्त्राची. त्यातले हे 'स्कॉलर.'

त्यांनी बरोबर एक पुस्तक आणले होते– 'ताओ–ते चिंग' (*Tao–to ching*) त्या पुस्तकानेच ते भारावलेले होते. कौतुकाने पुनःपुन्हा त्या पुस्तकातील चिनी लिपी, कविता ह्याबद्दल बोलत होते. मुळात त्यांचे भारावलेपण वरवरचे दिसत नव्हते. लाओ त्सु (Lao tsu किंवा Lao tzu) ह्या चिनी संताच्या ह्या पुस्तकातील तत्त्वज्ञानाने ते पूर्ण विचारमग्न होते. निसर्ग आणि माणूस ह्यातील सवाद, निसर्गाशी माणसाची असणारी एकतानता, त्यावर आधारून दैनदिन वर्तन, सामूहिक सबध, राज्यकारभार, धदा-उद्योग, अध्यात्म, शारीर–प्रक्रिया ह्याविषयी सागितलेली ठाशीव, सुस्पष्ट सूत्रे 'ताओ–ते चिंग' मध्ये होती अशा ८१ कविता त्यामध्ये होत्या

ओझरते चाळताना असे लक्षात आले की, **निसर्ग हे एक व्यापक 'संपूर्ण' (Macrocosm) आणि माणूस हे एक सूक्ष्म 'संपूर्ण' (Microcosm) मानून त्यांच्यातील संवाद आणि सहभाग** ह्याविषयी ह्या कवितामध्ये सांगितलेले आहे. ह्या मूलसूत्रावर आधारित बाकीची सूत्रे होती त्यामध्ये ह्या **एकतानतेचा** महत्त्वाचा भाग म्हणून **अ–कृतीला** (किंवा Non–action साठी '**न–कृती**' हे अधिक योग्य) प्राधान्य दिलेले होते स्वत.चे केवळ '**असणे**' जाणावे, ह्यावर भर होता.

सुरुवातीच्या चाळण्यात ह्या गोष्टी जाणवल्या. त्या मनापासून आवडल्याही. प्रश्न असा पडला की, हे भौतिकशास्त्रवाले अमेरिकन गृहस्थ ह्यामुळे एवढे भारावले आहेत, आपण मात्र विस्मित का होत नाही आहोत हे वाचून ? मनाने एक उत्तर तिथल्या तिथे दिले की, हे जितके ह्या गृहस्थांना नवे, धक्कादायक, त्यांच्या शब्दात म्हणजे 'ग्रेट' वाटते आहे; तितके, नव्हे, थोडेही, आपल्याला वाटत नाही. ही सूत्रे परिचित वाटत आहेत. ब्रह्म हे एक पूर्ण सत्य व 'मीच ब्रह्म' हे सूत्र, असे काहीतरी चुटपुटते मनात येत होते. ह्या सूत्रामधील सास्कृतिक प्रतिमा वेगळ्या, चिनी होत्या, तेवढेच वेगळेपण.

जाता जाता ते गृहस्थ 'ताओ–ते चिंग' ठेवून गेले–नव्याने स्तिमित होऊन की, आपला विस्मय ह्यांच्यात कसा झिरपला नाही!

लाओ त्सु हे जुन्या चिनी तत्त्वज्ञानामध्ये, दतकथामध्ये वारवार आढळणारे नाव. त्याची जीवनपद्धती, त्याची सूत्रे ह्याचा सग्रह म्हणजे 'ताओ–ते चिंग.' लाओ त्सु ह्यानी सुमारे २५०० वर्षांपूर्वी ही सूत्रे सांगितली. कन्फ्यूशसचे हे ज्येष्ठ समकालीन. त्याच्या निश्चित कालखडावि.यी तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत. त्यानी आचरलेली, उच्चारलेली सूत्रे शब्दबद्ध करणे, म्हणजे त्याचे स्वत.चेच सूत्र ('ताओ शब्दबद्ध करता येत नाही.') अमान्य करण्यासारखे. पण लोकासमोर ती कायम रहावीत म्हणून Yin Hsi ह्याच्या (एक सर्वसामान्य गृहस्थ) सांगण्यावरून त्यानी ती ८१ कविताच्या रूपात लिहिली.

## ताओ

ह्या सूत्राचा प्रभाव आणि कन्फ्यूशसच्या तत्त्वाचा प्रभाव, एकाचवेळी तत्कालीन चीन मध्ये होता. Tao म्हणजे मार्ग–Way. नंतर त्याला विशिष्टार्थ आला. तो असा : 'आचरण्याचा व आतरिकीकरणाचा एकमेव मार्ग' (The way to be followed and internalised).

ह्या मार्गात तीन मुख्य 'ताओ' सागितलेले आहेत. त्याचा सयोग म्हणजे ताओवाद. हे तीन ताओ असे :

(१) **राजमार्ग** (Way of the king–Wang Tao)

ह्यात राजाने कसे वागावे, कसे वागू नये कसे असावे, ह्यासंबंधीचे मार्गदर्शन आहे. (कवितांच्या रूपांतरात ते आले असल्याने येथे ते पुन्हा दिलेले नाही.)

**(२) स्वर्गमार्ग** (Way of the Heaven – t'ien Tao)

स्वर्ग आणि पृथ्वी ह्यांतील 'संपूर्णा'त माणसाने कसे 'असावे' ह्याबद्दलची सूत्रे ह्यात आहेत.

**(३) कायमस्वरूपी मार्ग** (Permanent way– Ch'ang Tao)

अशी अनिर्वचनीय वस्तुस्थिती की, जी पराकोटीच्या उत्कटतेत (in ecstacy) अनुभवाला येते. हीच वस्तुस्थिती विश्वाच्या मुळाशी असते आणि 'प्रत्यक्षा'च्या मागे आणि आत असते. थोडक्यात, **कोणताही क्षण त्याच्या परमपूर्णतेत निखळपणे, नैसर्गिकपणे अनुभवणे हा वर्तनमार्ग खरा.**

लाओ त्सु ह्यांचे म्हणणे असे की, ताओ शब्दबद्ध करता येत नाही; जाणवतो. ह्या कविता पाहता, त्यांचे काही निश्चित म्हणणे आहे, असे दिसते. त्याचे प्रमुख भाग असे :

१. निसर्ग आणि माणूस ह्यांचा संबंध.
२. निसर्ग आणि समूह ह्यांचा संबंध.
३. त्यावर आधारित वर्तनपद्धती,
४. राज्यकारभार.

त्यांच्या मते, निसर्ग हे एक व्यापक 'संपूर्ण', माणूस हे सूक्ष्म 'संपूर्ण' (पाणी व पाण्याचा थेंब ह्यांचा संबंध येथे ध्यानी घ्यावा) ह्या व्यापकाशी माणूस ह्या सूक्ष्माचा कायम संवाद आणि सहभाग (Communication & Participation) असतो. त्यात ढवळाढवळ करणे, म्हणजे दोन्हीतील एकतानता (Harmony) बिघडवणे. तसेच्या तसे 'असणे' (Being) म्हणजे स्वर्ग व पृथ्वी ह्यांत एकरस होणे. असे होण्याची अवस्था म्हणजे ताओ गवसणे. असे झाले की, काय काय मिळते ? माणसाला शांती, राजाला समाधान, राज्याला सुव्यवस्था आणि निसर्गाला आनंद.

त्यामुळे मुद्दाम काही '**करणे**' ह्या वादाला अमान्य आहे. त्यांचे शारीर, मानस व मानस–शारीरिक प्रक्रियांचे खुलासेही ह्यावर आधारित आहेत. आपल्या पाच संवेदनेंद्रियांचा संबंध त्यांनी निसर्गातील पाच दिशा, पाच पवित्र पर्वत, आभाळाचे पाच भाग, पाच ऋतू आणि पंचमहाभूते (wu–hsing) ह्यांच्याशी जोडलेला आहे. हे सूत्र इतके टोकाला नेले आहे की, त्यांची कारणपरंपराही सर्वसाधारणाहून वेगळी होते. एक–दोन नमुने पाहू.

आपल्या शरीरात रक्ताभिसरण होते. ताओवाद असे मानतो की, रक्ताभिसरण होते, **कारण** नद्यांचे पाणी वाहत असते. जसे नद्यांचे पाणी वाहते, तसे रक्ताभिसरण होते, असे हे सूत्र नाही.

निसर्गाशी हा **सेंद्रिय, जिवंत** संबंध ताओवादाने जोडला आहे. दुसरा नमुना पाहू. चीनमध्ये, वर्षाच्या ३६५ दिवसांपैकी ५ दिवस विधिदृष्ट्या अपवित्र मानले जातात. त्यामुळे उरले ३६० दिवस. ताओवाद असे मानतो की, आपल्या शरीरात ३६० सांधे असतात, **कारण** विधिवर्षाचे (Ritual year) ३६० दिवस असतात.

हा तर्कताणाचा भाग वगळला, तर ताओवाद हा आपल्याकडील **निसर्गवादाशी, शिववादाशी, वैदिक सूक्तांशी** काही प्रमाणात नाते सांगतो. काही सूत्रांत साधर्म्य आढळते. (प्रभाव, काळ, उसनवारी वगैरे येथे अभिप्रेत नाही.)

ताओवादाचा सामाजिक भाग पाहण्याआधी हे सामर्थ्य थोडे पाहायला हवे.

**लाओ त्सु** म्हणतात, 'ताओ अनिर्वचनीय आहे. 'स्व'ला जागणे हेच अनंत ताओ.'

**शैवसंप्रदाय सांगतो,**

'उच्चाररहितं चेतसैव विचिन्तयन् ।
यं समावेशमाप्नोति शाक्तः सोऽप्राभिधीयते ॥'

म्हणजे, मन एकाग्र करून कोणी उच्चारांत न सामावणारी वस्तुस्थिती जाणेल आणि संपूर्णावस्थेत (समावेश) असेल, तर असा 'समावेश' म्हणजे शाक्त.

स्वीकार, अस्वीकार, किंबहुना कोणतीही कृती हीच ताओवादाला अमान्य आहे. **लाओ त्सुंचे** म्हणणे असे, '**घटना होते–विरते.** त्यात **तुम्ही** काही **करत** नाही. अशा होण्यातील 'स्व'ला अनुभवणे ही परमानंदाची अवस्था.'

**शैवसंप्रदाय सांगतो,**

'मा किंचित् त्यज, मा गृहाण, विरम स्वस्थो यथावस्थितः ।' म्हणजे, काहीही नाकारू नकोस, काहीही स्वीकारू नकोस.



तुझ्या मूळ 'स्व'शी बद्ध राहा, '**तुझा**' **तू अस**. हा 'स्व' म्हणजेच अनंत अस्तित्व.

**ताओवादाचा** जसा 'संपूर्ण' रूपी **निसर्गा**वर विश्वास आहे, तसाच त्याच्या **विविध**रूपी आविष्कारांवरही आहे. दोहोंत ताओ **हे** सूत्र कायम मानून, एकतानता आहे, असे **हा** वाद मानतो. पर्यायाने मूळ रूप व त्याची नैसर्गिक स्पष्टीकरणे ह्यांत फरक नाही. **रूपे** असणे, हे मूळ स्वरूप जाणायला अत्यावश्यकच असते. म्हणून तर, नद्या वाहतात, झाडे डोलतात, पक्षी उडतात, माणसे असतात. नपेक्षा नुस्तेच रिकामे भांडे उरेल.

**शिवसूत्रे** सांगतात,

'अस्थास्यदेकरूपेण वपुषा चेन्महेश्वरः ।
महेश्वरत्वं संवित्वं तदत्यक्ष्यद्घटादिवत् ॥'
(तंत्रालोक' ३/१००)

म्हणजे, अनेकानेक नमुन्यांमध्ये उच्चतम वस्तुस्थिती आकारीत नसेल, तर ती खरोखरी उच्चतम वस्तुस्थिती, शक्ती नव्हे, जाणीवही नव्हे, केवळ एक रिकामा घटच !

(येथे जागेअभावी शिवसूत्रांचाच केवळ विचार केला आहे. उपासूक्ते, सूर्यसूक्ते ह्या वैदिक सूक्तांचा, उपनिषदांचा असा विचार करता येईल.)

## ताओवादाचा सामाजिक भाग

प्रश्न असा की, इतक्या विशुद्ध **रूपात** नैसर्गिक असायचे, **निसर्गच असायचे,** तर समूहांचे, सामाजिक मूल्यांचे, व्यवस्थेचे

एक कडी जरी तुटली तरी सांधा
निखळेल आणि आक्रमक शक्ती
उधळतील. मने दुरावली तर
परदास्याचा पाश आवळेल.
अशा वेळी तरी निकड भासते
सामाजिक सलोख्याची,
ऐक्याच्या भावनेची.

राष्ट्र म्हणजे एक विशिष्ट भूभाग
नव्हे, तर समानता आणि प्रबळ
इच्छाशक्ती असलेला अभेद्य ऐक्याचा
जागृत समाज होय.

सारे एक राहू ....
राष्ट्र महान घडवू

एकसंध साखळीची
एक जरी कडी निखळेल
तरी पाश बसून विनाश ओढवेल

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
महाराष्ट्र शासन

काय ? ह्याचे ताओवादाचे उत्तर कोणते ?

कन्फ्यूशसवाद आणि ताओवाद हे दोन्ही चीनमध्ये जवळजवळ एकाच वेळी होते कन्फ्यूशसची तत्त्वे मानवी समाजरचना, सामाजिक नीतिमत्ता, मानवी समाजाच्या सभासदांच्या सामाजिक जबाबदाऱ्या ह्याच्याशी सबंधित होती. ताओवादाचा भर निसर्ग, निसर्गतः घडणाऱ्या घटना आणि माणसाची स्वाभाविक उत्स्फूर्तता ( Spontaneity ) ह्यावर होता. ह्याचा अर्थ असा नव्हता की, ताओवादाला समाजरचना, त्याची व्यवस्था अमान्य होती. ती 'just' असावी, असे त्यांचे म्हणणे होते. 'just'ची त्याची सकल्पना अशी की, ही व्यवस्था जशी स्वभावतः आहे, तशी असावी, त्यात राजाही असावा. मात्र, त्यात जबरदस्ती बळ आणि महत्त्वाकाक्षा ( Compulsion, force and ambition ) आणू नयेत, त्यादृष्टीने लाओ त्सु ह्यानी सागितलेले राजाचे गुणधर्म थोडक्यात पाहण्याजोगे आहेत

१) राज्य न्यायाने करावे ( न्याय= निसर्गन्याय. )

२) शस्त्रे वापरू नयेत.

३) लोक आपोआप सुसघटित होतात. त्यासाठी खटपट करू नये. अ–कृती (न–कृती = wu–wui मानावी.

४) जे स्वाभाविकपणे सामोरे येते, ते घ्यावे, त्यासाठी उटारेटी करू नये.

५) संपत्ती ( wealth ) आणि किताब ( Titles ) ह्यावर हक्क साग़ू नये.

६) कायदे, नियम आणि अटी ( Laws, rules and regulations ) हे नसावेत. कारण त्यामूळे लबाडी वाढते.

७) सावध, सजग, नम्र, बदलण्यास तयार, साधे, अलिप्त व मुक्त असावे.

अशी अनेक 'राजसूत्रे' आहेत. वस्तुतः, कोणत्याही चागल्या शासकाचे म्हणून जे गुणधर्म सांगता येतात, तेच हे गुणधर्म आहेत परंतु ह्या गुणधर्माशी नतर किमया (Alchemy), निसर्गातील रौद्र घटनाच्या आणि अज्ञात वस्तूच्या भीतीपोटी जन्माला येणारी पूजा (जी मूळ ताओवादात कधीही नव्हती) ह्या गोष्टी जोडल्या गेल्या आणि ताओवाद (*Taoism*–'*Tao–chia*') हा ताओधर्माहून (Tao Religion–'Tao–chiao') पूर्णपणे वेगळा पडला ताओवाद हे उच्चवर्गीय वुद्धिवाद्यानी अभ्यासायचे तत्त्वज्ञान झाले आणि ताओधर्म हा आदिवासी, जंगलटोळ्या ह्यानी पाळायचा विधिनिबद्ध, चेटूक–भुते–खेते–मूर्ती ह्यानी भरलेला जुनाट धर्म झाला. (असे म्हटले जाते की, ज्या सुमारास बौद्धमत चीनमध्ये येऊ घातले होते, त्या सुमारास ताओवादाचा त्याला निसर्गतः विरोध होता. ह्या परिस्थितीचा फायदा घेऊन ताओवादाला, लाओ त्सुना विरोध असणाऱ्या मूळच्या लोकानी अप्रत्यक्ष मार्गाने, निसर्गपूजा–चेटूक–किमया–किमयागार (Alchemist)–राजे–त्याची वशपरपरागत क्रूर सत्ता अशी साखळी टोळ्यामध्ये प्रसृत केली. *ह्या साखळीतील 'निसर्ग' ह्या* घटकाला चिमटीत पकडून असे पसरवले गेले की, हाच ताओधर्म; कारण तो निसर्गाला मानतो. अर्थात्, चीनमध्येही, हा मतभिन्नतेचा विषय आहे )

---

Fritjof Capra ह्यानी त्याचा एक अनुभव सागितला आहे · 'मी एका उन्हाळी दुपारी समुद्राकाठी बसलो होतो. त्यावेळी मला हा अनुभव आला. मी शास्त्रज्ञ. खडक, माती, लाटा, वाळू, आभाळ ह्याची भौतिक रचना, त्याचे अतर्गत घटक मला माहीत होते. पृथ्वीचे वातावरण सतत वैश्विक किरणानी भारलेले असते, हेही मला माहीत होते. पण तोपर्यंत केवळ गणिती सूत्रे, आलेख ह्यांनीच मी ते समजावून घेतले होते. मला त्यावेळी 'जाणवले' की, निसर्गातील किरण, अणू ह्याना माझे शरीर प्रतिसाद देते आहे. अणूच्या, किरणाच्या, शक्तीच्या (Energy) बाहेर सतत चाललेल्या नृत्याचा ताल मला माझ्या शरीरात 'जाणवला.' (I felt its rhythm and I 'heard' its sound ) मला असे वाटले की, हे शिवतांडव आहे (At that moment, I 'knew' that this was the Dance of Shiva ).'

---

नतर बौद्ध तत्त्वज्ञान आणि ताओवाद ह्यानी काही प्रमाणात समन्वयाचे धोरण स्वीकारले. *इतकेच नव्हे, तर झेन (Zen)* सप्रदाय ह्या बौद्ध धर्मातील एका शाखेवर ताओवादाचा फार मोठा प्रभाव पडला. हा झेन सप्रदाय नतर चीन, जपान, कोरिया, तैवान येथे मोठ्या प्रमाणावर पसरला. अद्यापही त्याचे अनुयायी दिसतात. अमेरिकेतही झेन सप्रदायाला अनुयायी मिळाले. बौद्ध धर्म आणि ताओवाद ह्याचा अधिक सबध पाहण्यापूर्वी ताओवादाच्या काही आणखी सामाजिक, वैज्ञानिक भागाकडे ओझरते लक्ष द्यायला हवे, कारण त्याकडे आकृष्ट होऊन पश्चिमी राष्ट्रातील काही लोकानी झेन सप्रदाय व ताओवाद ह्याचा एकत्रित स्वीकार केला.

## ताओवाद आणि भौतिकशास्त्र

ताओवादाचे प्रमुख सूत्र निसर्ग आणि मानव ह्याची सेंद्रिय, जिवत एकतानता असल्यामुळे, त्यातील Macrocosm व Microcosm चे स्वरूप 'पूर्ण' असे होते. अर्थातच, भौतिकशास्त्रीय भाषेत बोलायचे तर, दोहोतील अणुरचना, रेणुप्रक्रिया एकाच स्वरूपाची होती, फरक सूक्ष्म व व्यापक ह्याचा होता.

ह्यादृष्टीने, Fritjof Capra ह्या पश्चिमी *भौतिकशास्त्रज्ञाचा उल्लेख येथे व्हायला* हवा त्याचे 'Turning Point' आणि 'The Tao of Physics' हे दोन प्रमुख ग्रथ जाणकाराना माहीत आहेत. 'The Tao of Physics' च्या प्रस्तावनेत ते म्हणतात, 'पौरस्त्य तत्त्वज्ञानाला असे वाटते की, पश्चिमी शास्त्र व तत्रज्ञान हे निसर्ग *व माणूस ह्याच्या एकतानतेच्या आड येते.* पण तसे नसून 'स्व'ची ओळख आणि आध्यात्मिक ज्ञान (Self Realization and spiritual knowledge) ह्यास भौतिकशास्त्राची मदत होते. कारण हे शास्त्र लवचिक आहे.' अणुरेणूची हालचाल आणि ताओवादाचे सूक्ष्म व व्यापक 'सपूर्णा'चे सूत्र ह्याचे Capra *ह्याना आकर्षण वाटले* आहे, त्यातील साधर्म्य शोधायचा त्यानी प्रयत्न केला आहे ('The Tao of Physics' मध्ये त्यानी ताओवाद, झेन सप्रदाय, हिंदू मत इत्यादीवर स्व-मत दिले आहे. भौतिकशास्त्रीय परिभाषेत त्याचा उलगडा करण्याचा प्रयत्न केला आहे येथे *सर्व देता येणार नाही, तो स्वतत्र अभ्या*-साचा विषय होईल )

## ताओ औषधयोजना

मूळ मुद्दा असा की, शास्त्राला ताओवादाचे आकर्षण वाटावे, असे त्यात काय होते? निसर्गाशी एकतानता मानल्यावर त्यातील घटकाचा स्वभाव आणि मानवी शरीर प्रक्रियाचा स्वभाव ह्याचा विचार ताओवादाने केला. जुन्या चिनी औषधोपचारापेक्षा हा विचार वेगळा नव्हता. आरोग्यरक्षण आणि आहे ते आयुष्य स्वास्थ्यपूर्ण ठेवणे हे दोन हेतू ताओवादाने मान्य केले मात्र, आयुर्मर्यादा लाबवणे त्याना अमान्य होते, कारण निसर्गप्रक्रियेतील तो अडथळा होता.

खनिजे, वनस्पती आणि प्राणिज घटक ह्यामधून शरीरोपयोगी औषधे तयार करणे ताओवादाने मान्य केले. त्यावर आधारून ५२ प्रकरणाचा एक ग्रथही १६ व्या शतकात लिहिला गेला ('Pen–ts'ao kang–mu', म्हणजे, 'Great Pharmacopoeia')

ह्या काळामध्ये पश्चिमी राष्ट्रामध्ये निसर्गोपचाराकडे कल होऊ लागला होता. चिनी औषधामध्ये नैसर्गिक घटकाचाच समावेश असल्याचे पाहुन औषधतज्ज्ञ त्याकडे आकृष्ट झाले अद्यापही निसर्गघटकाच्या औषध–योजनामध्ये चीनची औषधे मोठ्या प्रमाणात असतात.

## ताओवाद आणि बौद्धधर्म

ताओवाद असतानाच चीनमध्ये बौद्धधर्माचा शिरकाव झाला. प्रथम दोघोचा, स्पर्धक म्हणून विरोध आला नतर झेन बौद्धसप्रदायाने ताओवादातील न–कृतीचे तत्त्व स्वीकारून जपान, चीन, तैवान, कोरिया, अमेरिका येथे प्रगती केली. ताओवादाच्या सूत्राचा अतःस्त्रोत झेन सप्रदायातील गोष्टीमध्ये (legends) जाणवतो.

## ताओवाद आणि जपान

जपानमध्ये झेन बौद्धवाद पोचला, त्या आधी ७ व्या शतकात ताओसारख्या मताचा मागोवा तेथे सापडतो. नतर देवळे, न्यायालय आणि गावपातळीवरील झगड्याचे निवाडे ह्याच्या सदर्भात ताओवादाचा वापर 'प्रमाण न्याय' म्हणून केला जात असे.

---

मा त्सु (Ma Tsu) आणि शि ताऊ (Shi T'ou) हे झेन सप्रदायातील मान्यवर 'मास्टर्स' त्याच्याकडे पँग (P'ang) नावाचा एक सर्वसामान्य माणूस आला. त्याने प्रथम शि ताऊना विचारले, 'कोणता माणूस कधीच गर्दीत नसतो?' शि ताऊनी पँगच्या तोडावर हात ठेवला आणि पँगला उजळल्यासारखे झाले. त्या भरात पँगच्या तोडून शब्द आले, 'माझे दैनदिन व्यवहार वेगळे नसतात. फक्त मी नैसर्गिकपणे एकतान होतो कोणतेच स्थान मिळवले जात नाही किंवा नाकारले जात नाही मी कुठेच जात नाही किंवा कुठून येत नाही किरमिजी व जाभळा रग कुणाला मान्यता प्राप्त वाटतो! हिरव्या पर्वतावर धुळीचा कणही नसतो. आध्यात्मिक शक्ती आणि तिचे विस्मयकारक कार्य म्हणजे पाणी ढवळणे आणि सरपण वाहून नेणे!'
नतर पँग मा त्सु ह्याच्याकडे आला. त्यानाही त्याने विचारले, 'कोणता माणूस कधीच गर्दीत नसतो?' मा त्सु मोठे गमत्ये! त्यानी सागितले. 'वेस्ट रिव्हरचे सगळे पाणी पिऊन पचव, मग सागेन' पँगचे स्वत्व हे ऐकून पुन्हा उजळले आणि त्या भरात त्याने शब्द उच्चारले, 'दहा दिशाचे समेलन! प्रत्येकजण न–कृतीचा अभ्यास करतो जेथे बुद्ध निवडला जातो, तेच हे ठिकाण! मन रिक्त करून प्रत्येकजण यशस्वीपणे परत येतो!'
ताओवादी लाओ त्सु म्हणतात,
'प्रत्येक गोष्टीतून स्वतःला रिकामे करा.
मन शातपणे विसावू द्या
अनेकानेक गोष्टीचा उदयास्त होईल,
'स्व' त्यावेळी त्याच्या परतण्याच
निरीक्षण करीत असेल.'

---

चिनी ज्योतिषपद्धतीवर असलेला ताओवादी प्रभाव जपानने जसाच्या तसा उचलला. पुढे ८ व्या शतकापासून १२ व्या शतकापर्यंत न्यायालयीन कामकाजामध्ये ताओसूत्रे प्रमाण मानली जात होती. (Heian काळ). शितो (Shinto) ह्या वादाने ताओधर्मातील किमया उचलली. जपानमधील सो तो (So to) ह्या झेन सप्रदायावर १३ व्या शतकात लाओ त्सुच्या सूत्राचा प्रभाव पडला–जो आजही आहे. जपानी मंत्रावर लाओ त्सु व दुसरे ताओवादी चुआग त्सु ह्याचा प्रभाव आहे. ताओसूत्रे, मते, उदाहरणे, चित्रे, कविता ह्याची छपाई, नतरच्या काळात (Tokugawa Period) मोठ्या प्रमाणात केली गेली आजही परिस्थिती अशी आहे की, ताओ तत्त्वज्ञानाचे तज्ज्ञ चीनपेक्षा जपानमध्ये मोठ्या प्रमाणावर आहेत.

## परिवर्तन व पुनर्रचना

सध्याच्या कालखंडाचा विचार करता याबाबतची भूमिका जाणून घ्यायला हवी. आज ताओवादाचे काय चालू आहे? हेही त्यातून लक्षात येईल

ताओमत असे की, कोणतीही सुधारणा म्हणजे ठरीव पद्धतीकडे जाणारी घटना–तीही केव्हातरी भूतकाळात झालेलीच असते. सस्कृती म्हणजे निसर्गक्रमाचे अवमूल्यन. त्यामुळे, आदर्श काय? तर मूळ शुद्ध रूपाकडे जाणे. **व्यक्ती पातळीवर**– शहाणपणा म्हणजे आज्ञाधारकपणा, मात्र तो केवळ निसर्गलयीशीच असावा. म्हणजे, आहे ह्या क्षणातील निसर्गलय जाणून त्याप्रमाणे आपण फक्त असावे. **समाज पातळीवर**– साऱ्यानी मिळून निसर्गक्रम पाळावा.

ताओवादात परिवर्तनाबद्दल पुस्तक आहे. (I Ching–A Book of Change'). त्याचे म्हणणे असे की, स्थिर 'आदर्शाला' विरोध करीत तसेच राहण्यापेक्षा सह–ज होणारा बदल पद्धतीने बद्ध करावा. त्याच्या मुळाशी मात्र अपरिवर्तनीय कायमस्वरूपी ताओने (The Permanent Tao) सागितलेली एकतानता असावी 'आकार देणे व पुनर्रचना करणे' हे चुआग त्सुने एकाच प्रक्रियेचे घटक मानले. (ज्याप्रमाणे रात्र व दिवस, उन्हाळा व हिवाळा).

त्याच्या मते, कोणतीही हेतुबद्ध कृती ही निसर्गक्रम बिघडवते. त्यामुळे, काही प्रमाणात आदिमतेला (Primitivism) त्याची मान्यता आहे. स्वर्गकृत आणि मानवकृत (निसर्ग व समाज) ह्यात विरोध आला की, उत्स्फूर्ततेला (Tzu–jan) मान द्यावा, असे ताओवाद मानतो. त्यामुळे, 'शहाणा

माणूस कृती करीत नाही आणि तरीही काही व्हायचे राहिलेले नसते,' हे त्याचे सूत्र. स्वर्ग, पृथ्वी, रात्र (Yin), प्रकाश (Yang) आणि वाऱ्याचे श्वास (Ch'i) ह्यात उत्स्फूर्ततेने आपोआप घटना होतात. त्या होऊ द्याव्यात. त्यामुळे आपोआप न्याय्यता प्रस्थापित होते

ही भूमिका तत्कालीन चीनला मानवली. जपान, कोरिया, तैवान ह्यानी आजही ती काही भागामध्ये (लोकानी; शासनाने नव्हे) चालू ठेवली. मूळ मुद्दा मात्र चीनमध्ये आज बाजूला पडतो आहे. ताओवादाच्या 'न–कृती'चा अर्थ 'असेल हरी, तर देईल खाटल्यावरी' असा ऐदी आळसाचा नव्हता. नेमका हा चुकीचा अर्थ ताओधर्माने उचलला. त्यात किमयागारी मिसळली त्यामुळे टोळ्यानी काही स्वतंत्र धोरण स्वीकारले.

---

जपानमध्ये काही वेळा हाराकिरी केली जाते 'Hara' म्हणजे केंद्र. हाराकिरी करणे म्हणजे आपल्या शरीरातील केंद्राचा निसर्गकेंद्राशी संबंध जोडणे व 'स्व' शी संबंध तोडणे. स्वर्ग आणि पृथ्वी ह्यातील संबंधाबाबत माणसाला सूचना देताना ताओवाद सांगतो, 'निसर्गातील केंद्राला घट्ट चिकटून राहा 'स्व' पासून तुटा कारण, स्वर्ग व पृथ्वी निष्ठूर आहेत.'

---

मूळ मुद्दा अ–हिंसेचा आणि अ–शस्त्रात्मकतेचा होता. तो सध्याच्या काळात पाळणे चीनला (किंबहुना, कोणत्याच राष्ट्राला) शक्य नाही. परिणामी, बुद्धिवादी उच्चवर्गाने ताओवादाच्या तत्त्वज्ञानाचे चिंतन करायचे, शक्य होईल त्यानी निसर्गोपचार करायचे आणि काही पश्चिमी राष्ट्रातील अस्वस्थ मनोवस्थेतील (त्या अमेरिकी स्नेहयांसारख्या) लोकानी ताओवादाने, झेन बौद्धवादाने झपाटून जायचे, अशी बव्हंशी आजची परिस्थिती आहे. अशा झपाटलेल्यानी उभारलेली ताओ, झेन प्रार्थनामंदिरे, त्यातील सोयी–सुविधा हे मूलतः ताओ तत्त्वज्ञानाशी विसंगत आहे. परंतु, जसे शस्त्रवापराबद्दल; तसेच ह्याहीबद्दल, काही सांगणेही कदाचित् काही शुद्ध ताओवाद्याना 'करणे', म्हणजे, एकतानता बिघडविणे वाटत असेल !

□

(कृतज्ञता : प्रा. राम गायकवाड
यप सियांग हॉक)

---

## –मी सगळचातलं थोडं थोडं घेतो....

पुण्यातील एक चिनी उपहारगृह चालवणारे चिनी कुटुंब गेली कित्येक वर्षे पुण्यात राहते. त्याचा मुलगा लहानपणापासून चीनमध्ये होता. आता एम्. बी. ए. करायला आणि उपाहारगृहाची पुढची व्यवस्था पाहायला पुण्यात आला आहे ताओवाद, चिनी लिपी ह्या निमित्ताने त्याच्याशी झालेला संवाद असा : (त्याच्या म्हणण्याचा रोख कळावा, म्हणून त्याची काही वाक्ये मुद्दाम इंग्रजीत तशीच ठेवली आहेत.)

'तुला चिनी वाचता येत का ?'

'व्हेरी वेल. का ?'

'हे पुस्तक तुला माहीत आहे का ?' (माझ्या हाती लाओ'त्सु ह्याचे 'ताओ–ते चिंग.')

–मुलाने नुस्तेच खांदे उडवले

'ही कविता वाचशील का ?'

–मुलाने चिनीत भराभर कविता वाचली. त्यावेळी त्याला इंग्रजी भाषांतर दिलेले नव्हते. 'अर्थ सांग,' म्हटल्यावर त्याने भराभर अर्थ सांगितला. माझ्या हातातल्या इंग्रजी भाषांतराशी तो बऱ्यापैकी जुळला

'ह्या कविता तुला माहीत नाहीत ?'

'वेल ! इन स्कूल्स, दे आर डिसप्लेड सम लाइन्स.' (मला शाळेतले सुविचार, 'धावत्याला शक्ती येई' वगैरे.. ... आठवले.)

'तुझा धर्म कोणता ?'

'माय पेरेंटस् प्रॅक्टिस बुद्धिझम.'

'तुझा ?'

'वेल ! मी सगळचातलं थोडं थोडं घेतो.'

'ताओतलं काय घेतलंस ?'

'आता ताओ कुणाला माहीत ? आय डोंट नो. बट आय जस्ट बी नॅचरल '

'इथे काय करतोस ?'

'एम्. बी. ए.'.

'बाकी ? आणि एम्. बी. ए. वगैरे ताओवादाच्या नॅचरल असण्यात बसत ?'

'दॅट इज माय विश अ‍ॅन्ड विश इज नॅचरल !' त्याचे हे उत्तर चेष्टेचे वाटले; पण ते तसे नव्हते. इच्छा ही अत्यंत नैसर्गिक असते, हे तो गंभीरपणे सांगत होता त्याचे समवयस्क मित्रही असाच विचार करतात, असे तो म्हणाला. साहित्यात रस नाही, असेही त्याने सांगितले.

कदाचित् पुण्यातील काही चिनी स्कॉलर्सकडून, विद्यार्थ्यांकडून ताओवादाविषयी अधिक तपशील मिळाला असता. पण धर्म, तत्त्वज्ञान ह्याची शैक्षणिक पार्श्वभूमी नसलेल्या तरुण मुलाची 'ताओ' विषयीची तातडीची (Instant) प्रतिक्रिया हवी होती ती ह्या मुलाकडून पुरेशी बोलकी मिळाली.

□

# ' ताओ ते चिंग ' मधील कवितांचे रूपांतर

## कायमस्वरूपी मार्ग

**( Permanent way-Ch'ang Tao )**

काहीतरी गूढपणे आकारित झाल.
स्वर्गाच्या आणि पृथ्वीच्या आधी जन्मल,
नीरवनेत आणि पोकळीत,
एकाकी आणि अपरिवर्तनीय,
कायम उपस्थित आणि कल्पनेत.
कदाचित् हे अनेकानेक गोष्टींचं मूळ असेल.
मला ह्याचं नाव माहीत नाही.
ह्याला ' ताओ ' म्हणा.
अधिक चागल्या शब्दाच्या अभावामुळे,
मी ह्याला ' महत् ' ( श्रेष्ठ ) म्हणतो.
महत् असल्यान हे प्रवाही आहे.
हे दूरपर्यंत वाहतं.
दूरात जाऊन हे परत येतं.
म्हणून, ' ताओ महत् ( श्रेष्ठ ) आहे;
        स्वर्ग श्रेष्ठ आहे;
        पृथ्वी श्रेष्ठ आहे;
        राजाही श्रेष्ठ आहे.'
विश्वाच्या ह्या चार श्रेष्ठ शक्ती आहेत,
आणि राजा त्यापैकी एक आहे.
माणूस पृथ्वीला अनुसरतो.
स्वर्ग ताओला अनुसरतो.
जे जे नैसर्गिक, त्याला ताओ अनुसरतो.

## राजमार्ग


ताओचा विश्वास न–कृतीवर आहे.
तरीही काही व्हायचं उरत नाही.
राजे आणि महाराजे ह्यांनी हे पाळलं,
तर अनेकानेक गोष्टी निसर्गत: होतील.
तरीही जर त्यांना काही करावंसं वाटलं,
तर अनाकार द्रव्याच्या साधेपणापासून ते हटतील.
आकाराखेरीज इच्छा नसते.
इच्छा नसेल, तर सुशांतता, समाधानता असते.
–आणि अशा प्रकारे सर्वच गोष्टी सुशांत असतील.

## स्वर्गमार्ग
### ( Way of Heaven–t'ien Tao )

वचनीय ताओ म्हणजे अनंत ताओ नव्हे.
ज्याचं नामकरण करता येतं, ते अनंत नाव नव्हे.
अनामता ही स्वर्गाची व पृथ्वीची सुरुवात आहे.
सनामता ही अनेकानेक गोष्टींची जननी आहे.
कायम निरिच्छ होऊन गूढ 'पाहता' येतं.
सेच्छ राहून रूपं, आविष्कार पाहता येतात.
हे दोन्ही एकाच मूलस्रोतातून उमलतात,
दोहोंची नावं मात्र भिन्न आहेत.
हे सगळं अंधारासारखं भासतं.
अंधारात अंधार.
– सर्व गूढांचं प्रवेशद्वार.

## राजमार्ग
### ( Way of the king–Wang Tao )

राष्ट्राचा कारभार न्यायबुद्धीनं करा.
अनपेक्षित खेळ्यांनी युद्धं आवरा.
आटोकाट प्रयत्न न करता विश्वाचे नियंते बना.
हे असं आहे, हे मला कसं माहीत ?
असंच !
अधिक कायदे आणि बंधनं असतील,
तर लोक अधिक गरीब बनतात.
माणसांची शस्त्रं अधिक धारदार, म्हणजे,
सर्व प्रदेशांत अधिक त्रास !
अधिक बुद्धिमान आणि चतुर माणसं असतील,
तर अधिक विचित्र गोष्टी घडतात.
अधिक नियम आणि अटी म्हणजे,
अधिक चोर आणि दरोडेखोर !
म्हणून संत (लाओ त्सु) सांगतो की,
मी काहीच कारवाई करीत नाही आणि लोक सुसंघटित असतात.
मी शांतमनस्क असतो आणि लोक प्रामाणिक बनतात.
मी काहीच करीत नाही आणि लोक श्रीमंत होतात.
मी निरिच्छ असतो आणि लोक चांगल्या,
साध्या जीवनाकडे वळतात.



# दोनशे वर्षांचा माणूस

## ● रघुपती भट्ट ●

**जन्माने रशियन पण अमेरिकेत मोठा झालेल्या आयझॅक ॲसिमाव्हला शास्त्रकथालेखकांत अगदी वरचे स्थान आहे. स्मरणशक्तीची दैवी देणगी लाभलेला ॲसिमाव्ह बायोकेमिस्ट्री या विषयात पीएच्. डी. मिळवून राहिला आहे. बराच काळ तो प्राध्यापकी करीत होता. या काळात त्याने खूप क्रमिक पुस्तकेही लिहिली आहेत. १९५८ पासून त्याने पूर्ण काळ लेखनात घालवायला सुरुवात केली. अनेक शास्त्र-कथा–मासिकांत त्याच्या कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. शास्त्रकथां-बद्दलची सर्व बक्षिसे त्याने मिळवली आहेत. जवळजवळ दोनशेहून अधिक पुस्तके त्याच्या नावावर जमा आहेत. अनेक विषयांवर संपन्नपणे लिखाण करणाऱ्या ॲसिमाव्हला आता सत्तर वर्षे पूर्ण होत आली आहेत. 'शास्त्रकथा' मध्ये मानवी भावनांना प्राधान्य आणि माणसांच्या मूल्यांचं उदात्तीकरण ही त्याची खासियत आहे.**

---

**रोबोटिक्सचे ३ नियम**

(१) रोबोने माणसाला कधीही दुखापत करू नये किंवा त्याच्या निष्क्रियतेमुळे माण-साला इजा पोचता कामा नये.

(२) पहिल्या नियमास बाधा येईल अशा सोडून माणसाच्या सर्व आज्ञांचं त्यानं पालन केलं पाहिजे.

(३) पहिल्या आणि दुसऱ्या नियमाला बाधा येऊ न देता त्यानं स्वतःचं रक्षण केलं पाहिजे.

## (१)

अँड्र्यू मार्टिननं त्याचे आभार मानले आणि तो बसला. ही त्याची शेवटची आशा होती.

त्याच्या चेहऱ्यावर एक विलक्षण कोरडे-पणा होता. फक्त डोळ्यांतून एक खिन्न भाव डोकावून जायचा. अंगावरचे कपडे जुन्या पद्धतीचे पण व्यवस्थित. चेहरा नीट-नेटका होता.

त्याच्या समोर तो सर्जन बसला होता. त्याच्या नावाच्या पाटीत केवळ काही अक्षरे व क्रमांक लिहिला होता. अँड्र्यूला त्याची फिकीर नव्हती.

'ऑपरेशन केव्हा होईल?' त्याने विचारले.

सर्जन अगदी नम्र स्वरात म्हणाला, 'साहेब, ऑपरेशन कोणावर करायचं आहे ते मला अजून कळलेलं नाही.' यंत्रमानव असेच नम्र बोलत.

अँड्र्यूने त्याचं निरीक्षण केले. तो सर्जन म्हणजे अगदी काळजीपूर्वक बनवलेला यंत्र-मानव होता. त्याच्या वागण्याचालण्यात कुठंही चूक नव्हती. आताशा असे यंत्रमानव बनत नव्हते. पण त्यानं अँड्र्यूला ओळखलं नव्हतं. कदाचित त्यानं अँड्र्यूबद्दल ऐकलं नसावं.

अँड्र्यू म्हणाला, 'डॉक्टर, तुम्हाला कधी 'माणूस' बनावंसं वाटलं नाही?'

तो सर्जन थोडा थबकला. 'पण मी तर एक यंत्रमानव आहे, साहेब!'

'माणूस बनण्यात अधिक आनंद नाही?'

'अधिक चांगला सर्जन होणं बरं. मी माणूस असतो तर ते शक्य नव्हतं. मला अधिक प्रगत यंत्रमानव होणं बरं वाटेल. साहेब.' सर्जन नम्रपणे म्हणाला.

'मी तुम्हाला हुकूम देणं तुम्हाला अप-मानाचं वाटत नाही? मी सांगितल्याप्रमाणे तुम्हाला उठलं पाहिजे, बसलं पाहिजे.' अँड्र्यू म्हणाला.

'तुमच्या आज्ञा ऐकण्यात मला आनंद आहे साहेब. जर तुमच्या आज्ञा रोबोटिक्सच्या नियमात बाधा आणतील तरच त्या मला ऐकता येणार नाहीत. बरं पण हे ऑपरेशन कोणावर करायचं आहे?'

'माझ्यावर.' अँड्र्यू म्हणाला.

'पण ते अशक्य आहे. या ऑपरेशनमध्ये दुखापत होण्याची शक्यता आहे.'

'त्याचा काही प्रश्न येत नाही.' अँड्र्यू शांतपणे म्हणाला.

'मी दुखापत करू शकत नाही.' सर्जन म्हणाला.

'माणसांना तुम्ही दुखापत करू शकत नाही.' अँड्र्यू म्हणाला. 'पण मला? तुम्ही काळजी करण्याचं कारण नाही कारण मी पण एक यंत्रमानवच आहे.'

## (२)

अँड्र्यूची जेव्हा निर्मिती झाली तेव्हा तो यंत्रमानवासारखाच दिसत होता. त्या काळात यंत्रमानव कमी होते आणि ते घरगुती गडी म्हणून वापरले जात.

तो ज्या घरात आणला गेला होता तेथे फक्त चारच माणसे होती. 'सर', 'मॅडम', 'मिस्' आणि 'छोटी मिस्'. त्याला सग-ळ्यांची नावे ठाऊक होती. पण तो ती कधी

वापरत नसे. त्याला क्रमांक होता पण खूप वर्षं झाली त्यामुळे त्याला आठवत नव्हता. अर्थात त्याला आठवायचं असेल तर शक्य होतं.

छोट्या मिसला त्याचा क्रमांक घेता येत नव्हता. त्याची मालिका होती एन. डी. आर. त्यावरून त्याला ती अँड्र्यू म्हणू लागली.

छोटी मिस नव्वद वर्षे जगली. आता तिला जाऊनही खूप वर्षे लोटली होती. शेवटपर्यंत तिला तो छोटी मिस् म्हणे.

मार्टिन कुटुंबात तो रमला होता. त्याला फारसं काम करावं लागत नसे. मिस् आणि आणि छोटी मिस् यांच्याशी खेळण्यातच त्याचा वेळ जाई. तिने खेळायचा हुकूम दिल्यावर त्याला तो पाळावाच लागे. मग काम राहीच.

'सर' त्याची पर्वा करीत नसत. त्यांचं मिस्वर आणि छोट्या मिस्वर खूप प्रेम होतं. त्यामुळे अँड्र्यूचं त्यांच्याबरोबर खेळण्याचं त्यांना काही वाटत नसे.

एकदा छोट्या मिस्साठी त्यानं लाकडाचं एक सुंदरसं पदक करून दिलं होतं. छोट्या मिस्नं जेव्हा ते सरना दाखवलं तेव्हा त्यातील कलाकुसरीने ते थक्क झाले. त्यांनी अँड्र्यूला विचारलं,

'ही डिझाइन तू कशावर घेतलीस ?'

'ही भूमितीतील डिझाइन आहे सर. त्या लाकडाच्या ठोकळ्यात ती अचूक बसली.'

दुसऱ्या दिवशी सरनी त्याला लाकडाचा मोठा तुकडा दिला आणि विजेवर चालणारा चाकू देऊन सांगितलं.

'यातून तू मनाला येईल ते तयार कर.'

अँड्र्यूने आणखी एक कलाकृती करून दिली. त्यानंतर अँड्र्यूचं इतर काम संपलं. सरनी त्याला सुतारकामाची पुस्तके आणून दिली आणि अँड्र्यू लाकडाच्या सुंदर वस्तू बनवू लागला.

सर म्हणाले, 'या वस्तू फारच सुंदर आहेत.'

'मला त्यात आनंद वाटतो.' अँड्र्यू म्हणाला.

'आनंद ?' यंत्रमानवाच्या तोंडी आनंद शब्द ऐकून सरना मौज वाटली.

'माझ्या इलेक्ट्रॉनिक मेंदूतील तारा त्यामुळे सहज प्रभावित होतात. तुम्हाला मी 'आनंद' शब्द वापरताना ऐकलंय आणि तुम्ही ज्या अर्थी तो वापरता त्याअर्थीच मला तसं वाटतंय. मला त्या गोष्टी करताना आनंद होतो सर.'

(३)

जेराल्ड मार्टिननी त्याला अमेरिकन यंत्रमानव संस्थेत नेले. ते सिनेटचे सभासद असल्याने त्यांचा त्याठिकाणी सुलभ प्रवेश झाला. खरं म्हणजे सिनेटचे सभासद असल्यामुळेच त्यांना यंत्रमानव वापरता येत होता. एरव्ही त्यावेळी फक्त कारखानेच यंत्रमानव वापरू शकत.

तेथील प्रमुख रोबोमानसशास्त्रज्ञाने अँड्र्यूच्या कौशल्याबद्दल ऐकले तेव्हा तो थक्क झाला. मार्टिनची त्याबद्दल तक्रार असावी असं वाटून तो रोबो बदलून द्यायला तयार झाला. पण सर त्याला तयार नव्हते.



त्यांनी अँड्रयूच्या कौशल्याची एक झलक त्याला दाखविली, तेव्हा अँड्रयूला अभ्यासासाठी ठेवून जाण्याची त्याने विनंती केली.

पण सरनी त्याला नकार दिला. अँड्रयूला घेऊन ते सरळ घरी आले.

## (४)

मिस आता तरुण झाली होती. त्यामुळे ती बाहेरच असायची. आता अँड्रयूला फक्त छोटया मिसचीच सोबत मिळायची. त्याने तिच्यासाठी करून दिलेले पहिले लाकडी पदक ती नेहमी गळयात घालायची.

अँड्रयुने तयार केलेल्या वस्तू सर लोकाना द्यायचे. छोटी मिस म्हणाली, 'आपण त्या वस्तू विकू. त्यांना चागली किंमत येईल'

'एवढा लोभ बरा नव्हे' सर म्हणाले.

'आपल्यासाठी नाही. कलाकारासाठी मी म्हणते आहे.'

अँड्रयूने तो शब्द प्रथमच ऐकला होता. त्याने तो लगेच शब्दकोशात पाहिला.

पुन्हा सर त्याला घेऊन त्याच्या वकिलाकडे गेले. अँड्रयूने तयार केलेली एक सुदर वस्तू त्यानी वकिलापुढे ठेवली आणि त्याबद्दल त्यांचं मतही विचारलं. वकिलानं ती वस्तू कौतुकान न्याहाळली आणि तो म्हणाला.

'सुदर आहे. पण मी त्याबद्दल ऐकलय. ही तुमच्याबरोबर आलेल्या तुमच्या यंत्रमानवानं तयार केलीय.'

'याची किंमत किती असेल ?' सर म्हणाले.

'मला कल्पना नाही. मला या गोष्टीची आवड नाही.' तो वकील म्हणाला.

'अडीचशे डॉलर्स,' सर म्हणाले. 'अँड्रयूने आतापर्यंत दोन लाख डॉलर्स असलेल्या कामात कमावले आहेत. मी ते बँकेत ठेवले आहेत.'

'बाप रे !' वकील म्हणाला. 'म्हणजे हा यंत्रमानव तुम्हाला चांगली कमाई करून देतो आहे.'

सर हसले, 'त्यातील अर्धी रक्कम मी अँड्रयू मार्टिनच्या खात्यावर जमा केलीय.'

'यंत्रमानवाच्या ?'

'होय. आणि ते कायदेशीर आहे का ?' सरनी विचारले.

वकील थोडा विचारात पडला. 'काय सांगता येत नाही. त्याला सही येते का ?'

'येते. मी त्याला बँकेत नेले नव्हते. पण फॉर्मवर त्याची सही घेतली होती. याशिवाय आणखी काय करायला पाहिजे ?' सर म्हणाले.

थोडा विचार करून वकील म्हणाला, 'आपण एक ट्रस्ट करू. त्यामुळे व्यवहारी जगाचा अँड्रयूशी प्रत्यक्ष सबंध येणार नाही. त्याचे सगळे व्यवहार ट्रस्ट करेल. यापलीकडे काही करायला नको कोणाची हरकत असली तर तो कोर्टात जाईल. मग बघू काय करायचे ते.'

'जर कोर्टात केस उभी राहिली तर तुम्ही अँड्रयूच वकीलपत्र घ्याल ?'

'अवश्य'

'किती फी घेणार ?'

वकिलाने अँड्रयूने तयार केलेल्या वस्तूकडे बोट दाखवले व म्हटले, 'तेवढी.'

सर प्रसन्नपणे हसले.

वकील अँड्रयूकडे वळला. 'अँड्रयू या पैशाचं तू काय करणार आहेस ?'

'मला हव्या असणाऱ्या वस्तू घेईन. पैसा वाचेल सराचा नाहीतर त्याना पैसे द्यावे लागले असते.'

## (५)

आणि प्रसग आले. दुरुस्तीचा खर्च होता. काही वेळा नवे पार्टस् घालायला लागले. अखेर अँड्रयू यंत्रमानव होता ना ! यंत्रमानवातील सगळया अद्ययावत सुधारणा सरनी अँड्रयूत घडवून आणल्या. फक्त त्याची पॉझिट्रानिक मज्जासस्था त्यानी हलवू दिली नाही. सर म्हणायचे त्याच्यासारखी मज्जासंस्था आता तयार होत नव्हती. त्याच्या घडवण्यातच काहीतरी असे घडले होते की तो माणसाच्या अगदी निकट येऊन पोचला होता. त्या रोबोमानसशास्त्रज्ञाने त्यानतर यंत्रमानवाच्या मेंदूची रचनाच बदलून टाकली होती. अँड्रयूच्या मालिकेतील सगळे यंत्रमानव त्याने बदलले होते पण सराच्यामुळे तो अँड्रयूला हात लावू शकला नव्हता.

सर आता वयस्क दिसू लागले होते. मॅडम कोठे तरी युरोपात होत्या. मिस न्यूयॉर्कला होत्या. त्याची अधूनमधून पत्रं यायची. छोटया मिसच लग्न झाल होत; पण ती जवळच राहायची. तिच्या पहिल्या मुलाचा म्हणजे 'छोटे सर'चा जन्म झाला तेव्हा तिने अँड्रयूला बोलावलं होतं आणि छोटया सरना त्याने बाटलीतून दूधही पाजलं होतं.

छोटया सरचा जन्म झाल्यावर तो सराकडे गेला आणि त्याने एक विनती केली.

'आपण मला माझे पैसे वापरू दिलेत याबद्दल मी आभारी आहे.' तो म्हणाला.

'ते तुझेच पैसे आहेत.' सर म्हणाले.

'तरीपण तुम्ही इच्छेने मला ते वापरू दिलेत. माझ्याकडे आता सहा लाख डॉलर्स शिल्लक आहेत. ते मी तुम्हाला देणार आहे.' अँड्रयू म्हणाला

'मी ते घेणार नाही.' सर म्हणाले.

'त्याच्या बदल्यात मला काही तरी हवं आहे.' अँड्रयू म्हणाला.

'काय ?'

'माझ स्वातत्र्य, सर !'

'तुझं.. ?' सर अवाक् झाले

'मला माझ स्वातत्र्य विकत घ्यायचंय, सर.'

## ( ६ )

पण ते तितक सोपं नव्हतं. त्याची मागणी ऐकून सर नाराज झाले होते. पण छोटया मिसने त्याना अँड्रयूपुढे आणले. ती म्हणाली.

'बाबा, तुम्ही हा वैयक्तिक अपमान का समजता ? अँड्रयू इथच राहील. तो एकनिष्ठही राहील. फक्त त्याला ते लेखी पाहिजे. त्याला स्वतत्र म्हणवून घ्यायचं आहे. त्याला तो अधिकार नाही का ? आम्ही किती वर्षे त्यावर चर्चा केलीय.'

'अस्स ?'

'होय. तुम्हाला वाईट वाटू नये म्हणून तो आत्तापर्यंत विनती करायला कचरत होता.'

'स्वातंत्र्य म्हणजे काय हे त्याला कळतंय का ? तो केवळ एक यत्रमानव आहे ना ?'

'बाबा, तुम्ही त्याला ओळखत नाही. त्याने सगळ ग्रथालय पालथ घातलय. तुम्ही त्याच्याबरोबर बोलताना बघा. तो सगळया भावनाना आपल्यासारखाच प्रतिसाद देतो. तुमच्याप्रमाणे त्याच्या प्रतिक्रिया असतील तर तुम्ही आणखी काय अपेक्षा करता ?' छोटी मिस् म्हणाली

'कायदा त्या पद्धतीने पाहणार नाही.' सर रागाने म्हणाले 'फक्त कायदाच त्याला स्वातत्र्य देऊ शकतो.' अँड्रयूकडे वळून ते

म्हणाले, 'आणि कोर्टात गेल्यावर तुला स्वातंत्र्य तर मिळणार नाहीच, पण तुझा पैसाही जप्त होईल यंत्रमानवाला पैसे मिळवण्याचा अधिकार नाही. अस ते म्हणतील. या सगळया लटपटी, तुझे पैसे गमावण्याइतक्या योग्यतेच्या आहेत ?'

'स्वातंत्र्याला किंमत नसते सर !' अँड्रयू म्हणाला. 'स्वातंत्र्याची केवळ संधीही या सगळया पैशाबरोबर आहे.'

( ७ )

" कोर्टालाही ते पटायला तयार नव्हत सरकारी वकिलाच्या मते स्वातंत्र्य या शब्दाला यंत्रमानवाबाबतीत अर्थ नव्हता. तो वापरताच येत नव्हता.

अँड्रयूच्या बाजूने छोटी मिस् बोलली. ती म्हणाली, 'मला काही वकिलासारख बोलता यायचं नाही. पण मी काय म्हणतेय त्यातील अर्थ लक्षात घ्यावा.'

'आमच्या मार्टिन कुटुंबाने अँड्रयूला कधीही नोकर म्हणून वागवलेल नाही, आज्ञा दिलेल्या नाहीत. *पण आम्ही त्या देऊ* शकतो. कारण तो आमच्या मालकीच *यंत्र आहे पण का ? अँड्रयून* दीर्घकाळ आमची निष्ठेने सेवा केली आहे, पैसा मिळवून दिला आहे. तो आमच काही देण लागत नाही. आम्हीच त्याचं देण लागतो.

'त्याला मुक्त करण हे केवळ शाब्दिक आहे. तो आमची सेवा करीत राहाणारच. पण त्याच्या दृष्टीने ते स्वातंत्र्य फार मोलाचं आहे, आणि त्यामुळे आम्हाला कसलाही त्रास होणार नाही.'

न्यायाधीशानी स्मितहास्य केले ते म्हणाले,

'मला तुमचा मुद्दा पटतोय. पण अशा प्रकारची केस कधी आली नाही त्यामुळे नव्या कायद्याची गरज आहे. कदाचित माझा निर्णय वर बदलेल पण. मला अधिक बारकाईने याचा अभ्यास केला पाहिजे. मला त्या यंत्रमानवाशी बोलायचं आहे. अँड्रयू...'

'येस, युवर ऑनर !' अँड्रयू म्हणाला.

त्याच्या आवाजातील मानवीपणा पाहून न्यायाधीश स्तंभित झाले. 'तुला का स्वतंत्र व्हायच आहे ?'

'गुलाम राहाणं तुम्हाला पसत आहे, न्यायाधीश महाराज ?'

'तुम्ही व्हाल गुलाम ?' अँड्रयू म्हणाला.

'पण तू गुलाम नाहीस. तू चागला यंत्रमानव आहेस माझ्या माहितीप्रमाणे केवळ अद्वितीय असा कलात्मक दृष्टी लाभलेला असा यंत्रमानव आहेस स्वतंत्र होऊन तुला आणखी काय करायचय ?' न्यायाधीश म्हणाले.

'कदाचित मी आता करतोय त्यापेक्षा जास्त काही नाही, न्यायाधीश महाराज पण अधिक आनदाने. फक्त माणसाला स्वतंत्र राहता येत अस कोणी तरी म्हणाल.' 'मला वाटत ज्याला स्वातंत्र्याची इच्छा आहे त्याला स्वतंत्र होता येत. आणि मला स्वातंत्र्य हवं आहे.'

*न्यायाधीशाची खात्री पटली. आपल्या निकालपत्रात त्यानी म्हटल, 'ज्या* वस्तूला मन आहे, स्वातंत्र्याची कल्पना समजते आणि इच्छा आहे, त्याला स्वातंत्र्य नाकारण्यात अर्थ नाही.'

जागतिक न्यायालयाने तोच निकाल कायम केला.

( ८ )

सराचा राग काही गेला नाही. ते म्हणाले, 'त्याच्या कठोर आवाजान अँड्रयूला शॉर्ट सर्किट झाल्यासारख वाटल. 'मला तुझे पैसे नको आहेत. पण ते घेतले नाहीत तर तुला आपण स्वतंत्र आहोत अस वाटणार नाही इथून पुढे तू स्वत: मुखत्यार आहेस. मनाला येईल तस वाग. पण लक्षात ठेव. माझ्यावर तुझी जबाबदारी राहणारच कोर्टाच्या निकालाचा तो भाग आहे.'

*छोटी मिस मध्ये बोलली, '*काहीतरी बोलू नका बाबा, जबाबदारी फार नाही *तीन नियम आहेतच (रोबोटिक्स)'*

'मग तो स्वतंत्र कसा ?'

'माणसाना त्याचे नियम नाहीत का ?' अँड्रयू म्हणाला

'मला वाद घालायचा नाही.' असं म्हणून सर निघून गेले. ते रागातच होते. त्यानतर त्याची क्वचितच भेट होई

त्यानं स्वत साठी एक घर घेतल. त्यात बाथरूम, स्वयपाकघर वगैरे नव्हत. तो यंत्रमानव असल्याने त्याला त्याची गरज नव्हती. बस्स, एक लायब्ररी रूम आणि एक काम करण्याची खोली. छोटी मिस त्याला अधून-मधून भेटायला यायची. अँड्रयू आता स्वतंत्र काम करू लागला.

एक दिवस छोटे सर म्हणजे जॉर्ज त्याच्याकडे आला. त्याने स्वत: बजावल होतं. अँड्रयू आता स्वतंत्र होता, सर म्हणायची आवश्यकता नव्हती आणि ते आज्ञेच्या भाषेत सांगितल्यामुळे जॉर्ज म्हणण भाग होत.

त्या दिवशी तो एक वाईट बातमी घेऊन आला होता. सर शेवटच्या घटका मोजत होते छोटी मिस तेथेच होती; पण त्याना अँड्रयूला भेटण्याची इच्छा होती.

सराचा आवाज खणखणीत होता, पण त्याना हालता येत नव्हते. अँड्रयूला पाहून त्यानी हात वर करण्याचा प्रयत्न केला. जॉर्जने त्याना मदत करण्याचा प्रयत्न केला; पण त्यानी मान हलवली ते म्हणाले.

'अँड्रयू, मी आता देवाघरी चाललोय. मी काही पगू नाही...अँड्रयू, तू मुक्त आहेस याचा मला आनद आहे बाळ. मला तुला तेवढेच सांगायचे होते.'

काय बोलायचे ते अँड्रयूला समजेना. त्यान कोणाला मरताना पाहिले नव्हते; पण त्याला माहिती होत. माणसाच कार्य त्या पद्धतीन थाबतं. तो शातपणे उभा राहिला. *त्याला योग्य शब्द मिळेनात.*

सगळ आटोपल्यावर छोटी मिस् म्हणाली. त्याच अखेरच तुझ्याशी वागण तुला खटकल असेल अँड्रयू. पण लक्षात घे ते वयस्कर झाले होते आणि तू त्याना सोडून स्वतंत्र होतो आहेस याच त्याना वाईट वाटल होत.'

आणि मग अँड्रयूला शब्द सापडले, 'त्याच्याशिवाय मला स्वतंत्र होताच आलं नसत, छोटी मिस !'

( ९ )

सराच्या मृत्यूनंतर अँड्रयू कपडे घालू लागला. जॉर्जने त्याला एक पॅट आणून दिली.

जॉर्ज आता वकील झाला होता. अँड्रयूच्या बाबतीत ज्यानी सराना मदतीचे आश्वासन दिले होते त्या फेनगोल्ड याच्या फर्ममध्येच तो होता फेनगोल्ड आता नव्हते जॉर्ज मार्टिनकडेच त्याची सूत्रे आता होती. अँड्रयूने जेव्हा प्रथम पॅट घातली तेव्हा जॉर्जने गभीर राहण्याचा प्रयत्न केला. जॉर्जने त्याला कपड्यांचा वापरही शिकवला पण तो अँड्रयूला म्हणाला,

'तुला कपडे कशाला लागतात. अँड्र्यू ? एवढं सुंदर काम करणारा तुझा देह झाकायचा कशाला ? तापमान आणि सकोच याचाही प्रश्न येत नाही आणि धातूवर कपडेही नीट बसत नाहीत.'

'माणसाचा देहही सुदर काम करतोच की. तरी तुम्ही तो झाकताच की' अँड्र्यू म्हणाला.

'स्वच्छतेसाठी, ऊब मिळावी म्हणून, सरक्षण म्हणून, शोभा म्हणून. तुला याचा प्रश्नही येत नाही.'

'अँड्र्यू म्हणाला, 'मला कपड्याशिवाय उघड वाटत, वेगळ वाटतं.'

'वेगळं ! अँड्र्यू आता लाखाने यत्रमानव आहेत. जवळजवळ माणसाएवढेच.'

'मला माहिती आहे ते, आणि सगळ्या प्रकारचे काम करणारे यत्रमानव आहेत.'

'आणि त्यापैकी कोणीही कपडे घालत नाही.'

'पण त्यापैकी कोणीही स्वतंत्र नाही, जॉर्ज !'

हळूहळू अँड्र्यूनं सगळा पोशाख घालायला सुरुवात केली. लोकाच्या नजरेला तो सरावला.

अँड्र्यू मुक्त होता; पण अखेर यत्रमानवच होता लोकांशी वागताना तो जपूनच वागे. बरेचसे लोक त्याला अजून मुक्त मानत नसत.

छोटी मिस् आता म्हातारी झाली होती. आणि बहुतः उबदार देशात राही; पण आली की अँड्र्यूला भेटेच. एकदा ती आल्यावर जॉर्ज अँड्र्यूला म्हणाला.

'तिन मला आपले म्हणण ऐकायला लावलेय्, अँड्र्यू. पुढच्या वर्षी मी सिनेटच्या निवडणुकीला उभा राहातोय. आजोबासारखा !'

'चांगले आहे, जॉर्ज.' अँड्र्यू म्हणाला, 'जर सर आज–' तो थबकला 'चालू असते. ते अयोग्य वाटले.'

'जिवत !' जॉर्जने दुरुस्ती केली. 'अधूनमधून मलाही तस वाटत खर.'

काही वेळा जॉर्जचं बोलण त्याला समजायचं नाही, कारण तो बोली भाषा वापरायचा. त्याच्याकडे असणारी पुस्तकेही त्याला त्याबाबतीत उपयोगी पडायची नाहीत.

तेव्हा त्याच्या मनात लायब्ररीचा विचार आला. आता तो स्वतत्र रोबो होता. तो गावात जाऊन लायब्ररीची पुस्तके आणू शकत होता.

त्याने पूर्ण पोशाख केला. थोडी पावले गेल्यावर तो थबकला पुन्हा परत आला. एका कागदाच्या तुकड्यावर त्यान लिहिले

'मी लायब्ररीकडे गेलो आहे.'

तो कागद नीट दिसेल असा त्याने टेबलावर ठेवला आणि तो लायब्ररीकडे निघाला.

## (१०)

अँड्र्यू लायब्ररीपर्यंत पोचलाच नाही. त्यान सगळा नकाशा चाळला होता पण प्रत्यक्ष लायब्ररी कधी पाहिली नव्हती. त्यामुळे त्याचा थोडासा गोधळ उडाला. कोणाला विचारावे म्हटले तर आसपास कोणी नव्हते. तेवढ्यात दोन माणसे त्याच्या दिशेने येताना त्याने पाहिली. ती दोघेही तरुण होती. अर्थात वयाचा अंदाज अँड्र्यूला करता येत नव्हता.

अँड्र्यू त्या दोघाना उद्देशून म्हणाला. 'कृपया मला नगर – वाचनालयाचा मार्ग सागाल का ?

त्यातील जो उंच होता तो आपल्या शेजाऱ्याला म्हणाला, 'यत्रमानव आहे.'

दुसरा मोठ्या नाकाचा, जड झालेल्या पापण्याचा असा पहिल्याला म्हणाला, 'त्याने कपडे घातले आहेत

उंच माणसाने बोट नाचवली, 'तो स्वतत्र यत्रमानव आहे मार्टिनकडे एक यत्रमानव आहे, ज्याच्यावर कोणाचीही मालकी नाही. नाहीतर 'तो' कपडे का घालील ?

'त्याला विचार.' मोठ्या नाकाचा म्हणाला.

'मी अँड्र्यू मार्टिन आहे,' अँड्र्यू म्हणाला

'ठीक आहे.' तो उच माणूस म्हणाला, 'अगावरचे कपडे काढ. यत्रमानव कपडे घालत नाहीत.'

अँड्र्यू थबकला. 'मी तुला आज्ञा देतोय' तो उच माणूस म्हणाला.

हळूहळू अँड्र्यूने कपडे उतरवले.

'ते कोणाचही नाही.' मोठ्या नाकाचा म्हणाला.

'आपलही होऊ शकतं.'

'काही असो' उच म्हणाला. 'आपल्याला कोण हरकत घेणार आहे ?' अँड्र्यूकडे वळून त्याने आज्ञा केली.

'डोक्यावर उभा राहा.'

'डोक काही त्यासाठी नसते– अँड्र्यू म्हणू लागला.

'ती आज्ञा आहे.' तो उंच म्हणाला.

बिचाऱ्या अँड्र्यूपुढे पर्याय नव्हता. त्याने खाली वाकून डोक्यावर उभं राहण्याचा प्रयत्न केला आणि तो पडला. 'पडून राहा' आज्ञा आली. 'आपण आता त्याला सुटा करू. आपल्याला कोण अडवणार ?'

अँड्र्यू त्यांना थांबवू शकत नव्हता. रोबोटिक्सचे पहिले दोन नियम आडवे येत होते. स्वतःचं रक्षण करण्याचा तिसरा नियम होता पण पहिल्या दोन नियमात त्यातही आडकाठी घातली होती.

पहिल्याने त्याला पायाने ढकलले. 'त्याला सुटा करण्यासाठी आपल्याला हत्यारे लागणार.'

'त्यालाच आपण आज्ञा करू की.' दुसरा म्हणाला.

तेवढ्यात कोणी तरी आले. तो जॉर्ज होता. 'पडून राहा' या आज्ञेमुळे अँड्र्यूला हलता येत नव्हते. जॉर्ज पळतच आला. ते दोन तरुण मागे सरकले.

'अँड्र्यू, काय झालं ?' जॉर्जने विचारले.

'मी ठीक आहे, जॉर्ज' अँड्र्यू म्हणाला.

'मग उभा राहा. तुझे कपडे काय झाले?'

'आम्ही ते त्याला काढायला लावले.' तो उच म्हणाला 'तू का विचारतोस ते ? तुझा काय सबध ?'

जॉर्ज अँड्र्यूला म्हणाला, 'त्याचं काय चालल होतं ?'

'ते माझे भाग सुटे करणार होते.' अँड्र्यू म्हणाला.

जॉर्जने त्या दोघाकडे पाहिले. त्यांच्या चेहऱ्यावर खेद नव्हता. ते उपहासाने पाहत होते. 'आता आमच्यावर हल्ला करणार आहेस ?' त्यांनी आव्हान दिलं.

'नाही' जॉर्ज म्हणाला. 'मी अँड्र्यूला सांगणार आहे. तो सत्तर वर्षांहून जास्त वर्षे आमच्याबरोबर आहे तुम्ही दोघे मला आव्हान देत आहात असं त्याला सांगायचा अवकाश आहे. अँड्र्यू यांचा समाचार घे. माझा जीव धोक्यात आहे.'

अँड्र्यू पुढे सरकला. भीतीने त्या दोघांची

गाळण उडाली. यंत्रमानवाची ताकद त्याना माहिती होती.

त्यांनी पळ काढला.

'तू इकडे आलास अँड्र्यू ?' जॉर्ज म्हणाला, 'माणसे ही अशी असतात. लायब्ररीत जायच तुझ्या डोक्यात कुठून आल ? मी तुला पुस्तके आणून दिली नसती ?'

'मला माणसाविषयी जाणून घ्यायचय, जॉर्ज आणि यंत्रमानवाचा इतिहास लिहायचा आहे'

'घरी चल. तेथे रोबोटिक्सवर खूप पुस्तके मिळतील.'

'रोबोटिक्स नव्हे,' अँड्र्यू म्हणाला 'मला रोबोचा इतिहास लिहायचा आहे यंत्रमानवाने लिहिलेला यंत्रमानवांचा इतिहास. पृथ्वीवर प्रथम यंत्रमानव आला तेव्हापासूनचा.'

## (११)

छोट्या मिसला ब्याऐंशी वर्षे होऊन गेली होती. आता तिला अधूनमधून काठीचा आधार घ्यावा लागे. तिने जेव्हा अँड्र्यूवरील हल्ल्यासबंधी ऐकल तेव्हा ती अस्वस्थ झाली. ती जॉर्जला म्हणाली,

'जॉर्ज तू वकील आहेस. तू कोर्टात केस उभी कर आणि यंत्रमानवाच्या हक्काबद्दल कायदा करायला लाव. लागल तर जागतिक कोर्टापर्यंत केस उभी राहू दे.' थोडस थांबून ती म्हणाली, 'लक्षात ठेव, आज आपण जे काही आहोत ते अँड्र्यूमुळे आहोत. त्याला कोणी वाटेल तसे वागवले तर मला ते सहन होणार नाही.'

आणि त्यानंतर एक कायदेयुद्ध सुरू झाल. फेनगोल्ड आणि मार्टिन केवळ अँड्र्यूसाठी यंत्रमानवाच्या हक्काबद्दल झगडू लागले. जॉर्ज आता केवळ धोरणं आखत होता. बरचसं काम इतर कायदेपडित, विशेषत: जॉर्जचा मुलगा पॉल याच्याकडे असे. तो दररोजचा अहवाल आजीकडे म्हणजे छोट्या मिसकडे देई.

अँड्र्यूही त्यात गुतला. यंत्रमानवांचा इतिहास थोडा बाजूला पडला. तो स्वत:ही काही मौल्यवान सूचना देई.

तो म्हणाला, 'जॉर्जनं मला सागितल की माणसाच्या मनात यंत्रमानवाबद्दल भीती आहे. ती आहे तोवर कोर्ट आणि जनसभा काही करू इच्छिणार नाहीत. लोकमत जागृत करण्यासाठी काही करता येणार नाही का ?'

जॉर्जने ती जबाबदारी स्वीकारली पॉलचा कोर्टात लढा चालू होता आणि जॉर्ज सभासभातून यंत्रमानवाच्या हक्काबद्दल सागू लागला.

पत्रकाराच्या एका सभेत तो म्हणाला.

'दुसऱ्या नियमाने आपण यंत्रमानवाना कोणत्याही आज्ञा देऊ शकतो म्हणजे माणसाची यंत्रमानवावर अनियंत्रित सत्ता राहते. तिसऱ्या नियमाला पहिल्या दोन नियमाची अट असल्याने कोणताही माणूस आत्मसरक्षणाच्या नावाखाली यंत्रमानवाला स्वत:चे भाग सुटे करण्याची आज्ञा देऊ शकतो. काही वेळा हे अगदी हेतुपुरस्सर, काही कारण नसताना घडू शकेल'

'हे योग्य आहे ? एखाद्या प्राण्याला आपण अस वागवू ? आपली सेवा चोख बजावणाऱ्या एखाद्या निर्जीव गाष्टीचाही आपण विचार करतो यंत्रमानवाला जाणिवा आहेत. तो प्राणी नाही तो विचार करून आपल्याशी बोलू शकतो विनोद करू शकतो. आपण जर त्याना मित्र म्हणून वागवू शकतो, त्याच्यासह काम करू शकतो तर त्याना मैत्रीची फळे देण्यात, बरोबरीचे फायदे देण्यात काय हरकत आहे ?'

'इतर माणसाला इजा न होऊ देणारी आज्ञा देण्याचा माणसाला अधिकार असेल तर यंत्रमानवाला इजा होणार नाही अशी आज्ञा देण्याची सभ्यताही त्याच्यात असावी. यंत्रमानवासाठी तीन नियम आहेत तर यंत्रमानवाचे मानवापासून रक्षण व्हावे म्हणून एखादा नियम का असू नये ?'

आणि तो प्रत्येक सभेत हेच सागायचा.

### अखेर त्यांना न्याय मिळाला

जनमताच्या प्रचड दडपणामुळे सिनेटमध्ये बिल आले. कायदा झाला. यंत्रमानवाला इजा करणाऱ्या आज्ञाना बदी आली. त्यासाठी कठोर शिक्षा ठेवण्यात आली. ज्या दिवशी छोट्या मिसला मृत्यू आला, त्या दिवशी जागतिक लोकसभेत यंत्रमानवाच्या सुरक्षेचा कायदा मजूर झाला.

पण तो योगायोग नव्हता. छोट्या मिसचे प्राण तेवढ्यासाठी घुटमळले होते. शेवटचा विजय येईपर्यंत ती थांबली होती. तिचं शेवटच स्मितहास्य अँड्र्यूसाठी होतं. अँड्र्यूसाठी ती शेवटचे शब्द बोलली.

तू आमच्याशी फार चागला वागलास, अँड्र्यू !'

अँड्र्यूचा हात हातात घेऊनच तिने प्राण सोडला तिचा मुलगा, सून वगैरे बाजूला थांबले होते.

## (१२)

स्वागत कक्षातील रोबो आत गेल्यावर अँड्र्यू बाहेर थांबला. अँड्र्यूशी बोलताना त्याला कॉम्प्युटरची बडबड थांबायला हवी होती पण यंत्रमानवाचे स्वागत करण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसग असावा

अशा प्रसगी कोणते शब्द वापरावे हे आता अँड्र्यूला चागलेच कळले होते· तो जे पुस्तक लिहीत होता त्यासाठी त्याला खूप ठिकाणी जावे लागत होते.

अधूनमधून कोणी तरी यायचे, अँड्र्यूकडे कुतूहलाने बघायचे. अँड्र्यू पण शातपणे बघायचा त्याला आता सवय झाली होती.

तेवढ्यात पॉल बाहेर आला आणि त्याने अँड्र्यूला आत नेले 'पुस्तक किती झालय ?' त्याने विचारल.

'सपत आलंय.' अँड्र्यू म्हणाला. 'प्रकाशक खूष आहे'

'छान !' पॉल म्हणाला.

'आता मला या पुस्तकाचे खूप पैसे मिळतील. त्यानतर माझी एक योजना आहे.' अँड्र्यू म्हणाला

'आणि ती काय आहे ?' पॉलने विचारले.

'अमेरिकन यंत्रमानव कपनीच्या प्रमुखाची मी भेट मागितलीय. पण अजून ती मिळालेली नाही. तू जरा प्रयत्न करावास.'

अखेर पॉलच्या प्रयत्नाने त्याला रॉबर्टसनची भेट मिळाली. रॉबर्टसन अमेरिकन यंत्रमानव कपनीच्या संस्थापकाचा वारस होता अध्यक्ष म्हणूनची सर्व कारकीर्द त्याने यंत्रमानवाचे हक्क या विषयावर खर्च केली होती अँड्र्यू त्याला भेटला तेव्हा तो निवृत्तीच्या मरात होता

अँड्र्यू म्हणाला, 'मी एक शतकापूर्वी इथं आलो होतो तेव्हा इथल्या मॅन्स्कीनी मला सागितल की, यंत्रमानवाच्या पॉझिट्रॉनिक रचनेचे गणित इतकं गुतागुतीच असतं की

काही अंदाज लागत नाही. अगदी माझ्या क्षमताही सांगता येत नाहीत.'

'ते एक शतकापूर्वी!' रॉबर्टसन म्हणाला. थोडसं थांबून तो म्हणाला. पण साहेब (त्याच्या चेहऱ्यावर नाराजी होती.) आता तस नाही. आता आम्ही यंत्रमानव अगदी अचूक बनवतो आणि ते आपल काम चोख बजावतात.'

अँड्र्यू म्हणाला, 'म्हणजे आता माझ्यासारखे वाटेल त्या परिस्थितीला सरावणारे यंत्रमानव बनत नाहीत.'

'नाहीत.'

'माझ्या संशोधनामुळे मला समजले आहे की मी सध्या चालू असणारा सर्वांत जुना यंत्रमानव आहे.' अँड्र्यू म्हणाला.

रॉबर्टसन म्हणाला, 'सध्या आणि या नतरही. आता पचवीस वर्षांनंतर यंत्रमानवाची उपयुक्तता सपते आणि आम्ही ते बदलून देतो.

अँड्र्यू म्हणाला, 'सर्वांत जुना यंत्रमानव म्हणून मी एक विनंती करायला आलोय. मला माझं शरीर बदलून घ्यायचय. मी स्वतंत्र असल्याने मला स्वतःला हे करून घ्याव लागतय.'

रॉबर्टसन बुचकळ्यात पडला, 'ते कसं शक्य आहे? तुमचं शरीर बदलताना तुमच अस्तित्वच सपणार की. मग मी नवा यंत्रमानव कसा आणि कोणाला देणार?'

याठिकाणी पॉल मध्ये बोलला तोही अँड्र्यूबरोबर आला होता. तो म्हणाला,

'ते सोप आहे. अँड्र्यूच व्यक्तित्व त्याच्या पॉझिट्रॉनिक मेंदूमध्ये आहे. त्याला धक्का लावायचा नाही. फक्त इतर भाग बदलायचे.'

'होय' अँड्र्यू म्हणाला, 'तुम्ही मानवसदृश त्वचा असलेले यंत्रमानव केले आहेत ना?'

'होय' रॉबर्टसन अभिमानाने म्हणाला. 'असे यंत्रमानव ज्याच्या मेंदूतच फक्त धातू, पण इतर सर्व शरीर कृत्रिम त्वचासदृश भागाचे. पण ते फार महाग झाल्याने बाजारात येऊ शकले नाहीत.'

'मला माझे भाग मानवसदृश त्वचेचे हवे आहेत.' अँड्र्यू म्हणाला. ते ऐकून पॉल आणि रॉबर्टसन दोघानाही धक्का बसला.

'ते अशक्य आहे' रॉबर्टसन म्हणाला. 'आम्ही आता मानवसदृश यंत्रमानव तयार करत नाही लोकमत त्याच्या विरुद्ध आहे'

पॉल म्हणाला, 'अँड्र्यूची इच्छा तुम्ही मानली पाहिजे. तो एक स्वतंत्र यंत्रमानव आहे कायद्याने त्याला पूर्ण संरक्षण दिलेले असतानासुद्धा काही अविचारी माणसे अधूनमधून त्याला त्रास देत असतात'

'बरं मग?' रॉबर्टसन म्हणाला.

'अँड्र्यू हा माझा अशील आहे. त्याने आपले भाग बदलून मागितले आहेत. तो त्यांची किंमत द्यायला तयार आहे. तुम्ही जर त्याच ऐकणार नसाल तर मग आम्हाला कायदेशीर मार्गाने जावं लागेल.' पॉल म्हणाला.

रॉबर्टसनच्या कपाळावर आठ्या पडल्या पण पॉलला माहिती होत की तो पेचात सापडला आहे. कारण जनमताचा त्यानं कितीही पुरस्कार केला तरी अमेरिकन यंत्रमानव कंपनीबद्दल लोकमत चागल नव्हत. आणि कायद्याच्या पेचात ते अडकले तर सुटण्याची शक्यता नव्हतीच

'आणखी एक सांगून ठेवतो.' पॉल म्हणाला. 'हे भाग बदलताना माझ्या अशिलाच्या पॉझिट्रॉनिक मेंदूला किंचितही इजा झाली, कितीही कमी असो, तर तुमच्या कंपनीला फार महागात पडेल. मी स्वतः जास्तीत जास्त प्रयत्न करून कंपनीविरुद्ध लोकमत जागृत करेन'

रॉबर्टसनपुढे पर्याय शिल्लक नव्हता.

## (१४)

ते सगळं पुन्हा रचना करण्यासारख होत. अँड्र्यू पूर्वीचा राहिला नाही. ते सगळं व्हायला महिने लागले आणि अगदी साध्या गोष्टीही अँड्र्यूला दमवायच्या. पॉल वैतागला 'त्यानी तुझ्या मेंदूला इजा केलीय अँड्र्यू. आपण दावा दाखल करू या' तो म्हणाला

'नको' अँड्र्यू म्हणाला. 'त्यातून काही सिद्ध करता येणार नाही.' तो बोलतानाही अडखळत होता. पण आपल्या मेंदूला कसलीही दुखापत झालेली नाही हे त्याला चागलच माहिती होतं

आरशासमोर उभं राहून तो तास न तास आपल निरीक्षण करी अजून त्याचा चेहरा पूर्ण मानवी वाटत नव्हता. चेहऱ्यात अजून ताठरपणा होता. हालचाली अजून माणसाइतक्या मोकळेपणान होऊ शकत नव्हत्या. पण कंपनीनं त्याला बराच मानवसदृश बनवला होता.

आता कपडे घालताना अवघड जात नव्हत.

एक दिवस तो पॉलला म्हणाला, 'आता मी काम सुरू करेन.'

'याचा अर्थ तू ठीक आहे. आता काय? आणखी एखादं पुस्तक?'

'एकाच गोष्टीला चिकटून राहणारा मी नव्हे. मी कलावंत होतो, इतिहासकार होतो, अजूनही बनू शकतो पण आता मला यंत्रमानवांचा जीवशास्त्रज्ञ बनायचय!'

'म्हणजे?'

'यंत्रमानवाच्या मेंदूला जोडलेले मानवी शरीर! त्याचा अभ्यास! आणि तसा फक्त मीच आहे.'

'तू स्वतःसाठी मर्यादित क्षेत्र घेतो आहेस.' पॉल म्हणाला.

अँड्र्यूला अगदी प्रथमपासून अभ्यास करावा लागला. मुळात त्याला जीवशास्त्रावर पुस्तके वाचायला लागली तो लायब्ररीत सारखा दिसू लागला आता त्याच्या मानवसदृश रूपामुळे कोठेही त्रास होत नव्हता.

घरात त्याने एक प्रयोगशाळाही बांधली. त्याच्या स्वत.च्या लायब्ररीतही बरीच वाढ झाली होती.

अशी बरीच वर्षे निघून गेली. एक दिवस पॉल आला आणि म्हणाला,

'तू तो यंत्रमानवाचा इतिहास आणखी लिहिला असतास तर? आता यंत्रमानव कंपनीची धोरणेही बदललीत.'

पॉल आता वयस्क झाला होता. त्याच्यामध्ये ती वयस्कपणाची छटा दिसू लागली होती. 'काय केलय त्यानी?' अँड्र्यूने विचारले.

'ते आता प्रचंड गणकयंत्रे तयार करीत आहेत. ही गणकयंत्रे कोठूनही कोणत्याही यंत्रमानवाबरोबर सूक्ष्म लहरीने दळणवळण करू शकतात. या यंत्रमानवाना मेंदू असतच नाही. ती एखाद्या अवयवाप्रमाणे राबतात. मेंदू फक्त त्या गणकयंत्रातच.' पॉल म्हणाला.

'ही सुधारणा आहे अस वाटतं?'

'त्यांचा तसा दावा आहे. रॉबर्टसन मरण्यापूर्वी ही सुधारणा करून गेला. मला

वाटतं हा तुझ्यावर टोला आहे त्यानी आता तुझ्यावरून धडा घेतलाय. त्याना त्रास होईल अशा प्रकारचे यंत्रमानव ते आता निर्मीत नाहीत बदलून घेण्यासाठी मेंदूला शरीर नाही आणि शरीर आहे तेथे इच्छा करायला मेंदू नाही.'

थोडं थाबून पॉल म्हणाला,

'मला नेहमी आश्चर्य वाटत राहिलय. तू अमेरिकन यंत्रमानवाचा इतिहास किती बदललास! तुझ्यातील कलागुणामुळे त्यानी सज्ज आणि अचूक यंत्रमानव बनवले. तुझ्या स्वातंत्र्यामुळे यंत्रमानवाचे हक्क प्रस्थापित झाले. तू मानवसदृश देहाचा आग्रह धरलास त्यामुळे ही नवी शरीर वेगळ, मेंदू वेगळा ही रचना आली.'

'आता लक्षावधी यंत्रमानव पण एकच मेंदू अशी सुधारणा येईल.'

'पण मी ती पाहायला जगणार नाही.' पॉल म्हणाला.

अँड्रयूच्या चेहऱ्यावर चिंता पाहून पॉल खिन्न हसला.

'आम्ही मर्त्य आहोत अँड्रयू तुझ्यासारखे नाही आहोत. पण एक सागतो. मार्टिन कुटुंबातील मी आता शेवटचा राहिलोय. तसे लांबचे नातेवाईक आहेत पण त्याचा काही उपयोग नाही. माझा सगळा पैसा मी तुझ्या नावानं सोडून जातोय, म्हणजे तू आर्थिकदृष्ट्या सुरक्षित राहशील.'

अँड्रयूला कसेतरीच वाटले मार्टिन कुटुंबियाच्या मृत्यूला तो सरावू शकला नव्हता.

'आता तुझी काय योजना आहे? पॉलने विचारले.

'मी एक नवी पद्धती शोधून काढतोय ज्यामुळे अणुपेशीपेक्षा हैड्रोकार्बनच्या ज्वलनाने मानवसदृश यंत्रमानवाना (म्हणजे मला) जीवनशक्ती मिळेल.'

पॉलने भुवया उचावल्या. 'मग तशा शरीराला श्वसन करावे लागेल, खावे लागेल.'

'होय.'

किती काळ चाललय तुझ हे काम?

'आता बरीच वर्षे झाली. आतापर्यंत मी त्यासाठीचं उपकरणही तयार केलंय.' अँड्रयू म्हणाला.

'पण का हे?' पॉल म्हणाला. 'अणुपेशी काय बिघडवत होत्या?

'काही बाबतीत त्या बऱ्या आहेत पण पॉल, अणुपेशी असण काही माणसासारखं नाही.'

## १५

अर्थात त्याला खूप वेळ लागला. अँड्रयू-कडे वेळ होताच. सरांचा पणतू पॉल मार्टिन याला अतकाळी त्रास होऊ नये म्हणून तो थाबला.

पॉलच्या मृत्यूनंतर मात्र त्याला एकदम उघडं पडल्यासारख वाटल. पण पॉलची कंपनी जिवंत होती. अँड्रयूची सगळी जबाबदारी पॉलने आपल्या कपनीवर सोपवली होती. अँड्रयूची सापत्तिक स्थितीही चागली होतीच. आता अँड्रयूच्या ज्वलन-श्वसन उपकरणाची जबाबदारीसुद्धा पॉलच्या फेनगोल्ड आणि मार्टिन या कायदेपडिताच्या कपनीवर होती.

पुन्हा एकदा अमेरिकन यंत्रमानव कपनीला भेट द्यावी लागली. एकदा सर होते. एकदा पाल होता. आता मात्र तो एकटाच गेला.

यंत्रमानव कंपनीने आता धोरण बदलले होते. आता मेंदू असणारे खूप यंत्रमानव बनवले जात असत. पृथ्वीच्या लोकसख्येच्या ३०% एवढे यंत्रमानव आता पृथ्वीवर होते. त्याचे उत्पादन पृथ्वीबाहेर होत असे.

अँड्रयूचे नव्या संशोधन प्रमुखाने अगदी मनापासून स्वागत केले. 'मॅग्डेस्क्यू' नाव होतं त्याच!

तो म्हणाला, 'मी आपल्याला ओळखतो. आपण आमच सर्वांत कुप्रसिद्ध उत्पादन आहात रॉबर्टसन तुम्हाला एवढा विरोध का करत होते समजत नाही माझ्या मते तुमच्या मदतीनं आम्हाला खूप साध्य करता आल असतं.

'अजूनही करता येईल.' अँड्रयू म्हणाला.

'आता उशीर झालाय.' मॅगडेस्क्यू म्हणाला 'आताशा परिस्थिती बदललीय. आता बरेच यंत्रमानव अवकाशात आहेत. जे इथं आहेत त्याना मेंदू नाही.'

मॅगडेस्क्यू पुढे म्हणाला, 'आता काय आणलय तुम्ही?'

अँड्रयूने त्याला आपली योजना दाखवली. त्या द्वारे अँड्रयूने शरीरात ज्वलन-श्वसन प्रक्रियेचे उपकरण बनवले होते.

'हे आश्चर्यकारक आहे.' मॅगडेस्क्यू ती योजना पाहत म्हणाला, कोणाच डोकं हे?'

'माझं.' अँड्रयू म्हणाला.

'हे तुमच्या शरीरात बसवायला फार बदल करायला लागतील. हे तुम्ही करू नये असं मी सुचवेन.' मॅगडेस्क्यू काळजीच्या स्वरात म्हणाला.

अँड्रयूच्या चेहऱ्यावर फारसे भाव उमटत नसत. तो म्हणाला,

डॉ. मॅगडेस्क्यू, तुम्हाला माझी विनंती ऐकावीच लागेल. दुसरी गोष्ट अशी की हे उपकरण जर माझ्या शरीरात बसवता आले तर माणसाच्या शरीरातही बसवता येईल. माणसाची आयुर्मर्यादा त्यामुळे वाढेल.

'फेनफोल्ड आणि मार्टिन कपनी मीच चालवतो. आम्ही हे उपकरण मोठ्या प्रमाणात तयार करून माणसामध्ये बसवू शकतो. आणि यंत्रमानव–सदृश मानव तयार करू शकतो.

'मग तुमच्या कपनीचं काय राहिलं?

### मॅगडेस्क्यूनं घाम पुसला

अँड्रयू पुढे म्हणाला, 'पण जर तुम्ही माझ्या शरीरात हे बसवलेत, आणि पुन्हाही तसे करण्याचे मान्य केलेत, तर मी तुम्हाला हे उपकरण मनुष्य आणि यंत्रमानव या दोन्ही बाबीत वापरू देईन.'

बोलत असताना अँड्रयूला याचेही भान राहिले नाही की तो मनुष्य प्राण्याला आज्ञार्थक वाक्यात बोलतो आहे तो शिकला होता की प्रथमदर्शनी कठोर वाटणारे शब्द परिणामी मृदू बनू शकतात.

'मी त्याबद्दल निर्णय घेऊ शकत नाही.' मॅगडेस्क्यू म्हणाला. 'कंपनीची सभा घ्यावी लागेल.'

'मी वाट पाहायला तयार आहे' अँड्रयू म्हणाला.

## (१६)

काही काळात सर्व सुखरूप पार पडले. अँड्रयूच्या शरीरात ते उपकरण बसवण्यात आले.

'मी या ऑपरेशनच्या विरुद्ध होतो.' मॅगडेस्क्यू म्हणाला, 'पण का?'

'तुमच्या पॉझिट्रॉनिक मेंदूला धक्का बसू नये म्हणून शरीराला इजा पोचल्यावर मेंदूची

सुखरूप सुटका करण अवघड असत, अँड्र्यू.'

'माझा येथील विशारदावर विश्वास आहे.' अँड्र्यू म्हणाला. 'आता मी खाऊ शकतो ?'

'काहीही. फक्त अधूनमधून आतलं उपकरण स्वच्छ करावं लागेल.' मॅगडेस्क्यू म्हणाला.

'मी आणखी एक उपकरण तयार करतोय. ज्याचं ज्वलन होत नाही अशा घटकाना बाहेर काढणार.'

मॅगडेस्क्यू म्हणाला, 'मनुष्य बनण्याची तुमची महत्त्वाकांक्षा दिसते. पण अँड्र्यू, आता माणसापेक्षा उत्तम स्थितीत आहात. तुम्ही ऐंद्रिय गोष्टीची इच्छा का करता ?'

'अजून माझा मेंदू आहेच.'

'आहे. अँड्र्यू, हे नव संशोधन तुमच्या नावावर बाजारात आलंय. सशोधक म्हणून त्याबद्दल तुम्हाला सन्मानही मिळाले आहेत. आता आणखी आपल्या शरीरावर खेळ का खेळताय ?'

अँड्र्यूनं उत्तर दिलं नाही.

त्याला खूप सन्मान मिळाले. अनेक प्रतिष्ठित सस्थानी त्याला सभासद करून घेतले. रोबोबायॉलॉजी ही नवी शास्त्रशाखाच त्यानं तयार केली होती.

त्याच्या एकशे पन्नासाव्या वाढदिवशी त्याला अमेरिकेत रोबोतर्फे खास खाना देण्यात आला. मॅगडेस्क्यू तोपर्यंत निवृत्त झाला होता. पण तो जातीन हजर राहिला. तो चौऱ्याण्णव वर्षांचा असूनही अजून जिवत होता याला कारण अँड्र्यू होता. अँड्र्यूच्या सुपीक मेंदूनं निर्माण केलेली कृत्रिम लिव्हर, मत्राशय वगैरेचा लाभ त्याला मिळाला होता.

भावनेच्या भरात मॅगडेस्क्यूने आपला ग्लास उचलला होता आणि दीडशे वर्षांच्या यंत्रमानवाला अभिवादन केलं होतं.

अँड्र्यून आपल्या चेहऱ्यावर भावना व्यक्त करणारे स्नायू बसवून घेतले होते. पण त्याचा चेहरा निर्विकार होता.

दीडशे वर्षांचा यंत्रमानव म्हणवून घेणे त्याला आवडले नव्हते.

## ( १७ )

त्याच्या सशोधनाच्या माध्यमातूनच त्याला चद्रावर जावे लागले. त्या काळात पृथ्वीपेक्षा चंद्रावरच पृथ्वीसारखे वाटायचे. फक्त गुरुत्वाकर्षण आणि भूगर्भातील शहरे एवढा वेगळेपणा सोडला तर अनेक बाबीत चद्रावर पृथ्वीसारखे वातावरण होते.

कृत्रिम अवयवाना तेथे कमी गुरुत्वाकर्षण अनुभवाला लागायचे आणि त्याचा अभ्यास करण्यात अँड्र्यूने पाच वर्षे घालवली.

तो पृथ्वीवर परत आल्याबरोबर त्याने प्रथम फेनगोल्ड आणि मार्टिनमध्ये आपल्या आगमनाची वर्दी दिली 'सायमन डिलॉंग' सस्थेचा सध्याचा सूत्रधार याने त्याचे स्वागत केले.

'चद्रावर मी २० सशोधक मानवांच्या टोळीचे नेतृत्व केले.' अँड्र्यू त्याला म्हणाला, 'मी त्याना हुकूम सोडत होतो आणि ते मानत होते. चद्रावरील यत्रमानवानी मला माणसाप्रमाणे मान दिला. मग मी माणूस का नाही, सायमन ?'

सायमनचा चेहरा त्रस्त दिसला. 'अँड्र्यू तुम्हाला यत्रमानव आणि मानव दोघेही माणूस म्हणून वागवतात याचा अर्थ तात्त्विक दृष्ट्या तुम्ही मानवच आहात'

'मला फक्त तात्त्विक दृष्ट्या मानव म्हणणे पुरेसे नाही. मला नुसते वागवून भागणार नाही मला कायदेशीर रीत्या माणूस म्हणवून घ्यायचे आहे. माणूस व्हायचं आहे.

'ती बाब वेगळी.' डिलॉंग म्हणाला. मग माणसाचा पूर्वग्रह आडवा येईल आणि महत्त्वाची गोष्ट म्हणजे कितीही माणसासारखे असलात तरी माणूस नाही आहात.'

'का नाही ?' अँड्र्यूने विचारले. 'मला माणसासारखे अवयव आहेत, आकार आहे. कृत्रिम अवयव बसवलेल्या माणसाप्रमाणे माझे अवयव आहेत. कला, साहित्य आणि शास्त्र या तीन बाबीत कोणत्याही माणसाप्रमाणे मानवी सस्कृतीला माझे योगदान आहे. आणखी काय हवे ?'

'मला काय नको. पण जागतिक सभेने ठराव करून तुम्हाला माणूस म्हणून घोषित केले पाहिजे. आणि तसं होईल असं मला वाटत नाही'

'त्याच्यातील कोणाला भेटले पाहिजे ?'

'शास्त्र आणि तत्रज्ञान समितीच्या अध्यक्षाना !' 'ठीक आहे. मग त्याच्याशी माझी भेट ठरवा.' अँड्र्यू म्हणाला आणि हे सागताना अँड्र्यूने सरळसरळ 'माणसा'ला आज्ञा दिली होती. पण त्याला काहीही वाटले नाही. चंद्रावर त्याला सवय झाली होती. 'फेनगोल्ड आणि मार्टिन माझ्या मागे आहेत हे समजल पाहिजे'

बरं मग—' सायमन काही सागू लागला

अँड्र्यूने त्याला थाबवले. 'आता काही नाही. या फेनगोल्ड आणि मार्टिनसाठी मी एकशे ग्याहत्तर वर्षे काहीतरी करीत आलोय. एक काळ होता की या सस्थेच्या काही सभासदाच्या ऋणात मी होतो; पण आता नाही. आता उलट आहे. मी माझं ऋण परत मागतो आहे'

डिलॉंग म्हणाला, 'मी माझ्या परीने सर्व करेन'

## (१८)

जागतिक सभेच्या शास्त्र आणि तत्रज्ञान विभागाची प्रमुख पूर्व आशियायी होती आणि एक स्त्री होती. अत्यत झगमगीत आणि पारदर्शक कपडे घालणाऱ्या या स्त्रीचं नाव होते. ची लि सियाग !

ती म्हणाली, 'पूर्ण मानवी हक्क मिळवण्याच्या तुमच्या इच्छेबद्दल मला सहानुभूती आहे माणसाच्या काही गटानी आपल्या हक्काबद्दल लढे दिल्याचे इतिहासात नमूद आहे. कोणते हक्क तुम्हाला पाहिजेत ?'

'माझ्या जीवनाचा हक्क! यत्रमानव केव्हाही सुटा केला जाऊ शकतो.'

''माणूस केव्हाही मारला जाऊ शकतो' ती म्हणाली.

'कायद्याने शिक्षापात्र ठरवूनच' अँड्र्यू म्हणाला. 'यत्रमानव सुटा करायला कायदा लागतो का ? एखाद्या माणसाच्या शब्दामुळे माझं अस्तित्व सपू शकत. मला माणूस व्हायच आहे माणसाच्या सहा पिढ्या सरल्या तेव्हापासून मला ही ओढ आहे !'

लि सियागने त्याच्याकडे सहानुभुतीने पाहिले. लोकसभा एक ठराव पास करून तुम्हाला 'माणूस' म्हणून जाहीर करू शकते आणि ते दगडालाही माणूस ठरवू शकतात. पण ते प्रत्यक्ष काय करतील हे अलाहिदा. कॉंग्रेसचे लोक म्हणजे अखेर माणसच आहेत आणि यत्रमानवाबद्दल त्याच्या मनात पूर्वग्रह असणे साहजिक आहे.'

'अजून ?'

'होय आजही. मनुष्यत्व मिळवण्यासाठी तुम्ही पात्र आहात हे मान्य केले तरी एक

नवे उदाहरण उभे करावे लागते ना?' ती म्हणाली.

'कसले उदाहरण ? मी एकटाच स्वतंत्र असणारा यंत्रमानव आहे. पुन्हा असले नाहीत. पाहिजे तर तुम्ही अमेरिकन यंत्रमानव कंपनीला विचारू शकता.'

'श्री मार्टिन, (मी तुम्हाला मनुष्यच मानते.) कॉंग्रेसचे लोक याला कबूल होणार नाहीत. मी तुमच्या बाजूने आहे पण आशा करण्यात अर्थ नाही.' लि सियागने स्पष्ट सांगितले.

ती पुढे म्हणाली, 'आणि जर तुम्ही हे पुढे रेटलेत आणि फार वादंगे झाली तर कदाचित तुमचे भाग सुटे करून तुमच अस्तित्वच ते संपवतील. समस्या सोडवण्याचा तो सोपा मार्ग आहे. तेव्हा त्याचा विचार करा!'

'कृत्रिम अवयवाचे जे संपन्न शास्त्र मी शोधून काढलंय, त्याचा कोणी विचार करणार नाही का?' अँड्र्यूने विचारले.

'कदाचित निष्ठूर वाटेल. पण सांगते. त्याचा कोणी विचार करणार नाहीत. केलाच तर विरुद्ध विचार करतील. माणसाचे यंत्रमानवीकरण किंवा यंत्रमानवाचे मानवीकरण करण्यासाठी तुम्ही ते शोधले असे म्हणतील. राजकीय द्वेष तुम्ही पाहिला नाहीत श्री. मार्टिन, पण त्यामध्ये तुम्हाला सर्व क्षेत्रात बदनाम करण्याचा प्रयत्न होईल आणि त्यावर विश्वास ठेवणारे मिळतील.'

अँड्र्यू म्हणाला, 'मनुष्यत्वासाठी मी झगडा चालू केला तर तुम्ही मला साथ द्याल?'

तिने थोडा विचार केला आणि ती म्हणाली. 'मी जास्तीत जास्त प्रयत्न करेन. पण जर माझच भविष्य धोक्यात आलं तर मला तुमची साथ सोडावी लागेल.'

अँड्र्यू उठला. 'मी आपला आभारी आहे. मी झगडण्याचा निश्चय केला आहे आणि लागली तरच मी तुमच्याकडून मदत घेईन.'

## (१९)

अर्थात अँड्र्यूला समोरासमोर लढावे लागले नाही. फेनगोल्ड आणि मार्टिनने त्याला सबुरीचा सल्ला दिला आणि ते कायदेयुद्धाला लागले.

त्यांनी प्रथम एक खटला दाखल केला. एका माणसाचे कर्ज फेडायचे त्यांनी नामंजूर केले. त्या माणसाला अँड्र्यूच्या कृपेने कृत्रिम हृदय मिळाले होते. त्यांनी असा दावा केला की यंत्रमानवाचे भाग बसवलेला तो आता माणूसच राहिला नाही, त्यामुळे माणसाचे घटनात्मक हक्क त्याला मिळ शकत नाहीत'

अगदी कौशल्यपूर्वक त्यांनी खटला लढवला ते हरत गेले पण प्रत्येक वेळा हरताना त्याची जोरदार जाहिरात करतच त्यांनी केस जागतिक न्यायालयापर्यंत नेली.

त्याला खूप वर्षे लागली. खूप पैसे त्यात खर्च झाले.

शेवटी जेव्हा निर्णय आला तेव्हा अर्थातच ते खटला हरले होते तो सगळा एक योजनाबद्ध भाग होता. त्यावर एक आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

डिलींग अँड्र्यूला म्हणाला.

'आम्ही दोन गोष्टी केल्या आहेत, अँड्र्यू आणि या दोनही गोष्टी तुमच्या दृष्टीने चांगल्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे आम्ही हे सिद्ध केले आहे की माणसाच्या शरीरात कितीही कृत्रिम अवयव घातले तरी त्याचं मनुष्यत्व संपत नाही दुसरी गोष्ट म्हणजे कृत्रिम अवयवाबद्दल आम्ही जोरदार लोकमत जागृती केली आहे. मनुष्यत्वाची अगदी व्यापक व्याख्या आता तयार झाली आहे कारण वेळी कृत्रिम अवयव न वापरणारा माणूस सापडणे कठीण आहे.'

'आणि आता जागतिक लोकसभा मला माणसाचे हक्क देईल असं वाटतं?' अँड्र्यूनं विचारलं

'त्याबद्दल मला आशा करता येत नाही.' डिलींग म्हणाला, 'जागतिक न्यायालयाने मानवतेची व्याख्या करताना मेंदू हा अवयव मूलभूत धरला. माणसाना सेंद्रिय पेशी असणारा मेंदू असतो आणि यंत्रमानवाकडे पॉझिट्रॉनिक, धातूचा मेंदू असतो आणि तुमच्याकडे तसा मेंदू आहे.... माझ्याकडे असे पाहू नका. पेशींनी बनवलेल्या मेंदूची प्रतिकृती करता येणे शक्य नाही. तुम्हीही असे धाडस करू इच्छिणार नाही.'

'मग आपल्याला काय केलं पाहिजे?'

'आपण प्रयत्न करू. कॉंग्रेसची सियांग आणि इतर काही खासदार आपल्या बाजूने आहेत. अध्यक्ष शेवटी बहुमताचे ऐकणार.'

'आपल्याकडे बहुमत आहे?'

'नाही. पण आपण जनमताचा दबाव आणून मानवतेच्या व्याख्येत तुम्हाला बसवण्याचा प्रयत्न करू. शक्यता थोडी आहे. पण जर तुम्हाला अजून आशा असेल तर आपण हा जुगार खेळून बघू.'

'मी हा झगडा शेवटपर्यंत झगडेन.'

## (२०)

पुन्हा जेव्हा अँड्र्यू लि सियागला भेटला तेव्हा तिचे बरेच वय झाले होते. ते पूर्वीचे पारदर्शक कपडे आता इतिहासजमा झाले होते. ती झळाळीही आता राहिली नव्हती. अँड्र्यूमध्ये फारसा बदल घडला नव्हता.

सुरुवातीला त्याने कपडे घालायला सुरुवात केली. तेव्हाच्याच फॅशनला तो चिकटून होता.

ती म्हणाली, 'आमच्या परीने आम्ही सर्व केलय अँड्र्यू. आता थोड थांबून आम्ही पुन्हा प्रयत्न करणार आहोत. पण खरं सांगायचं तर आपला पराभव नक्की आहे आणि आपल्याला हे प्रयत्न सोडायला लागणार. माझ्या आतापर्यंतच्या प्रयत्नाचे फळ म्हणजे येणाऱ्या अधिवेशनात माझा राजकीय पराभव हेच आहे'

'मला माहिती आहे.' अँड्र्यू म्हणाला, 'मला त्याच वाईट वाटतंय. तुम्ही म्हणाला होतात. जेव्हा माझ राजकीय भविष्य धोक्यात येईल तेव्हा मी तुझी साथ सोडेन. मग तुम्ही तसं का केलं नाही?'

'मत बदलतं' ची शियांग म्हणाली, 'आता माझी लोकसभेत एकच टर्म राहिलीय. पंचवीस वर्षे मी जागतिक लोकसभेत आहे केवळ एका टर्मसाठी तुझी साथ सोडणे हे मला फार मोठी किंमत देण्यासारखं वाटलं अँड्र्यू!'

'आपल्याला लोकांची मनं बदलता येणार नाहीत, ची?'

'आपण सगळे प्रयत्न केलेत. पण बहुमत आणि त्यांची भावना बदलता येत नाही.'

अँड्र्यू म्हणाला, 'शेवटी मेंदूचा प्रश्न उरतो. पेशीचा प्रश्न बाजूला ठेवू कार्यात्मक व्याख्या नाही करता येणार? मेंदू कशाचा बनलाय यापेक्षा मेंदूची विचारक्षमता, यावर नाही ठरवता येणार?'

'नाही चालणार.' सियाग म्हणाली, 'तुझा मेंदू मानवनिर्मित आहे, माणसाचा

नाही. तुझा मेंदू बनवलेला आहे, माणसाचा घडतो. माणूस आणि यंत्रमानव यातली ही मोठी दरी आहे.'

'आपण त्याच्या भावनिक कल्लोळाच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला तर?'

'एवढी वर्षं शिकूनही माणसाच्या बुद्धीचा तुला ठाव नाही. रागावू नकोस अँड्र्यू. पण ही तुझ्यातल्या यंत्रमानवाची विचारसरणी आहे.'

## (२१)

ऑपरेशन यथास्थित पार पडले. थोडासा अशक्तपणा आल्यासारखा वाटत होता.

लि सियाग म्हणाली, 'या आठवड्यात शेवटचा निर्णय येईल. आता तो लाबणीवर टाकता येत नाही. आपण हरणार अँड्र्यू.'

'मी तुझा आभारी आहे.' अँड्र्यू म्हणाला. 'त्यामुळे मला वेळ मिळाला आणि मला हवी ती खेळी मी खेळलो आहे.'

लि सियाग काळजीच्या स्वरात म्हणाली, 'कसली खेळी?'

'तुला किंवा फेनगोल्ड आणि मार्टिन-मधल्या कोणाला सांगणे मला शक्य नव्हते. कारण तुम्ही मला अडवले असते' अँड्र्यू म्हणाला, 'मेंदूचा मर्त्यपणा हीच मोठी बाब होती ना? मेंदू कसा आहे किंवा कसा याबद्दल कोण चौकशी करतो? महत्त्वाचं म्हणजे मेंदूतील पेशी मरतात. 'मेल्या पाहिजेतच.' इतर सगळे अवयव बदलले तरी मेंदूतील पेशी बदलता येत नाहीत. कारण व्यक्तित्व बदलत. या पेशी अखेर मरतात.'

माझ्या पॉझिट्रॉनिक मेंदूतील सर्किट्स दोनशे वर्षे आहे तशी आहेत. आणखी काही शतके तशीच राहतील. हाच मूळ फरक नाही काय? अमर यंत्रमानव ही कल्पना माणसाला सहन होते. पण माणूस हा मर्त्यच! अमर माणूस ही कल्पना लोकाना सहन होणार नाही कारण सगळे मर्त्य आहेत. आणि म्हणून ते मला माणूस मानायला तयार नाहीत.'

लि सियांग म्हणाली, 'तुला म्हणायचय काय?'

'मी ती समस्या सोडवून टाकलीय.' अँड्र्यू म्हणाला. 'काही दशकापूर्वी माझ्या मेंदूला मी सेंद्रिय मज्जातंतू जोडले होते नुकतच एक ऑपरेशन मी करून घेतलंय त्यामुळे माझ्या मेंदूला मिळणारा शक्तिस्त्रोत हळूहळू कमी होत चाललाय.'

लि सियागच्या वृद्ध चेहऱ्यावर काही क्षण भावच उमटले नाहीत. पुन्हा कापऱ्या आवाजात ती म्हणाली.

'म्हणजे तू मरायचं ठरवलस? अँड्र्यू, तस करता येणार नाही. तिसऱ्या नियमाचा तू भग करतो आहेस.'

'नाही.' अँड्र्यू म्हणाला, 'शरीर आणि आतरिक इच्छा यांतून मी निवड केलीय. माझ्या इच्छेला मारून शरीराला जिवंत ठेवणं म्हणजे तिसऱ्या नियमाचा भग झाला असता.'

लि सियागन अँड्र्यूचा हात घट्ट पकडला. ती त्याला गदगदा हलवणार होती पण तिनं स्वत ला आवरल.

'अँड्र्यू त्याचा उपयोग होणार नाही. तू पुन्हा बदलून घे.'

'आता जमणार नाही.' अँड्र्यू म्हणाला.

'जे काही व्हायचय ते होऊन गेलय. मी आता एक वर्ष कसा तरी जगेन. दोनशे वर्षं पूर्ण होतील मला.'

'हे जे काय केलस ते योग्य आहे का? अँड्र्यू, तू मूर्खपणा केलास.' गद्गदलेल्या स्वरात लि सियाग म्हणाली.

'जर मला लोकांनी 'माणूस' म्हटल तर मग त्याचे सार्थक होईल. जर म्हटल नाही तर माझ्या आयुष्यभराच्या तळमळीला पूर्णविराम मिळेल. त्यातूनही मी केलेल्याचा योग्यपणा दिसेल.'

मग लि सियागने अशी एक गोष्ट केली की तिच तिलाही आश्चर्य वाटलं.

ती अक्षरशः रडली.

## (२२)

अँड्र्यूच्या शेवटच्या कृतीचा जगाला पत्ता लागला आणि जग स्तंभित झालं. आतापर्यंतच्या अँड्र्यूच्या प्रयत्नाना जगाने दाद दिली नव्हती पण 'माणूस' म्हणवून घेण्यासाठी अँड्र्यूने मरणाला साद दिली एवढा मोठा त्याग दुर्लक्षिता येत नव्हता.

अँड्र्यूच्या निर्मितीला ज्या दिवशी दोनशे वर्षे होत होती त्या दिवसाच औचित्य साधण्यात आलं. जगाचा अध्यक्ष स्वतः त्यावर सही करणार होता आणि जागतिक नेटवर्क कार्यक्रमातून, चद्र आणि इतर अवकाश वसाहतीना सुद्धा अँड्र्युला मनुष्यत्व बहाल करण्याच्या कार्यक्रमाच थेट प्रक्षेपण दाखवण्यात येणार होतं.

*अँड्र्यूला आता चाकाची खुर्ची लागायची.* तसा तो चालू शकत होता पण अंग कापायचे.

त्या दिवशी अँड्र्यू धन्य झाला. त्याच्या २०० व्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम जगभर दाखवण्यात आला. त्यात जगाचे अध्यक्ष त्याला उद्देशून म्हणाले,

'दीडशे वर्षांचा यत्रमानव असा तुमचा उल्लेख पन्नास वर्षांपूर्वी गौरवपूर्वक करण्यात आला होता अँड्र्यू, पण आज...' इथं ते थाबले आणि धीरगभीर आवाजात त्यानी घोषणा केली.

'आज श्री. मार्टिन, आम्ही तुम्हाला दोनशे वर्षांचा माणूस म्हणून घोषित करतो आहोत.'

आणि अँड्र्यूच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलले. अध्यक्षाशी त्याने समाधानाने हस्तांदोलन केले.

दोनशे वर्षांची महत्त्वाकांक्षा सफल झाली होती.

## (२३)

अँड्र्यूचे विचार तुटत चालले होते. तो अतिम घटका मोजत होता.

आता तो माणूस होता त्या विचारात मरणे, होय मरणे (यंत्रमानवासारखे निकामी होणे नव्हे) त्याला खूप सुखाचे वाटत होते.

त्याने पुन्हा डोळे उघडले आणि बिछान्याजवळच्या लोकाकडे एक नजर टाकली: ची. लि सियांग आणि इतर बरेच लोक होते. त्याने हात वर करून ची कडे खूण केली. तिने त्याचा हात हाती घेतला.

सगळ क्षीण होत चालल होत. पण संपण्यापूर्वी त्याच्या मनात विचार आला.

'छोटी मिस्!' तो पुटपुटला

ते त्याचे अखेरचे शब्द होते.

□

'The Bicentennial Man' या 'Isaac Asimov' यांच्या कथेचे स्वैर रूपांतर

# सामंजस्याची गरज

( पृष्ठ १६ वरून )

शकतात, असे काही घटनातज्ज्ञाचे मत आहे. प्राध्यापक ए. व्ही. डायसी यानी इग्लडच्या घटनेचे परिशीलन करताना अशी भूमिका घेतली की, 'मत्रिमडळाच्या सल्ल्याखेरीज राजा काहीच करू शकत नाही, या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे पण या तत्त्वानुसार राजा मंत्रिमडळाबाबत राष्ट्राची नेमकी मते काय हे जाणून घेण्यासाठी कधीही मत्रिमडळ बरखास्त करू शकत नाही, या मताशी मी पूर्णपणे असहमत आहे' ('I entirely agree that the king can do nothing except on the advice of ministers I totally disagree with the doctrine drawn from this principle that he can never dismiss ministers in order that he may ascertain the will of the nation') प्रा. डायसी याचे स्पष्ट मत होते की, मंत्रिमडळाच्या एखाद्या धोरणाला लोकसभेचा पाठिबा असेल पण लोकाचे त्या धोरणाबाबत मतभेत असतील, त्या वेळेस राजा मत्रिमंडळ बरखास्त करू शकतो. प्रा. डायसी याच्या मतांचा भारतीय घटनेच्या सदर्भात विचार करताना एक बाब आपण लक्षात घेतली पाहिजे की, लोकसभेतील पाठिबा खासदारांच्या मतसंख्येवरून निश्चित करणे सहज शक्य असल्यामुळे मंत्रिमंडळाच्या धोरणाला लोकसभेतील पाठिबा ठरवणे सोपे आहे. पण त्या विशिष्ट धोरणाला लोकांचा विरोध आहे, हे सिद्ध करणे अवघड आहे.

मत्रिमडळाच्या धोरणाला लोकाचा विरोध आहे, या कारणास्तव मत्रिमंडळ बरखास्त करण्याचा अधिकार ससदीय लोकशाहीमध्ये राष्ट्रपतीस देणे, हे योग्य नव्हे. जोपर्यंत सत्ताधारी पक्षाकडे लोकसभेत बहुमत आहे, तोपर्यंत मत्रिमडळ बरखास्त करण्यात येऊ नये, अशा प्रकारचे मत डॉ आयवर जेनिंग्ज् आणि डॉ वेड यानीही व्यक्त केले आहे राष्ट्रपती झैलसिंग याना राजीव गाधी याचे मत्रिमडळ बरखास्त करण्याचा अधिकार नाही. नुकत्याच सपलेल्या लोकसभेच्या अधिवेशनात कॉंग्रेस पक्ष बहुमतात आहे, हे निर्विवादपणे सिद्ध झाले आहे राष्ट्रपती झैलसिंग कदाचित मत्रिमडळ बरखास्त करतील, या विचारानेच लोकसभेचे अधिवेशन सपवताना लोकसभेची पुढील बैठक तहकूब ( Adjourn ) केली आहे, पण लोकसभा स्थगित (Prorogue) केलेली नाही तहकुब केलेल्या लोकसभेचे अधिवेशन शासन आपल्या अधिकारात हवे तेव्हा बोलावू शकते पण स्थगित केलेल्या लोकसभेचे अधिवेशन राष्ट्रपतीच बोलावू शकतात. समजा राष्ट्रपती झैलसिंग यानी पतप्रधान राजीव गाधी याचे मत्रिमडळ बरखास्त केले तर लोकसभेचे अधिवेशन बोलावून श्री राजीव गाधी मत्रिमडळावर विश्वासाचा ठराव समत करून घेऊ शकतात शिवाय राष्ट्रपतीविरुद्ध अभियोग प्रक्रिया सुरू करू शकतात, वस्तुतः मत्रिमडळ जर बरखास्त केलेच तर मत्रिमडळावर विश्वासाचा ठराव हे घटनात्मक चौकटीतील परिणामकारक उत्तर ठरू शकेल.

राष्ट्रपती झैलसिंग मत्रीमडळ बरखास्त करणार नाहीत, असा खुलासा नुकताच करण्यात आला आहे. राष्ट्रपतीचा हा खुलासा श्री. गाधी याचे लोकसभेत निर्विवाद बहुमत आहे, याचीच अप्रत्यक्ष कबुली आहे त्याचप्रमाणे विरोधी पक्षानी राष्ट्रपतीच्या मंत्रिमडळ बरखास्तीच्या कल्पनेला विरोध केला, तोसुद्धा या सदर्भात उल्लेखनीय ठरेल

राष्ट्रपती, पतप्रधान हे दोन घटनात्मक प्रमुख आहेत. एक राष्ट्रप्रमुख तर दुसरा शासनप्रमुख. दोघाचे घटनात्मक स्थान, कर्तव्ये, अधिकार, जबाबदाऱ्या इ. ठरविताना भारतीय घटना ही लिखित घटना आहे, ही बाब लक्षात घेणे आवश्यक आहे शिवाय आपली शासनपद्धती ससदीय आहे, अध्यक्षीय नाही, हाही महत्त्वाचा मुद्दा आहे. दोघानी एकमेकाचा आदर करावा आणि आपल्या वैयक्तिक, भावनात्मक मतभेदाचा परिणाम शासनावर होणार नाही, याची खबरदारी घ्यावी.

# राजीव गांधी राष्ट्रपती झाले तर?

• ॲड राजन कोचर •

भारतीय सविधानाच्या अनुच्छेद ५२ अन्वये भारताला एक राष्ट्रपती असेल असे प्रयोजन आहे तर अनुच्छेद ५३ (१) अनुसार सघराज्याची शासनशक्ती राष्ट्रपतीच्या ठायी निहित केली गेली आहे या शासनशक्तीचा वापर राष्ट्रपती प्रत्यक्षपणे किंवा त्याच्या हाताखालील अधिकाऱ्यामार्फत या सविधानानुसार करता येईल तसेच ५३ (२) या कलमान्वये संघराज्याचे सरक्षण सेनाचे आधिपत्यही राष्ट्रपतीच्या ठायी निहित केले आहे. या आधिपत्याचा वापर राष्ट्रपती कायद्याद्वारे विनियमित करू शकतात हेही नमूद केले गेले आहे सघराज्याची सपूर्ण शासनशक्ती व सरक्षणसेनाचे आधिपत्य भारताच्या राष्ट्रपतीच्या हातात एकवटलेले दिसून येते या दोन कलमावरून राष्ट्रपती सर्वशक्तिमान आहेत यात दुमत होण्याचे कारण नसावे कलम ७६ अन्वये राष्ट्रपती भारताचा Attorney General नियुक्त करू शकतात. तर अनुच्छेद १२४ तहत त्याना सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीश नियुक्तीचा अधिकार आहे. त्याचप्रमाणे घटनेच्या ७७ व्या कलमानुसार भारताच्या सर्व शासकीय कृतीचा आदेश राष्ट्रपतीच्या नावानेच होईल. अनुच्छेद १२३ अन्वये ससदेच्या विरामकालात अध्यादेश प्रस्थापित करण्याची शक्ती राष्ट्रपतीना दिली आहे तसेच सविधानाच्या १८ व्या भागात आणीबाणीसबधी उपबध असून त्यानुसार गभीर आणीबाणी अस्तित्वात असल्याची खात्री पटल्यानतर कलम ३५२ खाली आणीबाणीच्या उद्घोषणेची प्रचड शक्तीसुद्धा राष्ट्रपतीना दिलेली आहे भारताच्या सुरक्षिततेसाठीच हे अधिकार राष्ट्रपतीना बहाल करण्यात आलेले आहेत. परचक्रामुळे वा सशस्त्र बडामुळे असो, किंवा अतर्गत अशाततेचे कारण आढळल्यास अन् राज्यातील सांविधानिक यत्रणा बद पडल्यास राष्ट्रपती या

शक्तीचा वापर करू शकतात व या काळात काही विशिष्ट वैधानिक शक्तींचे शस्त्रही उचलू शकतात. राज्याची शासनशक्ती राज्यपालांच्या ठायी निहित असून अशा सर्व राज्यपालांची नियुक्ती राष्ट्रपतीच करू शकतात व त्यांच्या मर्जीच्या कालावधीपर्यंतच राज्यपाल पदावर राहू शकतात आणि काही अधिकार राष्ट्रपतींना देऊन संविधानात राष्ट्रपतींना सर्वशक्तिमान केलेले आहे. परंतु अनुच्छेद ७४ अन्वये राष्ट्रपतींच्या शक्तींना अंकुश लावला गेला आहे. या कलमानुसार राष्ट्रपतीस साहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी प्रधानमंत्री प्रमुखपदी असलेली एक मंत्रिपरिषद असेल व राष्ट्रपती आपल्या कार्याधिकारांचा वापर करताना अशा सल्ल्यानुसार वागण्याचे बंधन आहे. तसेच कलम ७५ प्रमाणे प्रधानमंत्री राष्ट्रपतींकडून नियुक्त केला जाईल व इतर मंत्री प्रधानमंत्र्यांच्या सल्ल्यानुसार नियुक्त केले जातील व राष्ट्रपतींची मर्जी असेपर्यंत मंत्री अधिकारपदे धारण करतील. अनुच्छेद ७८ अनुसार संघराज्याच्या कारभाराच्या प्रशासनासंबंधीचे मंत्रिपरिषदेचे सर्व निर्णय व विधिविधानाकरता आलेले सर्व प्रस्ताव राष्ट्रपतींना कळविण्याचे व प्रशासनासंबंधी व विधिविधानाकरता आलेल्या प्रस्तावासंबंधी राष्ट्रपती मागवील ती माहिती पुरविण्याचे प्रधानमंत्र्याचे कर्तव्य आहे. इतका शक्तिमान असतानासुद्धा राष्ट्रपतींना नामधारी किंवा केवळ रबरस्टँप म्हणूनच संबोधले जाते व त्याचे कारण कलम ७४ ने लादलेले बंधन. राष्ट्रपती मंत्रिपरिषदेच्या सल्ल्यानुसारच वागेल.

भारताचे सर्वप्रथम राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद व पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरू यांच्यामध्ये काही मतभेदांवरून घटनात्मक पेचप्रसंग निर्माण होऊ घातला होता. त्याचप्रमाणे श्रीमती इंदिरा गांधींचे इतर राष्ट्रपतींशी काही वेळा मतभेद निर्माण झाले होते व आज श्री. राजीव गांधी व श्री. झैलसिंग यांच्यात तर घटनात्मक युद्धच छेडले गेले आहे. संविधानाच्या उपरिनिर्दिष्ट राष्ट्रपतींच्या शक्तींचा व अधिकारांचा विचार केला अन् ते पद जर श्री. नेहरूंकडे असते तर कोण श्रेष्ठ ठरला असता ? त्याचप्रमाणे



**आपले संविधान अजब आहे. जो स्वत: श्रेष्ठ तो घटनात्मकरीत्याही श्रेष्ठ ठरू शकतो.**

□

जर श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रपती असत्या तर कोण अधिक शक्तिमान ठरला असता ? किंवा सद्य:परिस्थितीतील पात्रं बदलली गेली असती व श्री. राजीव गांधी राष्ट्रपती असते तरी संविधानातील अनुच्छेदांचा अर्थ व संदर्भ बदलला असता. राष्ट्रपतींचे संवैधानिक पद व अस्तित्व असून त्यांच्या ठायी अनेक अमर्याद अशा शक्ती निहित आहेत. कलम ७४ अनुसार मंत्रिपरिषदेची 'मदत व सल्ला' घेऊन ते कार्याधिकारांचा वापर करतील. परंतु 'मदत व सल्ला' न घेता ते कार्याधिकार वापरूच शकत नाहीत, ही तरतूद घटनेत कुठेच नाही. नेहरूंच्याच मदतीने व सल्ल्याने मंत्रिपरिषदेचे निर्णय झाले असते. जर ते राष्ट्रपती असते व त्यावेळी कलम ७४ मध्ये मदतीनुसार व सल्ल्यानुसार राष्ट्रपती वागतील हे असले तर ते स्वत: काहीच करू शकत नाहीत असे नाही. अशा प्रकारचा युक्तिवाद झाला असता. कारण नेहरूंचे प्रचंड व्यक्तिमत्त्व व उत्तुंग लोकप्रियता. कलम ७४ मध्ये मंत्रिपरिषदेच्या मदतीने व सल्ल्यानुसारच राष्ट्रपती कार्याधिकारांचा वापर करतील असे नाही. इंग्रजीतले ७४ कलम असे आहे, 'There shall be a council of Ministers with the Prime Minister at the head to aid and advise the President who shall, in the exercise of his functions, act in accordance with such advice :' इथे 'Only in accordance with such advice' असे प्रयोजन नसल्याने राष्ट्रपतींचे स्वतंत्र व स्वयंभू असे संवैधानिक अस्तित्व आहे व ते स्वतंत्रपणेही निर्णय घेऊ शकतात असा अर्थ राष्ट्रपती नेहरूंच्या समर्थनार्थ लावला गेला असता. कलम ७४ अशा प्रकारे जर सैल केले तर भारतीय संविधानात राष्ट्रपतीच श्रेष्ठ ठरला असता. जर पंडित नेहरू व श्रीमती इंदिरा गांधी राष्ट्रपती असत्या, आजसुद्धा राजीव गांधी राष्ट्रपती असते तर प्रधानमंत्री व मंत्रिपरिषद गौण ठरली असती. कलम ७४ अनुसार प्रधानमंत्री व मंत्रिपरिषद केवळ सहाय्यक व सल्लागार आहेत व ज्याला मदत व सल्ला द्यायचा त्याच्यापेक्षा ते श्रेष्ठ कसे ठरू शकतील असा युक्तिवाद झाला असता. सगळी चक्रं व सारा ओघ उलटा फिरला असता. ही किमया व्यक्तिमत्त्वाची आहे. नेहरू व इंदिरा गांधी मूलत: श्रेष्ठ होत्या, म्हणून घटनात्मकदृष्टचा श्रेष्ठ ठरल्या व राष्ट्रपती चंद्राच्या भूमिकेत गेले. स्वत:चा प्रकाश नसल्याप्रमाणे त्यांचे अस्तित्व ठरले. त्यावेळी वादळ नव्हतं उभं राहिलं. सूर्यासारखं व्यक्तिमत्त्व असलेले दोघे वादळं थोपवू शकले. आज जरा परिस्थिती वेगळी आहे. एक तारका घटनात्मक वादळात सापडली आहे. आपले संविधान अजब आहे. जो स्वत: श्रेष्ठ तो घटनात्मकरीत्याही श्रेष्ठ ठरू शकतो. तो निर्विवादपणे घटनेवर आरूढ होतो.

□

# राष्ट्रपतिपद शोभेचे आहे

• ॲड. अतुल एम्. सेटलवाड •

राष्ट्रपतींना स्वतंत्रपणे निर्णय घेण्याचा हक्क आहे? ते सरकारी कचेरीमधून माहिती मागवू शकतात? राष्ट्रपती पंतप्रधानाना बडतर्फ करू शकतात? पंतप्रधान राष्ट्रपतीपासून काही माहिती दूर ठेवू शकतात? या सर्व प्रश्नाची उत्तरे आपल्याला घटना समितीत झालेल्या चर्चेत सापडू शकतात. ( पहा– The framing of India's Constitution edited by B. Shiva Rao )

संसदीय शासनपद्धती इंग्लंडमध्ये उत्क्रांत होत गेली आणि हळूहळू राजघराण्याकडे असलेले अधिकार संसदेकडे आले. राजा फक्त शोभेपुरता राहिला. मंत्रिमंडळ लोकप्रतिनिधींच्या संसदेला जबाबदार धरण्यात आले संकेतावर आधारलेल्या इंग्लंडच्या घटनेला कॅनडा आणि ऑस्ट्रेलियात लेखी स्वरूप देण्यात आले काही मर्यादेपर्यंत भारतीय घटनेतसुद्धा हेच आहे. या शासन पद्धतीत दोन प्रमुख– एक राजा (किंवा त्याचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर–जनरल) आणि दुसरा पंतप्रधान. कॅनडाच्या घटनेचा उल्लेख करून प्रा. डावसन म्हणाले होते की, ' राजाचा प्रतिनिधी म्हणून गव्हर्नर जनरल राष्ट्रप्रमुख आहे; पण सर्व अधिकार पंतप्रधानाकडे आहेत '

मंत्रिमंडळ पूर्णपणे आणि संयुक्तरीत्या संसदेला जबाबदार धरण्यात आले आणि राष्ट्रप्रमुखास मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने वागणे आवश्यक ठरविण्यात आले. या रचनेत राष्ट्रपतीला स्वतंत्र निर्णय घेण्याचा अधिकार जवळजवळ नाही अपवादात्मक परिस्थितीमध्ये राष्ट्रपती स्वतंत्रपणे निर्णय घेऊ शकतात जेव्हा संसदेतील बहुमत मंत्रिमंडळाच्या बाजूने असते तेव्हा मात्र राष्ट्रपती या प्रकारचा निर्णय घेऊ शकत नाही. लोकसभा बरखास्तीचा निर्णयसुद्धा मंत्रिमंडळाने दिलेल्या सल्ल्यानुसारच घ्यावा लागतो.

राजापेक्षा मंत्रिमंडळ श्रेष्ठ या तत्त्वाला फक्त वसाहतीच्या राज्याचा घटनेत अपवाद असतो. गव्हर्नर–जनरल मंत्रिमंडळाच्या सल्ल्याने निर्णय घेत असतो. पण काही अधिकार मात्र गव्हर्नर जनरल स्वतंत्रपणे वजावत असतो. १९३५ सालच्या भारत सरकारच्या कायद्यामध्ये अशी तरतूद होती

भारतामध्ये संसदीय लोकशाही असावी याबद्दल घटना समितीमध्ये जवळजवळ एकमत होते. स्वातंत्र्यपूर्व काळात नेहरू कमिटीचीसुद्धा हीच शिफारस होती.

केवळ देखाव्यासाठी आपल्याला राष्ट्रपतीची गरज होती. भारत प्रजासत्ताक झाल्यावर गव्हर्नर–जनरल असू शकत नव्हता, म्हणून मग राष्ट्रपतिपद निर्माण करण्यात आले. राष्ट्रपतींना अधिकार मात्र कोणतेच दिले नव्हते. घटनेचा मसुदा घटना समितीपुढे सादर करताना केलेल्या भाषणात डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, ' राष्ट्रपती राष्ट्रप्रमुख आहेत. ते देशाचे प्रतिनिधित्व करतात, पण देशाचा कारभार करत नाहीत. ...शासनामध्ये त्याचे स्थान दिखाऊ आहे... त्यांच्या नावाने शासनाचे निर्णय जाहीर केले जातात त्यांना मंत्रिमंडळाने दिलेल्या सल्ल्याविरुद्ध ते काहीही करू शकत नाहीत ' थोडक्यात म्हणजे भारतीय राष्ट्रपतीचे स्थान इंग्लंडच्या राजासारखे असेल.

## राष्ट्रपतींचे निर्णयस्वातंत्र्य

काही घटना–तज्ज्ञांच्या मते राष्ट्रपतींना काही अ–राजकीय स्वरूपाचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असावे हे निर्णय राष्ट्रपतींनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार घेण्याऐवजी महाजन सभेच्या (Council of state) सल्ल्यानुसार घ्यावेत. या महाजन सभेमध्ये ज्येष्ठ राजकारणी वगैरे असतील. घटना समितीचे सल्लागार सर बी. एन. राव याचासुद्धा मला पाठिंबा होता. हा सल्ला फेटाळण्यात आला आणि मंत्रिमंडळाचे श्रेष्ठत्व कायम ठेवण्यात आले. महाजन सभा निर्माण करण्याचा सल्ला जरी फेटाळण्यात आला तरी हे लक्षात घेतले पाहिजे की, राष्ट्रपतींना काही खास अधिकार असावेत हा मुद्दा चर्चेसाठीसुद्धा घेतलेला नव्हता. कारण घटना समितीतील जेष्ठ, श्रेष्ठ सभासदाना मंत्रिमंडळाचे श्रेष्ठत्व अभिप्रेत होते.

घटना समितीतील एक सदस्य प्रा. के. टी. शाह याचा आग्रह होता की, राष्ट्रपतींना जास्त अधिकार प्रदान केले जावेत. त्यांच्या मते राष्ट्रपतींना असा अधिकार असावा की, ज्याद्वारे ते एखाद्या व्यक्तीचा सल्ला घेऊ शकतील किंवा शासकीय कचेऱ्यामधून फाईल्स मागवू शकतील आणि एखाद्या मंत्र्याच्या लक्षात न आलेली चूक दाखवू शकतील· या स्वरूपाची दुरुस्ती प्रा. शाह यानी सुचवली होती. पण ही दुरुस्ती निर्णायकरित्या नाकारली गेली. सर कृष्णस्वामी अय्यर म्हणाले की, अशा दुरुस्तीमुळे मंत्रिमंडळ आणि राष्ट्रपती याच्यात कायमची दरी निर्माण होईल.

घटना समितीत काही काळ असे ठरत होते की, घटनेमध्ये राष्ट्रपती आणि मंत्रिमंडळ याचे संबंध कसे असावेत हे सांगणारे सूचनांचे परिशिष्ट ( Instrument of Instructions ) जोडावे पण नंतर ही कल्पना सोडून दिली सभासदाना असे वाटले की, घटनेप्रमाणे मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार राष्ट्रपतींनी कारभार करावा, अशी स्पष्ट सूचना आहे त्याविरुद्ध जर राष्ट्रपतींनी काही केले तर ते घटनाविरोधी होईल आणि त्याच्याविरुद्ध अभियोगाची कारवाई करता येईल. श्री एच्. व्ही कामत आणि डॉ. आंबेडकर याच्यात १४–१०–१९४९ रोजी घटना समितीत झालेल्या संवादावरून याची स्पष्ट कल्पना येईल.

**श्री. कामत :** समजा एखाद्या प्रसंगात राष्ट्रपती मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार वागले नाहीत तर याचा अर्थ त्यानी घटनाविरोधी कृत्य केले असा होईल का? आणि त्याच्याविरुद्ध अभियोग सुरू करता येईल का?

**डॉ. आंबेडकर :** अर्थातच. यात शंकेला जागाच नाही

याचाच अर्थ असा की आपल्या घटनेमध्ये राष्ट्रपतीची जागा केवळ शोभेची आहे.

### सल्ल्याशिवाय, सल्ल्याविरुद्ध

भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी राष्ट्रपतींच्या अधिकाराबद्दल घटनात्मक सल्ला घेतला तेव्हा त्यांना स्पष्ट शब्दात सांगण्यात आले होते की, मंत्रिमंडळाच्या सल्ल्याविरुद्ध किंवा सल्ल्याशिवाय ते काहीही करू शकत नाहीत. जरी डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी भारताच्या तत्कालीन अ‍ॅटर्नी–जनरल सेटलवाड यांनी दिलेला सल्ला मानला तरीही १९६० साली परत त्यांनी जाहीरपणे हाच प्रश्न उपस्थित केला. त्यांचे म्हणणे होते की, घटनेमध्ये कुठेही अशी तरतूद नाही की ज्या अन्वये राष्ट्रपतींना मंत्रीमंडळाच्या सल्ल्यानुसार वागावे लागेल. आधी उल्लेख केल्याप्रमाणे, घटना तयार करणाऱ्या तज्ज्ञांना अशा स्पष्ट उल्लेखाची आवश्यकता भासली नाही. तरीही १९७६ साली घटनेतील कलम ७४ ला केलेल्या दुरुस्तीप्रमाणे राष्ट्रपतींना मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसारच वागावे लागेल.

या पार्श्वभूमीवर विचार करता आपल्या लक्षात येईल की, सध्या सुरू असलेले वादंग पूर्णपणे अनावश्यक आहे. बहुमत मागे असलेल्या पंतप्रधानाला बडतर्फ करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना नाही. समजा राष्ट्रपतींनी पंतप्रधानांना बडतर्फ केले किंवा लोकसभा बरखास्त केली तर त्यांचे हे कृत्य घटनाविरोधी असेल आणि त्यांच्याविरुद्ध अभियोग सुरू करता येईल.

काही तज्ज्ञांच्या मते हे योग्य नसून एखाद्या भ्रष्ट पंतप्रधानाला (जरी त्याच्यामागे बहुमत असले तरीही) बडतर्फ करण्याचा अधिकार राष्ट्रपतींना असावा. हा मुद्दा लोकशाहीविरोधी आहे. निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींपेक्षा राष्ट्रपती ह्या एका व्यक्तीला देशाचे भले कशात आहे हे समजते असाच याचा अर्थ झाला. लोकप्रतिनिधी कदाचित भ्रष्ट असतील, पण आज ना उद्या लोकप्रतिनिधींना जनतेला सामोरे जायचे असतेच, आणि तेव्हा जनता त्यांना नाकारू शकते. ज्या तज्ज्ञांना या प्रक्रियेविषयीच शंका आहे, त्यांना लोकशाहीविषयीच शंका आहे. या विचारसरणीचा आणखी एक धोकादायक भाग म्हणजे राष्ट्रपती या एका व्यक्तीच्या हातात अमर्याद सत्ता एकवटली जाईल.

घटनेतील तरतुदीप्रमाणे मंत्रिमंडळाचे स्थान वरचे आहे. याचा अर्थ मंत्रिमंडळ राष्ट्रपतीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करू शकते का? अर्थातच नाही घटनात्मक संकेताप्रमाणे राष्ट्रपतींना वेळोवेळी शासकीय निर्णयाची माहिती दिली जावी. १९७८ साली घटनेच्या कलम ७४ मध्ये अंतर्भूत करण्यात आलेल्या तरतुदीचा अन्वयार्थ हाच आहे की, मंत्रिमंडळाने दिलेला सल्ला राष्ट्रपती पुनर्विचारार्थ घेण्यास सांगू शकतात. यासाठी आधी त्यांना दिलेला सल्ला काय आहे आणि त्याची पार्श्वभूमी काय आहे, हे कळणे आवश्यक आहे. डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. राधाकृष्णन, डॉ. झाकीर हुसेन ही मंडळी भव्य व्यक्तिमत्त्वाची होती. अशा राष्ट्रपतींनी मंत्रिमंडळाला दिलेला सल्ला प्रांजळ आणि मोलाचा असेल कारण तो गुप्तरित्या दिलेला असेल.

राष्ट्रपती आणि पंतप्रधान अगदी जिवलग मित्र हवेत, असं नाही. पंतप्रधानांना राष्ट्रपतींचा अविश्वास वाटत असल्यास त्यांनी अभियोग सुरू करावा. पण जोपर्यंत राष्ट्रपती त्या पदावर आहेत तोपर्यंत त्यांना सरकारी कामकाजाची, निर्णयाची माहिती वेळोवेळी दिली गेलीच पाहिजे. असे न करणे हे प्रस्थापित घटनात्मक संकेताविरुद्ध आहे.

(संडे ऑबझर्वरच्या सौजन्याने)

□

"समजा मंत्रिमंडळाने मला विहिरीत उडी मारा, असा सल्ला दिला तर मी विहिरीत उडी मारावी का?"

— राष्ट्रपती झैलसिंग

— अर्थातच नाही. कारण विहिरीत उडी मारणे हे त्यांचे घटनात्मक कर्तव्य नाही.




Mudra: A:RTI:2093

# कै. दि. बा. मोकाशी वाड्.मय पुरस्कार

ख्यातनाम लेखक दि. बा मोकाशी यांचे २९ जून ८१ या दिवशी पुणे येथे निधन झाले. प्रतिभाशाली लेखक व एक दिलखुलास माणूस म्हणून अनेकांना त्यांच्याविषयी ओढ असे. सहाजिकच त्यांच्या स्नेहीमंडळीत, त्यांचे वाङ्मयीन स्मरण प्रतिवर्षी राहील अशी एखादी योजना ठरवण्यासंबंधी अनेक वेळा बोलणे होऊ लागले. आता ही गोष्ट खरीच की मोकाशींची आठवण शेवटी त्यांच्या लेखनातून रहाणार आणि तीच आठवण खरी. परंतु तरीही त्यांच्या स्मृतीचे एखादे 'आप्तवाक्य' ही अस्तित्वात असावे असे मनुष्यस्वभावानुसार सर्वांना वाटत होतेच.

वि. ग. कानिटकर व गजानन क्षीरसागर यांनी याबाबतीत पुढाकार घेताच, त्यांच्या साहित्यावर प्रेम करणाऱ्या साहित्यिकांनी व त्यांच्या वाचकांनी आवश्यक तो निधी निर्माण करण्यास तत्परतेने हातभार लावला. कोणालाही स्मरणपत्र देखील पाठवावे लागले नाही.

या निधीची रु. १२०००।– ही रक्कम १२ ऑक्टो. १९८६ रोजी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे यांचेकडे सुपूर्द करण्यात येऊन, या निधीतून प्रतिवर्षी कादंबरी, कथा व अंतर्देशीय प्रवासवर्णन या वाङ्मय प्रकारांतील वाङ्मयीन कृतींना 'कै. दि. बा. मोकाशी पुरस्कार' देण्याची योजना सुचवण्यात आली. महाराष्ट्र साहित्य परिषदेने ही योजना स्वीकारून दि. १–१–८६ पासून पुरस्कार देण्याची जबाबदारी स्वीकारली. हा पुरस्कार प्रथम प्रकाशित पुस्तकांनाच असलेला चांगला, ही रा. श्री. पु. भागवत यांची सूचना योजनेत अंतर्भूत करण्यात आली.

एवढे झाले तरी ८१ ते ८५ हा कालखंड या योजनेच्या कक्षेबाहेर रहात होता. तेव्हा पुन्हा निधीसाठी काही मित्रांना आवाहन करण्यात आले व या चार वर्षातील प्रथम प्रकाशित पुस्तकांनाही पुरस्कार द्यावा व समारंभपूर्वक २९ जून १९८७ या दिवशी ते पुरस्कार दिले जावेत असे ठरवण्यात आले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे व 'मोकाशी मित्र मंडळ' यांनी यासाठी सहकार्याने निवडसमिती नेमली. या समितीत सर्वश्री प्रा. म. ना. अदवंत, सौ. जोत्स्ना देवधर, वि. शं. पारगावकर, रंगा मराठे व प्रा. म. वि. गोखले यांनी काम केले. निवडसमितीने ८१–८५ वर्षाकरता पुढील प्रथम प्रकाशित वाङ्मयकृतींना पुरस्कार सुचवले आहेत.



◻

पुरस्कार वितरणाचा समारंभ दि. २९ जून १९८७ या दिवशी सायं. ६॥ वा. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या पटवर्धन सभागृहात होणार आहे. यावेळी श्रीमती शांता शेळके या 'मोकाशींच्या कथा' या विषयावर बोलणार आहेत. नंतर सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. विजय तेंडुलकर यांच्या हस्ते पुरस्कार दिले जातील.

या कार्यक्रमाला सर्वांनी यावे ही विनंती.

**–मोकाशी मित्र मंडळ**

**कादंबरी**

| | | | |
|---|---|---|---|
| रु. ५००।– | प्रथम पुरस्कार | 'एन्कीच्या राज्यांत' | ले. विलास सारंग |
| रु. २५०।– | द्वितीय पुरस्कार | 'आत्मनेपदी' | ले. हेमा होले |

**कथा**

| | | | |
|---|---|---|---|
| रु. ५००।– | प्रथम पुरस्कार | 'मारवा' | ले. आशा बगे |
| रु. २५०।– | द्वितीय पुरस्कार | 'मांडियला खेळ' | ले. नीलिमा भावे |

**अंतर्देशीय प्रवासवर्णन**

| | | | |
|---|---|---|---|
| रु. २५०।– | द्वितीय पुरस्कार | 'काळ्या पाण्याची निळाई' | ले. वासंती घैसास |

या सर्व लेखकांचे मन:पूर्वक अभिनंदन.

MANOOS ( Marathi Weekly ) (Licensed to post without prepayment of postage No. 11) Regd. No. PNC--W 28




# तुमच्या आयुर्विमा पॉलिसीची मुदत पूर्ण होताच...

## कृपया डिस्चार्ज फॉर्मसह तुमची पॉलिसी आमच्याकडे पाठवा. त्यामुळे क्लेम अधिक जलद निकालात काढण्यास आम्हाला मदत होईल.

एलआयसी सामान्यतः मुदत पूर्ण होण्याच्या दिनांकाच्या किंवा हयातीच्या लाभाचा हप्ता लागू होण्याच्या दिनांकाच्या बरेच आधी डिस्चार्ज फॉर्म विमेदाराला पाठवते.

तो फार्म भरावयाचा, तुमची सही साक्षांकन करुन घ्यावयाची आणि तुमच्या पॉलिसीसह तो एलआयसीकडे तत्परतेने पाठवावयाचा एवढेच तुम्ही करावयाचे असते. तसे केलेत तरच आम्ही पैसे देय होण्याच्या दिनांकाआधीच, तुमच्या रकमेचा पुढील दिनांक टाकलेला चेक पाठवू शकतो.




**लक्षात असू द्या**

मुदतपूर्ती दिनांकापूर्वी तुम्हाला डिस्चार्ज फॉर्म मिळाला नसेल तर ताबडतोब कार्यवाही सुरु व्हावी म्हणून तुमच्या एजंटशी किंवा तुमच्या पॉलिसीबाबतची सेवा पाहणाऱ्या एलआयसीच्या शाखा कार्यालयाशी कृपया संपर्क साधा. तुमच्या घरी तुमच्या रकमेचा चेक अदा करण्यासाठी एलआयसी आपणाकडून शिकस्त करील.

कृपया तुमची पॉलिसी काळजीपूर्वक जपून ठेवा आणि तुमच्या पत्त्यात काही बदल झाल्यास आम्हाला कळवा. आपल्या सेवेसाठी आम्हांस आपले सहकार्य हवे.

लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन ऑफ इन्डिया

**३० वर्षे जनतेच्या सेवेत.**

LIC/CO/2-87 MAR